म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ५६८

# ल्हार जोशी

यांचें

# चरित्र

ना. म. पटवर्धन.

REFBK-0019256

मूल्य ४। रुपये

ठाणे

१८२५५

हें पुस्तक/नियतकालिक नवें असल्याकारणानें प्रत्येकास लवकर मिळावें अशी उत्कंठा असते; तरी तें घेतल्यापासून निदान ७/१४ दिवसांत परत करण्याची कृपा करावी.

चरित्र

# वामन मल्हार जोशी

यांचें

# चरित्र

ठाणे.
१९२५६

ना. म. पटवर्धन

REFBK-0019256

ठाणे.

मूल्य ४। रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणें २

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्‌एल. बी.

मुद्रक
विट्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# सादर समर्पण

नारायण मल्हार जोशी

यांस—

## आभार

या चरित्राची कल्पना सुचविण्यापासून तों तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यापर्यन्त ज्या ज्या व्यक्तींनीं व संस्थांनीं मला मोठ्या आपुलकीनें सर्वतोपरी सहाय्य केलें त्यांचा त्यांचा मी अत्यन्त आभारी आहें. वामनरावांसंबंधीं वाटत असलेल्या आदरामुळेंच त्यांनीं हें सहाय्य केलें असलें आणि माझ्या आभारांची त्यांनीं अपेक्षा केली नसली तरी मीं ते न मानणें म्हणजे कर्तव्यांत चुकण्यासारखेंच होणार नाहीं का? माझ्या या 'कर्त्या-करवित्या नारायणां'नीं व 'बोलवित्या धन्यांनीं' माझे हे आभार गोड करून घ्यावे येवढीच विनंति आहे.

दांड्या बाजार, बडोदें

**ना. म. पटवर्धन**

# ना. म. पटवर्धन यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | आमची दिवाळी | ०–६–० |
| २ | जगांतील मौजा | ०–६–० |
| ३ | जगांतील मुलें | ०-१०-० |
| ४ | जगांतील प्रमुख पिकें | ०–६–० |
| ५ | साम्राज्यांतील आपले संबंधी | ०-१०-० |
| ६ | वाङ्मयमाला पुष्प १ लें } (वा. म. जोशी | १–४–० |
| ७ | वाङ्मयमाला पुष्प २ रें } यांच्या सहकार्यानें ) | १–६–० |
| ८ | तिचें अखेरचें पत्र व अघोर अहंकार | १–०–० |
| ९ | आमच्या इंदूचें शिक्षण | १–०–० |
| १० | हितपत्रें | ३–०–० |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| १ फुलें आणि दगड | १॥। |
| २ घरट्याबाहेर | १॥। |
| ३ पहिलें प्रेम (आ. २ री.) | ३ |
| ४ जळलेला मोहर | ३ |
| ५ क्रौंचवध | ४ |
| ६ सायंकाल (आ. २ री.) | २॥ |
| ७ अविनाश | १॥। |
| ८ मंदाकिनी | १॥। |
| ९ सहा भाषणें | २ |
| १० कलिका | २। |
| ११ स्त्री आणि पुरुष | २ |
| १२ पांढरे ढग | ४। |
| १३ फुलें आणि कांटे | २। |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| १ अवशेष | २ |
| २ नागकन्या | २ |
| ३ माझी नभोवाणी | २ |
| ४ नवे संसार (जप्त) | ४ |
| ५ चंदनवाडी | ६॥ |
| ६ व्यक्तिरेखा | २। |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| १ तात्या भा. १ ला. | २॥ |
| २ तात्या भा. २ रा | ३ |
| ३ निवाडे भा. १ ला. | २॥ |
| ४ चकमकी | १॥ |
| ५ बच्चा नवरा | १॥ |
| ६ अनेक आशीर्वाद | ३॥ |
| ७ दाजी भा. १ ला | ३॥ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| १ आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| २ नवें भारूड | २ |
| ३ स्टेशनमास्तर | २ |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| १ पुनर्जन्म (आ. २ री) | ३ |
| २ आस्तिक | २॥ |
| ३ सोन्या मारुति! (आ. २री) | २ |

## दत्तु बांदेकर

| | |
|---|---|
| १ सख्याहरी | १॥। |
| २ नवी आघाडी | १॥ |
| ३ तूं आणि मी | २। |

## प्र. के. अत्रे

| | |
|---|---|
| १ साखरपुडा | १। |
| २ ललित वाङ्मय | ३॥ |

## द. र. कवठेकर

| | |
|---|---|
| १ अपुरा डाव | ३ |
| २ रेशमाच्या गांठी | ३ |

## वा. म. जोशी

| | |
|---|---|
| १ स्मृति-लहरी | २ |
| २ विचार-लहरी | २। |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### पु. य. देशपांडे

१ नवें जग ? २॥

### भाई बेके

१ रॅायचरित्र १॥

### प. ले. वि. स. खांडेकर

१ काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत

१ पारंब्या २

### लक्ष्मण० सरदेसाई

१ ढासळलेले बुरूज २

### प्रो. वि. ह. कुलकर्णी

१ व्यक्तिचित्रें २॥

### ना. ह. आपटे

१ फसगत १॥

### शकुंतला परांजपे

१ भिल्लिणीचीं बोरें ३

### कृष्णाबाई मोटे

१ मीनाक्षीचें जीवन २।

### र. गो. सरदेसाई

१ चलतीं नाणीं २

### रा. श्री. जोग

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

### ना. म. पटवर्धन

१ हितपत्रें ३

२ वा. म. जोशीचरित्र ४।

### वि. वि. बोकील

१ बेबीची बहीण ३

### सत्यग्राही

१ ग्रह आणि तारे ४॥

### अनंत काणेकर

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

२ पिकलीं पानें ( दु. आ. ) १॥

### काकासाहेब कालेलकर

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १॥

### य. दि. पेण्ढरकर

१ प्रापंचिक पत्रें ३

२ घायाळ २

### वि. म. भुस्कुटे


१ स्टॅलिन ३॥

### कमलाबाई टिळक

१ आकाशगंगा २॥

### रामतनय

१ साखरगोटी ५



चरित्रनायक
कै. वा. म. जोशी

लेखक
प्रि. ना. म. पटवर्धन

१०२५५



" प्रि. तात्यासाहेब यांनी गेलीं पंचवीस वर्षें प्राध्यापक, व मागील दोन वर्षें प्राचार्य म्हणून या कॉलेजची एकनिष्ठपणें बहुमोल सेवा केली. या कालांत त्यांनीं आपली अढळ कार्यनिष्ठा, उच्च विचार, मनमिळाऊ स्वभाव, व खिलाडू वृत्ति या गुणांमुळें सर्व निकटवर्तियांचा आत्यंतिक लोभ संपादन केला होता....या दुःखदायक घटनेमुळें मराठी वाङ्मयाची अतिशय हानी झाली आहे; परंतु त्यापेक्षांहि आमच्या या शिक्षणसंस्थेचें फारच नुकसान झालें आहे. "

( धों. के. कर्वे )

" मराठी साहित्यावर सौंदर्याचा साज चढविणारे अनेक कलावंत झाले आहेत व पुढें होतील. मराठी भाषेचें सामर्थ्य वाढविणारे अनेक धुरंधर लेखक होऊन गेले आहेत, पुढेंहि निर्माण होतील. पण...पण तिच्या साधुत्वाची पताका फडकविणारे साहित्यिक पूर्वींहि फार कमी झाले; आणि आतां पुढें ? वामनरावांची जागा लवकर भरून निघेल का ? "

( वि. स. खांडेकर )

" जिज्ञासा हें त्यांचें जीवन होतें; व ऋजुता, शुचिता, आणि निरिच्छता हा त्यांचा स्वभाव होता. आपल्या वाङ्मयाच्या वैपुल्यानें म्हणा, किंवा वैदग्ध्यानें म्हणा, मराटी साहित्याचे मानदंड झालेले साहित्यशौंड किंवा कलाकोविद आज महाराष्ट्रांत अनेक आहेत. पण आपल्या निर्मल आणि निस्पृह चारित्र्यानें वामनरावांनीं जी वादातीत आणि पक्षातीत मान्यता संपादन केली होती, तिला महाराष्ट्रांत उपमा नाहीं.

वामनरावांचें जीवन हा यज्ञ होता; त्यांचा मृत्यु ही त्या यज्ञांतील पूर्णाहुति आहे "

( ग. त्र्यं. माडखोलकर )

" बालमनाचे निरीक्षक, मानसमंथनाचे अभ्यासक, नि समतोल समीक्षक;

विचार–उच्चार व आचार या साऱ्यांची सुसंगति राखणारा आदर्श अध्यापक;

ईश्वराचें स्वरूप समजावून घेऊन ' सुशीलेच्या देवा 'च्या स्वरूपांत जनतेला सहज ओळख करून देणारे ललित लेखक;

राष्ट्रांतील आंदोलनें डोळ्याआड न करणारे; त्यांतील मर्म दाखवून प्रगतीचा मार्ग निश्चितपणें दाखविणारे साहित्यिक;

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा संकलनात्मक अभ्यास करून, जुन्या–नव्याचा संघर्ष ओळखून शिकवण देणारे समाज–शिक्षक;

' सर्वांभूतीं परमेश्वर ' ओळखणारे, हळुवार मनाचे सद्गृहस्थ,

प्राध्यापक वामनराव दिवंगत झाले ! पुण्यात्म्याला सद्गति मिळणारच!"

( ल. नी. छापेकर )

साहित्यिक, प्राध्यापक, गृहस्थ वगैरे नात्यांनीं वामनराव ही व्यक्ति किती मोठी होती हें वरील उद्गारांवरून दिसून येईलच. हे सर्व उद्गार विरहदुःखानें भारावलेल्या मनस्थितींतले आणि म्हणून स्वाभाविकतःच थोड्याशा अंधभक्तीचे व किंचितशा अतिरंजित स्वरूपाचे असले तरी येवढी गोष्ट निश्चित कीं गेल्या तीन तपांत महाराष्ट्रांत ज्या कांहीं थोर व विचारवंत व्यक्ति होऊन गेल्या त्यांचेमध्यें वामनरावांचा समावेश केल्यावांचून चालावयाचें नाहीं. कोणाहि व्यक्तीला–मग तिची महात्मता व लोकमान्यता कितीहि मोठी असो–स्वतः वामनरावांनीं कधीं देव मानलें नाहीं व तिचा उदो उदो केला नाहीं. आपल्यालाहि कोणीं देव म्हणलेलें व डोक्यावर चढविलेलें वामनरावांना आवडलें नसतें. साध्या त्यागाचें श्रेय घ्यावयालाहि जो गृहस्थ तयार नाहीं, आणि सौ. सुधाबाई जोश्यांसारख्या कोणा चहातीनें त्यांच्या उच्च चारित्र्याचा उल्लेख केला असतां "मानसशास्त्रदृष्ट्या मनांत वाईट विचार येऊं न देणें हें कठीण दिसतें, तेवढें वळण मी आपल्या मनाला लावूं शकलों नाहीं" असें निःशंकपणें उघड उघड म्हणतो त्याला आपल्याला कोणीं देव, विभूति वगैरे म्हटलेलें कसें खपेल? तेव्हां आपणहि वामनरावांना कोणीतरी अतिमानुषकोटींतील कल्पून त्यांच्यावर सर्व सद्गुणांचा आरोप करणें बरें होणार नाहीं. वामनराव मूलतः व वृत्तितः मानवकोटींतले असून मनुष्यमात्रांत सामान्येंकरून दिसून येणारे सर्व गुण-दोष त्यांचेहि ठिकाणीं होते. हे गुणदोष कोणकोणते होते, वामनरावांचे ठिकाणीं ते तसे असूनहि इतरांपेक्षां त्यांचेमध्यें विशेष असें काय होतें हें सांगावें; तें सांगत असतांना होणाऱ्या आनंदाचा स्वतः उपभोग घ्यावा; त्याच्या मननानें सत्कर्माची स्फूर्ति मिळवावी; दुसऱ्यांनाहि तो आनंद व ती स्फूर्ति मिळवून देण्याला थोडें-फार कारणीभूत व्हावें; वामनरावांचें जीवितकार्य–जें साहित्य तें आस्वादयुक्त समजण्यास होईल तें साह्य करावें अशा निरनिराळ्या हेतूंनीं हें लिखाण लिहिण्यास लेखक उद्युक्त झाला आहे. हे सर्व हेतु अल्प प्रमाणांत जरी साध्य झाले, व वाचणारांना वामनरावांच्या व्यक्तिमत्त्वाचें वास्तविक दर्शन थोडेसें जरी घडलें तरी लेखकाला कृतार्थ झाल्याचें समाधान होईल.

'हें लिखाण लिहिण्यास लेखक उद्युक्त झाला आहे' असें वर थोड्याशा ऐटीनें म्हटलें खरें. पण तें तितकेंसें बरोबर नाहीं. कारण त्यांत 'लेखकाचें' स्वतःचें असें फारसें नसून वामनरावांचे जे कोणी आप्त-इष्ट, स्नेही–सोबती वगैरे आहेत त्या सर्वांचें–व विशेषतः वामनरावांच्या विद्यार्थिनींचेंच–सर्व कांहीं आहे. खरें म्हणजे

वामनरावांच्या पहिल्या वर्षश्राद्धाचे निमित्तानें 'त्यांच्या' म्हणविणाऱ्या आम्हीं सर्वांनीं त्यांचे चरणीं आदरानें अर्पण केलेली ही शब्दतिलांजली आहे येवढें म्हटलें म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें.

आतां जास्त कांहीं न सांगतां वामनरावांच्या चरित्राकडे वळावें हेंच चांगलें.

वामनरावांचें संबंध नांव वामन मल्हार जोशी असें होतें. 'जोशी' हें आडनांव विशेषेंकरून कोकणस्थांत असतें यामुळें, व वऱ्याचशा कोकणस्थ कुटुंबांशीं वामनरावांचे नात्याचे संबंध जडल्यामुळें पुष्कळांना ते कोकणस्थ वाटत. उलट, त्यांचा सढळ हात व गैरशिस्त कारभार पाहून 'तरी आम्ही म्हणतच होतों कीं ते देशस्थ असले पाहिजेत. झालें कीं नाहीं खरें?' असेंहि कांहींजण फुशारकीनें विचारीत. वामनरावांची 'सर्वांशीं मैत्री' पाहून त्यांच्या अत्रि गोत्राबद्दल मात्र कोणालाच शंका वाटत असल्याचें दिसत नसे. त्यांच्या ब्रह्मकुलोत्पन्नत्वाबद्दलहि लोक असेच निःशंक असत. पण त्यांच्या या निःशंकतेला उगीचच धक्का देण्याकरितां स्वतः वामनरावच एकादे वेळीं विचारीत 'अहो, ब्राह्मण कशावरून? जोशी हें आडनांव फक्त ब्राह्मणांचेंच असतें असें नाहीं. आमच्या कोकणांत महारांचेंहि असतें. आणि माझें दास्य लक्षांत घेतां मला तीच जात जास्त शोभली असती.' कुल, जात, गोत्र वगैरेसंबंधीं लोकांच्या किंवा वामनरावांच्या कांहींहि कल्पना व अर्थ असोत, येवढें निश्चित कीं शब्दांच्या रूढार्थांनीं ते वर्णानें ब्राह्मण, जातीनें देशस्थ, व गोत्रानें अत्रि होते.

वामनरावांच्या चरित्राची सामुग्री जमविली जात आहे असें ऐकून माझ्या एका ज्योतिषिमित्रानें 'वामनरावांची कुंडली मिळाली का, नसल्यास त्यांची जन्मतिथि व जन्मकाल कळवा, कुंडली फुकट तयार करून पाठवितों' असें मोठ्या घरोब्यानें मला लिहिलें. पण 'वामनराव व कुंडली' हें कसें तरीच वाटल्यानें, आणि ग्रहवर्तित व प्रत्यक्ष वृत्त यांचा मेळ बसला नाहीं तर काय घ्या अशी भीति वाटल्यानें मीं माझ्या ज्योतिषिमित्राला अद्याप कांहींच कळविलें नाहीं. 'वामनरावांच्या चरित्राचे बाबत आपल्या हातून दुसरें कांहींच साध्य होण्यासारखें नाहीं याचें वाईट वाटूनच कीं काय माझ्या एका तरुण मित्रानें मोठ्या भाविकपणें मला हस्तलिखिताकरितां कोरे कागद फुकट दिले. तरुण मित्रानें कागद देणें व ज्योतिषिमित्रानें कुंडली देऊं करणें हीं दोन्हींहि त्या दोघांना वामनरावांबद्दल किती आदर व आपलेपणा वाटतो हेंच दाखवीत नाहींत काय?

वामनरावांच्या वंशवृक्षाचीं मूळें किती खोलवर गेलीं आहेत हें खणून पाहण्याचें येथें प्रयोजन नाहीं. वर पृष्ठभागावर दिसतील तेवढींच पाहिलीं तरी पुरें आहे. वामनरावांचे पूर्वज देशावर–पुणें जिल्ह्यांतील रायरी गांवीं रहात असून ते तेथें भिक्षुकी, याज्ञिकी व ‘ जोसपणा’ची वृत्ति करीत; आणि या कारणानें ते ‘ रायरीकर जोशी ’ अशा जोड नांवानें ओळखले जात. रायरीकर जोश्यांपैकीं कोणता पुरुष प्रथम देशावरून खालीं कोकणांत उतरला, व त्याला असें देशान्तर करण्याला काय कारण घडलें हें नक्की सांगतां येत नाहीं. वामनरावांचे खापरपणजे गोरेगांवास आले व तेथेंच स्थायिक झाले. येथपासूनची माहिती मात्र सुसंगतपणें मिळते. वामनरावांचे आजोबा बाळ ( बल्लाळ ) जोशी यांनीं आपलें बस्तान बसवून आजोबांच्या व वडिलांच्या वृत्तींत, विद्येंत व कीर्तींत बरीच भर घातलेली दिसते; कारण याज्ञिकीच्या जोडीला त्यांनीं ज्योतिषाचाहि चांगला अभ्यास केलेला दिसतो. शेवटीं शेवटीं त्यांनीं संन्यास घेतला होता.

वामनरावांच्या वडिलांचें नांव मल्हार असून त्यांस एरवीं ‘ नथु जोशी ’ असें म्हणत. एक चांगले ज्योतिषी म्हणून त्यांचीहि आपल्या वडिलांप्रमाणें फार प्रसिद्धि असून परप्रांतांतले कितीतरी विद्यार्थी त्यांचेकडे रहावयास येत व ज्योतिष शिकून जात. पहिलें कुटुंब निवर्तल्यावर नथु जोश्यांनीं शेजारच्या ‘ तळें ’ गांवच्या जोश्यांच्या मुलीशीं विवाह केला. तळ्याच्या जोश्यांची ही मुलगी म्हणजेच आपल्या वामनराव जोश्यांची आई. हीं दोन्ही घराणीं नांवानें व वृत्तीनेंहि एकच होतीं. नथु जोशी वयाच्या साठाव्या वर्षी म्हातारपणाच्या क्षयामुळें वारले. त्यांना पहिल्या कुटुंबापासून एक व दुसऱ्यापासून सात अशीं आठ अपत्यें झालीं.

वामनरावांचा जन्म ‘ तळें ’ मुक्कामीं आपल्या आजोळीं सन १८८२ मध्यें जानेवारी महिन्याच्या एकविसाव्या तारखेस झाला. ते आपल्या आईचें शेवटचें अपत्य असून त्यांस दोन भाऊ व चार बहिणी अशीं एकंदर सहा सख्खीं भावंडें होतीं. पहिले सावत्र बंधु वासुदेवराव ऊर्फ भाऊ यांनीं आपली उभी हयात कोकणांत घालविली. त्यामुळें त्यांचा व इतर बंधूंचा फारसा संबंध येत नसला तरी ते परस्परांशीं मोठ्या आपुलकीनें वागत. एकुलत्या एका मुलाला पाण्यांत बुडून मृत्यु आल्यामुळें विरक्तता प्राप्त होऊन भाऊंनीं काशीस जाऊन राहण्याची इच्छा दर्शविली व तिघांहि भावांनीं मोठ्या आनंदानें गोरेगांवची आपली सामायिक शेती विकून टाकून आलेली सर्व रक्कम भाऊंचे स्वाधीन केली. पण काशीवासास कंटाळून

भाऊ फिरून गोरेगांवीं येऊन राहिले, व तेथेंच पुढें १९३० साली वारले. ते पुण्या मुंबईकडे क्वचितच येत. पण वामनराव मात्र वर्षादोन वर्षांनीं गोरेगांवीं त्यांच्या समाचारास जात; व त्यांचें जुन्या वळणाचें मन आपल्या कोणत्याहि कृत्यामुळें दुखावलें जाऊं नये अशी दक्षता घेत. डोक्यावर राखलेले केस–केवळ भाऊंना बरें वाटावें म्हणून–ते काढून टाकीत, व धावळी नेसून देवाची पूजाहि करीत. उलट भाऊहि पण आपल्या वामनाचें धोतर स्वतः धुऊन त्याच्या प्रेमाची परतफेड करीत. वामनरावांची आधुनिक विद्वत्ता, त्याग वगैरे भाऊंना फारसें कांहीं कळत नसलें तरी हा कोणी तरी मोठा आहे असें कौतुक त्यांस वाटल्यावांचून रहात नसे. भाऊंची पत्नी ही एक बोलभांड व तक्रारखोर बाई म्हणून शेजाऱ्यापाजाऱ्यांत गाजलेली होती. पण तिच्या तक्रारी शान्तपणें व सहृदयतेनें ऐकून घेऊन व वेळीं पत्रावळी वगैरे लावून वामनराव तिचीहि मर्जी राखीत. नवऱ्याचे मागून थोड्याच दिवसांत याहि बाई वारल्या..

वामनरावांचे दुसरे बंधु माधवराव ऊर्फ अण्णा. ते लहानपणापासूनच हुशार व तरतरीत विद्यार्थी होते. मराठी सहावी इयत्ता पुरी करून ते व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेकरितां अलिबागेस गेले होते. पण वय कमी भरल्यामुळें त्यांस पहिल्या वर्षी परीक्षेस बसूं दिलें नाहीं. दुसऱ्या वर्षी परीक्षा पास झाले, तेव्हां गोरेगांवच्या शाळेचे हेडमास्तर रा. फडके यांनीं त्यांस इंग्रजी शिकण्याची कल्पना सुचविली. त्याप्रमाणें ते रोहें येथें त्यांची एक आत्या होती तिच्याकडे राहून तेथील मिशन-ऱ्यांच्या इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. पण पुढें लवकरच ( १८८७ ) वरच्या मंड-ळीस कांहीं एक न कळवितां सवरतां ते तेथून पुण्यास गेले, व वारानें राहून तेथें नुकत्याच स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इंग्रजी ५ वींत दाखल झाले.

त्या वेळीं पुण्याची राहाणी स्वस्त, साधी व चैनीचे मोह कमी या योगानें कमी खर्चाची असल्यामुळें, व महाड–गोरेगांव या भागांतील लोकांना वरंधा घाटानें पुणें नजीक वाटत असल्यामुळें गरीब पण हुषार व महत्त्वाकांक्षी मुलगे दुय्यम व उच्च शिक्षणासाठीं पुण्यास जात असत. मोने, उपाध्ये वगैरे कुटुंबांतील होतकरू मुलगेहि माधवरावांप्रमाणें याच सुमारास पुण्यास इंग्रजी शिकण्याकरितां गेले होते. भिक्षुकी वृत्तीच्या नथु जोश्यांना आपल्या मुलाचें हें करणें आवडणें शक्य नव्हतें; तथापि कांहीं दिवसांनीं त्यांचा राग कमी होऊन ते माधवरावांना पैसे वगैरे पाठवूं लागले. माधवरावांना आतां शाळेंत शिष्यवृत्तीहि मिळूं लागली होती. वडील वारले त्या

वेळीं माधवराव मॅट्रिकच्या परीक्षेपर्यन्त आले होते. मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृताकरितां ठेवलेली पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळवून ते फर्ग्युसन् कॉलेजमध्यें गेले; तेथें पहिल्या दोन्ही परीक्षांत उत्तम प्रकारें पास होऊन त्यांनीं संस्कृतकरितां ठेवलेलीं सर्व पारितोषिकें मिळविलीं; पण फेलोशिप मिळावी म्हणून ते डेक्कन कॉलेजमध्यें गेले व तेथूनच बी. ए. व एम्. ए. झाले. याहि परीक्षांत संस्कृत विषयाचीं सर्व पारितोषिकें वगैरे मिळवून ते उत्तम प्रकारें पास झाले. माधवरावांची हुशारी व कर्तबगारी लक्षांत घेतां त्यांस तेथेंच किंवा दुसऱ्या एखाद्या सरकारी संस्थेंत मोठ्या मानाची व पगाराची जागा मिळावयाची. पण त्यांचा मानी स्वभाव व राष्ट्रीय वृत्ति वरिष्ठांना न खपल्यामुळें त्यांना कोणत्या तरी खाजगी संस्थेकडेच वळावें लागलें. १८९८ पासून १९०२ पर्यन्त माधवरावांनीं नगर येथील सोसायटीचे हायस्कुलांत हेडमास्तर म्हणून काम केलें. तेथून ते जुनागडला गेले, व तेथील बहुद्दीन कॉलेजमध्यें संस्कृतचे प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. सुमारें पंचवीस वर्षें तेथें काम करून व विद्यार्थ्यांचें प्रेम आणि लोकांकडून कीर्ति संपादून ते १९२८ सालीं सेवानिवृत्त झाले, व हिंगण्यास वामनरावांकडे येऊन राहिले. पण पेन्शन्चें सुख लाभण्यापूर्वींच ते तेथें मृत्यु पावले.

वामनरावांचे तिसरे थोरले बंधु नारायणराव ऊर्फ नाना. वडील वारले त्या वेळीं नाना मराठी सहावे इयत्तेंत होते. घरची जोशीपणाची वृत्ति बरीच मोठी असल्यामुळें आपणा एकट्याला ती झेपणार नाहीं असें वाटून भाऊंनीं नारायणाला शाळेंतून काढून वेदपठणांत घातलें. तें त्यांनीं सुमारें तीन वर्षें करून तेवढ्या अवधींत संहितेपर्यन्त मजल मारली होती. परंतु माधवरावांना तें पसंत न पडून त्यांनीं नानांना पुण्यास आणलें व करंदीकर, लवाटे वगैरे आपल्या मित्रांनीं चालविलेल्या न्यू प्रिपेरेटरी क्लासेसमध्यें त्यांस घातलें. वर्षा दीड वर्षांत तेथें इंग्रजी चार इयत्ता पुऱ्या करून नाना न्यू इंग्लिश स्कूलमध्यें गेले व तेथूनच पुढें मॅट्रिक झाले. पुढें ते डेक्कन कॉलेजमध्यें गेले व चार वर्षांत बी. ए. झाले. नंतर सुमारें सहा वर्षें नगर व पुणें येथील खाजगी शाळांत आणि मुंबई व रत्नागिरी येथील सरकारी शाळांत त्यांनीं शिक्षकाचें काम केलें. मुंबईस एल्फिन्स्टन हायस्कुलांत असतांना त्यांनीं सेकंडरी टीचर्स सर्टिफिकेट परीक्षा देऊन शिक्षकाच्या धंद्याचें सर्टिफिकेट मिळविलें व त्याच धंद्यांत स्थिर व्हावयाचा बेत केला. नाना सरकारी नोकरींतच शेवटपर्यन्त राहिले असते तर आज ते दोन-तीनशें

रुपये पेन्शन मिळवीत पुणें, नाशीकसारख्या ठिकाणीं स्वतःच्या बंगल्यांत आरामशीर रहात असलेले दिसले असते. पण योग निराळा असल्यामुळें ते शिक्षणखात्यांत न राहतां नामदार गोखल्यांनीं पुणें येथें काढलेल्या भारत सेवक समाजास १९०९ सालीं जाऊन मिळाले व तेथें त्यांनीं स्वतःला मजूरसंघटनेच्या कामीं वाहून घेतलें. १९१६ सालीं लढाईचे दिवसांत ते ज्ञानप्रकाशचे प्रतिनिधि म्हणून मेसापोटेमियांत जाऊन आले. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे ते आज चोवीस वर्षं सभासद असून ज्येष्ठत्वाच्या नात्यानें 'फादर ऑफ असेंब्ली' या मानाच्या पदवीस पात्र झाले आहेत. राऊंड टेबल कॉन्फरन्स्, मजूर परिषद वगैरे निरनिराळ्या निमित्तांनीं ते सुमारें सोळा वेळां युरोपला व एक वेळ अमेरिकेला जाऊन आले आहेत. हिंदी मजुरांची व कामगारांची दुःस्थिति तिकडील पुढाऱ्यांपुढें मांडून व प्रसंगीं त्यांच्याशीं भांडून त्यांनीं त्यांना बरीचशी सुस्थिति प्राप्त करून दिली आहे. या त्यांच्या कामगिरीमुळें ते केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर सबंध जगांत प्रसिद्धि पावले आहेत. ते हल्लीं भारत सेवक समाजांतून निवृत्त झाले असले व त्यांच्या वयाची पासष्टी चालू असली तरी त्यांचीं पूर्वीचीं सर्व कामें पूर्वीच्याच जोमानें चालू आहेत.

सदरहु तिघां भावांशिवाय आणखी चार मोठ्या बहिणीहि वामनरावांना होत्या. पैकीं पहिल्या दोघी माधवरावांपेक्षां थोरल्या असून दुसऱ्या दोघी त्यांच्या पाठच्या होत्या. त्या सर्व जणी अगोदरच वारल्यामुळें वामनरावांना भावंडांपैकीं एकटे नानाच काय ते शेवटपर्यन्त राहिले. आपल्या या सर्व भावंडांबद्दल वामनरावांना किती आदर व प्रेम वाटत असत हें त्यांच्या एकाच उद्‌गारावरून दिसून येतें. ते म्हणतात : "माझी आई, माझ्या बहिणी व भाऊ ही मंडळी फार प्रेमळ असल्यामुळें व माझें लहानपणचें कौटुंबिक आयुष्य फार सुखांत गेल्यामुळें मुलाबाळांनीं व इतर माणसांनीं गजबजलेल्या कौटुंबिक जीवनाची मला मनापासून आवड आहे. माझ्या लेखनांत स्त्रियांच्या विषयीं आदरभाव व सहानुभूतिहि दिसून येत असावी अशी माझी कल्पना आहे. याचें मूळ पाहूं गेल्यास लहानपणीं माझी आई व माझ्या बहिणी व मोठेपणीं याशिवाय माझी पत्नी, भावजया वगैरे नातलग मंडळी (व अलीकडे १५–१६ वर्षें माझ्या विद्यार्थिनी) यांच्या सहवासांत मला जे त्यांच्या सात्विक स्वभावाचे हरतऱ्हेचे अनुभव आले त्यांत सांपडेल. हे अनुभव जर कटु असते तर माझें लिखाण निराळ्या प्रकारचें झालें असतें अशी माझी खात्री आहे."

वामनरावांचा जन्म १८८२ सालीं तळें मुक्कामीं त्यांच्या आजोळीं झाल्याचें वर

सांगितलेंच आहे. त्यांचें सर्व लहानपण त्यांच्या गोरेगांवच्या घरांत गेलें. घर तळ्याच्या पाळीवर जुन्या पद्धतीचें एक मजली होतें. घराणें भिक्षुकी वृत्तीचें असलें तरी वृत्ति मोठी म्हणजे ऐशी एक गांवांची असून भरीला सुमारें दहा खंडी मक्ता येईल येवढी भाताची शेती होती. वृत्ति मक्त्यानें दिली असतां त्या वेळीं वर्षाकांठीं चार-पांचशें रुपये सहज आले असते. त्यामुळें घरांत खाण्या-पिण्याची कसलीहि ददात नव्हती. दाराशीं गाई-म्हशी असून दूधदुभतेंहि बरेच असे. गोरेगांव दोन-अडीच हजार वस्तीचा लहानसाच गांव असला तरी गुजर व ब्राह्मण मिळून ४०-५० घरें चांगलीं सुखवस्तु असल्यानें जोसपणापासूनची प्राप्ति चांगली असली पाहिजे.

वामनरावांच्या मराठी पांच इयत्ता गोरेगांव येथील मराठी शाळेंत दातार हेडमास्तरांचे हाताखालीं झाल्या. मोने, मराठे वगैरे आतांची मोठी गांवकरी मंडळी वामनरावांची त्या वेळची सहाध्यायी होत. वामनरावांची मुंज वडील वारल्यानंतर दोन वर्षांनीं झाली. पुढें लवकरच ते पुण्यास गेले. त्यामुळें संध्येपलीकडे ते दुसरें कांहीं शिकले असावेत असें वाटत नाहीं. नानांची शिकण्याची मजल नित्यब्रह्मकर्म संपवून संहितेपर्यन्त गेली असतां वामनराव मात्र संध्येपुढें जाऊं नयेत हें जरा चमत्कारिक दिसतें. खेड्यांत राहणारे मुलगे लगोऱ्या, विटीदांडू, खो खो, आट्यापाट्या वगैरे जे खेळ सामान्यतः खेळतात, तेच खेळ नाना व वामनराव त्या वेळीं खेळत. घरासमोर एक मोठें तळें असल्यामुळें थोडें-फार पोहणेंहि येत असलें पाहिजे.

माधवराव स्वतः डेक्कन कॉलेजच्या रेसिडेन्सींत रहात असले तरी आपल्या भावांच्या शिक्षणाची व राहण्याची नीट सोय व्हावी म्हणून त्यांनीं पुण्यास नारायण पेठेंत डोलकर आळींतील दामल्यांच्या वाड्यांत भाड्यानें जागा घेतली आणि आई, बायको, नाना व वामनराव यांस आणवून स्वतंत्र बिऱ्हाड थाटलें. वामनरावांचें इंग्रजी सात इयत्तांपर्यन्तचें शिक्षण सदाशिव श्रीधर करंदीकर यांनीं काढलेल्या न्यू प्रिपेरेटरी क्लासेसमध्यें झालें. हल्लींच्या नूतन मराठी विद्यालयाचे जागीं पूर्वी खासगीवाल्यांचा जुना वाडा होता त्यांत हे वर्ग भरत असून शंकरराव लवाटे, लक्ष्मणराव पांगारकर यांसारखी मोठमोठी मंडळी तेथें शिकवीत असत. या मंडळीपासून आपणांला वाङ्मयाची आवड व उच्च कार्याची स्फूर्ति बरीच मिळाली असें वामनराव नेहमीं म्हणत. याच सुमारास ( १८९८ ) माधवराव एम्. ए. पास होऊन अहमद-

नगरास सोसायटीच्या हायस्कुलावर हेडमास्तर म्हणून गेले. अर्थात् वामनरावहि त्यांचेबरोबर तेथें जाऊन मॅट्रिकच्या वर्गांत दाखल झाले. डॉ. पां. दा. गुणे, पां. म. चापट यांसारखी मंडळी त्यांचे सहाध्यायी होते. याच शाळेंतून ते १९०० सालीं मॅट्रिक झाले. परीक्षेंत त्यांचा नंबर बराच वर येऊन त्यांना स्कालरशिप मिळाल्यामुळें ते डेक्कन कॉलेजांत गेले. पुढच्याहि सर्व परीक्षांत दुसऱ्या वर्गांत पास होऊन त्यांनीं शिष्यवृत्त्या मिळविल्या. त्यांना चारी वर्षें अनुक्रमें रु. १०, १५, १५, २० अशा शिष्यवृत्त्या मिळत असत. १९०४ मध्यें बी. ए. झाल्यावर त्यांना फेलो नेमण्यांत आलें. १९०६ मध्यें ते तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेऊन एम्. ए. झाले, व त्याहि परीक्षेंत त्यांनीं दुसरा वर्ग मिळविला.

मध्यंतरीं म्हणजे १९०२ सालीं वामनराव इंटरच्या वर्गांत असतांना त्यांचा विवाह गुळसुंदे येथें राहणाऱ्या जोशी कुटुंबांतील एका मुलीशीं झाला.

एम्. ए. झाल्यावर पुढें काय करावें याचा विचार वामनराव करूं लागले. मी रजेवर जाणार असून रजेच्या मुदतींत मी तुमची तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसरच्या जागेकरतां शिफारस करीन असें शार्पसाहेब वामनरावांपाशीं बोलले होते. पण तें तेवढेंच राहिलें. सेल्बीसाहेबांच्या वशिल्यानें पोस्टासारख्या सरकारी खात्यांत वामनरावांना वड्या पगाराची एकादी नोकरी मिळण्यासारखी होती. पण त्यांना तसली नोकरी नको होती. फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून येण्याबद्दल प्रि. परांजपे, प्रो. भाटे वगैरे मंडळींनीं वामनरावांना आग्रह चालविला होता. त्यांचेहि मनांत तसें येऊं लागलें होतें. पण मध्यंतरीं ते कॉंग्रेसचें अधिवेशन पाहण्याकरितां म्हणून कलकत्त्यास गेले आणि परत आले ते विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयास आजन्म वाहून घेण्याचें मनाशीं ठरवूनच आले. १९०६ सालचें हें अधिवेशन दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं चांगलेंच गाजलें. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या प्रसिद्ध चतुःसूत्रीची घोषणा प्रथम येथें करण्यांत आली. विजापूरकर या अधिवेशनास हजर होते. त्यांनीं आपली राष्ट्रीय शिक्षणाची योजना पुढें मांडतांच वामनरावांच्या ध्येयप्रवण व संस्कारक्षम मनानें तिचा तत्काळ स्वीकार केला; व कलकत्त्याहून परत येतांच समर्थ विद्यालय त्या वेळीं कोल्हापुरास होते तेथें जाऊन ते कामावर रुजूहि झाले. वामनरावांचे पूर्वीच ज. स. करंदीकर, राजारामबापू देसाई वगैरे मंडळी विजापूरकरांना मिळून समर्थ विद्यालयांत शिकविण्याचें काम करूं लागली होती. शिक्षकाच्या कामाशिवाय दुसरीहि एक कामगिरी वामनरावांकडे

आली, आणि ती म्हणजे विजापूरकरांनीं ' विश्ववृत्त ' नांवाचें एक मासिक अगोदरच सुरू केलें होतें त्याच्या संपादनाची; या मासिकांत पं. सातवळेकर यांचा ' वैदिक धर्माची तेजस्विता ' या नांवाचा एक लेख छापण्यांत आला. संशयानें घेरलेल्या त्या काळच्या वातावरणांत सरकारला त्या लेखांत राजद्रोहाचा वास आला, आणि खुनाला उत्तेजन देण्याच्या आरोपावरून मुद्रक म्हणून विनायकराव जोशीराव, आणि जोड संपादक म्हणून विजापूरकर व वामनराव यांस कैदेच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. वामनरावांना झालेली शिक्षा सर्वांत जास्त कठोर म्हणजे तीन वर्षांची व सक्तमजुरीची होती. १९११ च्या जूनचे सुमारास वामनरावांची आई जुनागड मुक्कामीं वारली व पुढें चार महिन्यांनीं आक्टोबरमध्यें त्यांची तुरुंगांतून सुटका झाली. पण मध्यंतरीं समर्थ विद्यालय व विश्ववृत्त हीं दोन्हीं बंद पडलीं, आणि आतां पुढें काय करायचें असा प्रश्न पुन्हां एकदां वामनरावांपुढें उभा राहिला.

अर्थात् उपजीविकेकरितां जुळेल तेथें व मिळेल तो कांहीं तरी व्यवसाय पाहणें जरूरीचें होतें. १९११ पासून पुढचीं सहासात वर्षें एकंदरींत अस्थिरतेंतच गेलीं. पहिले कांहीं दिवस वामनरावांनीं आर्यभूषण छापखान्यांत इंग्रजी-मराठी कोषाचें काम केलें; पुढें दोन-एक वर्षें ' मराठा ' वर्तमानपत्राच्या संपादकीय कामांत घाल-विलीं, व नंतर मुंबईस अच्युतराव कोल्हटकर यांनीं सुरू केलेल्या मेसेज नांवाच्या इंग्रजी दैनिकाचें संपादन केलें. पण या धंद्याला अवश्य लागणारा पक्षाभिनिवेश वामनरावांत पुरेशा प्रमाणांत नसल्यामुळें तो धंदा त्यांना जुळण्यासारखा नव्हता. शिवाय पैशाची हलाखीहि कमी होईना; आणि म्हणून शेवटीं आयुष्यांत स्थिर व्हावयाचें या इच्छेनें वामनरावांनीं हिंगणें येथील प्रो. कर्वे यांच्या अनाथ बालिका-श्रम संस्थेस मिळण्याचें ठरविलें व १९१८ च्या जूनमध्यें ते तेथील महिलापाठशाळा कॉलेजांत प्रोफेसर म्हणून रुजू झाले. वामनरावांच्या आयुष्याचीं हीं सहा सात वर्षें नोकरीच्या दृष्टीनें अस्थिरतेंत गेलीं असलीं तरी त्यांचें महत्त्वाचें लेखनकार्य याच काळांत झालें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नीतिशास्त्रप्रवेशाचीं कांहीं प्रकरणें, साक्रेटिसाचे संवाद, नवपुष्पकरंडक, विचारविलास, रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी वगैरे लहान-मोठीं पुस्तकें त्यांनीं याच काळांत लिहिलीं.

नोकरीच्या शाश्वतीच्या दृष्टीनें हिंगणें येथील पुढचें आयुष्य एकदरीनें स्थिरतेचें गेलें असलें तरी तें निर्भेळ सुखाचें मात्र जावयाचें नव्हतें. हिंगण्यास येऊन राहि-ल्यास थोडे महिने झाले नाहींत तोंच वामनरावांची पत्नी निवर्तली, आणि चारी

लहान मुलांच्या संगोपनाचा भार त्यांचेवर पडला. पुढच्याच वर्षी त्यांना अनाथ बालिकाश्रम संस्थेच्या आजन्मसेवकाची दीक्षा देण्यांत आली. पुढील सात—आठ वर्षांत शिकवण्याच्या कामाशिवाय वामनरावांनीं थोडेंबहुत लेखनकार्यहि केलें. १९२७ मध्यें महिलाश्रम हायस्कूलचे मुख्याध्यापक रा. मोडक हे सोलापुरास गेल्यामुळें त्यांचे जागीं वामनरावांना नेमण्यांत आलें. १९२८ मध्यें वामनरावांचे थोरले बंधु अण्णा हे मृत्यु पावले व त्यांना कौटुंबिक दुःखाचा आणखी एक तडाका बसला. १९३० मध्यें वामनरावांनीं सुशीलेचा देव ही कादंबरी लिहून संपविली. याच वर्षी मडगांव गोवें येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान वामनरावांना मिळून त्यांची सबंध बृहन्महाराष्ट्रभर साहित्यिक म्हणून प्रसिद्धी झाली. १९३४ मध्यें त्यांनीं इंदु काळे व सरला भोळे ही पत्रात्मक कादंबरी प्रसिद्ध केली. याच वर्षी ते महिलाश्रम हायस्कुलाच्या मुख्याध्यापकाच्या कामांतून मुक्त झाले.

वामनराव मुख्याध्यापक असतांना त्यांनीं आपल्या शाळेच्या उन्नतीसाठीं अतोनात प्रयत्न केले. लेखन, संभाषण वगैरे मार्गांनीं विद्यार्थिनींचा मातृभाषेचा अभ्यास सकस केला; प्रार्थना, बागकाम इत्यादि साधनांनीं त्यांचें सर्व सामान्य ज्ञान वाढवून त्यांचे मनांत निसर्गाबद्दल आवड उत्पन्न केली; खेळाचे योगानें विद्यार्थिनींचे अंगीं खिलाडु वृत्ति बाणविली; सहलींचे योगानें स्वावलंबन, कष्टाळूपणा, मिळूनमिसळून वागणें इत्यादि संवयी त्यांनीं त्यांना लावल्या—थोडक्यांत म्हणजे आधुनिक पद्धतीनें चालविलेल्या शिक्षणसंस्थांत जें जें म्हणून करण्यांत येतें तें तें वामनरावांनीं शक्य तेवढ्या प्रमाणांत आपल्या आमदानींत केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. या सर्वांचा परिणाम म्हणून स्वाभाविकपणेंच विद्यार्थिनींची संख्या वाढून शाळेच्या लौकिकांतहि भर पडली.

यापुढें वामनरावांना हिंगण्याच्या शाळेंत फारसें कांहीं काम न उरल्यामुळें व कौटुंबिक सोयीचे दृष्टीनें त्यांना गांवांत बिऱ्हाड करणें जरूरीचें वाटूं लागल्यामुळें ते पुण्यांत डेक्कन जिमखान्यावर रहावयास गेले. कॉलेज व गांव हीं जवळ येणार असलीं तरी हिंगणें व हिंगण्याची मंडळी दुरावणार याचें वामनरावांना अतिशय वाईट वाटलें. हा सर्व संवयीचा परिणाम आहे, कांहीं दिवसांनीं गांवांतहि आपल्याला हिंगण्यांतल्या इतकेंच बरें वाटूं लागेल अशी मनाची समजूत करून घेऊनच वामनरावांनीं आपलें घोंटाळणारें पाऊल हिंगण्यांतून बाहेर काढलें असावें असें वाटतें. निरोप घेऊन निघण्याच्या क्षणीं त्यांची दृष्टि कशी झाली असेल, त्यांचे मनाला किती यातना झाल्या

असतील, हिंगण्याच्या मंडळींना—विशेषतः त्यांच्या चाळकरांना वामनराव तेथून निघालेले पाहून कसें भडभडून आलें असेल इत्यादि गोष्टी पाहावयाला मिळाल्या नाहींत हेंहि एका दृष्टीनें बरेंच झालें म्हणावयाचें. प्रभु रामचंद्र अयोध्या सोडून वनवासाला निघाले असतांना जो प्रकार तेथें झाला तसाच कांहींसा येथेंहि झाला असावा.

डेक्कन जिमखान्यावरील वास्तव्याची वास्तविक व यथातथ्य कल्पना वामनरावांचे पुतणे प्रो. त्र्यंबक महादेव जोशी यांनीं आपल्या पत्रांत दिली असून पत्रांतील तो भाग जशाचा तसाच देत आहें:—“ १९३४ च्या जून महिन्यांत तात्या हिंगणें सोडून गांवांत राहावयास आले व त्याच वेळीं माझी फर्ग्यूसन कॉलेजांत असिस्टंट् प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. आम्ही पहिल्या वर्षी डेक्कन जिमखान्यावर मेहेंदळे यांचे बंगल्यांत रहात असूं. पुढचीं पांच वर्षे प्रा. चिंतामणराव देवधर यांच्या बंगल्यांत काढलीं. तात्या, शकू, पुंडू व मी असे चौघेजण एकत्र रहात असूं. एकंदरीनें पाहतां ते दिवस आमचे सुखाचे गेले असें आतां वाटतें ! असें वाटण्यास कोणतेंहि व्यावहारिक कारण देतां येणार नाहीं. वास्तविक त्या काळांत आमच्यावर कौटुंबिक दुःखाचे प्रसंग वरचेवर आले. पण तात्यांच्या सहवासामुळें व त्यांच्यामुळें उत्पन्न झालेल्या वातावरणामुळें व्यावहारिक दुःस्थिति असून सुद्धां एक प्रकारच्या आध्यात्मिक सुखाची अनुभूति मिळाली असें वाटतें.

पहिलीं दोन–तीन वर्षे आम्ही खानावळींतून डबा मागवून जेवीत असूं हें तुम्हांला माहीत आहेच. मला स्वतःला तें जेवण अगदीं जात नसे, पण तात्यांनीं मात्र जेवणाविषयीं कधीं तक्रार केली नाहीं ! डब्यांत असेल नसेल तें स्वतः वाढून घेऊन जेवण उरकीत व जेवतां जेवतां एखाद्या तात्त्विक विषयावर बोलणें काढीत ! आम्हांला वाटे कीं इतकें वय झालें तरी यांना हें अन्न खाववतें तरी कसें ? पण आपणांस सुग्रास अन्न मिळत नाहीं याचें त्यांना कांहींच वाटत नसे ! म्हणजे त्यांनीं कष्टानें जिभेवर ताबा मिळविला होता असें नाहीं हं ! वास्तविक कांहीं कांहीं पदार्थ (विशेषतः कोकणांतील) त्यांना फार फार अवडत व ते मिळाल्यावर त्यांनीं ते खाण्यांत फारसा संयम ठेवला असता असें नाहीं. पण त्यांची वृत्ति अशी होती कीं आतां मिळत नाहीं ना ! मग मनाला त्रास करून कां घ्या ? आहे यांत समाधान माना ! अन्नाप्रमाणें इतरहि बाबतींत त्यांची वृत्ति अशीच असे. निजायला गादी वगैरे असो नसो, लिहायला वाचायला टेबल खुर्ची असो नसो, त्यांना त्याचें कांहींच वाटत

नसे ! या प्रकारची वृत्ति आपल्यासारख्या माणसांत असती तर ती आपणांस ' *Spiritual triumph* ' वाटून आपणांस एक प्रकारचा गर्व झाला असता. पण तात्यांना ती वृत्ति म्हणजे व्यावहारिक *necessity* वाटे ! तात्यांची खरी आध्यात्मिकता याच्यांतच आहे कीं जी गोष्ट सामान्य माणसाला आध्यात्मिक वाटते ती त्यांना व्यावहारिक वाटत असे !

डेक्कन जिमखान्यावर रहात असतांना आमचे घरीं फर्ग्यूसन कॉलेजांतील कांहीं तरुण प्राध्यापक व इतर मंडळींचा जा–ये नेहमीं असे. प्रा. अप्पासाहेब देवधर, प्रा. वैद्य, डॉ. दांडेकर, प्रा. कोसंबी, श्री. मर्ढेकर, श्री. प्रभाकर पाध्ये ही मंडळी विशेष येत—जात. आमच्या या मित्रमंडळांत तात्यांचें स्थान काय होतें हें शब्दांनीं कसें सांगूं ? वास्तविक त्यांचें वय व त्यांची योग्यता पाहातां ते आमच्यांत इतके समरस होतील असें कोणास वाटलें नसतें. पण तात्यांचा स्वभाव इतका कमालीचा साधा व सरळ होता कीं ते तरुण मंडळीच्या सहवासांत वयाचें अंतर विसरून जात, व त्यांच्याशीं समरस होत ! या त्यांच्या स्वभावामुळें तरुण मंडळींचें त्यांच्यावर पराकाष्टेचें प्रेम असे. ते धंदेवाईक लेखक किंवा संशोधन करणारे प्रोफेसर नसल्यामुळें त्यांना चार गप्पा गोष्टी करण्यास वेळ असे. " मी सध्यां कामांत आहें, पुन्हां केव्हां तरी या " असें त्यांनीं कोणाला म्हटलेलें आठवत नाहीं. कोणींहि आलें तरी या, बसा, चहा घ्या वगैरे म्हणून ते त्याच्याशीं बोलत बसत. निरनिराळ्या माणसांशीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्यांत त्यांचा हातखंडा असे. मर्ढेकर आले कीं *Aesthetics* मधील कांहीं गहन प्रश्नांवर बोलणें सुरू होई. पाध्ये, वैद्य, दांडेकर वगैरे मंडळी जमली म्हणजे इकडच्या तिकडच्या गप्पा, कॉलेजच्या बातम्या, थट्टामस्करी, कोड्या वगैरे सुरू होई. कोणी म्हणाले कीं सिनेमाला चला. तरी तात्या तयार. टेनिसला चला तरी त्यांची तयारी ! *Aristotle* च्या सौंदर्यवादावर किंवा *Freud* च्या लैंगिक वादावर किंवा *Marx* च्या *Dialectical Materialism* वर वादविवाद करण्यासहि उत्सुक ! कांहींच नाहीं तर नुसत्या चहा–सिगारेटवर समाधान ! त्यांचे नातु व प्रा. देवधरांचीं मुलें यांच्याशीं देखील लहानाहून लहान होऊन खेळत ! ते दिवस आठवले, कीं आमच्या मित्रांपैकीं प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी उभें राहातें ! आम्ही मित्रमंडळी पुन्हां भेटतों पण तात्या असतांना जें वातावरण होतें तें कसें पुन्हां अनुभवायास मिळेल !

वर सांगितल्यासारखी वृत्ति एकाद्या सर्व दृष्टीनें सुखी माणसांत आढळली तर

विशेष आश्चर्य नाहीं. पण सर्वांशीं हसत-खेळत वागणारा हा मनुष्य मनांतून किती दुःखी-कष्टी होता हें ज्याला माहीत आहे त्यालाच तात्यांच्या वृत्तीच्या पाठीमागें केवढें तत्त्वज्ञान व केवढी तपश्चर्या होती हें कळेल. तरुणपणीं अत्यंत कष्टदायक असा कारावास, पत्नीचें अकाली निधन, व त्यामुळें लहान मुलांना संभाळण्याची एकट्यावर पडलेली जबाबदारी—या सर्व आपत्तींमुळें जरी त्यांचें मन खंबीर झालें होतें तरी ते मनांतल्या मनांत अत्यन्त दुःखी असत हें साहाजिकच आहे. एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें " *Though he had won the battle, he bore the marks of the severe struggle.* " एब्राहाम लिंकनच्या चेहऱ्यावर ज्या प्रकारचें औदासिन्य ( *Sadness* ) वाटतें तसेंच तात्यांच्याहि चेहऱ्यावर मला दिसे. पण दुःख जिरविल्यामुळें ते खिन्न न दिसतां विचारी दिसत.

या काळांत तर त्यांच्यावर एक मोठीच आपत्ति येऊन गेली, ती म्हणजे बंडूचें वेड. तो इंग्रजी पहिलीपासून मॅट्रिकपर्यंत आमचेकडे ( म्हणजे जुनागडास ) असे. आधींच तो स्वभावानें अतिशय कुढा; त्यांतून बुद्धि सामान्य असल्यामुळें त्याची अभ्यासांत प्रगति बेताचीच असे. आपल्या कुटुंबांतील इतर मंडळी इतकी बुद्धिवान् असून आपणच असे कां असें वाटून त्याचें मन त्याला फार खात असे. लहानपणीच असा न्यूनगंड निर्माण झाल्यामुळें बंडू जास्त जास्तच एकलकोंडा होत गेला व पुढें पुढें तो सप्शेल वेडा झाला ! वेडामध्यें जेव्हां तो *Violent* झाला तो प्रसंग आठवला कीं मला अजून शहारे येतात ! तात्यांनीं व मी मिळून त्याला कसाबसा आवरला व त्याला येरवड्याच्या *Mental Hospital* मध्यें पोंचविला. तेथें तो तीनचार वर्षे होता व शेवटीं १९४० सालीं वारला ! या सर्व प्रकारामुळें तात्यांचें मन किती कष्टी झालें असेल याची कल्पना करवत नाहीं ! त्यांना मनांतून वाटे कीं एकदां भेटून यावें, व पण आपल्याला पाहिल्यावर त्याच्या मनाला अधिकच धक्का बसेल या विचारानें ते आपलें मन आवरीत. लोकांना सांगत " काय करायचें आहे भेटून ? कोणाचाच फायदा नाहीं ? " आपलं दुःख त्यांनीं कोणाला सांगितलं नाहीं, ( कदाचित् तुम्हांला सांगितलें असेल ! ) कीं त्याच्याविषयीं तक्रारीचा एक शब्द काढला नाहीं ! कांहीं झालेंच नाहीं अशासारखे ते सकाळीं *Lucky Restaurant* मध्यें जाऊन चहा घेत. कोणी आले गेल्यास चार गप्पा मारीत व नंतर जेवून कॉलेजांत जात !

१९४० च्या जून महिन्यांत तात्या एरंडवणा कॉलेजवर राहायला गेले व त्याच

वेळीं माझीहि सांगलीस बदली झाली. नंतरचीं तीन वर्षे तात्यांनीं फारच दुःखांत काढलीं. कॉलेजवरचा बंगला गांवापासून दूर असल्यामुळें मित्रमंडळींचें येणें–जाणें साहजिकच कमी झालें. तात्यांची प्रकृतीहि याच वेळीं बरीच खालावली. त्यांना *Anaemia* व *Piles* चा पुन्हां त्रास होऊं लागला. त्यांतून प्रिन्सिपालच्या कामाचे मानसिक श्रमहि फार होत. पुढें पुढें तर कॉलेजांतील कांहीं अंतस्थ भानगडींमुळें त्यांचें मनःस्वास्थ्य अजिबात गेलें, व त्यांची झोप उडाली म्हणतात. सुटींत त्यांचेकडे जावें तेव्हां ते बहुधा एकटे कांहींतरी विचार करीत पडलेले दिसायचे. या शेवटच्या दिवसांत ते बोलतहि कमी. नेहमींची त्यांची विचारी मुद्रा जाऊन त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची खिन्नपणाची छाया आली होती. गतायुष्याचें सर्व दुःख एकवटलेले त्यांचे डोळे दूर दूर कांहीं तरी शोधीत आहेत असा भास होई!"

१९४३ च्या जानेवारींत वामनरावांच्या वयाला साठ वर्षें पुरीं झालीं व त्यांच्या एकसष्टीचा समारंभ सबंध महाराष्ट्रभर मोठ्या उत्साहानें साजरा होऊन त्यांना लहानमोठ्या थैल्या व मानपत्रेंहि अर्पण करण्यांत आलीं. आणखी चार-पांच महिने काम करून आपण सेवानिवृत्त व्हावें, हिंगण्यास अगर मुंबईस राहून व पूर्णपणें विश्रान्ति घेऊन आपली बिघडलेली प्रकृति सुधारावी, कांहीं वाङ्मयकार्य–व जमल्यास कांहीं संशोधनकार्य करावें अशी वामनरावांची फार इच्छा होती. परंतु या इच्छा व हे बेत मनांतले मनांतच राहावयाचे होते; कारण, पुढें सहाच महिन्यांनीं त्यांची बिघडत चाललेली प्रकृति विकोपास जाऊन ते जुलैच्या वीस तारखेस मुंबई येथें मृत्यु पावले!

वामनरावांचे चिरंजीव गणेश वामन ऊर्फ पुंडूभाऊ बी. ए. असून पुण्यास नोकरी करीत आहेत. थोरली मुलगी गंगू हिचा विवाह प्रसिद्ध साहित्यिक प्रो. द. के. केळकर यांच्याशीं झालेला आहे. दुसरी मुलगी शकुन्तला हिचा विवाह साताऱ्याचे सीतारामपंत देवधर यांचे चिरंजीव विद्याधरपंत यांच्याशीं झालेला असून हल्लीं ते कामती येथें सरकारी इंजिनिअर खात्यांत हुद्याचे कामावर आहेत. दोघींनाहि मुलेंबाळें असून तीं सर्व नातवंडें आपल्या 'तात्त्यां'च्या आठवणी काढीत असतात.

## शिक्षण

## २

गोरेगांवच्या शाळेंत मराठी शिकत असतांना, किंवा पुण्याच्या ' न्यू प्रिपेरेटरी क्लासेस ' मध्यें इंग्रजी शिकत असतांना वामनरावांचा अभ्यास कसा होता, ते कोणतीं पुस्तकें वाचीत, त्यांचे विशेष मित्र कोण होते, कोणकोणत्या शिक्षकांनीं त्यांना शिकविलें, स्वभावपरिपोषक किंवा स्वभावदर्शक अशा कांहीं विशेष गोष्टी घडल्या काय, घडल्या असल्यास कोणत्या वगैरेसंबंधीं माहिती फारशी उपलब्ध नाहीं. स्वतः वामनराव यासंबंधीं कोणापाशीं कधीं फारसें बोलल्याचें ऐकिवांत नाहीं. मात्र गोरेगांवच्या गांवठी शाळेंत आपला पहिला–दुसरा नंबर असल्याचें वामनरावांनीं सांगितलेलें स्मरतें असें त्यांचे एक जिवश्चकंठश्च मित्र रा. अच्युतराव उपाध्ये लिहितात. तसेंच लहानपणीं एकदां शिक्षा म्हणून मास्तरांनीं आपल्याला शाळेंतील पेटींत कोंडून ठेवलें असल्याचें व आपण प्रश्न वगैरे विचारून शिक्षकांना भंडावून सोडीत असल्याचें वामनराव स्वतःच अमळनेर येथील हायस्कुलांतील विद्यार्थ्यांना सांगतात. यावरून शाळेंत शिकत असल्यापासून ते एक वरच्या दर्ज्याचे पण व्रात्य प्रकारचे विद्यार्थी असावेत असें दिसतें.

त्या वेळच्या इतर शिक्षकांसंबंधीं वामनरावांना फारसें कांहीं वाटत असल्याचें दिसत नसलें तरी शंकर गणेश लवाटे व लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचेसंबंधीं त्यांस

वराच आदर वाटत असल्याचें दिसतें. हे दोघेहि त्या वेळीं 'न्यू प्रिपेरेटरी क्लासेस'-मध्यें वामनरावांना शिकवीत असून आपल्याला मराठी वाङ्मयाची आवड लागली ती या दोघांमुळें लागली, व सामाजिक कार्ये करण्याची स्फूर्ति मिळाली ती या दोघांपासून मिळाली असें वामनराव नेहमीं म्हणत.

लवाटे हे टिळकभक्त व टिळकांच्या जहाल राजकारणांत हिरीरीनें भाग घेणारा त्यांचा एक भाविक अनुयायी म्हणून, व पांगारकर हे संतवाङ्मयाचे मार्मिक अभ्यासक, श्रद्धाळू लेखक व रसाळ वक्ते म्हणून महाराष्ट्रांत पुढें जितके प्रसिद्धीला आले तितके त्या वेळीं आले नव्हते हें उघड आहे. तरीपण साधेपणा, विद्वत्ता, शिकवण्यांतील जिव्हाळा, विद्यार्थ्यांबद्दल वाटणारी कळकळ, राष्ट्रीय वृत्ति इ० गुणांमुळें ते दोघे त्याहि काळीं विद्यार्थ्यांना अतिशय प्रिय व आदरणीय वाटत. वामनराव हे या दोघांचे सारखेच आवडते विद्यार्थी असून त्यांना परस्परांबद्दल वाटत असलेला आदर शेवटपर्यन्त कायम राहिला होता.

पुढें १८९८ मध्यें नगरच्या शाळेंत गेल्यापासून मात्र वामनराव आपल्या अंगच्या अभिजात हुशारीमुळें व खोडकरपणामुळें बरेचसे पुढें आलेले दिसतात. त्यांचे त्या वेळचे तेथील सहाध्यायी पांडुरंग महादेव बापट ( सुप्रसिद्ध 'सेनापती' ). हे त्यांचेसंबंधीं म्हणतात " तो ( वामनराव ) माझ्या इतकाच दंगेखोर व जेमतेम अभ्यास करणारा होता. त्याचे वडील बंधु कै. महादेव मल्हार जोशी आमचे हेडमास्तर होते. त्यांना व इतर मास्तरांना आम्हां दोघांपासून जवळ जवळ सारखाच त्रास होत असे, व आम्ही दोघे सर्व मास्तरांचे सारखेच आवडते होतों." वामनरावांना मॅट्रिक व्हायला तीन वर्षे लागलीं. पण तीं कारणाकारणानेंच लागलीं. एक वर्ष ते आजारी पडल्यामुळें परीक्षेला बसूं शकले नाहींत. इंग्रजी निबंध लिहिण्यांतच सगळा वेळ संपल्यामुळें बाकीचा पेपर सोडवायचा राहून दुसरें वर्ष गेलें. तिसऱ्या वर्षी मात्र ते चांगल्या प्रकारें पास होऊन सबंध युनिव्हर्सिटींत त्यांचा दहावा नंबर आला. सबंध वेळ इंग्रजी निबंध लिहिण्यांत घालविणें हा अजागळपणा तर खराच; पण त्यांतहि वामनरावांचें इंग्रजीवरील प्रभुत्व व मोठमोठे निबंध लिहिण्याची हौस हीं दिसून येतात.

वामनरावांच्या शालेय जीवनाची माहिती जरी दुर्मिळ असली तरी कॉलेजमधील त्यांच्या जीवनाची माहिती मात्र भरपूर मिळालेली आहे. तींतील बहुतेक भाग

वामनरावांचे त्या वेळचे कंपॅनिअन् व त्यांचे तेव्हांपासूनचे एक जानीदोस्त हरि केशव ऊर्फ भाऊसाहेब गोळे यांनीं स्वतः मिळवून व लिहून कळविलेल्या माहितीं-तून जशाचा तसा घेतला आहे. सबंध माहिती त्यांनीं इतक्या तन्मयतेनें, जिव्हा-ळ्यानें व डौलदार शैलीनें लिहिली आहे कीं तिचा नुसता सारांश देणें, किंवा मुळांतील भाषेचें कसें तरी रूपान्तर करून सांगणें म्हणजे त्या मजकुराला व शैलीला नीरस व विरूप करण्यासारखें होईल.

वामनराव मॅट्रिक पास होऊन त्यांचें डेक्कन कॉलेजांत शिकायला व राहायला जाण्याचें निश्चित झालें आहे या अनुरोधानें हरीभाऊ लिहितातः—

"३ जानेवारी १९०१. त्या दिवशीं डे. कॉलेजांत कोण गर्दी ! तेथें राहायला जागा मिळविणें म्हणजे केवढी करामत ! जागा रिकाम्या व्हायच्या ४० पण अर्ज १५० च्या वर ! त्यांत पुनः वर नंबर आलेले, कॉलेजच्या जुन्या विद्यार्थ्यांपैकीं कोणाचे मुलगे, भाऊ वगैरे यांना आधीं जागा मिळायच्या. बोर्डावर नांव लागेपर्यंत किती उत्सुकता ! शेवटीं खोली मिळायच्या यादींत माझें नांव लागलें. माझे कंपॅनिअन् ( जोडीदार ) कोणी एम्. एस्. पंडित यांचें नांव लागलें होतें. चौकशी करतां कळलें कीं हे पंडित म्हणजे प्रसिद्ध विद्वान् कै. शंकर पांडुरंग पंडित यांचे चिरंजीव व राजकोटच्या प्रसिद्ध बॅरिस्टर पंडितांचे पुतणे. ही पंडित मंडळी म्हणजे राजाच्या ऐश्वर्यांत वाढलेली. तेव्हां त्यांचें माझें कसें काय जमतें याबद्दल मनांत थोडी भीति वाटत होती. खोली कोणची ती पाहिली. तेथें पंडितांची गांठ पडली. उद्यां त्यांनीं व मीं आपलें सामान कॉलेजांत आणण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें मी सामान घेऊन आलों. पण पंडित आले नाहींत. कॉलेज सुरू होण्याचे वेळेस पंडित भेटले व म्हणाले 'मी येथें राहायचें रहित केलें आहे. येथें जेवण्यांत मासे मिळणार नाहींत म्हणे, तेव्हां मुंबईच्या कालेजांत जायचें मीं ठरविलें आहे.' ऐकून जरा मौजच वाटली. पण मग आतां दुसरा जोडीदार कोण येतो ह्याबद्दल पुनः उत्सुकता वाटली. यादींत नांव पाहिलें तों. *V. M. Joshi* असें लागलें. खोलींत त्यांचें सामान आलें. पंडितांच्या थाटाच्या रहाणीपुढें आपलें कसें काय जमणार असा जो *Inferiority Complex* ( न्यूनगंड ) वाटत होता त्याचें कारण नाहीं असें अनुभवास आलें. उलट, असलीच तर थोडी (*Superiority Complex*) अहं-गंडाची छटा आली होती. कारण आम्हां बहुतेकांच्या जवळ झोंपायला पलंग होते तरी जोशी यांची वळकटीच तेवढी दिसली. त्यांचें इतर सामानहि अगदीं बेताचेंच

होतें. कपडेंहि बेताचेच व साधे, असा सगळा कारभार आढळला. दिवा देखील राकेलचा किंवा मेणवत्तीचा नसून समईच होती. आम्ही दोघेहि एकाच क्लबांत, म्हणजे ४ थ्या, ऊर्फ ईडूर क्लबांत जेवावयास जाऊं लागलों. टेनिसहि एकाच सेटमध्यें खेळूं लागलों. बोटिंग्मध्येंहि एकाच क्रूमध्यें जाऊं लागलों. व कॉलेजांतील बराच काळ आम्ही कॅंपनिअनच राहिलों. यामुळें त्यांचा माझा स्नेहसंबंध दृढ होत चालला. पुढेंहि आमचें दोघांचें पुण्यास वास्तव्य पुष्कळ वर्षें राहिल्यानें तो पुष्कळच वाढला.

जोशी किंवा वैद्य आडनांवाचा प्रत्येक माणूस आपल्या निकट स्नेह्यांत एकेरी आडनांवाचा राहात नाहीं. याप्रमाणें वामनरावहि आमच्यांत ‘ जोशीबुवा ’ झाले. त्या वेळीं जुनागड कॉलेजचे प्रो. महादेव मल्हार जोशी यांची विद्यार्थीवर्गांत फार प्रसिद्धि होती. तेहि डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी असल्यानें डेक्कन कॉलेजांतल्या आम्हां मंडळींत त्या प्रसिद्धीबरोबर कौतुकहि होतें. त्यांचे हे बंधु; म्हणून ते हुशार असणारच असें आम्ही सर्व लोक धरून चाललों होतों. त्यांत त्यांना कॉलेजची स्कॉलरशिपहि मिळाली तेव्हां त्यांच्या हुशारीचा तो पुरावाच झाला. माझाहि नंबर मॅट्रिकमध्यें बराच वर येऊन मलाहि कॉलेजची स्कॉलरशिप मिळाली यामुळें आम्हां दोघांहि कॅंपनिअन्सना एक तऱ्हेची बरोबरी वाटून एकमेकांविषयीं आदरभाव वाटूं लागला.

एका गोष्टींत मात्र जोशीबुवांनीं फारच लवकर प्रसिद्धि मिळविली. ती म्हणजे गबाळेपणा ! त्यांचा कारभार म्हणजे सगळा अव्यवस्थित. कपडे कुठेंतरी पडलेले असायचे, पेटी बहुतेक उघडीच असायची, टेबलावरचीं पुस्तकें नीट लावून ठेवलेलीं कधीं असायचीं नाहींत. पण या सगळ्यावर ताण करणारा त्यांचा खमंगपणा असा कीं खोलींत राहायला आल्या रात्रीं जी गादीची वळकटी सोडली ती या बहाद्दरानें टर्म संपून घरीं जायच्या दिवशीं गुंडाळली. गादीच्या भोंवतीं बराच केर जमला कीं स्वारीनीं तशीच फरफटत ओढीत दुसऱ्या कोपऱ्यांत न्यायची. तिथें केर जाऊन सांचला म्हणजे तिथून जरा दुसरीकडे सरकवायाची, असा सगळा प्रकार चालायचा. परटाच्या कपड्याच्या माझ्या दोन तीन खेपा झाल्या तरी यांच्या कपड्यांची एकादी खेप व्हायची मारामार. पण त्यांत मुद्दां बिचाऱ्या पलंगपोसाची पाळी यायची नाहीं. अखेर एकदां पलंगपोस धुवायला द्यायला त्यांनीं काढला तेव्हां मी म्हणालों, “ इतक्यांत कशाला देतां ? अजून थोडे पांढरे डाग शिलक आहेत कीं. ” शेवटीं मी आपल्या कपड्यांबरोबर त्यांचे कपडे काढून धुवायला देऊं लागलों. तीच गोष्ट

कपडे शिवण्याची. तेहि मग आम्ही दोघे बरोबर शिवायला देऊं लागलों. त्यांतसुद्धां कापड पसंत करायच्या वेळीं ते म्हणायचे " मला त्यांत चांगलें कापड वाईट कापड कांहीं समजत नाहीं बुवा. तुम्हांला बरें वाटेल तें घ्या, झालें. " कॉलेजांत एकमेकांचा स्नेह जमायला फारसा वेळ लागत नाहीं. पण या कारणामुळें तो जास्तच जमला.

जोशीबुवांच्या लेखनाचा पहिला आविष्कार डेक्कन कॉलेज त्रैमासिकांत ( क्वार्टर्लींत ) झाला. त्याचें नांव 'थंडीनें गारठलेले शब्द ' असें होतें, व तो १९०३ सालीं प्रसिद्ध झाला असावा असें वाटतें. तो अर्थात् विनोदी लेख आहे. थंडीमुळें जसें पाणी गोठतें तसे एकदां शब्दही गोठले, व ते ज्या वेळीं उच्चारले त्या वेळीं ऐकूं न येतां पुढें थंडी संपल्यावर उन्हाळ्यानें पातळ झाल्यावर ते ऐकूं येऊं लागले. परंतु बोलणाऱ्याच्या विचारांत मध्यंतरीं बदल झाल्यामुळें ते त्याचे त्यासच पुढें चमत्कारिक वाटूं लागले असें त्यांतील विनोदाचें बीज आहे. कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा एक लेख या दृष्टीनें कॉलेजमध्यें तो पुष्कळांस आवडला होता; परंतु पुढें विकास पावलेल्या वामनरावांच्या लेखनवृक्षाचें तें बीज आहे ही गोष्ट आमच्या लक्षांत त्या वेळीं कशी येणार ! खुद्द जोशीबुवांना तरी त्या वेळीं त्याबद्दलची कल्पना कुठें होती ? सांगण्याचा मुद्दा येवढाच कीं त्यांची वृत्ति जरी तत्त्वज्ञान्याची होती तरी एरवीं तत्त्वज्ञानाशीं बहुतेक फटकून वागणारी विनोदवृत्तिहि त्यांच्यांत होती.

जोशीबुवांना टेनिसची फार आवड असे. व त्या खेळांत त्यांचें नैपुण्य बऱ्याच वरच्या दर्जाचें होतें. डेक्कन कॉलेजांत नवीन आलेल्यांच्या करितां म्हणून ज्यूनिअर टूर्नामेंट् दरसाल होत असे. त्यांत ते सिंगल्समध्यें पहिले आले होते. त्यांतसुद्धां त्यांच्या मूळ स्वभावाचें प्रतिबिंब होतेंच. म्हणजे त्यांची खेळण्याची ढब बेंगरूळ होती. खेळ पाहून हा चांगला खेळणारा असेल असें सहसा कोणास वाटायचें नाहीं. पण कसा का होईना, त्यांचा चेंडू परत यायचाच, व हलकें हलकें त्यांचा डाव चढत जायचा. मग पाहणाराला वाटायचें कीं अरे वा ! याला बरेंच खेळतां येतें कीं हो. दुसऱ्याच वर्षी म्हणजे इंटर्मीजिअटमध्यें ते टेनिसमध्यें चांगलेच चमकले, व सिंगल्समध्यें जनरल टूर्नमेंटमध्यें दुसरे आले. त्या टूर्नमेंटमध्यें सीनिअर बी. ए. त असलेल्या पत्की नांवाच्या विद्यार्थ्यांची व त्यांची मॅच् झाली. पत्की हे बऱ्याच वरच्या दर्जाच्या खेळणारांत मोडत होते, व स्वतःच्या खेळाची घमेंडहि त्यांना फार होती. त्यांची व जोशीबुवांची मॅच् मोठी चुरशीची झाली. जोशीबुवांच्या

बरोबरीच्या आम्हां ज्युनिअर लोकांना साहजिकच जोशीबुवांनीं ही मॅच् जिंकावी असें फार वाटे व त्याबद्दल खात्रीहि बरीच वाटे. सीनिअर मंडळींना वाटे पत्की खास जिंकणार. खुद्द पत्कींची तर जयाबद्दल खात्रीच होती. सुरुवातीला दोघांचा डाव साधारण सारखाच होता. पण श्री ऑलपासून जोशीबुवांनीं हलकें हलकें एक एक गेम हिसकायाला सुरुवात केली. चेंडू घेण्याची जोशीबुवांची ढब अगदींच बावळट असे. आतां यांना चेंडू घेतां येणार नाहीं असें पुष्कळांस वाटायचें, पण वेडेवांकडे होऊन, प्रसंगीं बैठक मारून, प्रसंगीं दोन्ही हातांनीं बॅट् धरून पण कसा तरी ते चेंडू परत करीत. पत्की हे जोशीबुवांच्या बावळट खेळाची मधून मधून थट्टा करीत. जोशीबुवांनीं बैठक मारली कीं ते ओरडायचे "यंवरे बैठक !" कीं प्रेक्षकांत हंशा उडायचा. पत्कींना वाटे, अशा रीतीनें ते बावरतील ( नर्व्हस होतील. ) असें होतां होतां एका वेळीं पत्की हे पुढें पुढें येऊन जोशीबुवांना मागें बेसलाईनवर रेटायचा प्रयत्न करीत. त्यांत जोशीबुवांनीं बैठक घेऊन चेंडू परत पाठविला तेव्हां पत्कींनीं 'यंवरे बैठक' म्हणून उपहास करून तो जोरानें मारला. पण तितक्यांत प्रसंगावधान राखून जोशीबुवांनीं तो चेंडू पत्कींच्या टप्प्याबाहेर त्यांच्या डाव्या बाजूस जोरानें भिरकावला. पत्की पुढें आलेले असल्यामुळें तो चेंडू त्यांच्या आटो-क्याबाहेर जाऊन त्यांना घेतां आला नाहीं. त्याबरोबर जोशीबुवांचा "यंवरे पुढें येणार" असा टोमणा आला. व पत्कींची गेम गेली. "–यंवरे बैठक–" हा उपहास, प्रेक्षकांचें हास्य, व लगेंच पुढच्या सेकंदांत "यंवरे पुढें येणार" हा टोमणा, व गेम होणें यामुळें प्रेक्षकांनीं टाळ्यांचा एकच गजर केला व तेथून सगळं वातावरण बदलून प्रेक्षकांची सहानुभूति–सीनिअर मंडळीसुद्धां–वामनरावांच्या बाजूची झाली. आणि पत्कींच्या खेळास उतरती कळा लागून ती मॅच् दोनच सेटसूमध्यें जोशी-बुवांनीं जिंकली.

ही आठवण इतक्या विस्तारानें देण्याचें कारण असें कीं. त्यांत वामनरावांच्या स्वभावाचीं—गबाळेपणा, चिकाटी, किंचित् विनोदाची छटा, व्यायामाची आवड, धिमेपणा, मनाचा मोकळेपणा, दोन ठोसे देण्याची व घेण्याची तयारी, वगैरे अंगें पूर्णपणें प्रतिबिंबित झालीं आहेत.

येथपासून पुढें ते कॉलेजच्या टेनिस चँपिअनपैकीं एक ठरले गेले व डेक्कन कॉलेजचे इतरांशीं जे सामने होत त्यांत कॉलेजच्या मुख्य जोडीपैकीं एक ते असत. ही त्यांची टेनिसची आवड जवळ जवळ अखेरपर्यंत टिकली. ते हिंगण्यास असतांनाहि

कसेंतरी टेनिसकोर्ट, कसेतरी चेंडू, कशी तरी बॅट, व खेळायला कसेतरी जोडीदार अशा पोक्त सरंजामानिशी ते शक्य तों खेळणें चुकवीत नसत. तेथें त्याच्या संगतींत दोन दिवस घालविण्यास मधून मधून जात असें, तेव्हां त्यांना मी म्हणें देखील कीं, " काय असल्या खेळानें तुमचें समाधान होत असेल कोण जाणें. " ते म्हणत " आहे या स्थितींत जें मिळतें आहे तेवढ्यावरच समाधान मानून नकोका घ्यायला ? शिवाय त्यांतसुद्धां—थोडें का होईना, वैचित्र्य अनुभवाला मिळतेंच कीं नाहीं ? चार मंडळींच्या स्वभावाचे ठराविकपेक्षां निराळे पैलू पाहायला सापडतात. आणि तुमच्यासारखा आलागेला खेळायला सापडतोच. " अशी तत्त्वज्ञान्याची वृत्ति त्यांची होती.

वामनराव व मी एकाच खोलींत राहणारे व एकाच क्लबांत जेवणारे. तेव्हां रीतीप्रमाणें क्लबच्या सेक्रेटरीपणाची पाळी एक महिना आम्हां दोघांवर मिळून आली. सेक्रेटरीचें काम अगदीं उत्तम करावयाचें आम्हीं ठरविलें. त्यावेळीं क्लबचे सेक्रेटरीच स्वतःसगळें करीत व पाहात. म्हणजे पुण्यास गावांत जाऊन धान्य वगैरे सगळा शिधा घेणें, मंडईची खरेदी रोज करविणें, ती नीट होत आहे कीं नाहीं यावर देखरेख ठेवणें हीं कामें स्वतः सेक्रेटरीच करीत. आलीकडच्याप्रमाणें आचाऱ्यानेंच सगळें कांहीं करावयाचें व तो सांगेल तें बिल सेक्रेटरींनीं द्यावयाचें असा प्रकार तेव्हां नव्हता. त्याप्रमाणें आम्हीं दोघांनीं आपल्याकडून काम उत्तम केलें. पण हिशेब निघाला माणशीं १७॥ ! तेव्हां आमचा जीवच दडपला. मीं जोशीबुवांना म्हटलें ' काय हो, इतका खर्च कसा झाला ? ' ते म्हणतात ' कांहीं बेरीज वगैरे तर चुकली नाहीं ना ? ' ' अहो, बेरीज काय चुकते आहे ? दहा वेळां केली. जोशीबुवा तुम्ही फारच वेंधळे बुवा. एकदां तरी मला सूचना द्यायची कीं नाहीं, खर्च जरा बेतानें करा म्हणून. ' ' अहो, मी वेंधळा म्हणून तर मीं तुम्ही करतांच आहां, आपण त्यांत आणखी काय पहायचें, म्हणून विचारलें नाहीं. ' ते वेंधळे म्हणून, मी खर्चिक म्हणून, बाजारखरेदींत दराची कसोशी, व शिधा काढून देण्यांत सावधगिरी व मेजवान्यांत थोडा आखडता हात हें आमच्या हातून झालें नाहीं. अशा रीतीनें आमची सेक्रेटरीशिप गाजली. त्यावेळीं क्लबांत माणशीं जेवणखर्च महिना १४॥ ते १५ रु. आला म्हणजे बेताचा झाला असा नेहमीं अनुभव असे. त्यांतल्यात्यांत चांगला दक्ष सेक्रेटरी असला तर त्यापेक्षांहि कमी येई. मला आठवतें कीं, माधवराव परांजपे ( *M. R. Paranjpe M. A. B. Sc.* ) यांनीं

आपल्या सेक्रेटरीशिपमध्यें आपल्या क्लबांत महिन्याचा खर्च माणशी रु. १३–२–० त भागविला. आमच्या कॉलेजच्या चार वर्षांच्या आयुष्यांत इतका कमी खर्च केव्हांहि कोणच्याहि क्लबांत आला नाहीं. याला कारण परांजप्यांची दक्षता. त्यांची व्यवहार-दक्षता वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या कुटुंबीयांना तिचा फारच फायदा झाला. त्याची जाणीव त्यांचे बंधु गोपाळराव (मुंबईच्या सायन्स इन्स्टिटयूटचे प्रिन्सिपल) यांना अजूनहि आहे. माधवराव परांजप्यांचे हिशेब, दरमाणशीं दररोज किती धान्य लागतें, त्याचा भाव काय, वगैरे अगदीं कसोशीनें बसविलेले होते. मोठ्या मेजवानींतसुद्धां त्यांचा अंदाज अगदीं बरोबर बिनचूक असे. जिन्नसाची उधळ-माधळ, जिन्नस कमी पडला, जास्त झाला, असें त्यांचें कधीं व्हायचें नाहीं. शिवाय काटकसरींत कधीं चिक्कूपणा केला असेंहि नसे. असो.

या आमच्या सेक्रेटरीशिप्‌मध्यें आम्हांला एक गडी नवीन ठेवावा लागला. त्याच्या निवडीचें श्रेय आमच्यापैकीं कोणाचें होतें तें आतां मला आठवत नाहीं. परंतु तो गडी आमच्या क्लबांतील मंडळींना–विशेषतः आम्हां दोघांना–असा कांहीं विनोदविषय झाला कीं कॉलेज सुटेपर्यंत तर त्याची आठवण बुजली नाहींच, पण अजून सुद्धां मला ती ताजी आहे व अनेक वेळां त्याच्या आठवणींनीं वामनराव व आम्ही सहाध्यायी हंसून मुरकुंडीनें चीत झालों आहों. वामनरावांच्या चरित्रांत हें विषयान्तर तर खरेंच. पण तें केल्यशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. कारण वामनरावांना जर विचारलें असतें कीं कॉलेजांतील तुमच्या आठवणींपैकीं विनोदाचे प्रसंग सांगा तर त्यांनीं या प्रकरणास महत्त्वाचें स्थान दिलें असतें.

या गड्याचें नांव शिवा असें होतें. त्यावेळीं क्लबांतील गड्यास क्लबांतील मंडळींचे दिवे, समया वगैरे घासून ठेवावें लागे. क्लबचा मंडई तोच करी, व त्या-वेळीं कोणाचें कांहीं सामान गांवांतून आणावयाचें झाल्यास तोच आणी. मी अगदींच नवखा आहें, काय काय काम करायचें तें मला नीट सांगून मला संभाळून घेत जा साहेब असें तो बिचारा वरचेवर आर्जवून म्हणत असे. त्याचे अनुभव असे—(१) क्लबांत फीस्ट झाली म्हणजे जेवणानंतर सगळी मंडळी पानसुपा-रीच्या ताटावर पडायची. तेव्हां चुन्यावर सगळ्यांचा एकदम हात पडायचा व त्यामुळें जरा त्रेधाच उडायची. यासाठीं आम्हीं सोयीचें पडावें म्हणून शिवाला सांगितलें ‘ शिवा सगळ्या पानांना चुना लावून ठेव, म्हणजे मंडळींना सोपें जाईल ! ’ जेवण्याच्या घंटेला क्लबची सर्व मंडळी जमली, व पाहतात तों जेवायला

मांडलेल्या केळीच्या पानांना भाताच्या जागेवर चुना फासून ठेवलेला! जो तो विचारतो 'अहो सेक्रेटरी, हा काय नवीन प्रकार आहे? जोशीबुवांनीं शिवाला विचारलें हें रे काय? तर तो म्हणतो 'साहेब तुम्हींच नाहीं का सांगितलें पानाला चुना लावून ठेव म्हणून!' (२) एके दिवशीं क्लबांत दुध्या भोपळ्याची भाजी होती. आम्ही सगळे जेवायला बसलों, व भाताबरोबर भाजीचा घास तोंडांत घातला मात्र, तों सगळ्यांची ओकायची पाळी आली! भाजी कडू जहर! सगळे भोपळे कडू जातीचे लागले. मग त्या दिवशीं उशीरा आलेल्या प्रत्येकाची गम्मत पाहण्याची संधी सगळ्यांनीं साधून घेतली. मारुतीच्या बेंबींत बोट घालण्याचा प्रयोग प्रत्येकाचा होई व प्रत्येक वेळीं मोठा हंशा! भाजी चिरायचें काम गड्याकडेच असे. म्हणून शिवाला विचारलें 'अरे, भोपळे चिरतांना कडू-गोड नाहीं का पाहिलेस खाऊन?' तो लाचारीनें उत्तर करतो 'एक एक हातभर सात भोपळे होते ते मी एकटा कसा खाऊं?' कडू-गोड म्हणजे काय याची त्या बिचाऱ्याला कल्पनाहि नाहीं. अन् चिरणाराच जर नमुन्याकरितां सारे भोपळे खाऊं लागला तर भाजी कशाची करणार, ही कल्पना देखील त्या गृहस्थाला सुचली नाहीं. !

(३) जोशीबुवा नेहमीं समई वापरीत, व माझा मेणवत्तीचा दिवा होता. एकदां संध्याकाळीं जेवायला जातांना मीं शिवाला सांगितलें "माझ्या टेबलावर मेणबत्तीचा पुडा आहे त्यांतील एक मेणवत्ती माझ्या स्टँडमध्यें घालून ठेव, आणि जोशीबुवांची समई लावून ठेव. तोंपर्यंत आम्ही जेवून येतों." जोशीबुवा जेऊन येऊन खोली उघडून पाहतात तों त्यांच्या समईत मेणबत्ती पेटवून आडवी ठेवलेली, व खालीं मेणबत्तीचें मेण सारखें टिबकून भलें थोरलें थारळें झालेलें! (४) गड्याला कधीं कधीं क्लबांतली मंडळी मंडईबरोबर आपापलें किरकोळ सामान आणायला सांगत. एकदां जोशीबुवांनीं पाहिलें तों क्लबचें सामान व इतर लोकांचें सामान यांच्या ओझ्याखालीं तो बिचारा वाकून गेलेला होता. म्हणून त्यांनीं कींव येऊन त्याला सांगितलें 'शिवा, एखाद्या दिवशीं सामान जास्त झालें तर हमाल करीत जा.' त्यानंतर कांहीं दिवसांनीं एकदां शिवाची स्वारी डोक्यावर पाटी घेऊन नेहमीं प्रमाणें गांवांतून सामान घेऊन येत आहे, व बरोबर एक माणूस आहे व त्याच्या हातांत कागद पेन्सिली वगरे किरकोळ सामान आहे. त्याला आम्हीं विचारलें 'हा रे कोण?' शिवा म्हणतो 'साहेब, सामान जास्त झालें म्हणून आपण सांगितल्याप्रमाणें तेवढ्याकरितां हमाल केला आहे.' म्हणजे सबंध ओझ्यानें

शिगेपर्यंत भरलेली पाटी शिवाच्या डोक्यावर, आणि कागद पेन्सिली, मेणवत्तीचा पुडा वगैरे किरकोळ दोन-तीन शेर वजनाचें सामान अर्थात हमालसाहेबांच्या हातांत! अर्थात् हमालसाहेब ठरलेली सर्व हमाली घेऊन गेले व शिवासाहेब घामाघूम होऊन घाम पुशीत बसले!! (५) त्या वर्षी अखेरची शील्डमॅच डेक्कन कॉलेज व मुंबईचें ग्रँट मेडिकल कॉलेज यांमध्यें गणेश खिंडीवर गव्हर्नमेंट् हाऊसमध्यें होती. व त्यानिमित्त गव्हरर्नरसाहेबांचा *At home* हि होता. अर्थात् सगळें कॉलेज गव्हर्नमेंट् हाऊसवर लोटलें. पुष्कळ मंडळी टांगेगाड्या करून गेली. त्याप्रमाणें जोशीबुवा व आम्ही तिघे मिळून एक गाडी करायची ठरविली, व शिवास सांगितलें ' शिवा, गणेशखिंडीच्या बंगल्यावर जायची ' गाडी ठरवून आण. ' त्याप्रमाणें तो गेला. तास झाला, दोन तास झाले, तीन तास झाले, तरी शिवाचा पत्ता नाहीं. शेवटीं आम्हीं ठरविलें चला आतां पायींच जाऊं. अर्धीतरी मॅच् पाहायला सांपडेल, निदान *At home* तर कुठें जात नाहीं? जाणारे होते ते सगळे केव्हांच निघून गेले होते. आम्ही चौघेच काय ते राहिलों होतों. कॉलेजपासून गव्हर्नमेंट हाऊस चांगलें चार मैल पडतें. उन्हांत चालतां चालतां अगदीं थकून व कंटाळून गेलों, आणि शेवटीं एकदां गव्हर्नमेंट हौसच्या दरवाज्याजवळ पोंचलों. तों शिवासाहेब गाडी घेऊन तेथें उभे! सलाम करून म्हणतात "साहेब गाडी आणली आहे. फार वेळ वाट पाहात बसलोंय?" मी तर संतापानें लाल झालों. पण जोशीबुवांची हसतां हसतां मुरकुंडी वळून ते खालींच बसले. रागाऐवजीं त्यांची विनोदीवृत्तीच जागृत झाली. झक मारीत आम्ही गाडीवाल्याचे पैसे—खोटीच्या वेळेसुद्धां—चुकते करून शिवास नमस्कार करून मॅच पाहायला गेलों. आमचाहि सगळ्यांचा राग जाऊन तो प्रसंग म्हणजे विनोदाचा एक कायमचा विषय सर्व कॉलेजवर होऊन बसला. ती मॅच् मोठ्या चुरशीची होऊन आमच्या डेक्कन कॉलेजचा साऱ्या १० धावांनीं पराजय झाला. असो. दुसरे दिवशीं शेवटीं जोशीबुवांस मीं म्हटलें, "कसें काय बुवा या गड्याचें करायचें? असें किती दिवस निभणार?" शेवटीं आम्हांस त्या गड्यास रजा देण्याचें नाइलाजानें ठरवावें लागलें. वास्तविक तो इतका गरीब व कामसू होता कीं, त्याला जा म्हणणें आमच्या जिवावर आलें. वामनराव म्हणाले, "आतां येवढें करूं. आपण दोघेहि त्याला खर्चायला दोन दोन रुपये देऊन जायला सांगूं. पण तें तुम्ही सांगा." त्याप्रमाणें ४ रुपये व वर मी आपला एक कोट देऊन मोठ्या कष्टानें रजा दिली. त्याला कोडें उलगडेना कीं ' मीं इतकें मनापासून काम करतों, अन् मला हे

जा म्हणून कां सांगतात ? ' त्यानंतर आमच्या दोघांच्या भेटी होत, त्यांत पुष्कळ वेळां शिवाच्या आठवणी निघत, व प्रत्येक वेळीं नव्याप्रमाणें हंशा होई. पण शेवटीं वामनराव कळवळून म्हणत " मला अजूनहि काळजी वाटते, बिचाऱ्या शिवाचें पुढें कसें झालें असेल कोण जाणें " !

डेक्कन कॉलेजांतील आम्ही मंडळी अधून मधून शहरांत नाटकें पाहायला जात असूं. वामनराव आमच्यापैकीं एक बहुतेक असायचेच. खर्च फार होतो म्हणून कांहीं वेळां पायींच जाऊन आम्ही पायींच परत येत असूं. त्यावेळीं नाटक संपायला पहाटे ४ वाजत. शहरांतून कॉलेज जवळ जवळ पांच मैल पडतें. इतक्या जाग्रणानंतर पेंगत पेंगत इतकें अंतर चालत येणें किती जिकीरीचें होत असेल बरें ? पण इतकाहि आंबट शोक मंडळी करीत. परत येईतों ५॥ वाजायचे. मग झोंप काढायची कशी ? कारण उजाडलें कीं जाग येणार. त्याला वामनरावांनीं तोड काढली होती कीं खिडक्यांचे आंतून आमचे काळे गाउन लावून उजेडाचा बंदोबस्त करायचा आणि मग ११ वाजेपर्यन्त झोपायचें ( त्यावेळीं डे. कॉलेजमध्यें कॉलेजच्या शिकण्याच्या वेळांत कोणीहि विद्यार्थी गाऊनशिवाय वर्गांत येवढेंच नव्हे तर कॉलेजच्या आवारांतहि दिसला कीं त्याला दंड होई अशी कडक शिस्त होती. ) आम्हीं किर्लोस्कर, शाहूनगरवासी अशांचींच नाटकें बहुतेक पहात असूं. बालगंधर्व नुकतेच त्या वेळीं स्टेजवर आले होते. शाकुंतल नाटकांत-त्यांचें शकुन्तलेचें काम नुकतेंच बसलें होतें. शाकुंतल नाटक कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्यें फार प्रिय असे. शकुंतलेचें कालिदासानें जें सहजरम्यत्व निर्माण केलें आहे तें त्या वेळीं बालगंधर्वांना इतकें बेमालुम साधत असे कीं त्यामुळें कॉलेजच्या विद्यार्थ्यांना त्यांनीं वेड लाविलें होतें. वामनराव तर त्या कामावर बेहद्द खूष असत, व शाकुंतल लागलें कीं आम्हांला आग्रहानें घेऊन जात. कॉलेज सुटल्यावर पुढें कांहीं वर्षांनीं किर्लोस्करांचें शाकुंतल लागलें तेव्हां वामनराव मुद्दाम मजकडे येऊन मला नाटक पाहायला घेऊन गेले. कारण बालगंधर्वांच्या त्या कामाची जुनी आठवण त्यांना ताजी करायची इच्छा झाली. पण पहिल्याच प्रवेशाला ते म्हणाले " हें हो काय ! आमची ती आश्रमवासी शकुंतला कुठें गेली ? ही तर अप टु डेट फॅशनेबल झाली आहे. " अर्थात् आम्ही नाटक सबंध पाहिलें पण आमची फार निराशा झाली. शकुंतलेच्या भूमिकेशीं पूर्वीं बालगंधर्वांचें तादात्म्य होत असे अशी जी आमची समजूत ती चुकीची ठरली. वामनरावांनीं त्याची मीमांसा अशी केली

कीं, बालगंधर्वांचें शकुंतलेच्या कामाचें त्या वेळचें सहजत्व त्या वेळां त्याच्या नव-शिकेपणामुळें आलें होतें, बुद्धिपुरःसर नव्हतें. धंद्याला आवश्यक असणारें कृत्रिम अभिनयाचें शिक्षण घ्यावें लागतें खरें, पण प्रसंगविशेषीं तें विसरावेंहि लागतें. हें विसरणें ( *Unlearning* ) बालगंधर्वांना पुढें निभलें नाहीं. मला ही मीमांसा पूर्वपणें पटली. वर्डस्वर्थच्या *Yarrow visited, Yarrow unvisited* यासारखाच थोडासा तो प्रकार झाला. असो.

एकदा नाट्यकलोद्धारक या नांवाची कंपनी आली होती. त्यांचें कोणतेंसें नाटक पाहायला आम्ही मंडळी गेलों. त्यांत सर्वांची निराशा झाली. वामनरावांच्या शेजारीं एक कोणीतरी गृहस्थ त्या मंडळीचा अभिमानी बसला होता. तो त्या मंडळीबद्दल कांहींतरी हकीगत एकसारखी सांगूं लागला. तो अगदीं अशिक्षित दिसला. मंडळीच्या नांवाचा ‘ नाट्य–कलोद्धारक ’ असा उच्चार करायच्या ऐवजीं तो गृहस्थ ‘ नाट्यक–लोद्धारक ’ असा करी. तोच वामनरावांना मौजेचा विषय झाला. ते वरचेवर त्याला असे प्रश्न विचारीत कीं त्याच्या तोंडून नाट्यक—लोद्धारक असा उच्चार वरचेवर व्हावा. व प्रत्येक वेळीं मला हातानें डवचीत. नाटकापेक्षां हीच करमणूक आम्हांला जास्त झाली. असा थोडासा खवचटपणा त्यांचे अंगीं होता. पण तो दुसऱ्याला तापदायक असा कधीं नसे. श्रीपाद कृष्णांच्या भाषेंत त्यांची विनोदवृत्ति मार्मिक होती, पण मर्मभेदी नव्हती.

अभ्यासाकरितां लावलेलीं पुस्तकें ( *Text Books* ) वामनराव व मी दोघे मिळून एकदां वाचीत असूं. मग त्यावरचा पुढचा अभ्यास ज्याचा त्याचा स्वतंत्र असे. वामनरावांना गोल्डस्मिथचा विनोद फार आवडे. तसाच—पण त्याच्या खालोखाल स्टीलचाहि आवडे. ॲडिसनच्या मिष्किल विनोदाचाहि ते आस्वाद घेत. पण तो तितकासा त्यांना पसंत नसे. आम्ही गोल्डस्मिथ व स्टील यांतलीं विनोदस्थळें बरोबर वाचीत असूं. त्या वेळीं कित्येकदां वाचून हसतां हसतां त्यांच्या डोळ्यांत पाणी येई. तिमजल्यावरील खपरेलांत ( *Garret* ) दिवस काढणारा गोल्डस्मिथ् आपल्या नायकाच्या तोंडून त्या राहणीचें वर्णन करतो त्यांतली " *A cap by night and stocking all the day* " हें वाक्य वाचून तर त्यांची अगदीं मुरकुंडी वळे. अनेक आपत्ति काढून देखील हृदयाचा गोडवा जसाच्या तसा राहणें हें जें त्या दोघांच्या वृत्तींतलें साम्य त्यांत तर त्यांच्या या गोल्डस्मिथ–प्रेमाचें बीज नसेल ना ?

अभ्यासाला जागणाऱ्या लोकांपैकीं वामनराव नव्हते. व मी तर नव्हतोंच नव्हतों. १२ वाजेपर्यन्त त्यांचें जाग्रण एखादे वेळींच होई. आणि मला तर ९ वाजले कीं पेंग यायला सुरुवात व्हायची. एकदां त्यांना काय हुक्की आली कोणास ठाऊक. ते मला म्हणाले, ' अहो, प्रिलिमिनरी अगदीं जवळ आली, इतके लोक जागजागून अभ्यास करताहेत, अन् आपण अगदींच जागत नाहीं हें वरें नव्हे. आपणहि जागूं शकतों हें लोकांना एकदां कळूं द्या. आज रात्रभर जागून सबंध मुद्राराक्षस नाटक संपवूं या. ठरल्याप्रमाणें रात्रभर—म्हणजे अगदीं उजाडतां सहा वाजेपर्यन्त—जाग्रण करून तें नाटक आम्हीं संपविलें. मी तर जाग्रणाला अगदींच कच्चा, तेव्हां झोपेवर तोडगा म्हणून आम्हाला त्या रात्रीं चार वेळ चहा घ्यावा लागला. सहा वाजतां पुस्तक खालीं ठेवून नित्यक्रमास सुरुवात झाली. पण मग जेवल्यानंतर एक तासाच्या पुढें आम्हांस वसवेना. मग काय, संध्याकाळपर्यन्त झोप. शिवाय जाग्रणाचा जो शीण आला होता तो दुसऱ्या दिवशींहि गेला नाहीं. असा जागून अभ्यास करण्याचा जोशीबुवांचा फार्स झाला.

कालजमधल्या आमच्या काळांत ( १९०१ ते १९०४ ) राजकीय चळवळीचे वारें देशांत बरेच खेळूं लागलें होतें. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या गोष्टींना सुरुवात झाली होती. दरसाल आमच्या कॉलेजची व फर्ग्युसन कॉलेजची ॲनिव्हर्सरी होत असे. त्या दिवशीं टेनिस मॅच् खेळायला आमची जोडी त्यांचेकडे व त्यांची जोडी आमचेकडे खेळायला येई व पाहुणे म्हणून त्यांना ठेवून घेतलें जाई. आमच्या जोडींतले जोशीबुवा एक असत. मला वाटतें १९०४ सालची गोष्ट. शार्पसाहेब डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल होते. फर्ग्युसन कॉलेजच्या ॲनिव्हर्सरीला आमची टेनिसची जोडी त्यांचेकडे खेळायला गेली होती. अर्थात् जोशीबुवा त्यांत होते. परत आल्यावर शार्पसाहेबांनीं त्यांना सहज विचारलें " कसा काय समारंभ झाला ? " जोशीबुवा सहजच म्हणाले " फार उत्तम झाला. त्यांतल्या त्यांत प्रोफेसर मंडळी सगळी आमचीच ( म्हणजे इंडिअन् ) असल्यामुळें विद्यार्थ्यांत जास्त मोकळेपणानें मिसळत होती. यामुळें तेथें सगळ्यांना आपलेपणा वाटत होता. तसा आम्हांला आमच्या ॲनिव्हर्सरींत वाटत नाहीं. " बाहेर चाललेल्या चळवळीचा जोशीबुवांच्या मनोभूमीवर न कळत उठलेला तो पडसाद होता. पण तें ऐकून शार्पसाहेबांची चर्या बदलून एकदम कावरी बावरी झाली. त्यांना तें रुचलें नाहीं.

किंचित् चेष्टेनें किंचित् कुचेष्टेनें ते म्हणाले " तुम्ही मंडळी आतां एम. ए. वगैरे झालांत म्हणजे आमच्या जागीं तुम्हांसच नेमूं म्हणजे झालें कीं नाहीं ? "

आमच्या वेळीं प्लंकेट म्हणून एक विद्यार्थी होते. तें बोलतांना चाचरत. त्याच-प्रमाणें पुण्यांतील श्रीमन्त बाळासाहेब विंचूरकरांचे चिरंजीव श्रीमंत भाऊसाहेब–आमच्या बरोबरीचे विद्यार्थी हेहि तसेच चाचरत. कॉलेजांत राहणारे सर्व विद्यार्थी एकमेकांना सहजच ओळखीत. परंतु श्रीमंत भाऊसाहेब गांवांतून येणारे व प्लंकेट लष्करांतून येणारे व दोघेहि निरनिराळ्या वर्गांत. यामुळें त्यांची मुळींच ओळख नव्हती. श्रीमंत भाऊसाहेब आमच्या बरोबरीचे असल्यामुळें ते चाचरतात हें आम्हांस माहीत होतें. परंतु मि. प्लंकेटहि चाचरतात ही गोष्ट त्यांच्याबरोबर टेनिस मॅच् खेळण्याचा योग एकदां आला असतां वामनरावांना व मला कळली होती. माझ्या मनांत एक दिवस कुचेष्टा करायचा विचार आला, व तो आमचे कंपॅनिअन् जोशीबुवा यांस कळविला. तेव्हां बरी गंमत होईल म्हणून त्यांनाहि तो पसंत पडला. मॅच्पासून जोशीबुवांची प्लंकेट यांच्याशीं थोडी ओळख झाली. त्याचा फायदा घेऊन जोशीबुवांनीं प्लंकेट व त्यांचे जोडीदार मि. कोडी यांना एक दिवस सहज मॅच् खेळायला म्हणून बोलावलें व श्रीमंत भाऊसाहेब विंचूरकर यांस आपले जोडीदार म्हणून घेतलें. जोशीबुवांनीं खेळायच्या सुरुवातीस त्यांची व प्लंकेट यांची ओळख करून दिली. एकजण म्हणाला " ग–ग–ग्लॅड टु मीट यू " लगेच दुसऱ्यानें म्हटलें " ग्–ग्–ग्लॅड टु मीट् यू. " त्याबरोबर दोघांनींहि जरा रागानेंच एकमेकांकडे पाहिलें. एकाला वाटलें हा आपल्याला वेडावून दाखवितो, व दुसऱ्याला वाटलें हा आपाल्याला वेडावतो. खेळतांनाहि स्कोअर मोजतेवेळीं " वेल् प्लेड पार्टनर्, " " युअर्स पार्टनर्, " वगैरे बोलतांना ते दोघेहि चाचरत. तसतसा दोघांचाहि राग वाढत चालला. कसेतरी चेंडू वेडेवाकडे मारूं लागले, व खेळाचा अर्थात् विचकाच झाला.

जोशीबुवांना व मला हंसूं कसें आवरावें याची मोठी पंचाईत पडली. खेळ संपल्याबरोबर आतां कांहीं जास्त बोलणें वाढून एकमेकांचें भांडण होतें कीं काय अशी भीति पडली. म्हणून मी तावडतोब भाऊसाहेब विंचूरकरांचे हातांत हात घालून घाईनें " चला भाऊसाहेब, आपलें तें काम तसेंच राहिलें. " असें कांहींतरी बोलून तडक खोलीकडे घेऊन गेलों. तों वाटेंतच भाऊसाहेब म्हणूं लागले " काय हो चमत्कारिक माणूस ! माझी त्याची पहिली ओळखहि नाहीं, आणि आपला मला

वेडावून दाखवितो. " हो, हो म्हणून मी त्यांना आपल्या खोलींत नेऊन बसविलें. व इतका वेळ दाबून ठेवलेलें हंसूं शेवटीं अनिवार फुटलें. विंचूरकर म्हणतात " मी इतका रागवतों आहें, अन् तुम्ही आपले सारखे हंसत सुटलां ! " मग सगळा प्रकार समजावून सांगून त्यांची क्षमा मागितली. तिकडे जोशीबुवांनींहि प्लंकेट् यांची समजूत करून त्यांची माफी मागितली; व तडक खोलीकडे आले. त्यावर पुन्हां आमच्या तिघांचा आणखी हंशा उडाला. मग दुसरे दिवशीं आम्हीं विंचूरकर व प्लंकेट यांचा एकमेकांशीं शेकहँड् करवून झालेला गैरसमज दूर केला. व तेहि तो खेळीमेळीचा प्रकार समजून आमच्या विनोदांत सहभागी झाले. यावरून दिसून येईलच कीं वामनराव जरी वृत्तीनें व अभ्यासानें तत्त्वज्ञानी होते तरी वेदाभ्यासजड नव्हते. त्यांना विनोदाची मोठी आवड असे. मात्र त्यांची थट्टामस्करी कधीं कोणास बोंचणारी नसायची. त्यांच्या लेखनांत जीं विनोदस्थळें आहेत तेथेंहि त्यांचें स्वरूप साधें भोळें आहे, खवचट नाहीं. मि. प्लंकेट् यांचेबद्दल मीं नुकतीच चवकशी केली, यावरून असें कळतें कीं ते गृहस्थ सिंधमध्यें हल्लीं *officiating Inspector General of Prison* या हुद्यावर आहेत.

आमच्या वेळीं कॉलेजांत स्टोव्ह वगैरे सरंजाम ठेवून चहा पिणारे लोक थोडे होते. शेंकडा १५—२० हि नसतील. आम्ही बरीच मंडळी रोज सकाळीं ताजें दूध पीत असूं. आमच्या चौथ्या क्लबांतील बहुतेक सगळी मंडळी सोवळें नेसत असत, जोशीबुवाहि नेसत. बहुतेक लोक डोक्याची हजामत करीत. केस ठेवणारे थोडे होते. पण कॉलेजच्या ४ वर्षांत त्यांची संख्या फार झपाट्यानें वाढली. माझे आजोबा जुन्या मताचे असल्यामुळें माझी केस ठेवण्याची छाती नव्हती. पण जो तो केंस ठेवूं लागल्यामुळें शेवटीं शेवटीं—हुक्की अनावर होऊन—मीही केस ठेवले. रविवारीं घरीं गेलों असतां आजोबा येवढेंच म्हणाले " बी. ए. परीक्षेंत केव्हां पास व्हाव-याचा तो होशील, पण आतां बी. ए. शोभूं लागलास येवढें मात्र खरें." जोशीबुवां-च्यानेंहि शेवटीं शेवटीं केस ठेवल्यावांचून राहावेना. कॉलेजमध्यें जो न्हावी येई तो फार गचाळ असे. नुसत्या म्हशीभादऱ्या होता. त्याला कंटाळून आम्हीं दुसरा एक चांगला न्हावी आणवून कामावर लावला; पण जोशीबुवांचा पहिला न्हावी कांहीं सुटला नाहीं. त्याच्या हजामतीचा त्रास होई तरी ते तसेच चालवून घेत. आम्ही सगळे लोक त्यांची चेष्टा करूं तेव्हां जोशीबुवा आपले हसायचे व म्हणावयाचे 'बरा आहे, आमचा आहे तो.' अशी त्यांची वृत्ति होती.

१९०० ते १९०६ या काळांत आम्ही डे. कॉलेजांत शिकत असतांना सेल्बी, शार्प, बेन, फ्रेजर, भांडारकर वगैरे मडळी शिकवायला असत, व पां. म. बापट (सेनापती), पी. एल. दामले (बुलढाण्याचें वकील व कवि), पी. के. पेंडसे (मुंबईचे कायदेपंडित), वामनराव गोडबोले (अजमिर व कोल्हापूर येथील कालेजांत प्रोफेसर), ज. वि. ओक (लोकशिक्षणकार), मोने (प्रोफेसर रॉबर्टसन कॉलेज), जी. जी. पेंडसे (प्रोफेसर बडोदा कॉलेज), बेलवलकर (प्रोफेसर डेक्कन कॉलेज, संचालक–भांडारकर इन्स्टिटयूट), रा. द. रानडे (युनिव्हर्सिटी प्रोफेसर–अलाहाबाद), माधवराव परांजपे (प्रोफेसर एस. पी. कॉलेज, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ), एम्. ए. फाटक (कर्नल, निष्णात डॉक्टर), जी. सी. भट (प्रसिद्ध वकील–पुणें), एस्. बी. जोशी (सेवानिवृत्त सबजज्–बडोदें), जी. व्ही. मेढी (वकील–कर्जत), लोकूर (जस्टिस् हायकोर्ट–मुंबई), बाबासाहेब खापर्डे (मंत्री वऱ्हाड–मध्यप्रांत), कंबळी (मुंबई इलाख्याचे माजी शिक्षणमंत्री), सर गुरुनाथ बेवूर, गो. वि. तुळपुळे (प्रोफेसर वाडिया कॉलेज), ल. ज. खरे (वकील–दर्यापूर) वगैरे मंडळी–कांहीं वामनरावांचे वर्गात, कांहीं पुढें, तर कांहीं मागें—शिकायला होती. प्रोफेसरांपैकीं मुख्य म्हणजे अर्थात् प्रि. सेल्बी. हे इतकीं वर्षे प्रिन्सिपल होते कीं ह्या वेळीं डेक्कन कॉलेज म्हणजे सेल्बी व सेल्बी म्हणजे डेक्कन कॉलेज अशी स्थिति होती. व त्यांचेंहि कॉलेजवर फार प्रेम असे, व त्याचा अभिमानहि त्यांना फार असे. डेक्कन कॉलेजच्या असंख्य विद्यार्थ्यांना त्यांनीं नोकऱ्या दिल्या व देवविल्या. त्यांची शिस्त फार कडक असे. व त्या शिस्तीचा डे. कॉलेजच्या लोकांवर परिणाम झाल्याशिवाय कधींहि रहात नसे. अलीकडे कॉलेजांतून होणारें *Stamping*, विद्यार्थिनींच्या कुचेष्टा, विद्यार्थ्यांचें अद्वातद्वा वागणें, या गोष्टी आम्हां डे. कॉलेजच्या लोकांच्या स्वप्नांतहि येऊं शकत नाहींत. कॉलेजच्या अभ्यासाच्या काळांत कोणीहि विद्यार्थी गाउनशिवाय बाहेर फिरकेल म्हणजे काय बिशाद आहे! तीच गोष्ट सिगरेट् ओढण्याची. कॉलेजांत खोलीबाहेर सिगरेट ओढीत चाललेला त्यांच्या नजरेस आला, किंवा कोणीं फेलोनें त्यांच्या कानांवर गोष्ट घातली कीं त्याचें नांव बोर्डावर लागलेंच, व त्याला बोलवून कानझाडणी करून दोन रुपयांची दक्षिणा बसलीच त्याच्या बोकांडीं! त्याचप्रमाणें सीनिअर–ज्यूनिअरचें प्रकरण. कोणींहि ज्यूनिअर विद्यार्थ्यानें सीनिअर विद्यार्थ्याचा अपमान केला व कागाळी सेल्बी साहेबांकडे गेली कीं बसलीच ज्यूनिअरवर दक्षिणा. तशीच गोष्ट फेलोसंबंधीं. कोणींहि विद्यार्थ्यानें

फेलोशीं बेअदबीचें वर्तन केलें कीं त्याची कंबक्तीच. यामुळें कोणी कोणाला निष्कारण टाकून बोलणें वगैरे तमाशा कॉलेजमध्यें कधीं होत नसे. याचा परिणाम आयुष्यभर मनावर पक्का राही.

सेल्बीसाहेबांची शिकविण्याची शैली कांहीं मोठी वाखाणण्यासारखी नव्हती. पण विषय थोडक्यांत फोडून सांगून वरचेवर त्याचा पुनरुच्चार करून विद्यार्थ्यांच्या मनावर पक्का ठसविण्याची कला त्यांना उत्तम साधली होती. त्यांचा नियमितपणा तर अगदीं कित्ता घेण्यासारखा होता. त्यांचें शिकवणें इतकें बसून गेलें होतें कीं आजच्या तारखेला जितका विषय झाला असेल तितकाच पुढच्या वर्षी त्या तारखेला व्हावयाचा! मुलांच्या पोषाखाच्या टापटिपीबद्दल त्यांचा फार कटाक्ष. त्यांनीं भपकेदार पोषाख करावा हें त्यांना आवडत नसे. तो साधाच असावा, पण स्वच्छ, नीटनेटका मात्र असला पाहिजे. एक दिवस सेल्बीसाहेब रोजच्याप्रमाणें संध्याकाळीं बाहेर पडले. वाटेंत त्यांना त्यांच्या ओळखीचा एक मोठा इंग्रज अधिकारी भेटला. व मग ते दोघे तसेच आणखी पुढें चालत गेले; वाटेंत त्यांना दोघे कॉलेजविद्यार्थी भेटले. अर्थात् त्यांनीं त्यांना 'गुड् ईव्हिनिंग सर' केलें. दुसऱ्या दिवशीं वर्गातच त्यांनीं त्यांची हजेरी घेतली. त्यांचे कपडे मळके होते. सेल्बीसाहेब म्हणाले, "तुम्हीं कॉलेजचा अपमान केलात. तुमचे मळके कपडे पाहून माझ्या बरोबरच्या इंग्रज गृहस्थानें विचारलें 'हे तुमचे डॉग्बॉइज् आहेत, होय?' एका गृहस्थानें माझ्या डेक्कन कॉलेजाच्या मुलांस डॉग्बॉइज् समजावें ही केवढी लांछनास्पद गोष्ट आहे!" त्यांना त्याबद्दल चांगलीच दक्षिणा द्यावी लागली. आपल्या कॉलेजचा कोणत्याहि गोष्टींत कधींहि अपमान झालेला त्यांना सहन होत नसे. कॉलेजबद्दल इतका आपलेपणा व इतका अभिमान प्रोफेसरांमध्यें क्वचितच आढळतो. अशा प्रिन्सिपालच्या हाताखालीं विद्यार्थ्यांचाहि स्वाभिमान जागृत असे. त्यांच्यामुळें कॉलेजचें वजन येवढें वाढलें होतें कीं दरवर्षी गव्हर्नरसाहेब एकदां केव्हां तरी कॉलेजला भेट द्यायचे, व एकाद् वेळेस कॉलेजला त्यांनीं अॅटहोम द्यायचा असा प्रघातच पडून गेला होता.

दुसरे मुख्य प्रोफेसर म्हणजे बेनसाहेब. इतिहास व अर्थशास्त्र हे विषय ते शिकवीत. या दोन्ही विषयांत त्यांच्यासारखा प्रकांड पंडित व गाढा विद्वान् फार क्वचित्. यांची शिकविण्याची पद्धति फार आवेशपूर्ण असे. ते पक्के कान्सर्वेटिव्–चांगल्या अर्थानें–होते. लिबरल् पार्टी, लोकशाही, फ्री ट्रेड, कार्ल मार्क्स, फ्रेंच

राज्यक्रान्ती, वगैरेसंबंधीं त्यांचीं मतें कांहींशीं लोकविलक्षण होतीं; व तीं ते मोठ्या जोसानें मांडीत. त्यांस खेळाचा फार शोक असे. स्वतः मॅचमध्यें खेळणें, निदान हजर राहणें, बक्षिसें लावणें, इत्यादींनीं ते विद्यार्थ्यांना खेळाची आवड लावीत. ते मोठे खिळाडू वृत्तीचे होते. '*Marathi is a poor language*' असें ते म्हणाल्यावरोबर एका विद्यार्थ्यानें '*Yes sir, to those who do not understand it*' असें प्रत्युत्तर देतांच '*Your's is a brilliant repartee*' असें ते त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाले. वर्गामध्यें लेडी स्टूडंट्सकडे पाहून त्यांच्यावर ते नेहमीं कोटया करीत.

तिसरे प्रोफेसर फ्रेजर हे इंग्लिश लिटरेचर शिकवीत. त्यांचें शिकविणें मास्तरी थाटाचें असे. ते स्वभावानें साधे व धार्मिक वृत्तीचे असत. हे पुढें *Secondary Teachers' Training College* चे प्रिन्सिपल झाले व तें काम त्यांच्या वृत्तीला फार अनुकूल होतें. त्यांना निरनिराळे दगड व झाडाफुलांचे नमुने यांचा संग्रह करण्याचा फार नाद होता. यांनीं थोडा मराठीचा अभ्यास केला होता. कॉलेजांतल्या शिपायांना कांहीं काम सांगायचें झाल्यास तें मराठींतून सांगायचा त्यांना फार शौक असे, आणि मग गड्याला 'पत्र घेऊन धावत जाशील का ?' असें विचारावयाचे ऐवजीं 'पत्र घेऊन पळून जाशील का ?' असें विचारल्यामुळें मोठे घोटाळे व हंशे उत्पन्न होत.

याच अवधींत सेल्बीसाहेब रिटायर झाले व त्यांच्या जागीं शार्पसाहेब प्रिन्सिपल म्हणून आले. शार्पसाहेब कांहीं विचित्र स्वभावाचे होते. त्यांचा स्वभाव विनोदी पण जरा कुत्सित होता. इंग्रजींत *Cynic* म्हणतात तसे ते होते. म्हणजे कोणत्याच गोष्टीचें त्यांना महत्त्व नव्हतें. त्यांचें लग्न झालें नव्हतें त्यामुळें त्यांची वृत्ति तशी झाली असावी असा आम्हां लोकांचा समज असे. त्यांना प्रवासाचा फार शोक असून जगांतील सर्व देश त्यांनीं पाहिले होते. फोटोग्राफीचा व लॅंटर्न् स्लाइड्स् करण्याचाहि त्यांना नाद असे.

आमचे पुष्कळ मित्र होते व त्या सर्वांसंबंधीं थोडें थोडें म्हटलें तरी सांगण्यासारखें पुष्कळ आहे; व सांगण्याचा मोहहि होत आहे. पण मुद्दामच हात आंखडतों.

डेक्कन कॉलेजची सगळीच गोष्ट कांहीं और होती. आरंभापासून वर्डस्वर्थसारखे प्रिन्सिपल व प्रोफेसर यांनीं निर्भय स्वतंत्र विचाराची, निरपेक्ष विद्याप्रेमाची ज्योत महाराष्ट्र–कर्नाटकांत येथेंच प्रथम पेटविली. विष्णुशास्त्री चिपळूणकर ज्याला

' वाघिणीचें दूध ' असें म्हणस तें महाराष्ट्र–कर्नाटकांत फक्त येथेंच प्यायला मिळे. ही झाली बुद्धि व अंतःकरण यांच्या जोमदारपणाची गोष्ट. तोच प्रकार बाह्य वातावरणाचाहि. डेक्कन कॉलेजची इमारतच घ्याना. तिची गॉथिक स्टाईल म्हणजे बौद्धिक वातावरणाचें प्रतीक, व तिच्या भवतींची किल्ल्यासारखी बांधणी म्हणजे लढाऊपणाचें प्रतीक. अशा रीतीनें ' इदं क्षात्रमिदं ब्राह्मं ' अशीं दोन्हीं तेजें येथें एकवटलीं होतीं. तसेंच भोवतालचें विस्तीर्ण मैदान घ्या, व निर्मनुष्य शांत वातावरण घ्या. त्याचा परिणाम प्रत्यक्ष तेथें जो एकदांच जाऊन आला त्याच्यावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. याशिवाय डे. कॉलेजच्या बोटक्लबाचें अद्वितीयत्व तर हिंदुस्थानभर प्रसिद्ध होतें.

या सर्व गोष्टी व आमचा शिक्षकवर्ग यांची आम्हां डेक्कन कॉलेजांतल्या मंडळींना आठवण झाली म्हणजे प्रेमाचें व आदराचें कसें भरतें येतें हें सांगतां येत नाहीं. डे. कॉलजचें वातावरण काय होतें याची कल्पना बाहेरच्या लोकांस येणार नाहीं. महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत इंग्रजी अंमलानंतर इंग्रजी विद्येचें व संस्कृतीचें जें वातावरण पसरलें त्याचें उगमस्थान डेक्कन कॉलेज होतें. व ती परंपरा फार वरच्या दर्जाची होती. त्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांमध्यें तो जोम, तो दुर्दमनीय आत्मविश्वास, तो मनाचा थोरपणा, ती खरी खिलाडू वृत्ति, ती मैदानी खेळांची आवड व या सर्वांवर कडी करणारी ती शिस्त हे सर्व गुण जे बाणून गेले त्यांनीं महाराष्ट्र व कर्नाटक यांवर आपला ठसा कायम ठेवून ही परंपरा कायम ठेवली होती. सरकारी नोकरींत, इतर व्यवसायांत, सार्वजनिक आयुष्यांत–कोठेंहि घ्या–डेक्कन कॉलेजचा मनुष्य वरील सर्व गुणांनीं उठून दिसत असे. "

हरीभाऊ गोळ्यांच्या आठवणींतील हा उतारा बराच मोठा झाला असला तरी वामनरावांच्या स्वभावबीजांची लावणी व त्यांची पुढची मशागत कोठें, कशी, कोणांकडून चालली होती या सर्व गोष्टी कळण्याच्या दृष्टीनें तो अतिशय महत्त्वाचा आहे. शिवाय एका काळीं महाराष्ट्रांत अत्यंत नांवजलेल्या एका मोठ्या संस्थेची माहितीहि या उताऱ्यामधून मिळत असल्यामुळें तो दिला याचें निराळें समर्थन करण्याचें कारण उरत नाहीं. हरीभाऊंना आपल्या कॉलेजचा जितका अभिमान व आदर वाटतो तितकाच तो वामनरावांनाहि वाटत असे, आणि त्याचें—तेथील प्राध्यापकांचें, तेथील वनश्रीचें, वगैरे—वर्णन ( अर्थात् कलात्मक ) त्यांनीं आपल्या पुस्तकांतून कितीतरी ठिकाणीं केलेलें आहे. वामनरावांचे व्यक्तिमत्त्वांत व त्यांचे

वाङ्मयांत जें जें विषेश आढळतें त्याचीं बीजें पाहणाराला तीं त्यांच्या डे० कॉलेजांत दिसून आल्यावांचून राहणार नाहींत. हरीभाऊनीं त्या वेळच्या आपल्या ( व वामन-रावांच्या ) मित्रांसंबंधीं नांवांपलिकडे फारसें कांहीं सांगितलें नसलें तरी ते जेव्हां जेव्हां हिंगण्यास वामनरावांकडे रात्रीं वस्तीला येत तेव्हां तेव्हां त्यांच्यासंबंधींच्या आठवणी हटकून निघत. आणि या त्यांच्या आठवणींना इतका रंग चढे कीं काळावेळाचें भान न राहून ' अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ' अशी त्यांची स्थिति होई. आणि मधून मधून चहा सिगारेट; मग काय विचारतां ? आठवणींना व विनोदाला नुसता बहर येई. सेनापती बापट किती हुशार, भावना-प्रधान व धाडसी होते, त्यांना पकडण्याचें वारंट घेऊन पोलीस डेक्कन कॉलेजात आले असतांना बेनसाहेबांनीं त्यांना कसा अटकाव केला व बाणेदारपणा दाखविला; वामनराव गोडबोले येवढा चौरस व गाढा विद्वान—पण विचाऱ्याचें कोठेंच कसें जमलें नाहीं; नोटस उतरून न घेण्याबद्दल सेल्बीसाहेबांनीं हटकतांच ओकांनीं त्या तोंडानें घडघड म्हणून त्याला गप्प कसें बसविलें, रिस्ले सर्क्युलरचा निषेध करण्या-करितां ४०० रुपयांच्या नागपूरच्या नोकरीवर लाथ मारून ते ८० रुपयांवर विजापुरकरांकडे कसे गेले; जी. जी. पेंडसे अहोरात्र अभ्यास कसे करीत व त्यांची शिस्त किती कडक असे; शार्पसाहेबांनीं प्रो० काण्यांना मागें सारून बेलवलकरांना —ते केवळ डेक्कनचे विद्यार्थी म्हणून—तेथील संस्कृतची प्रोफेसरी कशी बहाल केली; रामभाऊ रानडे वास्तविक सर राधाकृष्णन्‌च्या तोडीचे पण अंगांत व्यवहारकौशल्य नसल्यानें मागें कसे पडले; खापर्ड्यांची राहणी वडिलांप्रमाणेंच कशी नवाबी थाटाची होती व त्यांच्या एकट्याच्याचपाशीं त्याकाळीं फाऊंटन् पेन असल्यामुळें इतरांस कसा हेवा वाटत असे; एस. ए. फाटक मनाचा किती उदार व उमदा—बापट आजारी असतांना बायकोहि करणार नाहीं इतकी सेवा फाटकांनीं त्यांची कशी केली; कंबळी शिक्षणमंत्री असतांना डेक्कन कॉलेजला मूठमाती कशी मिळाली इत्यादि गोष्टींचीं घोळघोळून केलेलीं भावयुक्त वर्णनें व त्यांतून उत्पन्न होणारे विषाद, विनोद वगैरे ऐकून माझ्यासारखा तिऱ्हाईत सुद्धां रंगून जाई; मग ते गेल्यास नवल काय !

वामनरावांच्या जरा मागचे, पण त्यांच्याच वेळीं डेक्कन कॉलेजांत असलेले रा. ल. ज. खरे यांनीं वामनरावांसंबंधीं दिलेली माहितीहि बरीच मनोरंजक आहे. पण ' स्थलाभावें ' ती कमी करून द्यावी लागत आहे. ते लिहितात:—" जोशीबुवा लोकप्रिय होण्याचें मुख्य कारण त्यांचा निगर्वी व मनमोकळा स्वभाव. आपल्यापुढें

दोन किंवा तीन वर्षें पुढें असलेल्या विद्यार्थ्यांशी बोलतां-चालतांना थोडाबहुत संकोच कॉलेजांत प्रत्येकास वाटतोच. परंतु जोशीबुवांशीं वागतांना तसा कधींच कोणास वाटत नसे.

आमच्या वेळीं कॉलेजचे मुख्याध्यापक सेल्बीसाहेब होते. हे विद्यार्थ्यांशीं मिळून-मिसळून वागत नसत. परंतु कॉलेजांतील कांहीं विद्यार्थ्यांवर त्यांचा लोभ असे. या लोभाचें कारण कांहीं वेळां वडिलांचा परिचय हें असे. परंतु बहुतकरून हा लोभ जडवून घ्यावा लागत असे. सेल्बीसाहेबांचा लोभ ज्यांवर असे त्यांना आम्ही सेल्बीचे मानसपुत्र म्हणून संबोधित असूं. या मानसपुत्रांत वामनराव नव्हते. त्यांचा ऐच्छिक विषय तत्त्वज्ञान होता. तो सेल्बीसाहेबच शिकवीत होते. यामुळें मानसपुत्र होण्याचा मान जोशीबुवांस सहज मिळवितां आला असता. परंतु वर म्हटल्याप्रमाणें लोभ जडवून घेण्यासाठीं पुढें पुढें करणें, साहेबांचा कल पाहून त्याप्रमाणें वागणें-बोलणें वगैरे 'गुण' वामनरावांमध्यें नसल्यामुळें त्यांचेवर सेल्बीसाहेबांचा लोभ जडला नाहीं.

विकारवश न होतां कोणत्याहि विषयाचा समतोलपणें विचार करण्याची वृत्ति तेव्हांहि वामनरावांमध्यें होती. ती डिबेटिंग्‌सोसायटीमध्यें ठळकपणें दिसून येई. फेलो झाल्यावर डिबेटिंग् यूनिअन् मार्फत होणाऱ्या व्याख्यानांचे वेळीं पुष्कळ वेळां वामनराव अध्यक्ष असत. त्या वेळीं त्यांचा समारोप ज्यूरीला केस समजावून देणाऱ्या जज्जाच्या भाषणाप्रमाणें असे.

वामनराव कॉलेजच्या त्रैमासिकाचे मराठी बाजूचे संपादक दोन वर्षें होते. ती बाजू सजविण्याकरितां त्यांनाच पुष्कळसे लेख लिहावे लागत. त्याप्रमाणें ते लिहीत. परंतु बहुतेक लेख एकाचे नांवावर छापले तर तें बरें दिसणार नाहीं म्हणून एकाच अंकांतील निरनिराळ्या लेखांवर ते निरनिराळीं टोपणनांवें घालीत.

वामनराव बी. ए. झाल्यावर त्यांना डेक्कन कॉलेजामध्यें फेलो नेमण्यांत आलें. त्या वर्षीं तिन्ही फेलो तत्त्वज्ञान विषय घेऊन पास झाले होते. बाकीचे दोघे रा. एस्. बी. जोशी व रा. जी. सी. भट होते. या फेलोंना 'दक्षिणा' फेलो म्हणतात. कारण पेशवाईंत चातुर्मास्यांत जी रक्कम दक्षिणा म्हणून पेशवे वाटीत असत त्या रकमेंतून फेलोंना वेतन मिळतें. या नांवावरून त्या वेळीं केलेली कोटी मला आठवते. 'जोशी' व 'भट' यांना 'दक्षिणा' फेलोशिप्स देण्यांत सेल्बी-साहेबांनीं औचित्य दाखविलें खरें !

१९०५–०६ सालीं वंगभंगाची व त्याबरोबर स्वदेशीची चळवळ जोरानें सुरू झाली त्या वेळीं वामनरावांनीं स्वदेशी व्रत अजन्म पाळूं अशा प्रतिज्ञापत्रकावर कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या सह्या घेण्याचा उपक्रम केला होता असें आठवतें.

कॉलेज सोडल्यानंतर समर्थविद्यालयासाठीं वर्गणी गोळा करण्याकरितां वामनराव एकदां वसतिगृहांत आले होते. त्यावेळीं सेल्बीसाहेब डायरेक्टर होऊन निघून गेलें होते. त्यांना निरोप देण्यासाठीं जो मोठा उत्सव झाला त्यासाठीं ‘ सेल्बी वेलफेअर फंड ’ जमविण्यांत आला होता. त्याची उरलेली शें–दीडशें रुपयांची शिल्लक विद्यार्थ्यांनीं ठराव पास करून त्यांच्या स्वाधीन केली. मात्र अशी मदत उघडपणें केल्यास कदाचित् प्रिन्सिपल बेनना आवडणार नाहीं म्हणून पावती डी. सी. पी. ( डेक्कन कॉलेज पब्लिक् ) या नांवानें घेतली ! ”

## आप्तगुरु वगैरेंचे संस्कार

## ३

माणसाच्या जीवनावर त्याला शाळेंत मिळालेल्या शिक्षणाचा जसा परिणाम होतो तसा ज्यांच्या ज्यांच्या सहवासकक्षेंत तो येत असतो त्या व्यक्तींचाहि होत असतो. वामनरावांचें मन विशेष हळवें व संस्कारक्षम असल्यामुळें त्यांचेवर तर अशा व्यक्तींचा पुष्कळच परिणाम झाला आहे. त्यांच्या मातुःश्री, त्यांचे दोघे वडील बंधु, शाळेंतील कांहीं शिक्षक व कॉलेजमधील त्यांचे कांहीं प्रोफेसर या सर्वांच्या सहवासाचे संस्कार वामनरावांचे स्वभावावर झाले असून या सर्वांना त्यांच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. ' माझ्यांत तुम्हांला जें कांहीं चांगलें दिसतें तें सर्व मला या सर्वांकडून मिळालें आहे ' असें ते आपल्या विद्यार्थिनींना स्वतःच्या जीवनाविषयीं गोष्टी निघाल्या असतां सांगत. देव, धर्म, नीति वगैरेसंबंधींच्या भावनांना विचाराच्या कसोटीवर घासून पुसून पाहणारा व त्या त्या कसोटीला न उतरल्यास खुशाल फेंकून देणारा हा गृहस्थ आपल्या आप्तेष्टांचे व गुरुजनांचे बाबतींत भोळसट दिसण्याइतका श्रद्धाळू कसा याचें कोडें पुष्कळांना पडे. वामनरावांसंबंधीं जीं कांहीं कोडीं होतीं त्यांतलेंच तें एक होतें. तें कांहीं असो. वामनरावांच्या मनाचें संस्करण सदरहू व्यक्तींच्या हातून बरेंच झालें हें मात्र निश्चित.

वामनरावांच्या मातुःश्री १९११ मध्यें ते तुरुंगांतून सुटून येण्यापूर्वीं अवघ्या चारच

महिने आधीं जुनागडला आण्णांकडे वारल्या हें आपण मागें पाहिलेंच आहे. अर्थात् त्यांची प्रत्यक्ष अशी माहिती कांहींच नाहीं. वामनरावहि त्यांचेसंबंधीं एरवीं फारसें बोलत नसत. पण कधीं कधीं असे कांहीं बारीक सारीक प्रसंग घडून येत कीं त्यांमुळें त्यांना आपल्या मातुःश्रीविषयीं अनन्यसाधारण प्रेम वाटत असलें पाहिजे असें स्पष्ट दिसे. पुढील प्रसंग हा अशापैकींच एक होताः—

हिंगण्याच्या व्हिटवर्थ हॉलमध्यें यशवन्तांचें काव्यगायन चाललें होतें. ‘ स्वातंत्र्य-लक्ष्मीस–, ’ ‘ अस्तप्राय महाराष्ट्रास प्रणाम, ’ ‘ अंधळा झालों तर ’ वगैरे कवितांचें गायन होऊन कविरायांनीं आपल्या भावभव्य व करुणमधुर आवाजांत आपल्या सुप्रसिद्ध ‘ आई ’ या कवितेला सुरुवात केली, आणि क्षणा दो क्षणांत जिकडे तिकडे एक विपण्ण वातावरण उत्पन्न झालें. पहिलीं चार–पांच कडवीं होऊन ‘ वात्सल्य माउलीचें, आम्हां जगांत नाहीं, दुर्भाग्य याविना कां ? आम्हांस नाहिं आई ’ । हे हृदयाचा ठाव घेणारे उद्गार तरळ व कंपयुक्त गळ्यांतून बाहेर पडले मात्र, आधींच अस्थिर झालेले वामनराव जागचे उठून सभागृहाबाहेर पडले. ही त्यांची नेहमींचीच काव्यविमुखता व गान-अरसिकता नव्हे–आज कांहींतरी निराळेंच झालें असलें पाहिजे असें वाटून मीहि जरा वेळानें बाहेर गेलों आणि पाहिलें तों स्वारी आड रस्त्यावरील एका दगडावर बसून उपरण्यानें डोळे पुशीत असलेली दिसली ! “ काय असेल तें असो. नाना, ” उसनें हसूं तोंडावर आणीत व आपणांसारख्या विचारी व बुद्धिवादी म्हणून गणल्या गेलेल्या माणसानें इतकें भावनाविवश होणें बरें दिसत नाहीं अशा जाणीवेनेंच जणूं वामनराव म्हणाले “ मग ती कवीची कला असो, नाहींतर गायकाचें कसब असो, नाहींतर बालपणींच्या त्या रम्य आठवणी असोत, अजूनहि आपलं असं होतं हें खरं; बाकी आमची आई होतीहि तशीच प्रेमळ.”

अशाप्रकारें आईची आठवण होऊन गहिंवरून येण्याचे कितीतरी प्रसंग वामनरावांच्या सान्निध्यांत असलेल्यांच्या पाहण्यांत आले आहेत. १९३० सालीं वामनराव साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून गोव्यास गेले असतांना तेथील मंडळींनीं त्यांची एक मोठी थाटाची मिरवणूक काढली. जिकडे तिकडे कोण उल्हास नी आनंद ! पण वामनराव आपले पहावें तों खिन्न अन् उदास ! शेवटीं निवासस्थानांत येऊन जरा एकान्त मिळाल्याबरोबर वामनराव आईच्या आठवणींनीं अश्रुविमोचन करीत असलेले दिसले असें त्यांचेच बरोबर त्यांच्या दिमतीला म्हणून गेलेले मोनेमास्तर सांगत. मुंबई येथें झालेल्या एकसष्ठी समारंभाचे उत्सवप्रसंगीं वामनरावांचे तोंडून

पहिलें वाक्य आलें तें ' माझा हा मानसन्मान पाहायाला आज माझी आई असती तर–पण–' !

वामनरावांची वृत्ति व रहाणी फकिरासारखी असून त्यांच्या घराच्या भिंतीहि मशिदीसारख्या अगदीं ओक्या व भकास अशा दिसत. फोटो, चित्रें, निदानचीं सचित्र कॅलेंडरें तरी कोठें दिसावीं पण तींही नसावयाची. नाहीं म्हणायला निजण्या-वसण्याच्या खोलींत समोरच भिंतीवर 'तुळशीची पूजा करीत बसलेली त्यांची आई व जवळच अदबीनें उभ्या असलेल्या त्यांच्या धाकट्या सूनबाई ' असा एक ग्रूप फोटो मात्र कायमचा लटकावलेला दिसे !

आणि वामनरावांची आई होतीहि तशीच ! ती व्यवहारांत दक्ष, स्वभावानें सोशीक, मनाची प्रेमळ व वृत्तीनें त्यागी होती. विद्वान्, पण तामसी व तापट बिज-वर नवऱ्याच्या तंत्रानें चालणें, सावत्र मुलाच्या व त्याच्या बोलभांड बायकोच्या कलाकलानें घेऊन सर्व गोष्टी बिनबोभाट निभावून नेणें, स्वतःच्या सात-आठ मुलांचा प्रपंच नीटनेटका चालविणें, पन्नास-साठ गांवच्या वृत्तीचा व दहा-बारा खंडीच्या शेतीभातीचा पसारा कुशलतेनें उरकणें, आल्यागेल्या पाहुण्यारावळ्यांची व घरीं शिकायल्या राहिलेल्या विद्यार्थ्यांची बडदास्त ठेवणें, गुराढोरांची निगा राखणें वगैरे-सारखीं कठीण व किचकट कामेंहि त्या माऊलीनें आंगच्या गुणांवर, सर्वांकडून भलें म्हणवून घेऊन पार पाडलीं. पतिनिधनानंतर चार-पांच वर्षांनीं–म्हणजे सावत्र चिरंजीव ' भाऊ ' हे घरचीं व वडिलांचीं सर्व कामें पाहण्यास समर्थ झाल्यावर–त्या दहा-बारा वर्षांच्या आपल्या वामनाला घेऊन गोरेगांवाहून पुण्यास आण्णांकडे आल्या, आणि तेव्हांपासून पुढें कधीं आण्णांकडे, तर कधीं नानांकडे–ते असतील तेथें तेथें–त्यांचे संसार चालवीत व स्वतःचा परमार्थ साधीत राहिल्या. शेवटीं १९०८ चे सुमारास रत्नागिरीस नानांकडे असतांना वामनरावांच्या खडतर शिक्षेची हृदयद्रावक वार्ता ऐकून त्यांची कंबर खचली, व त्या मनानें व शरीरानें अधू होऊन कायमच्या आजारी पडल्या. याच सुमारास नानांनीं आपली सरकारी नोकरी सोडून नामदार गोखल्यांच्या भारतसेवकसमाजास जाऊन मिळण्याचें ठरविलें. अर्थातच रत्नागिरीचें बिऱ्हाड मोडल्यावर त्या जुनागडास आण्णांचेकडे गेल्या व तेथेंच ' वामन, वामन ' करीत विचारीनें प्राण सोडला. पुढें चारच महिन्यांनीं वामनराव तुरुंगांतून सुटून आले; पण आई मात्र अगोदरच निवून गेली होती ! वामनरावांच्या मनाला ही गोष्ट अखेरपर्यंत लागून राहिली होती. सुखदुःखाचे कसलेहि प्रसंग आले

म्हणजे त्यांचे डोळे भरून येऊन ते अंतराळांत शून्यपणें कोठेंतरी—कांहींतरी बघत रहात !

'माझ्या आयुष्यांतील सुखदुःखाचे कांहीं क्षण' या लेखांत वामनराव आपल्या आईच्या मृत्यूसंबंधीं लिहितात "आईच्या मृत्यूची वातमी मला हैदराबाद येथील तुरुंगांत असतांना चमत्कारिक रीतीनें कळली. कैदेची मुदत संपत आली होती, सुटण्याला दोन-तीन दिवसच राहिले होते. ऑफिसमध्यें मला तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडून बोलावून घेण्यांत आलें, तेव्हां मी आनंदानें गेलों आणि ऑफिसमध्यें जाऊन वसलों. मला वाटलें कीं तुरुंगांतून सुटल्यावर चांगले कपडे मला मिळावेत म्हणून बंधूंना मीं लिहिलें होतें त्याचें उत्तर आलें असावें आणि कपडेहि आले असावेत आणि हें सांगण्याकरितां मला बोलावण्यांत आलें असावें. पण माझ्या नशिबीं निराळेंच पत्र वाचावयाचें होतें. पत्र बंधूंचेंच होतें, पण त्यांत मातुःश्रींचें चार महिन्यापूर्वींचें वृत्त होतें ! तुरुंगांत मला दुःख होऊं नये, आणि घरीं आल्यावर आई कोठें आहे म्हणून विचारल्यावर मृत्यूची वार्ता सांगण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनीं तुरुंगांतून सुटण्याचे आधीं एक-दोन दिवस पत्र दाखवावें अशी तुरुंगाधिकाऱ्यांना विनंति केली होती आणि त्याप्रमाणें त्यांनीं व्यवस्था केली होती. तुरुंगावरील जेलर हा युरोपिअन होता, त्यानें मला फार आधीं आणि विशेषेंकरून त्यावेळीं फार सौजन्याचें वागविलें. मला बसण्यास खुर्ची दिली, आणि एक दोन समाधानाचे आणि सहानुभूतीचे शब्द बोलून मोकळेपणानें रडण्यास थोडा एकान्तवास करून दिला ! आईच्या मृत्यूची हकीकत तुरुंगांतच कळली हें उत्तम झालें. नाहींतर घरीं आल्यावर माझ्या उभयतां बंधूंवर ती गोष्ट सांगण्याचा प्रसंग आला असता तर तो मोठा दुर्धरच प्रसंग होता."

मातुःश्रीसंबंधीं अबोल नाना लिहितात "ती कधीं बोलली नाहीं तरी ती तात्यांच्या शिक्षेमुळें लागलेल्या हृद्रोगानेंच वारली. तात्या हे आमच्या आईचें शेवटचें अपत्य असल्यामुळें तात्यासंबंधानें तिची जास्त माया होती." पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजचे सेवानिवृत्त प्रिन्सिपाल रा. बटीन हे याच सुमारास आण्णांकडे विद्यार्थी म्हणून राहिलेले होते; तेहि 'म्हातारी'च्या धार्मिक वृत्तीची व सहिष्णुतेची मुक्त कंठानें वाखाणणी करतात. आपल्या आईच्या अशा प्रकारच्या साधुवृत्तीचा वामनरावांचे मनावर विशेष परिणाम झाला असल्यास, त्याचेच योगानें त्यांना जुन्या पिढींतील अशिक्षित पण सुसंस्कृत स्त्रियांसंबंधीं—साधेपणा, सरळपणा, भाविकपणा, पतिनिष्ठा,

१८२५६



वात्सल्य, स्वतःला विसरून—स्वतःच्या व्यक्तिमत्वाची वेगळी जाणीव न बाळगतां पतीच्या व मुलाबाळांच्या जीवनाशीं तादात्म्य पावण्याची शक्ति—इत्यादि त्यांच्या गुणांसंबंधीं विशेष आदर वाटूं लागला असल्यास व त्यांच्याच प्रतिमा त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून मोठ्या हौसेनें रेखाटल्या असल्यास नवल नाहीं.

वामनराव अवघे सात वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील वारले. त्यामुळें वामनरावांना त्यांजविषयीं कांहीं आठवत नसल्यास किंवा फारसें वाटत नसल्यास नवल नाहीं. उलट आपलें साधें बिचारें 'वामन' हें नांव लोकांच्या लक्षांत न येतां वडिलांचें 'मल्हार' हेंच नांव आपल्या कानभर व कठोर उच्चारामुळें लोकांच्या ध्यानांत विशेष राहतें आणि त्या अर्थानें आपण वडिलांच्याच नांवानें जगतों असें वामनराव विनोदानें म्हणत. मल्हारभट ऊर्फ नथु जोशी महाड-गोरेगांव प्रांतांतील एक विद्वान् म्हणून गणले जात असून नाणावलेले ज्योतिषीहि होते. त्यांच्या या गुणाबद्दल व अशा विद्वान घराण्यांत आपण जन्माला आलों, या गोष्टीबद्दल वामनरावांना कांहीं कमी अभिमान वाटत असे असें नाहीं. तथापि मातुःश्रींचे खालोखाल वामनरावांना कोणाबद्दल विशेष आदर वाटत असेल तर तो आपल्या वडील भावाबद्दल—महादेव मल्हार जोशी—ऊर्फ आण्णा—यांबद्दल होय.

आपल्या जीवनांत विशेष परिणाम करणारे तीन आण्णा आहेत असें वामनराव नेहमीं म्हणत. पहिले आण्णा कर्वे, दुसरे आण्णा विजापूरकर, आणि तिसरे आपले बंधु—आण्णा जोशी. आण्णांच्या या मालिकेंत आपल्या आण्णांना ते विनयानें तिसरे घालीत, पण अंतर्यामींचा भाव मात्र निराळाच असे. आण्णांची ती भव्य देहयष्टि, पोषाखाची जुनी पुणेरी पद्धत, किंचित् किंजाळणारा पण कानांत घुमणारा आवाज, साध्याहि बोलण्यांत दिसून येणारा आवेश, ओबडधोबड चेहऱ्यावरील भेदक दृष्टि इत्यादि गोष्टी पाहणाराच्या मनावर कायमची छाप पाडीत. तरल बुद्धिमत्ता, गाढी विद्वत्ता, संस्कृत, इंग्रजी, मराठी वाङ्मयाचा सखोल व मार्मिक अभ्यास, पौर्वात्य व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा रहस्योद्ग्राही व्यासंग, जुन्या संस्कृतीचा व परंपरेचा जाज्वल्य अभिमान,—पण त्याबरोबरच आधुनिक संस्कृतींतील सत्तत्त्वें स्वीकारण्याची तत्परता, डोळस देशप्रेम, झळ सोसून केलेला त्याग, विचारांची तेजस्विता वगैरे कितीतरी गुण आण्णांमध्यें होते. त्यांचा बाणेदार-पणा तर असा कीं एम्. ए. पर्यंतच्या सर्व परीक्षांतील संस्कृतचीं सर्व पारितोषिकें

त्यांना मिळालेलें असतां व एक मोठा संस्कृत पंडित असा सर्वत्र लौकिक असतांहि त्यांनीं परीक्षकाचे जागेकरितां एकदांहि अर्ज केला नाहीं. 'आण्णांपासून आपण एक गोष्ट प्रामुख्यानें शिकलों व ती म्हणजे लहानामोठ्यांचे भांडणांत मोठ्यानें पड खाऊन लहानांना उदारतेचें उदाहरण घालून द्यावें ही होय' असें नाना परत्रां म्हणाले, आणि तो संबंध प्रसंग मोठ्या भावपूर्ण आवाजानें सांगूं लागलेः—'मी व तात्या एके दिवशीं स्वयंपाकीण बाईवर अतिशय रागावलों व तिला लागेल असें कांहीं बोललों. तीहि बाई रागावली व अर्ध्या जेवणांत निघून जाऊं लागली. आण्णांनीं तें पाहून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण 'पोरटीं पाया पडल्याखेरीज आपण परत फिरणार नाहीं' असें म्हणून ती अडून राहिली. आण्णांनीं आम्हांला पड खायला सांगितलें. पण आम्हीं तरी काय म्हणून ऐकायचें ! झालें. आम्ही कोणीच ऐकत नाहीं असें पाहून स्वतः आण्णांनींच त्या बाईपुढें आमचे वतीनें साष्टांग नमस्कार घातला आणि तिची समजूत पाडली. माझ्या आयुष्यांत जेव्हां जेव्हां असले आणीबाणीचे प्रसंग येतात तेव्हां तेव्हां मीहि आण्णांच्या या युक्तीचा अवलंब करतों व आला प्रसंग निभावून नेतों.'

आण्णांच्या आंगच्या या मोठमोठ्या गुणांची प्रभा विरोधामुळें जास्त उत्कटत्वानें भासविणारे असे पार्श्वभूमिवजा कांहीं लहानसान दोषहि त्यांचेमध्यें होते. तथापि त्यांच्या जीवनांतील एकतः आर्ष व गंभीर वृत्ति व अन्यतः हृद्य, निरागस, खेळकरपणा हीं पाहतां त्यांना दोष तरी कसें म्हणावें अशी शंका येते. जागचें निसटूं पाहणारें धोतर डाव्या हातानें सांवरीत व उजव्या हातांतील रॅकेट पराजीत बेस लाईनवर इकडून तिकडे दुडदुडा धांवणारे; पोराबाळांचे घोळक्यांत हिंगण्याशेजारच्या डबकेवजा विहिरींत मोठ्या हिरीरीनें पोहणारे; खो खो, आट्यापाट्या खेळतांना विद्यार्थ्यांच्या हातच्या चापट्या खायला मागेंपुढें न पाहणारे; स्वतःच्या कर्तबगारीवर आवश्य तोहि विश्वास नसल्यामुळें लिहिलेला लेख व केलेलें भाषण 'काय, कसें काय झालें?' असें सामान्य माणसालाहि आवर्जून व भावडेपणानें विचारणारे; ताजा भात इतका कढत केला म्हणून आपल्या घेडगुजरी गुजराथींत महाराजाचे अंगावर खेकासणारे; 'काय रे वामन, बालगंधर्व म्हणतात तो हाच का, रें?' असें नाटकगृहांत भर प्रेक्षकांत मोठ्यांदा विचारणारे, व त्यांच्या फिदीफिदी हसण्याची पर्वा न करणारे; कानावरचें जानवें विमनस्कतेनें तसेंच विसरून कोट-पगडी चढवून बाहेर पडणारे—असे हे आण्णा पाहून थोडेंसें हसूं आलें तरी

त्यांच्या थोर थोर गुणांची जाणीव झाली म्हणजे तें हसूं नाहींसें होई, व पुन्हां पूर्वीचा आदर वाढूं लागे.

आण्णांच्या या विरोधात्मक स्वभावाचें व वामनराव आणि आण्णा यांना परस्परांबद्दल वाटणाऱ्या प्रेमाचें मार्मिक वर्णन रा. पु. गो. काणेकर यांनीं केलें आहे. ते लिहितात " ...... आण्णा जरी आधुनिक काळांतील एक जाडे विद्वान् होते, तरी त्यांची रहाणी अगदीं जुन्या चालीची असे. ते धार्मिक बाबतींत अत्यंत श्रद्धाळू होते. गुरुचरित्राच्या पोथीची पूजा केल्यावांचून ते अन्नग्रहण करीत नसत. ते सनातनी मताचे असले तरी त्यांच्या प्रेमळ व प्रांजळ स्वभावामुळें त्यांच्यासंबंधानें कट्टर सुधारकांनाहि प्रेम आणि आदर वाटे. हैदराबाद तुरुंगांतून तात्यांना ( वामनरावांना ) घेऊन मुंबईला आल्यावर आण्णा मला म्हणाले, " वामनाला प्रायश्चित्त देवविण्याचें मीं ठरविलें आहे. यथासांग प्रायश्चित्तविधि पुण्यास करूं; तूर्त तात्पुरता विधि करून टाकला पाहिजे. तुम्हांला आमच्या नारायणरावांचे विचार माहितच आहेत. तेव्हां तुम्हींच माझें काम करा. एक भटजी बोलावून आणा. " हें ऐकत असतां मनांतल्या मनांत मला हसूं येत होतें. आण्णांशीं वादविवाद करून त्यांचीं मतें मला थोडींच बदलतां येणार होतीं ! प्रायश्चित्ताचा विधि तात्पुरता खरा, परंतु सक्षौर व्हावयाचा असल्याकारणानें भटजीबरोबर न्हावीहि बोलावून आणावा लागला. न्हाव्यासमोर तात्यांना बसवून शेजारीं आण्णा बसले, आणि आपल्यादेखत त्यांनीं क्षौरविधि करून घेतला. मला तात्यांची दया येत होती. तात्यांचा प्रायश्चित्तावर विश्वास नव्हता; अर्थात आवश्यकता वाटत नव्हती परंतु प्रेमळ आण्णांचें मन कसें दुखवायचें ? बिचारे तात्या निमूटपणें क्षौर करून घेत होते ! त्यानंतर स्नानाचे वेळीं आण्णांनीं आपल्या हातांनीं तात्यांना आंघोळ घातली, त्यांचें आंग चोळलें, जणू काय एखादी आईच आपल्या लहान बालकाला आंघोळ घालीत आहे ! आण्णा आणि तात्या या उभयतांच्या प्रेमळ व हळव्या अंतःकरणाची त्या वेळीं मला ओळख पटली आणि अजूनहि जेव्हां जेव्हां या गोष्टीची मला आठवण होते, तेव्हां तेव्हां माझें मन सद्गदित झाल्यावांचून राहात नाहीं. "

आण्णांच्या संबंधीं काकासाहेब कालेलकर काय म्हणतात तें पाहण्यासारखें आहे. ते म्हणतात, " जुनागड येथें दोनदां त्यांच्या घरीं त्यांचा पाहुणा म्हणून मी राहिलों होतों. रसिकशिरोमणी महाकवि कालिदासाची मूर्ति कशी असेल याचें

कल्पनाचित्र जेव्हां जेव्हां मनामध्यें रेखाटण्याचा मीं प्रयत्न केला आहे, तेव्हां तेव्हां त्या आदर्शभूत गृहस्थाश्रमी व सात्त्विक महादेव मल्हारांच्या मूर्तीशीं तिचें साम्य असल्याचें माझ्या ध्यानांत आलें आहे. महादेव मल्हारांनीं ' आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त ' ही लेखमाला लिहिली आणि वामन मल्हारांनीं आपल्या शंकांची व मतभेदाची पुस्ती त्याला जोडून दिली. तत्त्वज्ञानाची इतक्या उच्च भूमिकेवर जाऊन केलेली मनोरंजक चर्चा अन्यत्र क्वचितच पहावयास सापडेल. महादेव मल्हारांनीं लिहिलेली '.सच्चिदानंद बाबांचीं पत्रें ' पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं नाहींत हा त्यांच्या बंधूंचा आणि रसिक महाराष्ट्राचा सारखाच अपराध आहे. " ( हीं पत्रें आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. )

आण्णांच्या मृत्यूचा प्रसंगहि मोठा हृदयद्रावक आहे. ते जुनागडहून पेन्शन घेऊन नुकतेच हिंगण्यास वामनरावांकडे येऊन राहिले होते. १९२८ एप्रिलमध्यें ते आजारी पडून थोड्याच अवधींत त्यांच्या प्रकृतीची स्थिति चिंता करण्यासारखी झाली. यावर्षी १८ एप्रील रोजीं प्रो. कर्वे यांचा एकाहत्तरावा वाढदिवस मोठ्या प्रमाणांत साजरा व्हावयाचा होता. समारंभाच्या कार्यकारी मंडळाचे वामनराव अध्यक्ष होते. इकडे उत्सवाच्या कामाची धांदल, आणि इकडे वडील बंधु मृत्युशय्येवर पडलेले ! वामनरावांच्या जिवाची अतिशय ओढाताण होई; परंतु अंगावर काम घेतल्यानंतर त्यांत कांहीं कमी पडतां कामा नये हा त्यांचा बाणा. त्यांचें काम चालूंच असे. मरणापूर्वीं चारच दिवस आण्णा क्षीण आवाजांत वामनरावांना म्हणाले, " Tatya. I am not afraid of death; but I am afraid I shall come in the way of your celebrations. " दोघां भावांच्या डोळ्याला पाणी आलें. उत्सव अठरा तारखेला तर दैवानें सोळा तारखेलाच आण्णांना आपल्या घरीं नेलें, आणि त्यांची भीति व्यर्थ ठरविली ! दोन दिवसांनंतर झालेल्या समारंभांत वामनरावांनीं इतक्या स्थितप्रज्ञतेनें भाग घेतला कीं या माणसाचा पितृतुल्य बंधु दोन दिवसांपूर्वी वारला असेल असा कोणास संशय सुद्धां आला नसेल.

आण्णांच्या स्वभावाचें इतक्या विस्तारानें वर्णन करण्याचें कारण असें कीं तो समजल्याशिवाय वामनरावांच्या विरोधात्मक व थोडयाशा विचित्र जीवनाचें योग्य तें आकलन नीटसें होत नाहीं. वामनराव जे कोणी व जसे कसे झाले त्याला कारण बऱ्याचशा प्रमाणांत त्यांचे आण्णा होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. या गोष्टीची

जाणीव खुद्द वामनरावांना कशी होती व तिचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक वागणुकींत कसा दिसे हें वामनरावांचे पुतणे प्रो. अ. म. जोशी यांच्या पुढील आठवणीवरून दिसून येणारें असल्यामुळें येथें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. प्रो० अवधूतराव लिहितात, " आण्णामुळें आपण इतकें शिकून नांव मिळविलें या गोष्टीची तात्यांना अतिशय जाणीव असे. यामुळें आमच्याकरितां वाटेल ती झीज सोसण्याची त्यांची तयारी असे. १९१८ सालीं हिंगण्यास नोकरीनिमित्त जाऊन राहिल्यानंतर लवकरच त्यांची पत्नी निवर्तली. त्यावेळीं त्यांचें वय केवळ ३६ वर्षांचें होतें. त्यावेळीं दुसरें लग्न करणें केवळ शक्यच नव्हे, तर इष्ट होतें. परंतु ते त्या पाशांत पडले नाहींत. त्यांना चार मुलें होतीं हें त्याचें एक कारण असूं शकेल. परंतु पुढें कांहीं वर्षांनीं त्यांच्याच एका सहाध्यापकानें सांगितल्यावरून खरें कारण कळलें. ते म्हणाले ' आम्हीं तात्यांना दुसरें लग्न करण्याचा पुष्कळ आग्रह केला; परंतु त्यांचें आपलें एक उत्तर ठरलेलें. आण्णा, नाना व त्यांचीं मुलें आज मोकळेपणानें व प्रेमानें सुटींत महिना महिना माझेकडे येऊन राहतात; मीं दुसरें लग्न केलें तर त्यांना तसा मोकळेपणा वाटणार नाहीं, आणि कदाचित् तीं यायचींहि बंद होतील. मग मात्र मला फार वाईट वाटेल. तेव्हां नकोच ती लग्नाची भानगड.' आतां यापुढें काय बोलणार ? आण्णांबद्दलच्या कृतज्ञतापूर्ण प्रेमामुळें ते आमच्याकरितां वाटेल तें करण्यास तयार असत. पैशाची त्यांनीं कधींच पर्वा केली नाहीं. युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे पैसे आले म्हणजे दोन दिवस कांहीं ते टिकायचे नाहींत. ' बगे, तुला दोन पातळें घे; जगू–बाळू, तुम्हांला कांहीं कोटबीट करायचे आहेत का? हे घ्या पैसे. ' अशी खैरात सुरू व्हायची. कित्येक वेळां आम्हां पुतण्यांपैकीं कांहींजणांशीं मतभेद वा गैरसमज होण्याचेंहि प्रसंग आले, नाहीं असें नाहीं; परंतु प्रत्येक वेळेस तात्यांनीं नमतें घेऊन समेट घडवून आणावा असें घडायचें. याच्या मुळाशीं त्यांच्या स्वभावांतील सौम्यपणा व प्रेमळपणा तर असेच, पण तितकीच आण्णांबद्दलची कृतज्ञताबुद्धीहि असे. "

वामनरावांना आण्णांप्रमाणेंच त्यांच्या पत्नीबद्दल–म्हणजे आपल्या वहिनींबद्दलहि तितकेंच प्रेम व आदर वाटत असे. वहिनींचेंहि आपल्यावर कसें पुत्रवत् प्रेम असे याचें उदाहरण म्हणून वामनराव पुढील गोष्ट सांगत असें प्रो. अ. म. जोशी लिहितात:—" मी पहिल्या वर्षी मॅट्रिकचे परीक्षेस बसलों व नापास झालों. यावरून आण्णा मला बोलले. माझा अपमान झाला व आतांच्या आतां घरांतून

निघून जातों असें म्हणून मी खरोखरच जावयास निघालों. आण्णांनाहि माझी परीक्षा पहावयाची होती कीं काय कोणास ठाऊक! पण ते कांहींच बोलले नाहींत. वहिनी सर्व प्रकार स्वयंपाकघरांतून पहात होती. हा मुलगा खरोखरच नेसत्या धोतरानिशीं घरांतून निघून जात आहे असें पाहतांच ती स्वयंपाकघरांतून धांवतच बाहेर आली, व 'भावोजी, कुठें चाललां तुम्ही? माझी शपथ आहे तुम्ही जाल तर! तुम्ही जेवींपर्यंत मी जेवायची नाहीं.' असें म्हणून ती दार अडवून उभी राहिली. झालें! तत्क्षणीं माझा चेव थंडावला व हळू हळू आण्णांचाहि राग कमी झाला. वहिनीच्या प्रेमानें डाव जिंकला! अशा प्रेमळ भावजया आतां पहायला सांपडायच्या नाहींत." आणि असले भावोजी तरी कुठें पहायला सांपडणार आहेत? वामनरावांची पिढी असल्या भावजींचीहि कदाचित् शेवटचीच पिढी ठरेल.

वामनरावांना आण्णांबद्दल ज्या कारणांमुळें आदर वाटे त्यांहून कांहीं निराळ्याच कारणांमुळें त्यांना त्यांचे दुसरे बंधु नाना यांचेबद्दल आदर वाटे. आयुष्याच्या संस्कारक्षम काळांत वामनरावांचा आण्णांशीं जितका संबंध आला तितका नानांशीं आलेला दिसत नाहीं. त्या दोघांच्या वयांत तसें पांचसहा वर्षांचेंच अंतर असलें तरी दोघांच्या मनाच्या ठेवणी प्रथमपासूनच निरनिराळ्या घडल्यामुळें वामनरावां-च्या आण्णांविषयींच्या प्रेमांत जी आर्तता आणि उत्कटता प्रतीत होई तितकी नानांविषयींच्या प्रेमांत होत असे असें वाटत नाहीं. आण्णा आणि वामनराव जात्या सारखेच भावनाशील, तर नाना विचारशील. त्या दोघांचा ओढा चिपळूणकर, टिळक व त्यांचा राष्ट्रीय पक्ष यांकडे. तर नानांचा ओढा रानडे, गोखले व त्यांचा नेमस्त पक्ष यांकडे. त्या दोघांना अध्ययन, अध्यापन, अध्यात्म वगैरे चिंतनपर गोष्टींची आवड, तर यांना प्रत्यक्ष कार्य करण्याची व निरनिराळ्या चळवळींत भाग घेण्याची आवड. [ नाना शिक्षक होते–अगदीं ट्रेन्ड शिक्षक होते. पण त्यांच्या शिकविण्यांत आण्णांच्या शिकविण्याइतकी रंजकता, तेजस्विता, किंवा स्फूर्तिप्रदता नसे असें त्या दोघांच्याहि शिकविण्याचा अनुभव असलेले प्रो. नारळकर सांगतात. हें आपलें वैगुण्य ओळखून म्हणा, किंवा तोंडानें नुसतें शिकविण्यापेक्षां हातानें काम कर-ण्याचीच जास्त आवड म्हणून म्हणा नानांनीं शिक्षणखातें लवकरच सोडलें. ] आण्णा व वामनराव काव्यशास्त्रविनोदांत, व नीति–अनीति, कार्य–अकार्य, इत्यादि प्रश्नांचा खल करण्यांत मग्न; तर नाना अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या किंवा सरकारी निळ्या

पुस्तकांच्या वाचनांत, लोकस्थितिदर्शक आंकडे जमविण्यांत, व रिपोर्ट अहवाल वगैरेसारखें रुक्ष वाङ्मय प्रसिद्ध करण्यांत दंग. ते दोघे बोलके व वादविवादप्रिय, तर हे अबोल व कामसू. मात्र वादाचा प्रश्न राजकीय व गंभीर असला म्हणजे नाना त्यांत हिरीरीनें भाग घेत, व त्यावेळीं ते व वामनराव यांत मोठी खडाजंगी उडे. नाना बहुधा रागावून व तावातावानें बोलत, तर वामनराव हळू पण मिष्किलपणें बोलत. नाना हे आण्णा व वामनराव यांचेहून अशाप्रकारे भिन्न मनोवृत्तीचे व भिन्न प्रकृतीचे असले तरी नानांचा व्यवस्थितपणा, टापटीप, कामसूपणा, विरक्तता, स्वतंत्र बाणा, निर्लोभ वृत्ति, इत्यादि गुणांमुळें वामनरावांना नानांबद्दल आण्णां-इतकाच आदर वाटे, व आण्णांइतकाच नानांच्याहि चारित्र्याचा परिणाम वामन-रावांवर झाल्यावाचून राहिला नाहीं.

नानाहि वामनरावांप्रमाणेंच विधुर झालेले, प्रकृति नेहमीं नादुरुस्त असलेली; बी. ए. झालेली, घरांतलें पाहणारी, वडिलांच्या जीवाला जपणारी थोरली मुलगी भिकुताई वारलेली; धाकटया मुलीची स्थिति नेहमींच काळजी करण्यासारखी अस-लेली; अशा प्रकारच्या आधिव्याधींत व विवंचनेंत नानांना आयुष्य काढावें लागतें याचें वामनरावांना मनांतून अतिशय दुःख होई. आणि आपल्याला त्यांच्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं कांहीं करतां येत नाहीं या जाणीवेनें तर त्यांच्या दुःखांत अधिकच भर पडे. पण अशाहि दुःखद स्थितींत नाना इतक्या आनंदानें राहतात, अशा रुग्णावस्थेंतहि इतक्या लांबचे प्रवास करतात, विरुद्ध व्यक्तींनीं व प्रतिकूल पक्षांनीं केलेल्या निंदेकडे कानझाक करून हातीं घेतलेलें काम श्रद्धापूर्वक करतात, सरकारनें केलेल्या गौरवानें व दिलेल्या मानानें सुखावून न जातां किंवा लोकनिंदेनें व वृत्तपत्रीय टीकेनें दुखावून न जातां 'समदुःखसुखे कृत्वा' 'समलोष्टाष्मकांचन' अशा योगी–वृत्तीनें राहतात याचें वामन-रावांना मोठं कौतुक वाटे. दोघांवरील समान आपत्तींमुळें व विशेषतः आण्णा गेल्यापासून आठ भावंडांपैकीं आपण आतां दोघेच उरलों या अबुद्ध जाणीवेमुळें अलिकडे वामनराव व नाना मनानें पूर्वीपेक्षां जास्तच निकट आल्यासारखे दिसत. चार सहा महिन्यांनीं जेव्हां ते एकमेकांना भेटत, आणि एकाच काडीनें दोन विड्या शिलगावन सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसत तेव्हां जसे कांहीं फार दिव-सांचे दोन स्नेही भेटले आहेत आणि अंतर्यामींचीं हितगुजं सांगत आहेत असें वाटे–इतका मोकळेपणा, प्रेमळपणा व स्वाभाविकपणा त्यांच्या बोलण्या–बसण्यांत

भरलेला असे. वामनरावांच्या शेवटच्या दुखण्यांत व विशेषतः अंतकाळच्या प्रसंगीं नानांचें जें धीरोदात्ततेचें व स्थितप्रज्ञतेचें वर्तन दिसलें त्याच्यासारखें दुसरे महाभारतांतच एकादें आढळलें तर आढळावयाचें !

आण्णा, नाना आणि वामनराव या त्रिवर्ग बंधूंकडे पाहिलें म्हणजे धन्यता दाटून एकाच घराण्यांत एकाच वेळीं अशा तीन महान् व्यक्ति जन्माला कशा आल्या याचेंहि थोडेसें आश्चर्य वाटतें. एक महाराष्ट्रीय मान्यतेचा गाढा पंडित, दुसरा जागतिक कीर्तीचा हिंदी मजुरांचा कैवारी, आणि तिसरा बृहन्महाराष्ट्रांतील विख्यात साहित्यिक. असे बंधु असल्याचें महाराष्ट्रांत तरी हें पहिलेंच उदाहरण असेल. पण असाहि एक दुःखद विचार मनांत येतो कीं, तिघांच्याहि बायका आपआपल्या पतींना व मुलाबाळांना सोडून भर संसारांतून अकालींच कशा नाहींशा व्हाव्यात ! असा काय शाप घराण्याला असावा, किंवा अशी काय ईश्वरी योजना असावी कीं कोणालाच पुरेसें पत्नीसुख लाभूं नये ? यांचे संसार शेवटपर्यंत सुखानें चालते तर त्यांचें कार्य आणखी चांगलें नसतें का झालें ? का उलटच झालें असतें ? वामनरावांचे प्रमाणेंच एकदम 'अस्तु' असें म्हणून या विचारकल्पनांना आवरून धरूं. आणि पुढें चालूं.

वामनरावांच्या जीवनावर विद्यार्थिदशेंतच ज्यांच्या चारित्र्याचा विशेष परिणाम झाला असे त्यांचे गुरुजन म्हणजे डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपाल सेल्बी आणि न्यू प्रिपेरेटरी क्लासेसमधील त्यांचे शिक्षक पांगारकर आणि लवाटे हे होत. प्रिन्सिपल सेल्बींचें आपल्या कॉलेजवर किती प्रेम होतें, त्यांना आपल्या विद्यार्थ्यांबद्दल किती आपलेपणा व अभिमान वाटत होता, त्यांची शिस्त किती कडक होती हें सर्व आपण अगोदरच पाहिलें आहे. या सर्व गुणांचें बाळकडु वामनरावांस मिळालें होतें. वामनरावांचेंहि आपल्या महिला पाठशाळा कॉलेजवरील प्रेम, व त्यांना आपल्या विद्यार्थिनींबद्दल वाटणारा अभिमान हीं तितकींच गाढ व प्रबळ स्वरूपाचीं होतीं. पण कॉलेजवरील प्रेम उत्कटतेनें व्यक्त व्हावयास कॉलेजा-कॉलेजांमधील सामने, चढाओढी वगैरेसारखे जे प्रसंग घडावे लागतात तसले प्रसंग वामनरावांच्या कॉलेजचे बाबतींत–तें एकटें एका बाजूला पडत असल्यामुळें–फारसे घडत नसत; आणि अर्थातच अंतर्यामीं वाटणाऱ्या प्रेमाचें प्रत्यन्तर तितकें उठून दिसत नसे. त्यांना आपल्या कॉलेजच्या मुलींबद्दल अतिशय अभिमान वाटे; पण अभिमानाच्या भरांत आपले हातून कांहीं पक्षपात किंवा पंक्तिप्रपंच होऊं नये अशीहि जाणीव तितकीच जागृत असल्यामुळें

तो सेल्बीसाहेबांच्या अभिमानाइतका उठून दिसत नसे इतकेंच काय तें. प्रेम काय किंवा अभिमान काय–उज्ज्वलतेनें दिसायला माणसांत थोडा तरी अंधळेपणा असावा लागतो; तो वामनरावांत मुळांतच नसल्यामुळें त्यांचें प्रेम, अभिमान वगैरे सर्व फिकीं व मिळमिळीत दिसत.

पुष्कळ वेळां वाटे कीं मागच्या जन्मींच्या एकाद्या शापामुळेंच वामनराव मुलींच्या संस्थेंत येऊन पडले असावेत. मुलींच्या शाळेंत किंवा कॉलेजांत न येतां ते मुलांच्या मोठ्या शाळेंत किंवा कालेजांत जाते व तेथें मुख्याध्यापक किंवा प्रिन्सिपल म्हणून काम करते, तर त्यांच्या गुणांचें चीज व मूळ वृत्तींचें सार्थक अधिक प्रमाणांत होऊन सर्वांनाच हिताचें झालें असतें. समर्थ विद्यालयांत जाण्याचा त्यांनीं जो बेत केला तो आपल्यांतील गुण व प्रवृत्ति ओळखूनच त्यांनीं केला होता असें वाटतें. पण नियतीची योजना निराळीच होती. आपल्या कॉलेजची प्रगति व्हावी त्या प्रमाणांत व हवी तितक्या लवकर होत नाहीं ह्याची रुखरुख वामनरावांना सारखी वाटत असे, व ते ती मनांत मावेनाशी झाली म्हणजे कांहीं कांहीं प्रसंगांनीं बोलूनहि दाखवीत असत.

डेक्कन कॉलेजांतील इतर प्रोफेसरांपासूनहि वामनरावांनीं थोडें थोडें उचललेलें दिसतें. खेळाडूपणा, खिळाडू वृत्ति, थट्टेखोर स्वभाव, विशेषतः विद्यार्थिनींची चेष्टा करण्याची प्रवृत्ति, विचारस्वातंत्र्याची चाड इत्यादि त्यांनीं बेनसाहेबांपासून घेतले. फ्रेजर व शार्प यांचें फुला-दगडांचें वेड व चित्रांचा शोक स्वतः वामनरावांना लागलें नाहींत हें खरें, पण तसा एकादा छंद प्रत्येकाला अवश्य असावयास पाहिजे याची तीव्र जाणीव त्यांस असे. एकाच एक उद्योगानें जीवित कसें कंटाळवाणें होतें हें त्यांना पटूं लागलेलें असून आपल्या विद्यार्थिनींच्या मनावर ती गोष्ट बिंबवण्याचा ते सारखा प्रयत्न करीत असत.

साधी रहाणी, मनांत खोलपर्यंत पोंचेल असें तळतळून बोलण्याची तऱ्हा, तेजःपुंज चेहरा, नम्रता, कष्टाळूपणा इत्यादि गुणांचे योगानें भाऊसाहेब लवाटे कोणाहि तरुणाचें मन आपलेकडे एकदम ओढून घेत असत; आणि वामनराव तर त्यांच्या निकट सान्निध्यांत असलेले मग काय विचारतां? वामनरावांचें सुधारकी वर्तन भाऊसाहेबांस पुढें तितकेंसें आवडत नसलें तरी त्यांचेबद्दल त्यांना अतिशय प्रेम वाटत असे, आणि वामनरावांनीं पुढें सोसलेल्या देहदंडाबद्दल तर त्यांना आदरहि वाटूं लागला होता. परवां भाऊसाहेबांपाशीं बोलतांना वामनरावांवरील

त्यांचें हें प्रेम नी आदर त्यांच्या पाणावलेल्या डोळ्यांतून व अडखळणाऱ्या शब्दांतून स्पष्ट दिसत होतीं. लहानपणच्या संवयीमुळें मधूनच ते ' वामन ' अशा एकेरी नांवानें उल्लेखीत; पण हें बरें नाहीं अशी लगेच जाणीव होऊन आपल्या कांपऱ्या आवाजांत म्हणत " महाराज क्षमा करा. मी पूर्वीच्या सलगीनेंच त्याला ' वामन ' म्हणतों. वास्तविक तो फार मोठा होऊन गेला. इतका विद्वान्, धीरगंभीर, व सात्विक वृत्तीचा हा निघेल असं तेव्हां वाटलं नव्हतं. "

पांगारकर जुन्याचे अभिमानी, तर वामनराव-पांगारकरांचाच शब्द वापरायचा म्हणजे-धर्मलंड अन् नास्तिक. असें असूनहि त्यांस वामनरावांचे वडील बंधू आण्णा यांजबद्दल आदर असल्यामुळें, पांगारकरांसारख्या गुरुजनांशीं वामनरावांचें वर्तन मर्यादशील असल्यामुळें, आणि वामनरावांच्या वाङ्मयप्रेमामुळें पांगारकर त्यांवर मनांतून खूश असत. उलट पांगारकरांची स्वतःला संत म्हणवून घेण्याची हौस, सन्तवाङ्मय हेंच खरें पुरोगामी वाङ्मय असें म्हणण्यापर्यंत गेलेली त्यांची अंध संतभक्ति इत्यादि गोष्टी जरी वामनरावांना पसंत नव्हत्या तरी पांगारकरांचा जबरा व्यासंग, तल्लीनता, गुरुभक्ति, मनःसमाधान इत्यादींचें त्यांना मोठें नवल वाटे. ' वाङ्मयमाले'च्या दुसऱ्या पुष्पांत घालण्याकरितां म्हणून पांगारकरांच्या वेंच्यांची निवड करतांना वामनरावांनीं त्यांचे दुसरे सरस वेंचे बाजूला सारून त्यांनीं ' मुमुक्षूंत ' आगरकरांवर जो लेख लिहिला होता तो घेतला. कारण त्यांत पांगारकरांची गुरुभक्ति व परमतसहिष्णुता उत्तम प्रकारें प्रतिबिंबित झाली असून त्यांच्या या गुणांमुळें वामनरावांना त्यांचेबद्दल अतिशय आदर वाटत असे.

अण्णा सुटींत हिंगण्यास रहावयास येत त्यावेळीं लवाटे, पांगारकर वगैरे मंडळीहि तेथें जमत. तेव्हां त्यांचेसंबंधींचा वामनरावांचा हा आदरभाव आम्हा भोंवतालच्या मंडळींच्या चांगलाच दृष्टीस पडे.

वामनरावांच्या मनोघटनेचें कार्य चालू असतांना टिळक, गोखले, परांजपे वगैरे तत्कालीन मोठमोठ्या व्यक्तींचे परिणाम त्यांचे मनावर होत राहिले असले पाहिजेत हें उघडच आहे. तो काळच असा होता की उच्च विचारांनीं, उदात्त ध्येयांनीं, देशसेवेच्या शपथांनीं, मातृभूमीचा उद्धार करण्याच्या आणाभाकांनीं सर्वच वातावरण नुसतें दुमदुमून गेलें होतें. वर्तमानपत्रांतील लेख, व्याख्यानें, पुराणें, प्रवचनें वगैरे सामान्य माणसांचीं अंतःकरणेंहि भारून सोडून त्यांस कार्यप्रवण करीत होती; मग वामनरावांसारख्या तल्लख बुद्धीच्या व भावनाशील अंतःकरणाच्या तरुणाच्या

मनावर त्यांचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील ? पण या गोष्टी सर्वच तरुणांना थोडयाफार लागू पडणाऱ्या असल्यानें त्यांचा विशेष उल्लेख न करतां ज्या व्यक्तींच्या सान्निध्याचा व चारित्र्याचा प्रत्यक्ष परिणाम वामनरावांवर विशेषत्वानें झाला तेवढ्यांचाच उल्लेख वर विस्तारानें केला आहे.

माणसाच्या जीवनावर नुसत्या व्यक्तींचेच संस्कार घडतात असें नाहीं. आयुष्यांतील कांहीं कांहीं घटनाहि त्यांचे मनावर तितकेच चिरंतन आणि महत्त्वाचे परिणाम करूं शकतात. या दृष्टीनें वामनरावांचे जीवनांत ज्या एका घटनेला विशेष प्रकारचें महत्त्व प्राप्त झालें आहे ती म्हणजे त्यांना भोगावा लागलेला तुरुंगवास ही होय. आप्त, गुरु, आणि तुरुंग या आपल्या तीन शाळा आहेत आणि या शाळांत मिळालेलें शिक्षणच आपल्या खरें उपयोगीं पडलें असें वामनराव म्हणत. शिस्त, स्वावलंबन. वक्तशीरपणा, आज्ञाधारकपणा इत्यादि गुण तुरुंगामुळें आंगीं येतात; आणि म्हणून तुरुंगवासाचा अनुभव आयुष्यांत एकदां तरी माणसाला यावा असा तुरुंगाचा गौरव करण्यांत येतो. [ मीनाक्षीबाई कऱ्हाडकरांनीं याच त्याच्या फायद्यांची महती गातांना त्याची बोर्डिंगशीं बरोबरी केली; पण उपमेंतून भलताच अर्थ उत्पन्न होऊन बोर्डिंगच्या मेट्रन बाई खजील होऊन खालीं पाहूं लागल्या ही गोष्ट आपण सोडून देऊं. ] तुरुंगवासाचे सदरहु सुपरिणाम इतरांच्या बाबतींत होत असले तरी वामनरावांचे बाबतींत तरी ते झाले नाहींत, आणि त्या अर्थानें ते आपल्या तुरुंगवासाला कधींच महत्त्व देत नसत. तुरुंगाचे त्यांचेवर जे संस्कार झाले ते अगदीं निराळेच होते.

संकुचित देशाभिमानानें मनाचें समाधान न होऊन वामनराव मनानें समाजहितवादी बनले; स्वजाति, स्वधर्म, स्वभाषा यांचेहि पलीकडे मानवजात, मानवधर्म, व हृदयाची भाषा म्हणून कांहीं असते ही जाणीव त्यांना झाली; माणसाच्या मतापेक्षां त्याचें मन हें जास्त मोठें व मोलाचें आहे हें त्यांना समजलें; प्रामाणिक असलेलें कोणतेंहि वेड आदरणीय आहे हें त्यांना उमजलें; प्रेम, दया, आदर, इत्यादि सनातन भावनांचा विशिष्ट जात, विशिष्ट धर्म, विशिष्ट शिक्षण यांच्याशीं संबंध असतोच असें नाहीं—त्या कोणत्याहि जातींत, कोणत्याहि धर्मांत, कसल्याहि शिक्षणांत,—किंबहुना अधार्मिकांत व अशिक्षितांतहि—असू शकतात, इत्यादि प्रकारचीं वामनरावांचीं जीं मतें बनलीं त्यांना त्यांचें इतर पुस्तकी व तात्त्विक ज्ञान तर कारण झालें असेलच; पण त्यांचें प्रात्यक्षिक जर वामनरावांना कुठें पाहायला

मिळालें असेल तर तें तुरुंगांतच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. तुरुंगाची ही घटना कालक्रमानें जरा पुढें घडली असली तरी तिचा वामनरावांच्या भावी आयुष्यावर व स्वभावावर झालेला परिणाम लक्षांत घेतां तिचा उल्लेख याच ठिकाणीं करणें उचित होईल.

वामनरावांचा कॉन्व्हिक्टर ओव्हरसिअर ( म्हणजे पगडीवाला मुकादम ) गोमल हा जातीनें, धर्मानें, भाषेनें, दर्जानें, वगैरे सर्व बाबतींत त्यांचेहून भिन्न असला तरी हिंदु, बम्मन, काफीर अशा वामनरावांची त्याला दया येते; तुरुंगाच्या नियमांना झुगारून तो वामनरावांना चक्की पिसतांना मदत करतो; स्वतःची पगडी जाण्याची भीति असतांना देखील तो स्वतःच्या पोळींतली अर्धी पोळी वामनरावांना चोरून देतो; वामनराव हिंदु असतांहि चक्की पिसून झाल्यावर " चक्की है, हिंदू मर गया," असें भत्तेवाल्यास सांगून तो त्यांना अधिक डाळ देववितो; हिंदु धर्म खरोखरचाच घाणेरडा आहे असें वाटत असून वामनराव या हिंदु व्यक्तीबद्दल त्याला आदर व प्रेम वाटतात; दोघेहि युरोपिअन जेलर आपला राजकीय मतभेद लक्षांत न आणतां वामनरावांशीं सौजन्यानें वागतात, व थोडेंसें नियमाविरुद्ध जाऊनहि त्यांना स्वतःचीं पुस्तकें वगैरे देतात; बादशहा वारले तेव्हां वामनरावांच्या शिक्षेंत सूट मिळाली नाहीं म्हणून जेलरनें तक्रार केली असतांना त्यांना तर ती मिळत नाहींच, उलट दुसऱ्या एका गुजराथ्याला रीतसर मिळालेली सूट मात्र रद्द होते; स्वतः मनुष्य ' अहो, मीच तो ' असें परोपरीनें सांगत असतां केवळ कागदांतल्या वर्णनांत थोडासा फरक पडतो म्हणून त्याचेवर विश्वास ठेवला जात नाहीं; जेलमधून सुटल्यावरहि एका पोलिसाच्या लाथा खाण्याचा प्रसंग येतो; इत्यादि गोष्टींचे व कारावासाच्या एकंदर अनुभवांचे संस्कार वामनरावांच्या उत्तरकालीन विचारसरणीवर, स्भावावर व वागणुकीवर किती खोल व कायमचे झाले असतील याची सहज कल्पना येते. उगीच नाहीं वामनराव तुरुंगाला आपल्या आप्तांच्या व गुरूंच्या पंक्तीला बसवीत !

# जीवनाला मिळालेलीं वळणें ४

एकोणीसशें सहामध्यें वामनराव एम्. ए. झाले. १९१८ मध्यें ते हिंगण्यास प्रो. कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रम संस्थेस जाऊन मिळाले. मधला बारा वर्षांचा हा काळ वामनरावांच्या आयुष्यांतला अतिशय महत्त्वाचा समजला पाहिजे. या काळांत कांहीं अकल्पित घटना कांहीं आकस्मिक रीतीनें घडून येऊन वामनरावांच्या जीवनाला निरनिराळीं वळणें लागलीं. तें निरनिराळ्या अनेक प्रवाहांकडे वेळोवेळीं आशेनें वळे, पण कोणत्याच प्रवाहांत मिळून जाऊन एकरूप होण्याचा गुण त्याचे अंगीं नसल्यामुळें तें प्रत्येकापासून भिन्न, अलग, व एकाकी राही. शेवटीं परिस्थितीच्या एका अकल्पित व जोरदार धक्क्यानें तें आपल्या नियोजित कार्यक्षेत्रीं पोहोंचलें आणि तेथून पुढें तें सरळ, स्थिर व अखंडपणें आपला मार्ग आक्रमूं लागलें. बारा वर्षांच्या या कालखंडांत वामनरावांचे मनांत इतक्या निरनिराळ्या आशा उत्पन्न झाल्या व त्या इतक्या भराभर निरासहि पावल्या कीं वामनरावांचे जीवितासंबंधींचे पुष्कळसे भ्रम नाहींसे होऊन त्यांना त्याचें वैफल्य व वैय्यर्थ्य जाणवूं लागलें. मनुष्याच्या नुसत्या प्रयत्नांचें किंवा पराक्रमाचें सर्वस्वीं चालत नाही, जगांत नियति, दैवगति, परिस्थिति म्हणून कोणीतरी एक बलवत्तर शक्ति आहे, आणि तिच्या कलाकलानें घेऊन वागलें तरच त्या प्रयत्नाचें व पराक्रमाचें चीज

होतें, एरवीं तरणोपाय नाहीं, फुटून व फटकून वागून चालत नाहीं, जुळून आणि जुळवून घेऊन वागलें तरच कांहीं निभाव लागतो अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाचे धडे वामनरावांना या काळांत प्रामुख्यानें मिळाले.

वामनरावांच्या जीवनाला अशाप्रकारें वळणें देणाऱ्या मुख्य घटना म्हणजे समर्थ-विद्यालयाशीं जडलेला संबंध, 'विश्ववृत्त' प्रकरण, 'मराठा' पत्राकडील नेमणूक आणि 'मेसेज'ची संपादकी या होत. यांपैकीं पहिल्या दोन संलग्न असून त्यांसंबंधींची सर्व माहिती वामनरावांचे स्नेही व आपले माहीतगार मित्र रा. हरीभाऊ गोळे यांच्या पत्रांत मिळते. हरिभाऊ लिहितातः—

"वामनराव १९०६ सालीं एम्. ए. झाले. तो काळ राजकीय चळवळींत फार धामधुमीचा होता. टिळकांच्या लेखणीचा फार जबरदस्त परिणाम समाजावर होत होता. राष्ट्रीय चळवळींत कांहीं कार्य करावें असें पुष्कळांस वाटे. पण राष्ट्रकार्यांत आयुष्य घालवायचें असें ठरविणारे जे थोडे लोक होते त्यांत वामनरावांची गणना केली पाहिजे. नामदार गोखल्यांची सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी नुकतीच निघाली होती. त्यांत जावें असाहि विचार त्यांच्या मनांत एकदां आला होता व त्यासाठीं ते दोन-तीनदां नामदार गोखल्यांच्याकडे सोसायटीचें ध्येय व कार्य यांबद्दल अधिक माहिती मिळावी म्हणून गेले होते. त्या वेळीं त्यांच्याशीं झालेल्या भाषणाची माझे-जवळ त्यांची चर्चाहि होई. परंतु त्यांच्या मनाला तो आयुष्यक्रम तितकासा पटला नाहीं. नामदार गोखल्यांबद्दल त्यांना जरी फार आदर होता, तरी त्यांच्या बुद्धीला पाहिजे होता तितक्या नेटाचा कार्यक्रम त्यांत त्यांना वाटला नाहीं; म्हणून ती कल्पना त्यांनीं सोडून दिली. शिवाय त्यांची वृत्ति शिक्षणव्यवसायाला विशेष अनुकूल असल्यानें प्रो. विजापूरकरांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यांत आयुष्य घालवावयाचें त्यांनीं ठरविलें. मी त्यांच्या या कल्पनेला पाठिंबा दिला नाहीं. माझें त्यांना असें म्हणणें होतें कीं 'तुमच्या वृत्तीला व विद्वत्तेला साजेसें काम म्हणजे प्रोफेसराचें आहे. मुलांवर पंतोजीपणा करण्यांत तुम्हांला समाधान होणार नाहीं. राष्ट्रीय शिक्षण म्हटलें तरी शाळा ती शाळाच; शिवाय युनिव्हर्सिटीचा म्हणजे सरकारी शिक्का असल्याशिवाय या शाळांत मुलें फारशीं व फार दिवस येणार नाहींत. तेव्हां शेवटीं निराशा पदरीं येईल.' त्यावर त्यांचें म्हणणें असें कीं 'तुम्ही म्हणतां तसें होण्याचा संभव आहे, हें खरें; पण अशा संस्थांबद्दल प्रयत्न तरी व्हायला नको काय? प्रयोग आहे, पाहूं काय होतें तें! निदान प्रयोगाचें समाधान तरी मिळेल.'

एकंदरींत पाहतां कोणत्याहि राष्ट्रीय कार्यांत पडल्यानें त्या काळीं निराशा होण्याचा प्रसंग येईल हें त्यांस कबूल होतें. व तशी त्यांची निराशा झालीहि. पण त्या बाबतींत त्यांची वृत्ति विचारपूर्वक स्वार्थत्यागाची व म्हणूनच निःसंशय फार वरच्या दर्जाची होती.

ठरल्याप्रमाणें वामनराव १९०७ च्या जूनमध्यें विजापूरकरांच्या शाळेंत कोल्हा-पुरास गेले. व त्यानंतर कांहीं दिवसांनीं शाळेचें एकंदर वातावरण कसें आहे व त्यांचें कसें काय चाललें आहे हें पाहण्यास त्यांनीं एकदां बोलावलें होतें, व मलाहि पाहायाचें होतें म्हणून त्यांच्याबरोबर आठ दिवस राहून आलों. तेथें गुरुशिष्यांनीं एकाच ठिकाणीं राहायचें, जेवणखाण बरोबरच करायचें, यांमुळें त्या दोघांमध्यें जो आपलेपणा उत्पन्न होतो त्याचें मला निःसंशय कौतुक वाटलें. व वामनरावहि तेथील वातावरणांत समरस झालेले मला दिसले. परंतु कोल्हापुरांत चांगल्या माहीतगार मंडळींत मला विजापूरकरांचेबद्दल फारसें चांगलें मत ऐकूं आलें नाहीं. व तें मी वामनरावांस सांगितलेंहि. पण ती गोष्ट त्या वेळीं तितकीच राहिली. विजापूरकर हे अव्यावहारिक, एककल्ली, व चमत्कारिक वृत्तीचे गृहस्थ आहेत, असाच एकंदरींत कोल्हापुरांत त्यांचेबद्दल ग्रह होता. त्यांच्या त्या बंगल्याचें जें 'अजरशरणम्' असें नांव पाहिलें तेंच मला विचित्र वाटलें. व त्याबद्दल मी वामनरावांची तेथें व नंतरहि पुष्कळदां चेष्टा केली होती. १९०६ मध्यें विजापूरकरांनीं 'विश्ववृत्त' मासिक काढलें होतें. त्यांच्या गैरहजेरींत पत्रव्यवहाराचें वगैरे किरकोळ काम वामनरावांना त्यांनीं पहायला सांगितलें होतें, व तसें एका अंकांत त्यांनीं छापून प्रसिद्ध केलेंहि होतें. पण प्रत्यक्ष लेखनाचें काम त्यांच्या वृत्तीला अनुकूल होतें तरी त्या वेळीं वामनराव करीत नसत. पुढें 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा पंडित सातवळेकरांचा लेख विश्ववृत्तांत प्रसिद्ध होऊन त्या पत्रावर खटला झाला. त्यांत संपादक म्हणून विजापूरकर, त्यांचे मदतनीस म्हणून वामनराव व प्रिंटर म्हणून जोशीराव असे तिघे आरोपी केले गेले. वामनरावांना त्यांत शिक्षा झाली वगैरे हकीकत मशहूरच आहे. परंतु या खटल्याच्या प्रकरणीं झालेल्या अंतस्थ घडामोडींतील एक भाग सविस्तर सांगणें अपरिहार्य आहे.

विश्ववृत्तावरील खटल्याची पार्श्वभूमि समजण्यास त्यावेळीं गाजलेल्या वेदोक्त प्रकरणाची माहिती देणें जरूरीचें आहे. लग्न, मुंजी आदिकरून जे संस्कार आहेत ते ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या त्रैवर्णिकांस वैदिक मंत्रविधीनें करण्याचा अधिकार आहे.

शिवाजी महाराजांचें मौंजीबंधन वगैरे करवून काशीच्या गागाभट्ट पंडितांनीं त्यांना क्षत्रिय कुलावतंस म्हणून राज्याभिषेक केला. त्यांचा प्रत्यक्ष वंश म्हणजे कोल्हापूरचें राजघराणें, म्हणून त्यांचेहि संस्कार तसेच व्हावयास पाहिजेत. परंतु मध्यन्तरींच्या काळांत काय झालें कोणास ठाऊक. त्यांचे विधि वेदोक्त न होतां पुराणोक्त होऊं लागले. कोल्हापूरच्या शाहू महाराजांचे मनांत ते विधी पुन्हां पूर्वीप्रमाणें वेदोक्त व्हावे असें आलें. पण कोल्हापुरांतल्या कांहीं ब्राह्मणांना हा महाराजांचा विचार अधार्मिक वाटूं लागला. ते म्हणाले राजघराण्यांत वेदोक्त विधीचा लोप होऊन त्यांनीं आपलें क्षत्रियत्व गमावलें आहे. महाराजांचा अभिमान जागृत झाला. त्यांनीं परोपरीनें सांगून पाहिलें कीं, आमचें क्षत्रियत्व मान्य व्हावें येवढाच आमचा हेतु आहे, तेवढें तुम्ही होय म्हणा म्हणजे झालें. पण ब्राह्मण कांहीं ऐकेनात. दोन्ही पक्ष हट्टाला पेटले आणि त्यांतूनच पुढील वेदोक्त प्रकरण, सत्यसमाज पक्ष, ब्राह्मणब्राह्मणेतरवाद वगैरे निर्माण होऊन महाराष्ट्राची एकी नाहींशी झाली.

विजापूरकर हे वेदोक्ताच्या विरुद्ध जोरानें आग्रह धरणारांपैकीं एक होते; व त्यामुळें महाराजांची त्यांवर गैरमर्जी होऊन त्यांना राजाराम कॉलेजांतील प्रोफेसराची नौकरी सोडावी लागली होती. लगेच त्यांनीं 'समर्थ विद्यालय' काढलें. त्यालाहि झळ लागून तें बंद झालें असतें, पण तें अगोदरच मिरजेस व तेथून तळेगांवास ब्रिटिश हद्दींत गेल्यामुळें बचावलें. 'विश्ववृत्त' मात्र कोल्हापुरास होतें. खटल्यांतला मुख्य रोख विजापूरकरांवरच होता ही गोष्ट जगजाहीर होती. निदान कोल्हापुरांतील आबालवृद्धांस तरी यांत कांहींहि गूढ नव्हतें. वामनराव तर बोलून चालून परस्थ होते. म्हणून कोल्हापुरांतील विजापूरकरांच्या हितचिंतकांनीं त्यांना सरळ सल्ला दिला कीं "महाराजांनीं काय हेतूंनीं या खटल्यास मंजुरी दिली आहे तें तुम्हांस माहीतच आहे. वामनराव जोशी यांचें विचाऱ्याचें नांव नाइलाजास्तव गोवलें गेलें आहे. तिसरे आरोपी जोशीराव हे तर बोलून चालून प्रिंटर आहेत. शिवाय कोणाचा लेख छापावयाचा, कोणाचा नाहीं हें सगळें तुमच्याच मर्जीवर असतें. तेव्हां तुम्ही सरळ जबाब देऊन टाका कीं प्रसिद्धीची सर्व जबाबदारी माझी एकट्याचीच आहे. वामनरावांचें संपादकवर्गांत नांव नाहीं, मॅजिस्ट्रेटपुढें त्यांचें कोणतेंहि डेक्लरेशन नाहीं. तेव्हां विनाकारण वामनराव जोश्यांना त्यांत कां अडकवितां? खरे संपादक तुम्हीच व महाराजांचा रागहि खरा तुमच्यावरच. रीत-

सर डिफेन्स करून सुटायचे तर तुम्ही सुटालहि कदाचित. पण टाळाटाळी कराल तर तुम्ही तर सांपडालच, पण तुमच्याबरोबर वामनराव जोशी मात्र निष्कारण बळी पडतील. शिवाय ते बाहेर राहिले तर शाळेला व वर्तमानपत्राला ते उपयोगी पडतील याचाहि विचार करा."

पण विजापूरकरांचे दुसरेहि कांहीं बद सल्लागार होते; त्यांनीं त्यांना निराळाच सल्ला दिला कीं "शक्यतोंवर तुम्ही आपल्यावरील जबाबदारी टाळा. पुराव्यामध्यें तुमचेवर जबाबदारी नाहीं असें ठरलें तर तुम्ही सुटालच, व वामनरावांवर महाराजांचा कांहीं राग नाहींच यामुळें ते त्यांनाहि सोडतील" झालें; या मंडळींचा पगडा विजापूरकरांवर बसत चालला. विजापूरकरांनीं जबाबदारी नाकारायची, व वामनरावांनीं जबाबदारी घ्यायची असें ठरविलें गेलें! कांहींहि संबंध नसतांना वामनरावांनीं थोरपणानें आपल्या मुख्याविषयींच्या एकनिष्ठेनें सर्व जबाबदारी आपलेवर घेतली. त्यांनीं ती अंगाबाहेर टाळली असती तर कायदेशीर अगर नैतिक कोणतीहि जबाबदारी त्यांचेवर येण्याला काडीचाहि पुरावा नव्हता. अपेक्षेप्रमाणें निकाल झाला. वामनरावांना तीन वर्षें सक्तमजुरी व विजापूरकरांस ३ वर्षें साधी कैद झाली. या गोष्टी आम्हां लोकांस तावडतोब कळल्या. तेव्हांपासून सहाजिकच विजापूरकरांबद्दलचें आमचें मत अगदीं बदललें. पुढें तुरुंगांतून वामनराव सुटून आल्यानंतर त्यांच्या आमच्या कोल्हापुरांतील स्नेह्यांच्या गांठी पडल्या. त्या वेळीं वरील हकीगत अगदीं यथातथ्य आहे ही गोष्ट वामनरावांस कबूल करावी लागली. पण त्यांनीं त्याबद्दल बाहेर कधींच उच्चार केला नाहीं!

उलट, केसरीवरील १९०८ सालच्या खटल्यांत झालेला प्रकार पहा. ज्या लेखांबद्दल खटला झाला ते लेख टिळकांचे नव्हते. कोणत्या संपादकाचे होते तें आतां सर्वश्रुत आहे. टिळकांच्या कांहीं मित्रांनीं त्यांना असाच सल्ला दिला होता कीं लेखकाचें नांव सांगून टाका म्हणजे तुम्ही मोकळे व्हाल. त्यावर टिळकांनीं दिलेलें उत्तरहि लोकविश्रुत आहे. 'अशानें मी तर सुटणार नाहींच, दुसरा माणूस मात्र विनाकारण अडकेल. सरकारचा खरा राग माझ्यावर आहे, तेव्हां कांहींतरी निमित्त काढून मला ते डांवणारच.'

माझ्या ऐकिवांत असेंहि आहे कीं, वामनरावांचा खटला चालायच्या आधीं महाराजांच्याकडून निरोपहि आला होता कीं, वामनरावांवर माझा कांहीं आक्षेप नाहीं, विजापूरकरांनीं जबाबदारी आपलेवर घ्यावी म्हणजे झालें. तुरुंगांतहि जेलरला

महाराजांनीं वामनरावांना सवलतीनें वागविण्यास सांगून ठेविलें होतें, पण पुढें महाराजांस काय वाटलें कोणास ठाऊक; त्यांनीं वामनरावांचें लोढणें ब्रिटिश सरकारच्या गळ्यांत अडकविलें व त्यांची रवानगी सिंधमधील हैद्राबाद जेलमध्यें केली.

[ खटल्याची ही हकीकत यथातथ्य असल्याबद्दल कोल्हापूरचे त्याच वेळीं मुनसफ म्हणून काम करीत असलेले रा. दत्तात्रय हरी गोखले एम्. ए. एल्एल्. बी.— वामनरावांचे कॉलेजपासून विशेष गट्टीचे मित्र–यांनीं पत्रीं नमूद केलें आहे. ]

योगायोग असा कीं हैदराबाद जेलचे या वेळचे जेलर वामनराव डेक्कन कॉलेजमध्यें फेलो असतांना त्यांना ज्युनिअर असलेले एक डेक्कन कॉलेजचेच माजी विद्यार्थी ग–ग–ग्लॅड असें तोत्रे बोलणारे मिस्टर प्लंकेटच निघाले. ओळख पटल्यावर मि. प्लंकेट वामनरावांना म्हणाले तुमची पूर्वपीठिका तुम्ही आमच्या ताब्यांत यायच्या आधीं आमच्याकडे आली. तेव्हांच माझ्या लक्षांत आलें कीं आमचे फेलो असलेले व्ही. एम. जोशी ते तुम्हीच. अशा रीतीनें अकस्मात ओळख पटून जेलर मि. प्लंकेट यांनीं नियमास अनुसरून मिळणाऱ्या शक्य तेवढ्या सवलती वामनरावांस दिल्या व त्यांच्या प्रकृतीस जड जाणार नाहीं असेंच काम त्यांनीं त्यांना दिलें.

वामनराव, विजापूरकर व जोशीराव यांचेवर जो खटला भरला त्यांत सातवळेकर यांनाहि आरोपी करण्यांत आलें होतें पण सातवळेकर त्यावेळीं पंजाबकडे गेले असल्यामुळें त्यांचेवर सुटलेल्या वारंटाची त्यांना माहिती नव्हती. पण नंतर ते स्वतःआपण होऊन हजर राहिले व त्यांच्यावर पूर्वीचाच स्थगित झालेला खटला सुरू करण्यांत आला. आपल्यापैकीं आणखी एक माणूस त्याच कारणाकरितां बळी पडणार हा विचार वामनरावांचे मनाला बेचैन करूं लागला. आणि म्हणून ‘ सातवळेकरांच्या मूळ लेखांत कांहीं ठिकाणीं बदल करून मीं तो लेख छापला, कोणते शब्द बदलले तें आतां सांगतां येत नाहीं ’ असा जबाब वामनरावांनीं देऊन सातवळेकरांना शीरसलामत सोडविलें.

खटल्याच्या निकालासंबंधीं लिहितांना प्रो. येरवडेकर म्हणतातः—“ विश्ववृत्तावरील राजद्रोहाचा खटला म्हणजे आंधळी मानलेली न्यायदेवता प्रसंगविशेषीं अभावांत सुद्धां भाव स्पष्टपणें पाहूं शकण्याइतकी डोळस कशी होऊं शकते याचें एक चांगलें उदाहरण आहे. हजारों वर्षांपूर्वी लिहिण्यांत आलेल्या वेदांमधील कांहीं मंत्रांचे अर्थ विसाव्या शतकांत राजद्रोहाला उत्तेजन देणारे ठरतात हा एक अद्भूतच चमत्कार नव्हे काय ? असो. या बाबतींत अन्याय झाला हें तर खरेंच. पण

वामनरावांवरील अन्यायाचा वांटा त्यांनीं आपण होऊनच आपणांवर ओढवून घेतला. " खटल्याचा निकाल लागल्यानंतर प्रथम या तिघांना कोल्हापूर जेलमध्यें दोन–एक महिने ठेवण्यांत आलें होतें. नंतर कोल्हापुराहून पन्हाळ्यास रवानगी झाली. तेथें थोडा काळ गेल्यावर त्यांना परत कोल्हापुरास आणून लष्करी पाहऱ्याखालीं ठेवण्यांत आलें. पण पुढें तिघांस एकत्र ठेवणेंहि कोल्हापूर सरकाराला इष्ट न वाटल्यामुळें जोशीराव यांना धुळ्याच्या तुरुंगांत, विजापूरकर यांना साबरमतीच्या तुरुंगांत, व वामनराव जोशी यांना सिंध हैद्राबादच्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें व या तीन ठिकाणीं तिघांनीं आपल्या शिक्षा भोगल्या.

आरोप ठेवल्याचें ऐकून काय वाटलें हें वामनराव स्वतःच लिहितातः " माझ्यावर व विनायकरावांवर ' खुनास मदत ' करण्याचा आरोप होता. आम्हांला या आरोपाची बातमी प्रथम तळेगांवासच वर्तमानपत्रांच्या द्वारें लागली. ' खुनास मदत ? ' कोणाचा खून ? कोणीं, केव्हां कशी मदत दिली ? आम्हांला कोणाला कांहींच अर्थ कळेना. कांहींतरी कोणीं कुभांड रचलें असावें असें मला वाटलें, व मी थोडासा घाबरून गेलों; पण क्षणाभरानें माझें मलाच हंसूं आलें; कोणाचा खून करण्याचें स्वप्नांत देखील नाहीं; आणि हा असला आरोप तर ठेवलेला, तेव्हां आतां जगाच्या मूर्खत्वाकडे व दैवाच्या विचित्र लीलांकडे पाहून हसायाचें नाहीं तर काय करायाचें ? " विजापूरकरांवरील याच आरोपासंबंधीं ते म्हणतात, " अशा या सात्त्विक ब्राह्मणावर खुनाचा आरोप ठेवणारानें ठेवला कसा, व जज्जानें तो आरोप सिद्ध मानला कसा हें गूढच आहे. अथवा गूढ तरी कसलें ? जगांत असे विपरीत प्रकार काय थोडे होत आहेत ? सॉक्रेटीस्, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी इत्यादिकांवर नाहीं नाहीं ते आरोप जर येतात व ते ' सिद्ध ' होतात, तर प्रो. विजापूरकरांना तरी अपवादकोटींत कोण कां घालणार ? जगांत भौतिक वादळानें कितीतरी झाडें फळांमुळांसुद्धां उन्मळून खालीं पडतात, त्यांतलाच हा मानवी जगांतील प्रकार मानावें; झालें. "

कोल्हापुराहून हैदराबादेस जातांना वामनरावांवरील शिपायानें ठरलेल्या दोन आण्यांत वामनरावांना पुरेसें जेवण कसें मिळणार अशी दया येऊन आपल्या खर्चानें त्यांस जेवण घालून माणुसकी कशी प्रकट केली; तुरुंगांतून सुटल्यानंतर सुद्धां पोलीस वामनरावांना कोल्हापूरला स्वतंत्रपणें कसा जाऊं देईना, व ते जाऊं लागले असतां त्यांस त्यानें खोलींत कोंडून कसें बेदम मारलें; वगैरे गोष्टी आतां

वाचायला व ऐकायला ठीक असल्या तरी त्यावेळीं त्यांनीं वामनरावांचे मनावर खूपच परिणाम केला असला पाहिजे.

समर्थ विद्यालय तळेगांवीं स्वतःच्या मालकीच्या जागेंत स्थानापन्न झालें खरें, पण पुढें दोनच वर्षांनीं ( १९१० ) सरकारनें त्यास बेकायदेशीर संस्था ठरवून नामशेष केलें. वामनराव कोल्हापूर, मिरज, बेळगांव या तीनहि ठिकाणीं या संस्थेंत काम करीत होते. वामनरावांच्या जीवनाला वळण देणारी पहिली संयुक्त घटना अशा रीतीनें संपली.

समर्थविद्यालयाला जाऊन मिळण्यांत आपली कांहीं चूक झाली कीं काय, 'विश्ववृत्त' प्रकरणीं वागतांना कोणाच्या काय काय चुका झाल्या, 'समर्थ विद्यालय' नामदार चौबळ वगैरे लोकांच्या तंत्रानें आण्णांनीं फिरून काढलें हें बरें केलें का वाईट केलें वगैरेसंबंधीं बोलणें वामनराव शक्य तों टाळीत. खुद्द विजापूरकरांबद्दल वामनरावांना आदर तर खराच; त्याशिवाय ते त्यांना जाऊन मिळाले नसते, व त्यांसाठीं देहदंड वगैरे भोगायला तयार झाले नसते; पण विजापूरकरांसबंधीं बोलतांना ते कधीं भावनेच्या भरांत आले आहेत असें दिसत नसे. विजापूरकरांची ध्येयनिष्ठा, स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वदेशी इत्यादिकांसंबंधींचा त्यांचा अभिमान; राष्ट्रीयशिक्षणावरील त्यांचें प्रेम; सत्य–प्रीती यासंबधीं बोलतांना वामनराव त्यांच्या स्वभावांतील अतिरेकीपणा, शब्दचाळेपणा, प्रतिपक्ष्याशीं वागतांनाचा भोंगळपणा इत्यादि दोषांसंबंधींचेंहि थोडेंफार दिग्दर्शन करीत. एकादा स्वामिनिष्ठ नोकर आपल्या धन्यासंबंधीं विशेष कांहीं बोलत नाहीं, किंवा बोलायचें झाल्यास थोडयाशा संकोचानें व सावधगिरीनें बोलतो तसें वामनराव विजापूरकरांसंबंधीं बोलतांना बोलत, असें ऐकणाराला वाटे. त्यांतूनहि कोणीं त्यांच्या दोषांसंबंधीं उद्मेखून विचारलेंच तर ते विजापूरकरांप्रमाणें नुसतें 'तेंच कीं' असें म्हणून हसत व पुन्हा आपल्या गुणवर्णनाला लागत. विजापूरकरांचे चरित्रांत वामनरावांनीं त्यांचेसंबंधीं जो एक लेख लिहिला आहे त्यांत मात्र त्यांना त्यांचेसंबंधीं वाटत असलेला आदर व प्रेम हीं नितान्त व निर्मळ रीतीनें व्यक्त झालीं आहेत. ते लिहितात:—

"विजापूरकरांचा खटला केव्हांच निकालांत निघाला, सजा भोगून झाली, विजापूरकरहि वारले. तेव्हां आतां हा काळा कोळसा ( विश्ववृत्त प्रकरणांतील न्याय्यान्याय्यता ) न उगाळतां त्यांच्या चरित्रापासून बोध काय घ्यावयाचा इकडे आपण पुन्हां वळूं या. त्यांची ध्येयनिष्ठा ही जगप्रसिद्धच आहे. सुटून आल्यानंतर

मानापमान वगैरे गुंडाळून नामदार चौबळ वगैरे वजनदार गृहस्थांचे उंबरठे झिजवून, त्यांची सहानुभूति संपादन करून त्यांच्या सहाय्यानें त्यांनीं ' नवीन समर्थविद्यालय' ' पुनश्च हरिः ॐ ' या न्यायानें काढलें, यांत त्यांच्या चिकाटीबरोबर निरभिमानताहि चांगलीच दिसून येते. हें आवर्तन करतांना त्यांना कोणत्याहि पक्षाची किंवा पुढाऱ्याची विशेष उत्साहाची व कळकळीची सहानुभूति नव्हती ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे......अशा परिस्थितींतहि आण्णांनीं धीर खचूं दिला नाहीं. ' सुधांविना न प्रययुर्विरामम् ' या त्यांच्या आवडत्या वचनाला अनुसरून राष्ट्रीय शिक्षणात्मक सुधेप्रीत्यर्थ अहर्निश अविश्रान्त श्रम चालूं ठेवले यांतच त्यांचें ' अण्णा 'त्व व ' समर्थशिष्यत्व ' आहे !

इतका वेळ आण्णांचा स्तुतिपाठ आपण गाइला, पण ते म्हणजे अगदीं निर्दोष होते, त्यांच्या हातून कांहीं चुका झाल्या नाहींत असें समजण्याचें कारण नाहीं. दोष कोणांत नाहींत ? चंद्रावरच नव्हे तर सूर्यावर देखील डाग आहेत. आण्णांचा दोष म्हणजे गुणातिरेक. गुणांचा अतिरेक झाला म्हणजे ते दोषस्वरूप होऊं लागतात. समर्थविद्यालयांत केंस ठेवणें वगैरे सुधारकी प्रकार चालूं न देणें चांगलें असेल, परंतु एकाद्या केंस टेवलेल्या मुलाला बळजबरीनें केंस काढावयास लावणें हें कसेसेंच वाटतें. विदेशी माल तुम्ही घेऊं नका, पण एकाद्या पालकाला आपल्या आजारी मुलाला कॉडलिव्हर ऑइल द्यावेंसें वाटलें तर त्याबद्दल विशेष आग्रहाची हरकत घेणें हा तरी दुराग्रहाच. वरील दोष सत्यकथनाच्या दृष्टीनें सांगितले खरे; पण सत्यकथनाची दृष्टीच लेखणीला पुढें जाऊं न देतां लेखकाला सांगते कीं " आपल्या प्रामाणिक मताप्रमाणें वागणें याला दोष म्हणणारे तुम्ही कोण ? ज्यानें त्यानें आपल्या मताप्रमाणें वागावें, आपल्या शक्तीप्रमाणें कार्य करावें, असाच जर धर्माचा सिद्धान्त आहे तर स्वमतानुसार वागणाऱ्याला व स्वशक्तीची पराकाष्ठा करून ध्येयसिध्यर्थ सोत्साह व साग्रह परिश्रम करणाऱ्याला तुम्ही दोष कां देतां ? "

येवढा लांब उतारा देण्यांत हेतु आहे. वामनरावांची विजापूरकरांसंबंधींची वृत्ति तर त्यांत चांगली दिसून येतेच, पण सर्व व्यक्तींकडे पाहण्याची त्यांची दृष्टि त्यांत प्रतिबिंबित झाली आहे. त्यांनीं दाखविलेली हीच दृष्टि आपल्याला खुद्द वामनरावांकडे पाहतांनाहि उपयोगी पडणार नाहीं का ?

वामनराव व विजापूरकर हे तुरुंगांत दिवस कंठत असतांच इकडे समर्थ विद्यालयाची वाताहात झाली हें वर आलेंच आहे. तेव्हां सन १९११ च्या अखेरीस

तुरुंगांतून सुटल्यावर ' काय करावें ' हा प्रश्न वामनरावांच्यापुढे आलाच. आतां राजद्रोहीपणाचा चांगलाच शिक्का कपाळावर बसलेला; तेव्हां नोकरी मिळणें ही त्या काळीं किती अवघड गोष्ट असेल याची सहज कल्पना करतां येईल. म्हणून वामनरावांना सन १९१२ ते १९१८ हीं सहा वर्षे जें काम व जें वेतन मिळेल तें स्वीकारून कसे तरी दिवस काढावे लागले. तुरुंगांतून बाहेर आल्यावर पहिलें काम त्यांनीं हातीं घेतलें तें म्हणजे आर्यभूषण छापखान्यानें त्यांना दिलेलें कोश तयार करण्याचें. वामनरावांना मदत व्हावी या बुद्धीनेंच गोपाळराव गोखले, वामनराव पटवर्धन यांनीं तें दिलें, व तात्पुरतें कांहीं काम हवें म्हणूनच वामनरावांनीहि तें पत्करलें. या कोशांत इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द देऊन पुढें इंग्रजी प्रतिशब्दहि देण्याची योजना होती. या कोशाची पहिलीं तीन-चार अक्षरे होऊन तो अपुराच राहिला. हें अपुरे कामहि पुढें किबे वाडा जळाला तेव्हां जळून जाऊन वामनरावांनीं केलेल्या कामाची अक्षरशः राखरांगोळी झाली. परंतु तेवढ्या त्या कामानेंच शब्दाला नेमका प्रतिशब्द देण्याचें महत्त्व, व तसा शब्द भाषेंत अगोदरच नसला तर नवीन बनविण्याचें अगत्य हीं आपणांला पटून आपलें लिखाण सुधारण्याच्या दृष्टीनें हें काम फार उपकारक ठरलें असें वामनराव म्हणत. हें काम वामनरावांनीं १९१२ अखेर केलें. तेवढ्या काळांत त्यांचा भारतसेवक समाजाशीं व नेमस्त पक्षाशीं पुष्कळ संबंध येऊन त्यांच्या कार्याबद्दल त्यांना थोडीफार सहानुभूतिहि वाटूं लागली. १९१३ पासून वामनराव टिळकांच्या केसरी–मराठा संस्थेंत काम करूं लागले.

वामनरावांचें या संस्थेंतील काम, त्यांना तेथें मिळणारा पगार, ते व त्यांचे वरिष्ठ यांची परस्परांविषयींची वागणूक, तेथून त्यांचें निघण्याचें कारण इत्यादि बाबींसंबंधीं कांहीं निरनिराळ्या व परस्परविरुद्ध गोष्टी ऐकूं येतात. वामनराव या संस्थेंत अवघे अडीच वर्षेंच राहिले आणि लगेच तेथून निघाले. तेव्हां कांहींतरी भानगड असली पाहिजे, येवढ्या भांडवलावर निरनिराळे तर्ककुतर्क लढविले जातात. आणि आपापल्या माहितीप्रमाणें व पूर्वग्रहांप्रमाणें–कोणी टिळकांना, कोणी केळकरांना, व कोणी वामनरावांना दोष लावतात. नेमस्त-जहाल, सुधारक-दुर्धारक अशा निरनिराळ्या विरुद्ध पक्षांचे ते होते असें कल्पून हीं पक्षापक्षांतील भांडणें होतीं असें भासवितात. तेव्हां वस्तुस्थिति कळावी येवढ्याकरितां श्री. तात्यासाहेब केळकर यांचेचकडे जावें म्हणजे सर्वच गोष्टी स्पष्ट व शंकातीत होतील असें वाटून त्यांचेकडे गेलों. तात्यासाहेबांचा

चांगुलपणा इतका की त्यांनीं सर्व कांहीं तेथल्या तेथें व सविस्तर सांगितलें येवढेंच नव्हे तर पुन्हां सर्व कागदपत्र पाहून स्वतःच लिहून देण्याचें कबूल केलें. मागितला डोळा एक, व देवानें दिले दोन असं घडलं ! या सर्व प्रकरणासंबंधीं माझें जसें समाधान झालें, तसें वाचकांचेंहि होईल यांत शंका नाहीं. श्री. केळकर लिहितातः—

" प्रो. कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमाला जाऊन मिळण्यापूर्वी सुमारे अर्डाच वर्षें म्हणजे १९१३ च्या सप्टेंबरपासून १९१६ च्या जानेवारीअखेर वामनरावांनीं 'केसरी' कचेरींत पण 'मराठा' पत्राकडे काम केलें. म्हणजे टिळक मंडालेहून येण्यापूर्वी सुमारे एक वर्ष केसरी कचेरीशीं त्यांचा संबंध जडला, व टिळक सुटून आल्यानंतर दीड वर्षपर्यंत तो संबंध टिकला. या अवधींत वामनरावांना केसरींत मराठी लिहिण्याचें काम केव्हांहि पडलें नाहीं. केसरींत लेख आले होते ते त्यांचे वडील बंधु महादेव मल्हार जोशी यांचे. 'सुशिक्षितांचा वेदान्त' या विषयावर ती एक लेखमालाच असून, ती त्यांनीं त्यांचा व माझा स्नेहसंबंध लक्षांत घेऊन माझेच सांगण्यावरून मुद्दाम लिहिली होती. वामनरावांचें काम मराठा पत्राकडे माझे असिस्टंट किंवा मदतनीस म्हणून लेख लिहिण्याचें होतें. कारण त्यावेळीं केसरीप्रमाणें मराठ्याचाहि संपादक मीच होतों. या अवधींत आमचे दोघांचे संबंध चांगले होते, व तसेच ते अखेरपर्यंत अबाधित राहिले.

" माझी व वामनरावांची ओळख प्रथम १९०३ च्या सुमारास डेक्कन कॉलेजांत झाली. या वेळीं माझे मेहुणे कै. गजाननराव पेंडसे यांच्याकडे कॉलेजांत चार दिवस राहण्यास मी गेलों होतों. या ओळखीचें कारण पुढें वामनराव तुरुंगांतून सुटून परत येईपर्यंत पडलें नाहीं. परंतु तळेगांव येथील समर्थ विद्यालयाचे प्रमुख प्रो. विजापूरकर यांना वामनराव जाऊन मिळाले होते ही गोष्ट मला माहीत होती, व विजापूरकर हे माझे प्रथम गुरु व नंतर ऋणानुबंधी मित्र होते. विजापूरकर व वामनराव यांना कोल्हापूर दरबारच्या उपद्व्यापामुळें शिक्षा झाली, आणि पुढे तळेगांवची राष्ट्रीय शिक्षणाची शाळा बंद झाली, या गोष्टींचा विषाद सर्व महाराष्ट्राप्रमाणें मलाहि वाटत होताच. पण नुसता विषाद वाटून उपयोग काय? या कामीं ज्यांचा छळ झाला त्यांजविषयीं कांहीं सक्रिय सहानुभूति दाखवितां आली तरच त्याचा उपयोग. पण केसरी संस्थेनें केव्हांहि, राजकारणांत छळ झालेल्या लोकांना शक्य तेवढें सहाय्य करण्याचें ब्रीद, टिळकांच्या वेळेपासून व त्यानंतरहि यथाशक्ति पाळलें आहे. त्याचें पहिलें प्रत्यंतर हें कीं, समर्थ विद्यालय बंद झाले

५

तरी शिक्षणांत खंड न पडावा म्हणून त्यांतील कांहीं मुलें पुण्यांत खाजगी रीतीनें एका घरीं राहून शिक्षण घेत होतीं. आणि तळेगांव येथील राष्ट्रीय शाळेचे विजापूरकरांनंतरचे प्रमुख रा. जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर हेच त्या मुलांवर देखरेख ठेवीत व शिकवीतहि. पण करंदीकर हे स्वतः एल्‌एल्‌. बी. असतां स्वार्थत्यागपूर्वक या राष्ट्रीय संस्थेला येऊन मिळाले, व पुढें तेहि बेकार झाले, म्हणून त्यांनीं केसरीला कांहीं मजकूर लिहून देत जावें व केसरीनें त्यांना कांहीं ठरीव मोबदला द्यावा, अशी योजना मीं १९११–१२ सालापासून चालविली होती. अर्थात् वामनराव तुरुंगांतून आले तेहि याच ऋणानुबंधांतले व बेकार. सरकारच्या त्या वेळच्या दडपशाही धोरणामुळें वामनरावांना इतर कोठें नोकरी मिळणें कठीण.

"तथापि कांहीं दिवस असेच गेल्यावर मीं वामनरावांना मराठा पत्राकडे घेतलें. वामनरावांना सुरुवातीला काम थोडें म्हणून ४० रुपये पगार होता. एका वर्षानंतर त्यांना प्रथम ५० रुपये व नंतर ७० रु. याप्रमाणें पगार होता. तो १९१६ जानेवारीपर्यंत ७० रुपये होता. करंदीकर व वामनराव यांच्याविषयीं सहानुभूति तर खरीच, तथापि मला यावेळीं मदतनीस लेखकाची गरजहि होती. १९१० च्या प्रारंभीं मी केसरी पत्राचा जबाबदार संपादक झालों व तेव्हांपासून खाडीलकर यांनीं केसरीशीं आपला संबंध तोडला. अर्थात् केसरी व मराठा या सबंध दोन पत्रांचें काम मी व दुय्यम संपादक कै. दत्तोपंत लिमये अशा दोघांवर पडलें. यामुळें आमच्या मदतीला आणखी कोणीतरी हवाच होता. १८९८ पासून मी मराठ्याचा संपादक होतोंच, व आतां माझ्या त्या कामांत केसरीच्या संपादकत्वाची भर पडली म्हणून मीं प्रथम आर्‌. के. जोशी, एम्‌. ए. हे गृहस्थ मराठ्यामध्यें इंग्रजी लिहिण्यास मदतनीस म्हणून घेतले होते. परंतु दोन वर्षांच्या नोकरीनंतर जोशी हे गेले. वेळीं मदतनीस न मिळाला तरी दोन्ही पत्रांत मुख्य अग्रलेख लिहिण्याचें काम मी करीतच होतों. पण इतर किरकोळ मजकुराकरितां उपसंपादकाची जरूरी भासे. म्हणून १९१३ च्या सप्टेंबरांत वामनराव यांना मी आर्‌. के. जोशी यांच्या जागीं मराठ्याचे उपसंपादक नेमलें. पुढें १९१४ सालीं टिळक मंडालेहून सुटून आले तरी टिळकांनीं संपादक या नात्यानें केसरी-मराठ्यांत लिहिण्याचें काम पुन्हां आपलेकडे केव्हांहि घेतलें नाहीं. कारण त्यांचें इतर राजकीय व सार्वजनिक कार्य फारच वाढलें–इतकें कीं त्यांनीं केसरी–मराठ्यांत लिहिण्याला वेळ

खर्चणें हा वेळेचा अपव्ययच ठरता. शिवाय केसरी–मराठ्याचें काम आपल्या गैरहजेरींत १९०८ ते १९१४ हीं सहा वर्षें अखंड व चांगलें चालून दोन्हीं पत्रें टिकून राहिलीं, आणि त्यांच्या लोकमान्यतेंत कमीपणा आला नाहीं, हें पाहिल्यावर टिळकांनाहि हीं पत्रें चालविण्याला स्वतः हातीं घेणें किंवा त्याकरितां दुसरा कोणी पाहणें याचें कांहींच कारण नव्हतें. शिवाय आतां खाडीलकरहि परत संस्थेंत येऊन जबाबदार संपादक नसले तरी सहसंपादक असल्यासारखे लिहूं लागले होते. खाडील-कर आल्यानें केसरीकडील इतर मजकूर लिहिण्याचें माझें काम थोडें हलकें झालें होतें. आणि दत्तोपंत लिमये वारले त्यांच्या जागीं तात्यासाहेब करंदीकर हे उप-संपादक म्हणून येऊन कायमचे मिळाले होते. यामुळें पुढें मराठ्याकडे कोणी मदतनीस नसला तरी भागण्यासारखें होतें. वामनराव यांना मीं प्रथम केसरी संस्थेकडे घेतलें ते अर्थात् हंगामी किंवा तात्पुरते म्हणूनच. टिळक येईपर्यंत कोणाचीहि कायमची नेमणूक मीं करणें शक्य नव्हतें. आणि १९१६ च्या जानेवारींत वामनरावांनीं राजीनामा दिला नसता तर पुढें काय झालें असतें हें नक्की सांगणें कठीण आहे. पण वामनरावांनीं राजीनामा दिला. ते पुढें हिंगणें येथें कर्वे यांचे संस्थेला जाऊन मिळाले व तहहयात सभासद झाले. याचें खरें कारण वामनरावांची खरी आवड शिक्षक होण्याची होती, संपादक होण्याची नव्हती. म्हणूनच त्यांनीं एम्. ए. झाल्यावर, एल्‌एल्. बी. होणें किंवा एकादी प्रोफेसरची नोकरी मिळविणें शक्य असतां, ध्येयवादित्वामुळें विजापूरकरांच्या शिक्षणसंस्थेशीं ऋणानुबंध जोडला.

"केसरी संस्थेंतून राजीनामा देऊन वामनराव गेले याची हकीगत अशी असतां कांहीं लोक या बाबतींत टिळकांना दोष देतात, व कांहीं वामनरावांना देतात! परंतु त्या दोहोंतहि फारसा अर्थ नाहीं. राजकीय बाबतीत वामनराव हे पूर्ण राष्ट्रीय वृत्तीचे होते हें टिळकांना दिसतच होतें. बरें सामाजिक बाबतींत ते सुधारणावादी होते असें असलें तरी त्याकरितां त्यांना टिळकांनीं केसरी संस्था सोडा असें म्हटलें नसतें. कारण स्वतः मी वामनरावांइतकाच समाजसुधारणावादी होतों हेंहि टिळकांना दिसत होतें. अर्थात् असला मी टिळकांना खपलों तर तसले वामनरावहि खपले असते. परंतु वर सांगितल्याप्रमाणें वामनरावांची केसरी संथेंस्तील नोकरी बोलून चालून हंगामी होती. एकादा उपसंपादक कमी झाल्यानें माझें काम बाधित होण्या-सारखें नव्हतें, आणि वामनरावांना कर्वे यांच्याशीं आजन्म संबंध जोडावयाचा होता.

"राजीनाम्याचें प्रत्यक्ष कारण मात्र थोडें आकस्मिक घडलें एवढें खरें. तें असें—

१९१६ सालीं प्रारंभींच पुण्यांतील नेमस्त पक्षाची एक सभा किंवा परिषद भरली होती. तिला टिळक, मी, किंवा टिळकपक्षाच कोणी लोक अर्थातच जाणार नव्हते. तथापि त्या वेळीं पुण्यांतील या दोन पक्षांत वेवनाव व चुरस होती, यामुळें या परिषदेंत प्रत्यक्ष काय हकीगत घडते हें पाहण्यासाठीं केसरी संस्थेतर्फे कोणी तरी अधिकृत बातमीदार म्हणून जावा असें टिळकांना वाटलें. आणि वामनराव हे सहज कचेरींत डोळ्यापुढें दिसले म्हणून टिळकांनीं त्यांना तें काम सांगितलें. असलें काम कचेरींतील उपसंपादकाला सांगणें ही रीतच आहे. शिवाय त्या वेळीं केसरी संस्थेंत रिपोर्टर किंवा बातमीदार असे कोणी वेगळे नेमलेले नव्हते. स्वतः मी तर कॉंग्रेस प्रांतिक परिषद अशा सभांना जाई तेव्हां मुद्दाम होऊन बातमीदारांच्या प्रशस्त व सोयीच्या जागेंतच बसें! तथापि वामनरावांना ती गोष्ट आवडली नाहीं. त्यांना असें वाटलें कीं आपण उपसंपादक व लेखक असतां आपणाला रिपोर्टरचें बातमीदाराचें काम सांगितलें! त्यांना दुसराहि असा संशय आला म्हणतात कीं "स्वतः टिळक केळकर ज्या सभेला जात नाहींत त्या सभेला टिळक मला जा सांगतात याचा अर्थ मी पक्का राष्ट्रीयपक्षवादी नाहीं अशी टिळकांची समजूत आहे कीं काय?" कांहीं असो. टिळकांनीं सहज काम सांगितलें व तें करीत नाहीं असें वामनरावांनीं निश्चयानें सांगितलें. असें व एवढें बिघडलें खरें. मात्र ही गोष्ट खरी कीं टिळकांना हा नकार आवडला नाहीं. वामनरावांच्या कानावर जावें म्हणून टिळक माझे जवळ म्हणाले कीं "केसरी-मराठा कचेरींतील ही शिस्त नाहीं. त्या पत्रांचें पडेल तें काम वरपासून खालपर्यंत कोणींहि केलें पाहिजे. तरच ती संस्था." तथापि झाल्या अपराधाकरितां तुमची नोकरी यापुढें नको असें टिळकांनीं वामनरावांना सांगितलें नाहीं. पण आपण यापुढें केसरी संस्थेंत राहणें बरें नाहीं असें मनाशीं ठरवून वामनराव यांनींच राजिनामा दिला. टिळकांनीं माझे मार्फत वामनरावांना सूचना दिली तींत वर दर्शविलेल्या वर्तमानपत्राच्या कचेरींतील फक्त शिस्तीची समज दिली होती. परंतु राजीनामा द्या अशी सूचना केली नव्हती हें निश्चित आहे. आणि वामनरावांनीं आपण होऊन ती सूचना मान्य आहे असें उलट टिळकांना कळविलें असतें तर त्यांनीं वामनरावांचा राजीनामा कदाचित् स्वीकारलाहि नसता.

"वामनराव हे कायम म्हणून नेमले गेले नव्हते याचें प्रत्यन्तर हेंच कीं करंदीकर केसरींत थोडथोडें लिहीत असतांहि, दत्तोपंत लिमये हे मृत्यु पावेतों करंदीकरांना कायम नेमलें नव्हतें. लिमये वारल्यामुळेंच करंदीकर कायमचे घेण्यांत आले.

वामनरावांप्रमाणें हंगामी, म्हणजे त्यांच्या त्यांच्या कारणापुरते, इतर कित्येक गृहस्थहि असेच, केसरी संस्थेंत टिळक मंडळेंत असतां व तेथून सुटून आल्यावर, मीं व टिळकांनीं नेमले होते. याविषयीं सेनापती बापट, येवल्याचे डॉक्टर भट, रामचंद्र विनायक ऊर्फ बाबा पटवर्धन हीं उदाहरणें होत. यांना तात्पुरता पाय ठेवण्याला जागा म्हणून केसरीकडे हंगामी घेण्यांत आलें होतें, आणि पुढें वामनराव जसे कर्व्यांच्या संस्थेला जाऊन मिळाले तसेच पटवर्धन हे त्यांना मिळालेल्या पुणें म्युनिसिपालिटींतील नोकरीवर गेले; आणि भट यांचा मुंबईच्या मेडिकल कॉलेजांतील अभ्यासक्रम अपुरा राहिला होता तो पुरा करण्याकरितां ते केसरीकचेरींतील नोकरी सोडून गेले, व पुढें येवलें येथें डॉक्टरकीचा धंदा करूं लागले. मी खाडीलकर करंदीकर व अधून मधून टिळक इतके कायमचे लेखक केसरीमराठ्याला असल्यानें नवीन माणसें केसरीकडे कायम नेमण्याचा प्रश्नच नव्हता.

"दुसरी एक बाजारगप्प अशी कीं वामनरावांनीं टिळकांच्या गीतारहस्याचें समालोचन इंग्रजींतून केलें त्यांत टिळकांच्या मताशीं किंचित् भेद दर्शविण्यांत आला होता, तो टिळकांना नापसंत झाल्यानें त्यांनीं वामनरावांना नोकरींतून काढलें! परंतु ही गोष्टहि खरी नाहीं. गीतारहस्यांतील मतप्रतिपादन हा बौद्धिक विषय होता, आणि आपल्या हाताखालील एखाद्या लेखकानें आपल्याशीं तत्त्वज्ञानाचे बाबतींत बौद्धिक मतभेद दाखविला म्हणून त्याला नोकरीवरून काढण्याइतके टिळक असहिष्णु नव्हते. याचें प्रत्यंतर हेंच कीं टिळकांच्या गीतरहस्याचा वाद चालू असतांना रा. वालचंद कोठारी (पुण्याच्या प्रभात पत्राचे हल्लींचे संपादक) यांनीं टिळकांशीं मतभेद दर्शविणारा व किंचित् कठीण शब्द वापरलेला असा एक लेख लिहिला होता तो केसरीचा संपादक (मी) यांनीं केसरींतच छापला होता. पटेलबिलाच्या सभेंत वामनरावांनीं भाग घेतला म्हणून त्यांना राजीनामा द्यावा लागला अशीहि एक गप्प सांगतात. परंतु एक तर पटेल बिलाची ही सभा वामनरावांनीं केसरी कचेरी सोडल्यावर सुमारे दीड वर्षानें झाली. आणि दुसरें असें कीं वामनरावांप्रमाणें स्वतः मीहि पटेल बिलास अनुकूल असून, वामनरावांबरोबरच त्या सभेंतून पोरांसोरांकडून हुर्यो करून घेऊन सभेंतून बाहेर पडलों होतों. पण टिळकांनीं मला याकरितां केसरीच्या संपादकाच्या जागेवरून काढलें नाहीं, इतकेंच नव्हे तर या वेळीं मी टिळकांच्या होमरूल लीगचा सेक्रेटरी होतों व पुढील वर्षीं टिळकांचा दुय्यम मदतनीस म्हणून विलायतला गेलों.

तात्पर्य, निराधार वाजारगप्पा या अशाच असावयाच्या. आणि त्यांतलीच एक आणखी अशी कीं, वामनरावांना टिळक हे केसरीचे ट्रस्टी करणार होते व तसें त्यांनीं वामनरावांना सांगितलें होतें म्हणे ! ! ही दंतकथा चित्रमयजगतच्या १९४३ च्या ऑगस्ट महिन्याच्या अंकांत रा. दा. न. शिखरे यांनीं लिहिलेली पाहून, आणि तिला खुद्द वामनरावांचा आधार देऊन लिहिलेली आहे असें लिहिलें आहे म्हणून, आश्चर्य वाटलें. कारण इकडे शिखरे असें सांगतात कीं वामनराव केसरीचे रिपोर्टर म्हणून एका सभेला गेले नाहींत याकरितां टिळकांची इतराजी होऊन वामनरावांना राजीनामा द्यावा लागला. आणि तेच शिखरे त्याच वाक्याच्या जोडीला असें लिहितात कीं टिळक वामनरावांना केसरीचे ट्रस्टी करणार होते ! पण आधीं एक तर १९१९ सालीं केसरीचा ट्रस्ट करण्याची कल्पना टिळकांच्या डोक्यांतहि आली नव्हती. कारण ते या वेळीं विलायतेंत चिरोलसाहेबांवर अब्रू-नुकसानीची फिर्याद दाखल करून एका धाडसी उद्योगांत गुंतले होते, व ट्रस्ट करण्याऐवजीं या फिर्यादीचा खर्च कसा उभारावा या विवंचनेंत होते. तेव्हां ट्रस्टची कल्पना कोठून सुचणार ? बरें, ट्रस्टची कल्पना असली तरी यापूर्वी वीस वर्षें केसरी संस्थेंत असलेले मी व खाडीलकर यांना सोडून हंगामी नोकरीला आलेल्या वामनरावांना ते ट्रस्टी करणार होते कीं काय ? आमच्या मतें ही ट्रस्टची गोष्ट वामन-रावांच्या तोंडून शिखरे यांनीं ऐकली असणें अशक्य, कारण शिखऱ्यांपेक्षां निकट परिचयाच्या त्यांच्या माणसांपाशीं ही गोष्ट ते कधींच बोललेले नव्हते. पण एकाद्या मृताविषयीं लिहितांना त्याला मोठेपणा देण्याच्या भरांत इतर कोणाला अन्याय होतो कीं काय याची काळजी जशी कांहीं लोक करीत नाहींत, तशाच आपण ज्या दंतकथा मिळवितों–प्रसृत करतों त्यांत खरेपणा किती असेल याची खोल चिकित्साहि ते करीत नाहींत.

" मीं वामनरावांना केसरी संस्थेकडे घेतलें तें याच हेतूनें कीं त्यांचा त्यावेळीं सरकारकडून छळ होत होता; आणि पुढे सेनापती बापट, डॉ. भट यांनाहि केसरींत कांहीं वेळ आश्रय मिळाला तोहि सरकारकडून ते गृहस्थ त्या वेळीं छळ सोशीत होते म्हणून ! यांत केसरीची जशी निर्भय वृत्ति वाखाणण्यासारखी दिसते तशीच देशभक्तीच्या अपराधामुळें संकटांत पडलेल्या लोकांना दाखविलेली सक्रिय सहानु-भूतिहि वाखाणण्यासारखीच होय. "

केळकरांचें व वामनरावांचें केसरी संस्थेंत पटलें नाहीं वगैरे म्हणण्यांत कसा अर्थ नाहीं हें वरीलवरून स्पष्टच होईल. गोव्याच्या साहित्यसंमेलनप्रसंगीं केलेल्या अध्यक्षीय भाषणांत केसरीविरुद्ध नेहमीं नेहमीं लिहिणाऱ्या साप्ताहिकांची स्तुति करून व केसरीचा उल्लेख न करून वामनरावांनीं अप्रत्यक्षरीत्या केसरीला अन्याय केला ही गोष्ट केळकरांना आवडली नाहीं; आणि त्याबद्दल मात्र त्यांचा वामनरावांवर कांहीं काळ रोष होता. वामनरावांनाहि त्याची जाणीव होती. पण केळकरांकडे चहाचे निमित्तानें जाऊन व मोकळेपणानें सर्व खुलासा करून त्यांचा तो रोष वामनरावांनीं घालविला होता. कालान्तरानें दोघेहि व्याही व्याही बनून आप्तसंबंधानें जास्त जवळ आले. आणि अगदीं शेवटीं तर महाराष्ट्रसाहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षाचे पदावरून केळकर स्वतः उतरून त्यांनीं त्या स्थानीं वामनरावांना चढविलें. असा वास्तविक सर्व प्रकार असल्यामुळें त्या उभयतांचीं मनें तितकीशीं शुद्ध नव्हतीं वगैरे समजुती खोट्या ठरतात हें सांगायला नकोच.

१९१६ च्या जानेवारींत ' मराठा ' सोडल्यावर पुढें ४–५ महिने वामनराव रिकामे–बेकारस्थितीतच होते. याच काळांत केव्हां तरी ते पुण्यांतल्या आणखी एका सुस्थित संस्थेंत नोकरी मागण्याकरितां गेले असतां चालकांनीं आपल्याला २५ रुपये पगार देऊन आपला उपमर्द केला व दारिद्र्याचा पहिला कटु अनुभव आणवून दिला असें वामनराव सांगत. मेच्या सुमारास श्री. अ. ब. कोल्हटकर यांनीं मुंबईस सुरू केलेल्या ' मेसेज ' या इंग्रजी दैनिकाचे दुय्यम संपादक होण्यासंबंधीं त्यांस विचारण्यांत आलें. यासंबंधीं त्यांनीं आपले मित्र गोळे यांस विचारलें असतां पुढीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं:—

' कसें काय करावें ? अच्युतराव मेसेजचा एडिटर म्हणून बोलावताहेत. '

' हा अविचार तुम्ही अगदीं करूं नका. अच्युतरावांच्या घटोत्कची बाजारांत तुम्ही जाऊं नका. पश्चात्ताप पावाल. त्यांच्यासंबंधीं तुम्हांला जास्त सांगायला पाहिजे का ? '

' म्हणतां तें खरें आहे. पण पाहूं तर खरें, काय होतें तें. अहो *Any port in the storm.* करतां काय ? '

असें म्हणून वामनराव मुंबईस गेले आणि जूनपासून १२५ रु. पगारावर संपादकाचें काम पाहूं लागले. येथल्या त्यांच्या कामासंबंधीं आणि वास्तव्यासंबंधीं श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर लिहितात:—

" वामनरावांच्या वर्तमानपत्री लिखाणांत अमृतबझारपत्रिकेसारखी धडाडी किंवा चुरचुरीतपणा कमी असे. त्यामुळें मराठींतल्या संदेशप्रमाणें इंग्रजी मेसेज पत्र तितकें लोकप्रिय होऊं शकलें नाहीं. पुष्कळ वेळां अशी गंमत होई कीं वामनरावांनीं लिहिलेला लेख दुसऱ्या दिवशीं सकाळीं अगदीं निराळ्या स्वरूपांत प्रसिद्ध झाल्याचें त्यांना आढळून येई ! आणि संदेश-मेसेज मध्यें उलटसुलट विचारसरणीचे लेखहि प्रसिद्ध होत, हें वामनरावांना फारसें मानवत नसे. पण अच्युतरावांचा खाक्या अगदीं निराळा. त्यांना असल्या विरोधाभासाचीच एक प्रकारची हौस असे ! वामनराव अच्युतरावांप्रमाणें जरी ध्येयवादी असले, तरी अच्युतरावांचा जबरदस्त आशावाद आणि संकटांना तोंड देण्याची–किंबहुना संकटें मुद्दाम आपल्यावर ओढून घेण्याची त्यांची बेछूट किंवा हौशी निर्भयवृत्ति हे गुण वामनरावांच्या अंगीं नव्हते. त्यामुळें मुंबईचें वास्तव्य त्यांना सुखावह झालें नाहीं. मुंबईला त्यांनीं कांहीं दिवस स्वतंत्र बिऱ्हाड केलें होतें. पण संदेश-मेसेजच्या अवाढव्य परंतु अनागोंदी जमाखर्चात त्यांच्या वाटणीला चुकूनमाकूनच पैसे यावयाचे. ध्येयवादाच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या उबीनें घरांतली चूल कशी पेटणार ? यामुळें त्यांच्या पत्नी वैतागून जात. पण त्याबद्दल स्वतः वामनरावांनीं कधींहि कुरकुर केली नाहीं. अच्युतरावांचा दांडगा व्याप पाहून वामनराव कांहींसे गांगरूनच जात ! पण असा आंतबट्ट्याचा व्यवहार अव्याहत कसा चालूं शकणार ? म्हणून त्यांना पुढें मुंबई सोडावी लागली. " अच्युतरावांनीं बरेचसे पगाराचे पैसे अखेरपर्यन्त दिले नाहींतच. कोर्टामार्फत जें कांहीं वसूल करतां आलें तेवढ्यावरच संतुष्ट होऊन १९१७ च्या अखेरीस वामनरावांनीं मेसेज व मुंबई सोडली.

पुन्हां नोकरीचा शोध करणें ओघानेंच आलें. पण आतां वृत्तपत्राच्या संपादकाचें काम पत्करण्यांत अर्थ नाहीं ही त्यांची पूर्वीचीच भावना प्रभावी झाली. वृत्तपत्रांचा धंदा म्हणजे केवळ वरवर वाचन करून तात्कालिक महत्त्वाच्या जुजबी विषयांवर लिहिणें यापलीकडे त्याला कांहीं महत्त्व नाहीं असें वामनरावांस वाटे. संपादकीय नोकरी करीत असतांनाच त्यांच्या मनाला अस्वस्थता वाटत होती. ही अस्वस्थता व नुसत्या वर्तमानपत्रीय लिखाणाचा तिटकारा हीं वामनरावांच्या ' सॉक्रेटिसाचे संवाद ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत व्यक्त झालीं आहेत. ' मराठा ' हें साप्ताहिक तरी होतें, पण ' मेसेज ' हें दैनिक पडलें. त्या मानानें रोजच्या रोज त्यांच्या बुद्धीची व मनाची अधिकाधिक कुचंबणा होऊं लागली. इतकेंहि करून

पैशाची सारखी तारांबळ; त्यामुळें त्यांच्या आवडत्या शिक्षकाच्या धंद्याकडे त्यांचें मन पुनः वळलें. सन १९१६ सालींच प्रो. कर्वे यांनीं आपली 'महिला विद्या-पीठाची' योजना जनतेपुढें मांडून त्याप्रमाणें कार्याला सुरुवातहि केली होती. त्या योजनेंत व समर्थविद्यालयाच्या पूर्वीच्या योजनेंत मातृभाषेंतून शिक्षण ही व अशाच इतर गोष्टी सारख्याच समान आहेत हें पाहून वामनराव १९१८ सालीं एप्रिलांत हिंगणें येथें गेले व महिला पाठशाळा या कॉलेजांत काम करण्याचें त्यांनीं प्रो. कर्वे यांच्या वाढदिवशीं ( १८ एप्रिल ) ठरविलें. या निश्चयाप्रमाणें उन्हाळ्याची सुटी संपून पाठशाळा पुन्हां सुरु होण्याचे वेळीं जून १९१८ पासून वामनराव हें काम करूं लागले, व पुढें दोन वर्षांनीं म्हणजे १९२० पासून ते अनाथबालिकाश्रम या संस्थेचे आजन्मसेवक झाले.

वामनरावांच्या या ६ वर्षांतील कामासंबंधीं त्यांचे बंधु नाना म्हणतात, "तात्या राजकारणांत पडले व राजकारणांतून बाहेर पडले असें म्हणण्यापेक्षां तात्या खरो-खर राजकारणांत फारसे पडलेच नव्हते, असें म्हणणें जास्त बरोबर होईल. राजकारणांत सर्वस्वीं समरस होणें त्यांच्या मनोवृत्तीचा विचार करतां त्यांस शक्य नव्हतें. कारण त्या वेळच्या कोणत्याहि राजकीय पक्षाशीं त्यांचीं वैयक्तिक राजकीय व सामाजिक मतें पूर्णपणें जुळत नव्हतीं. त्यामुळेंच त्यांना हिंगण्याच्या संस्थेस मिळण्यानें समाधान वाटलें. राजकारणांत पडण्याला कोणत्या तरी एका पक्षाशीं समरस व्हावें लागतें. तें तात्यांच्या मनोवृत्तीशीं जुळत नव्हतें."

# अनाथ बालिकाश्रमाची बहुविध सेवा ५

तुरुंगांतून सुटल्यानंतरचा सहा–सात वर्षांचा काळ वामनरावांनीं वृत्तपत्रीय व्यवसायांत कसा घालविला, त्यांत त्यांना कसेकसे अनुभव आले, तो त्यांना कां सोडावा लागला वगैरे गोष्टींचें वर्णन मागें आलेंच आहे. आपल्या ध्येयवादाला, देशसेवेच्या आपल्या कल्पनेला मनासारखा वाव मिळत नाहीं, उलट आपल्या विपन्नावस्थेचा व अगतिकत्वाचा भलता फायदा घेऊन लोक आपल्याला जेथें तेथें नाडतात असें वामनरावांच्या मानीं पण हळव्या मनानें घेतलें व सर्व उद्योग सोडून देऊन ते विवंचनेंत व विषण्णावस्थेंत काळ कंठूं लागले.

पण अशा स्थितींत वामनरावांना फार काळ काढावा लागला नाहीं. १९०६ सालीं एम्. ए. होऊन डेक्कन कॉलेजमधून बाहेर पडल्याबरोबर वामनरावांनीं डे० ए० सोसायटीला येऊन मिळावें व फर्ग्यूसन कॉलेजमध्यें आपल्याबरोबरीनें प्राध्यापकाचें काम करावें अशासंबंधींची खटपट प्रि. परांजपे, प्रो. लिमये, प्रो. भाटे वगैरेंनीं पूर्वी केली होती, पण त्या वेळीं राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांचें व विशेषतः विजापूरकरांचें वजन वामनरावांचे मनावर फार पडल्यामुळें सदरहु मंडळींच्या परिश्रमाला फळ आलें नव्हतें. मध्यन्तरींच्या काळांत वामनरावांच्या कार्याला जें वळण मिळालें होतें तें या मंडळींना फारसें मान्य व अभिमत नसलें तरी वामनरावांची विद्वत्ता,

त्यांचें लेखनकौशल्य, त्यांची त्यागी वृत्ति, त्यांची शिक्षणविषयक आवड इत्यादि-बद्दलचा त्यांचा पूर्वीचा आदर अद्याप कायम होता; आणि दुसरी योग्य संधी आल्यावरोवर त्यांनीं वामनरावांना आपल्या नाहीं–तरी आपल्या नियंत्रणाखालीं चाललेल्या दुसऱ्या एका शिक्षण–संस्थेंत ओढून आणण्याचें यश मिळविलें.

ही दुसरी संस्था म्हणजे प्रो. धों. के. कर्वे यांनीं १९१६ सालीं स्थापन केलेलें महिला विद्यापीठ ही होय. या विद्यापीठाचें पहिलें कॉलेज ' महिला पाठशाळा ' नांवानें अनाथ वालिकाश्रम संस्थेमार्फत हिंगणें येथें सुरू झालेलें असून त्यांत दिवेकर, आठवले, चिपळूणकर, जोशी, मायदेव, मोडक, गरूड, गोडे वगैरे विद्वान् लोक प्रोफेसर म्हणून काम करीत होते. महिला विद्यापीठाच्या वैशिष्ट्या-मध्यें मातृभाषेंतून शिक्षण व मातृभाषेचा विशेष अभ्यास हीं दोन विशेष प्रमुख असल्यामुळें वामनरावांसारख्या अखिल महाराष्ट्रांत नाणावलेल्या साहित्यिकाचा लाभ–इतरांचे पेक्षां जास्त पगार देऊनहि आपल्या कॉलेजला करून घेतां आल्यास कर्वे वगैरे मंडळींना तें हवें होतें. अस्थिरतेचें, भगभगीचें व विवंचनेचें जिणें सतत सहा वर्षें कंठावें लागल्यामुळें वामनरावहि आतां जरासे जेरीस व टेकीस आले असल्यामुळें त्यांनाहि आतां कोठेंतरी स्थिरतेचें, प्रतिष्ठेचें, व सांपत्तिक दृष्ट्या स्वास्थ्याचें एकादें ठिकाण हवेंच होतें. शिवाय अशाच एकाद्या निवान्त ठिकाणीं त्यांच्या सत्वस्थ, चिंतनशील, व अध्ययन–अध्यापनप्रवण मनाला समाधान लाभण्यासारखें होतें. दोघांनाहि एकमेकांची जरूर सारखीच अस-ल्यामुळें व दोघांनाहि हा सवदा आपल्याला किफायतशीर व हितप्रद होणार अशी मनांतून खात्री वाटूं लागल्यामुळें निमंत्रण देण्याघेण्यांत व अटी वगैरे ठरण्यांत फारसा वेळ न जातां १९१८ च्या जूनमध्यें वामनराव हिंगणें येथील कॉलेजमध्यें प्राध्यापकाचे कामावर रुजू झाले व पुढें दोन वर्षांनीं अनाथबालिकाश्रम मंडळीचे आजीव सभासद बनले.

वामनराव आपल्या संस्थेला लाभले या गोष्टीचा प्रो. कर्वे व त्यांचे सहकारी यांना किती आनंद झाला हें संस्थेच्या त्या वर्षाच्या रिपोर्टावरून दिसून येतें. रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं:—" महाराष्ट्र गद्यलेखकांत रा. वामनराव जोशी आज बरेच वर्षांपासून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काव्यशास्त्रविनोदात्मक ' रागिणी' नें मराठी कादंबऱ्यांत उच्च स्थान पटकाविलें आहे; व त्यांच्या ' नीतिशास्त्रप्रवेशा' चे द्वारें अनेक विद्यार्थ्यांनीं नीतिशास्त्रासारख्या अगम्य विषयांत सहज प्रवेश केला

आहे......यांच्या योगानें आजन्मसेवक मंडळींच्या कार्यक्षमतेंत केवढी भर पडली आहे हें सांगत बसण्याचें कारणच नाहीं."

वामनरावजी हिंगण्याच्या संस्थेला कायमचे येऊन मिळाल्यावर त्यांना मुख्यतः तीन प्रकारचीं कामें करावीं लागलीं. पहिलें म्हणजे महिलापाठशाळा कॉलेजांत प्रोफेसर म्हणून व महिलाश्रम हायस्कुलांत शिक्षक म्हणून केलेलें शिकविण्याचें काम. दुसरें म्हणजे–सदरहु दोन्ही ठिकाणीं प्रिन्सिपल व सुपरिंटेंडेंट या नात्यांनीं निरनिराळ्या काळीं केलेलें संस्था चालविणाऱ्या चालकाचें काम; व तिसरें म्हणजे–अनाथबालिकाश्रम मंडळीचे आजन्मसेवक या नात्यानें केलेलें इतर काम. प्राध्यापक वा शिक्षक म्हणून वामनरावजींचें वैशिष्टय काय होतें, व प्रिन्सिपल वा सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांचें धोरण काय होतें यासंबंधींचें दिग्दर्शन पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत होणार आहे. आजन्म सेवक म्हणून त्यांनीं केलेलीं इतर प्रकारचीं कामें–त्यांचें स्वरूप, त्यांतील त्यांचें धोरण यासंबंधींचें दिग्दर्शन आतां या प्रकरणांत करावयाचें आहे.

लोकाश्रयावर चाललेल्या शिक्षणसंस्थांत काम करणाऱ्या आजीव सभासदांस प्रत्यक्ष शिकविण्याच्या कामाशिवाय इतर कितीतरी निरनिराळ्या प्रकारचीं कामें करावीं लागतात. या कामांचा बोजा सर्वांवर सारखाच पडतो असें अर्थातच नाहीं. कोणाकडे कोणतें व किती काम येतें हे त्याच्या गुणावर अवलंबून असतें. जे सदिच्छेच्या व उत्साहाच्या भरांत कोणतेंहि काम करावयाला झटदिशीं पुढें होतात त्यांचेवर त्यांतलीं वरीचशीं कामें पडतात. उलट ज्यांचे ठिकाणीं अगदीं चुकारतट्टूपणाचीच नसली–तरी मागें मागें घेण्याची वृत्ति असते ते तसेच सहीसलामत निसटून जातात. हिंगण्याच्या संस्थेंतील बहुतेक आजन्म सेवक तेथेंच माळावर रहात असल्यामुळें व ते संख्येनेंहि थोडेच असल्यामुळें सर्वच कामें सर्वांना—वेळ पडेल तशीं करावीं लागत असत. गांव तिथें म्हारवडा या न्यायानें त्यांचेमध्येंहि कधीं कधीं एकादें काळें कोकरूं असायचेंच—नाहीं असें नाहीं. अशा एखाद्या कोकराविरुद्ध कांहीं कुरबुरीचें बोलणें निघालें म्हणजे वामनरावजी शान्तपणें म्हणत 'अहो, असें हें चालायचेंच. कांहींनीं मरमर मरायचें व इतरांनीं त्यांच्या श्रमावर सुखानें जगायचें हा तर सृष्टिनियमच आहे. जे आपण होऊन करतात त्यांचेवरच अधिक लादलें जातें; बरें, जे मोकळे राहातात ते कायमचे सुटतात. त्यांना नांवें ठेवण्यांत कांहींच अर्थ नाहीं; नांवें ठेवायचींच झालीं तर तीं पहिल्यांनाच—ते जास्त करतात म्हणून ठेवावीं लागतील.

त्यांचे गुणच त्यांना नडतात.' आणि या आपल्या म्हणण्याला आधार म्हणून ते गुणानामेव दौरात्म्यात् धुरि धुर्यो नियुज्यते । असञ्जातकिणस्कंधः सुखं स्वपिति गौर्गलिः ॥ असें सुभाषित म्हणून दाखवीत.

मुख्याध्यापक या नात्यानें हायस्कुलावर देखरेख ठेवणें व त्यांतील वरच्या वर्गांना शिकविणें या दोन कामांशिवाय लोकांकडून देणग्या व वर्गणी गोळा करणें, संस्था पाहावयास येणाऱ्या प्रेक्षकांना व संस्थेंत मुलींना दाखल करण्याच्या इच्छेनें येणाऱ्या पालकांना संस्था दाखविणें, रोज संध्याकाळीं सामुदायिक प्रार्थना घेणें, डाग-डुजीच्या व स्वच्छतेच्या खात्यांवर देखरेख करून त्याचे हिशेब ठेवणें, फुलाफळांच्या बागांवर देखरेख ठेवणें, नवीन झाडें लावणें इत्यादि विविध प्रकारचीं कामें वामन-रावांनी-स्वतःकडे आलीं तीं केलीं. हीं कामें त्यांनीं कधींहि न कुरकुरतां केलीं असलीं तरी ते वृत्तीनें शिक्षक असल्यामुळें वर्गातील शिकवण्यांत व प्रार्थनेच्या प्रसंगीं करावयाच्या प्रवचनांत त्यांना जितका आनंद वाटे तितका इतर कामें करतांना वाटत नसे हें खास. आजन्मसेवकसंस्था हीं एक कुटुंबसंस्था आहे, व प्रत्येक आजन्म सेवकानें कुटुंबांतल्या माणसाप्रमाणें पडेल तें काम शक्य तितक्या चांगल्या-प्रकारें पार पाडलें पाहिजे—मग तें त्याला आवडो वा न आवडो—अशा कर्तव्य-बुद्धीनेंच वामनरावजी हीं इतर कामें करीत असत.

देखरेख खात्यांतील किचकट काम व त्याचे हिशेब हीं तर वामनरावांना नीटशीं कधींच जमलीं नाहींत. असलीं कामें करवून घ्यायला लागणारा दृष्टीचा बारकावा, सारखें गडीमाणसांचे पाठीवर राहून त्यांचेकडून काम करवून घ्यावयास लागणारा वृत्तीचा खमकेपणा व तोंडाचा शिवराळपणा; घासाघीस घालून भाव पाडून घ्यावयाला लागणारा धंदेबाजपणा इत्यादि गुण वामनरावांमध्यें नव्हते; उलट गडीमाणसांच्या अज्ञानाची व त्यांच्या दारिद्र्याची त्यांस कधीं कींव येई, तर कधीं सुशिक्षित म्हटलीं जाणारीं माणसें तरी कितीशीं प्रामाणिक आहेत असा त्यांस प्रश्न पडून त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करावेंसें वाटे. अर्थात् या त्यांच्या उदार वृत्तीचा जो कांहीं फायदा घेतला जावयाचा तो घेतला जाई, व त्यामुळें संस्थेचें जें कांहीं नुकसान व्हावयाचें तेंहि होई. हाताखालील माणसांना संभाळून घेण्याच्या वृत्तीमुळेंच वामन-रावांना पुष्कळ वेळां नादान माणसांनाहि कामावरून काढवत नसे. मनाच्या औदार्यामुळेंच सुतार-गवंडी वगैरेंना त्यांनीं मागितलेल्या सामानापेक्षां ते थोडें जास्तच देऊन ठेवायचे, व 'अरे, जास्त घेतलंत तर कांहीं बिघडत नाहीं;

सांडलवंड, मोडतोड, तूटफूट वगैरे व्हायचीच; मग मागाहून नको ' असें वर बजावायाचे ! आपल्या वृत्तींतील हा गुणातिरेक ऊर्फ दोष त्यांना समजत नसे असें नाहीं. पण दुर्वृत्तांना सुमार्गावर आणतांना पहिल्यापहिल्यांदा तरी सुवृत्तांचाच तोटा व्हावयाचा, आणि हें जाणूनच सुधारणेच्छूनें सुधारणेचे कामीं हात घातला पाहिजे अशी त्यांची विचारसरणी असल्यामुळें होणारा तोटा ते मुकाट्यानें होऊं देत, किंवा प्रत्यक्ष पैशाची बाबत असल्यास स्वतःच्या खिशांतून भरपाई करीत.

मोठमोठ्या श्रीमंत लोकांकडे जाऊन संस्थेकरितां देणग्या वगैरे मिळविणें, किंवा वार्षिक वर्गणी देणारांची संख्या वाढविणें हीं कामें वामनरावांना वरील कामाचे मानानें जास्त चांगलीं साधत असत. त्यांची विद्वत्ता, त्यांचें वाङ्मय, त्यांचा त्याग, त्यांना भोगावा लागलेला कारावास इत्यादि गोष्टींची छाप कांहीं कांहीं लोकांचे मनावर अशी कांहीं विलक्षण पडे कीं, प्रो. कर्वे किंवा त्यांचें कार्य यांबद्दल फारशी माहिती नसतांना–किंवा असल्यास त्याबद्दल फारशी सहानुभूति वाटत नसतांहि–केवळ वामनराव आपलेकडे मदत मागायला आले म्हणून–ते हिंगण्याच्या संस्थेला मदत करायला तयार होत. स्त्रीशिक्षणाचें महत्त्व, संस्थेचें कार्य, इत्यादिसंबंधीं बोलायला सुरुवात करून वामनराव त्यांचें आवाहन करूं लागले म्हणजे कांहीं लोक म्हणत—" संस्था-बिंस्था ठीक आहे. त्यांत आम्हांला कांहीं गम्य नाहीं. तुम्ही मागायला आलांत म्हणून देतों, झालं. " १९२८ सालीं प्रो कर्वे यांच्या ७० व्या वर्षाच्या ज्युबिलीचे प्रसंगीं कोल्हापूर, सांगली वगरेसारख्या ठिकाणीं वामनरावांनीं थोडक्याश्या अवधींत जी बरीच मोठी रकम मिळविली ती–बरीचशी, मला वाटतें, त्यांच्या वैयक्तिक गुणांचे जोरावरच मिळाली. संस्थेकरितां पैसे मिळविण्याचें काम त्यांना अशा प्रकारें साधत असलें तरी तें त्यांना मनापासून आवडत नसे हें खास. त्यांत वेळ जाऊन शिकविण्याचें काम मनासारखें होत नाहीं हें एक, व दुसरें म्हणजे–स्वतःसाठीं तर नाहींच नाहीं, पण संस्थेसाठीं सुद्धां–दुसऱ्याचे पुढें तोंड वेंगाडणें व हात पसरणें त्यांच्या मानी मनाला तितकेंसें मानवत नसे.

मध्यन्तरीं संस्थेची फारच हलाखीची स्थिति होती, तेव्हां कांहीं दिवस दर रविवारीं ते मला बरोबर घेऊन निरनिराळ्या लोकांकडे जात. गेल्याबरोबर सुरुवातीला कोणीं व काय बोलायाचें, मुख्य मुद्याची गोष्ट कोणीं काढायाची, पहिली मागणी कोणीं, कशाची व केवढ्याची करावयाची, ती त्यानें केल्यावर दुसऱ्यानें मध्यस्थाची भूमिका घेऊन देणाराघेणारांत पडलेला बांधा त्वरार्थें

मयार्थ करून कसा मिटवायाचा इ. चें एक तंत्र आम्हीं आपलेकडून ठरविलें होतें; व कांहीं थोडे वेळां हा आमचा सिद्धसाधकपणा चांगला जमेहि. पण पुष्कळ वेळां वामनरावांचा भिडस्थपणा व त्यांची अल्पसंतुष्टता हीं ऐत्या वेळीं जागृत होत आणि मग मिळेल तें घेऊन–किंवा कांहीं वेळां तर नुसते हात हालवीतच आम्हांला परत फिरावें लागे! अधिक मिळण्याची आलेली संधि यांच्या या कच-खाऊ वृत्तीमुळें फुकट गेली असें वाटून मी त्यांच्यावर चिडें, तेव्हां ते हंसत म्हणत 'अहो, आपलीच मुलगी चांगली असं प्रत्येक बापाला वाटत असलं तरी पाह-णाराला ती तशी वाटली पाहिजेना? आणि वाटली तरी दुसऱ्या कांहीं गोष्टी त्याला जमेंत घ्याव्या लागतातच ना! स्त्रीशिक्षण येवढें एकच महत्त्वाचें कार्य आहे, आणि हिंगण्याची संस्था येवढी एकच काय ती मदत करण्यालायक संस्था आहे असें नाहीं. दुसऱ्याहि संस्था आणि दुसरींहि कार्यें तितकींच उपयुक्त आहेत. शिवाय देणारांचें दारिद्र्य, त्यांच्या विवंचना, हींहि आपण लक्षांत घेतलीं पाहिजेत. आपल्या-सारख्या सुशिक्षित आणि आधुनिक भिकाऱ्यांनीं जुन्या अशिक्षित भिकाऱ्यांप्रमाणें खरखरमुंडेपणा करून कसें चालेल?' वामनरावांच्या या सरळ व सामोपचाराच्या वृत्तीचा एक फायदा मात्र असा होई कीं, प्रचारकाच्या अत्याग्रहीपणामुळें किंवा आततायीपणामुळें त्याचेबद्दल, व त्याचेवरून त्याच्या संस्थेबद्दल देणाराच्या मना-मध्यें जी एक अप्रियता, आढी, किंवा शिसारी पुष्कळ वेळां उत्पन्न होते ती वामनरावांबद्दल व त्यांचेमुळें त्यांच्या संस्थेबद्दल कधींहि उत्पन्न झाली नाहीं. उलट, इचलकरंजीकर, फलटणकर, भोरचे युवराज, डॉ. एस्. ए. फाटक, डॉ. पी. एम्. केतकर, प्रो. नारळकर इत्यादिसारख्या त्याच त्या व्यक्तींकडे वामनराव पुन्हां पुन्हां गेले असतांनाहि त्यांनीं त्यांना हंसतमुखानें व मुक्त हस्तानें मदत दिली आहे.

वर्गणी मिळविण्याकरितां फिरत असतांना दात्यांचे—व माणुसकीचेहि किती-तरी निरनिराळे प्रकार आमच्या दृष्टीस पडत. आम्ही कर्वे यांचें नांव काढतांच कांहींजण त्यांच्या निष्कोप प्रकृतीचें व त्याच्या सकाळसांज फिरण्याचें इतकें कांहीं कौतुक करीत कीं आम्हांला आमच्या मूळ मुद्याचें सूतोवाच सुद्धां करतां येऊ नये. कांहींजण विधवांची दुःस्थिति, सामाजिक अन्याय वगैरेवरून निघून राजकीय सद्यः-स्थितीवर येत व स्वराज्य मिळेपर्यन्त शिक्षण वगैरे सगळं फुकट आहे असं प्रतिपादित; आणि शेवटीं 'तेव्हां तुम्ही अगोदर त्या मार्गाला लागा' असं 'त्या'वर जोर देत सांगत, व आम्हीहि त्यांचा रोख स्वराज्यप्राप्तीवर नसून 'मार्गाला लागा' यावर आहे

असें ओळखून मार्गाला लागत असूं. कांहींजण वायकोच्या आजारीपणाचा, व उपवर मुलीच्या न जुळणाऱ्या लग्नांचा पाढा वाचून आपण संस्थेला मदत करण्याऐवजीं संस्थेनेंच—आमचेंहि स्त्रियांच्या उन्नतीचेंच कार्य आहे असें ओळखून—आपणांस मदत करणें किती जरुरीचें आहे हें सांगून तेरी उप्पर मेरी करण्याचा प्रयत्न करीत! कांहींजण मुद्दामच वेड पांघरून पेडगांवाला जात, व सर विठ्ठलदास ठाकरसींची पंधरा लाखांची देणगी हिंगण्याच्या संस्थेच्या तिजोरींतच पडली असून आतां तुम्हांला जादा मदतीची कशी गरज नाहीं हें आम्हांलाच समजावून देत! कांहींजण हिंगण्याच्या तोंडावर सेवासदनाची सबब व सेवासदनाच्या तोंडावर हिंगण्याची सबब सांगून दोन्हींहि संस्थांच्या तोंडाला खुशाल पानें पुशीत! कांहींजण आपल्या भरगच्च पाहुणचारानेंच आमचें तोंड असें कांहीं बंद करीत कीं आपल्या मुख्य कामाची गोष्ट काढण्यालाहि तें विचारें उघडत नसे! कांहींजण कांहीं वेळां वर्गणीचे ऐवजीं चहाचाच इतका मारा करीत कीं 'बाबांनों, चहाचे ऐवजीं एक पेला पाऊण आणा या हिशेबानें होणारे पैसेच संस्थेला द्या असें म्हणण्याची पाळी आणीत! कोणी आपल्या मित्राच्या मुलीला फुकट घेतलें नाहीं म्हणून, तर कोणी आपल्या सुविद्य पत्नीला समारंभाचे वेळीं पुढच्या खुर्चीवर बसविलें नाहीं म्हणून; कोणी अमूक एक आजन्म सेवक आपल्याशीं तुटकपणें बोलतो म्हणून, तर कोणी संस्थेचे हल्लींचे चिटणीस पूर्वीं 'धोंडोपंत' हातांनीं पत्रें लिहीत त्याप्रमाणें न लिहितां टाइपांनीं लिहितात म्हणून मदत करण्याचें नाकारीत. कांहीं थोडेजण मात्र संस्थेचें एकादें विशिष्ट धोरण किंवा तत्त्व आपल्याला मान्य नाहीं अशा तात्त्विक भूमिकेनें आपण मदत देत नाहीं असें सरळ सरळ सांगत आणि एकादा दाता (?) तर असाहि भेटे कीं संस्थेच्या एकाद्या गोष्टीसंबंधीं किंवा व्यक्तीसंबंधीं यथेच्छ तोंडसुख घेऊन आम्हांला जवळ जवळ बाहेर काढी! माझ्यासारख्याला असले अपमान असह्यप्राय झाले म्हणजे वामनरावांनीं शांतपणें म्हणावें कीं अहो, असें चिडून अन् रागावून कसें चालेल? प्रचारकाला अपमान, निंदा वगैरेसारख्या गोष्टींविषयीं उदासीन बनून जगांतील व्यवहाराकडे विनोदबुद्धीनें पाहतां आलें पाहिजे. स्तुति, सन्मान वगैरेसारख्या फक्त चांगल्या गोष्टीच आपल्या वांट्याला याव्या—निंदा, अपमान वगैरे वाईट गोष्टी येऊं नयेत अशी अपेक्षा त्यानें करतां कामा नये. प्रामाणिक निंदक हा प्रच्छन्न भोंदूपेक्षां व्यक्तीला वा संस्थेला जास्त हितप्रद व कल्याणकारक ठरतो.

आण्णांच्या ७० वर्षांच्या ज्युबिलीसाठीं देणग्या मिळविण्याकरितां वामनराव व

मी सातान्यास वाग्भट देशपांड्यांकडे गेलों होतों. थोड्याच वेळांत कमळाबाई बाहेरून येऊन कान्हेरीण बाईकडे झालेल्या प्रकारासंबंधीं सांगू लागल्याः—“ वर्गणी मागणारांची अशी स्थिति होते. आज मी गेलें होतें कान्हेऱ्यांच्या गंगूकडे तिला बरें नाहीं म्हणून समाचाराला ! तिचे आईनें–म्हणजे वहिनींनीं–मला सांगितलें कीं, ‘ शाळेची वर्गणी पुढील महिन्याला पाठवितें. ’ तेव्हां मीं म्हटलें ‘ अहो वर्गणी सावकाश पाठवा. आज मी निवळ गंगूला भेटायला आलें आहे. ’ म्हणजे वर्गणीचें काम करणारांना इतर कांहीं सामाजिक संबंध उरतच नाहींत. ” वामनरावांनीं खालच्या ओंठावर वरचा ओंठ दावून व डोळे मिचकावून मला गप्प बसविलें व प्रसंगावधान राखून ते एकदम कमळाबाईंना म्हणाले “ अहो, आम्ही तेंच म्हणतों. आम्ही वर्गणीसाठीं हिंडतों आहों हें खरें; पण आज सातारला आलों ते वर्गणीसाठीं नव्हे. तुमचा श्रीधर देवी येऊन आजारी होता म्हणून ऐकलें होतें; तेव्हां त्याला व तुम्हांला सहज भेटावें म्हणून आलों. ” वामनरावांनीं वेळींच सावरून घेतलें म्हणून ठीक !

एकाद्या खट मनुष्याचें मन वळवितांना वामनराव एकादे वेळीं मोठ्या उच्च विचारानें सुरुवात करीत आणि ती मात्रा लागू पडली म्हणजे मनांतून स्वतःवर खूष होऊन दुसऱ्याकडे मोठ्या फुशारकीनें पहात. पण एकदां एका बाईनीं त्यांच्या त्या उच्च विचारांचा अन् तत्त्वज्ञानाचा प्रयोग त्यांचेवरच करून त्यांचा डाव मोठ्या शिताफीनें उलटविला ! सदरहु श्री. बाईला मूलबाळ कांहीं नसल्यामुळें तिच्या कै. पतीची सर्व मिळकत तिच्याच हातीं आली होती. तिनें संस्थेला एकादी बडी देणगी द्यावी म्हणून वामनरावांनीं तिचें आवाहन करण्यास सुरुवात केली. तिचे पति स्त्रीशिक्षणाचे अभिमानी कसे होते, त्यांना कर्व्यांबद्दल किती आदर वाटत असे, वगैरे सांगून झाल्यावर ‘ तेव्हां, मृत पतीची अतृप्त इच्छा तृप्त करणें हें पतिव्रता स्त्रीचें कर्तव्य नाहीं का ’ ? असा सरळ सरळ सवाल वामनरावांनीं बाईंना केला. त्या बाईहि कांहीं कमी धर्मज्ञ नव्हत्या. त्या हळू हळू, थांबत थांबत म्हणाल्या ‘ हें पहा प्रोफेसरसाहेब, आपण तर ज्ञानीच आहां. तेव्हां, आपल्याला कळत नाहीं असं कांहीं नसणारच. पण एक विचारतें–त्यांची जर आपल्या संस्थेला मदत करायची खरी इच्छा असती तर ती त्यांनीं आपल्या हयातींतच नसती का पुरी केली ? त्यांचा हात धरायला का कोणी होतं ? पण त्यांनीं ज्या अर्थी ती केली नाहीं, त्या अर्थी त्यांची इच्छाच नव्हती असं नाहीं का होत ? आणि म्हणून पतिव्रताधर्मानें

वागायचं म्हणजे मला माझी इच्छा मारून त्यांच्याच इच्छेला मान नको का द्यायला ? ' आणि असें म्हणून बाई खरोखरच पदरानें डोळे पुसूं लागल्या. राघोबाची जी गत अहिल्याबाईनें केल्याचें आपण ऐकतों तीच गत त्या बाईनीं वामनरावांची केलेली प्रत्यक्ष पाहून वामनरावांबरोबर खरोखरचें हंसावें का त्या बाईबरोबर खोटें खोटें रडावें हेंच मला समजेना !

संस्था पाहण्यास आलेल्या लोकांना ती नीटपणें दाखविणें हें एक मोठें कठीण व कुशलतेचें काम आहे. आपण चालविलेल्या संस्थेचें कार्य ती पहावयास येणारांच्या डोळ्यांत भरेल व तो प्रसन्न होऊन कोणत्या ना कोणत्या रीतीनें संस्थेला सहायभूत होईल हेंच उद्दिष्ट दाखविणाराचें असतें; आणि हें साध्य व्हावयाला सांगणारांत संभाषणकुशलता, प्रसन्न चेहरा, संस्थेची सांगोपांग माहिती इत्यादि गोष्टी तर असाव्या लागतातच; पण त्यांशिवाय पाहणाराच्या आवडीनिवडी, त्याची वृत्ति, त्याचे कल, त्याची ऐपत, त्याची दानत इत्यादींचें ज्ञान–थोडक्यांत म्हणजे त्याचें मानसशास्त्र–हेंहि त्यास अवगत असावें लागतें. हे सर्व गुण आम्हां बहुतेकांपेक्षां वामनरावांचे ठिकाणीं जास्त प्रमाणांत असल्यामुळें आणि शिवाय त्यांचा स्वतःचा लौकिकहि फार मोठा असल्यामुळें आलेल्या प्रेक्षकाचें मन ते झटकन् वश करून घेत व त्याचे मनांत संस्थेबद्दल जिव्हाळा उत्पन्न करीत. ते सर्वच गोष्टी सर्वच प्रेक्षकांना सारख्याच पाल्हाळानें सांगत बसत असें नाहीं, तर वर सांगितल्याप्रमाणें ज्याच्या त्याच्या मनाची विशिष्ट घडण ओळखून व तारतम्य बुद्धि वापरून–कांहीं गाळून तर कांहीं वाढवून–सांगत. या त्यांच्या व्यावहारिक कौशल्याचें मार्मिक वर्णन सौ. सरलाबाई कर्वे यांनीं आपल्या आठवणींत केलें आहे. त्या लिहितात—" कोणी प्रथमच शाळा पाहण्यास आला असेल व तात्या दाखविण्यास असले तर प्रथम मामुली प्रश्न विचारून पाहुण्याचें मत काढून घेतात, व तो नवमतवादी आढळेल तर ' आमच्याकडे जातिभेद नाहीं, आम्हीं सर्व कामें मुलींना सांगतों, गॅदरिंगमध्यें स्टँडिंग् पार्टीला सर्व मुली वाढतात, रात्रींच्या–सकाळच्या प्रार्थनेला सर्व मुली एकत्र असतात, ' वगैरे गोष्टी भर देऊन सांगतात. पण पाहणारा सनातनी पगडीवाला दिसल्यास ' आमच्याकडे वाढणें, ताक–पाणी करणें हीं कामें ब्राह्मणाच्या मुली करतात. आम्ही सकाळ–संध्याकाळ प्रार्थना घेतों, प्रार्थनेंत गीता, रामदास, तुकाराम वगैरे धार्मिक शिक्षण व पद्यें शिकविलीं जातात ' या गोष्टींवर भर देऊन सांगतात. " वामनरावांच्या या करण्यांत दुटप्पीपणा तर

नाहींना अशी शंका लेखिकेला येऊन तिनें वामनरावांना त्याप्रमाणें विचारलें असतां ते तिला सांगतात—" हो; पण करायचें काय ? संस्था आहे ही; तिला सर्वांचीच जरूरी आहे. सर्वांचीं मतं संभाळायचीं म्हटलं तर ही दुटप्पी दिसणारी व्यावहारिक वागणूक ठेवलीच पाहिजे. "

संस्था पहावयास येणाऱ्या माणसांना व मुलींना भेटावयास येणाऱ्या पालकांना–यांना हिंगण्याच्या मुली अनुक्रमें 'बघे' व 'भेटे' असें म्हणतात–ऑफिसांत विनाकारण तिष्ठत ठेवणें, किंवा पाणी वगैरेची विचारपूस न करणें, किंवा पाहण्याच्या किंवा भेटण्याच्या ठराविक दिवशीं व ठराविक वेळींच ते न आल्यामुळें त्यांस तसेंच परत पाठविणें इत्यादि प्रकार–इतर कोठें चालत असले तरी आपल्या हिंगण्याचे संस्थेंत चालतां कामा नयेत असा वामनरावांचा मोठा कटाक्ष असे. मनुष्य इतक्या लांबून येतो, तेव्हां त्याची शक्य ती सोय पाहिली जावी एतदर्थ त्यांची भारी धडपड चाले. ज्यांना लोकाश्रयावर अवलंबून राहावें लागत नाहीं अशा सरकारी संस्थांतूनहि केवळ नियमांना कवटाळून बसण्याची हट्टी वृत्ति, आडमुठा शिस्तबाजपणा, निर्जीव यांत्रिकपणा, आल्यागेल्याबद्दलची उपेक्षा वगैरे गोष्टी दिसतां कामा नाहींत; मग लोकाश्रयावर चाललेल्या आपल्यासारख्या संस्थांत तर नाहींच नाहीं असें त्यांचें मत असे. या त्यांच्या उदार व नियमशिथिल वृत्तीमुळें शाळांतील मुख्याध्यापकांची व विशेषतः वसतिगृहचालिकांची स्वाभाविकपणेंच थोडीफार गैरसोय होई, व पुष्कळ वेळां त्यांचें व वामनरावांचे लहानमोठे खटकेहि उडत. अर्थात् ते लवकरच विसरले जात, व दोघेहि थोडी थोडी पड खात ही गोष्ट निराळी. मात्र असा एकादा खटका नुकताच उडाला असला, आणि त्याचा कडवटपणा अद्याप शिलक असला म्हणजे वामनराव आलेल्या माणसाला आपल्या घरीं घेऊन जात व कधीं चहा तर कधीं सरबत, तर कधीं नुसतेंच गूळपाणी वगैरे देऊन त्याला प्रसन्न करीत आणि संस्थेच्या अगत्याचा लौकिक वाढवीत.

हिंगण्याच्या दैनंदिन जीवनांत संध्याकाळच्या प्रार्थनेला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. हें महत्त्व तिला केवळ धार्मिक दृष्ट्याच आलें आहे असें नसून तें नैतिक, बौद्धिक व सांस्कृतिक दृष्ट्याहि तिला प्राप्त झालें आहे. हिंगण्याबद्दल ज्या कांहीं गोड आठवणी विद्यार्थिनींचे अंतःकरणांत कायमच्या वास करून राहतात त्यांपैकीं एक आठवण या प्रार्थनेसंबंधींची असते असें कितीतरी विद्यार्थिनींकडून ऐकूं येतें.

‘ प्रार्थना ’ या नांवावर जरी ‘ प्रेअर ’ या इंग्रजी शब्दाची छाया पडली असली तरी प्रार्थना घेण्याच्या कृतींत पुराण, प्रवचन, भजन, पूजन, गायन, वादन, अशा शुद्ध देशी कृतींचाच अंतर्भाव होतो. ‘ प्रार्थना ’ या शब्दाइतकाच ‘ प्रार्थना घेणें ’ हा शब्दप्रयोगहि चमत्कारिक आहे. पण ते दोन्ही हिंगण्याच्या माळावर आतां इतके कांहीं रूढ झाले आहेत कीं त्यांतला सर्व चमत्कारिकपणा पार नाहींसा झाला आहे. या दोहोंबद्दल जास्त योग्य व अन्वर्थक शब्दांसंबंधींची वाण तेथील लोकांना विशेषतः वामनरावांना–सारखी भासत असे, आणि त्यांना पर्यायवाचक शब्द हुडकून काढण्याचा त्यांचा प्रयत्न सारखा चालू असे. संध्यावंदन, सायंसंध्या, सायंस्मरण, वगैरे निरनिराळे शब्द त्यांच्या डोक्यांत घोळत, पण ते सर्व निराळ्या अर्थानें अगोदरच रूढ होऊन गेल्यामुळें वामनरावांना नको असलेले ‘ प्रार्थना ’ व ‘ प्रार्थना घेणें ’ हेच शब्द मुलींच्या व इतर मंडळींच्या तोंडीं कायमचे बसले.

ही प्रार्थना दररोज संध्याकाळीं–मुलींचीं जेवणें झाल्यावर–‘ गीतामंदिर ’ नांवाच्या एका प्रशस्त दालनांत होते. समोरच्या मोठ्या देव्हाऱ्यांत गजाननाची मूर्ति व सरस्वतीचें चित्र शेजारच्या समयीच्या व नीरांजनाच्या शान्त उजेडांत प्रकाशत आहेत; जिकडे तिकडे धूपाचा, उदबत्त्यांचा व फुलांचा सुगंध दरवळत आहे; उलट दिशेला मध्यभागीं मांडलेल्या व्यासपीठावर पुराणीकबुवा किंवा प्रवचनकार आसनस्थ झाले आहेत; सभोंवार पसरलेल्या सतरंज्यांवर सर्व लहानमोठ्या मुली रांगारांगांनीं बसल्या आहेत;–अशा प्रकारचा देखावा पाहणाराला मोठा रम्य व आकर्षक वाटे. प्रार्थनेचा क्रमहि मोठा थाटदार असे. घंटा झाल्यावरोबर ‘ यं ब्रह्मा वरुणेंद्र ’ या श्लोकानें सर्वांनीं एका सुरांत सुरुवात करायची; ‘ मनिं भाव धरुनिया निका ’, किंवा ‘ भक्ताचिया काजासाठीं ’ अशासारखें एकादें गोड भक्तिपर गाणें सगळ्यांनीं तालासुरावर म्हणायचें; व्यासपीठस्थ व्यक्तीनें एकादी नवीन ओवी किंवा अभंग सांगावयाचा; त्याचे अनुरोधानें विद्यार्थी धर्म, नागरिक नीति, सामाजिक कर्तव्यें, इत्यादि विषयांचें सुबोध व सोदाहरण विवेचन करायचें; नंतर तो अभंग सर्वांकडून पुन्हां म्हणून घ्यावयाचा व शेवटीं ‘ सीताकांतस्मरण ’ करून उठायचें—असा हा एकंदर प्रकार असे.

प्रार्थनेची ही परंपरा बरीच जुनी असून तींत प्रो. कर्वे, प्रो. दिवेकर, प्रो. मायदेव, वामनराव वगैरेंनीं विशेष भाग घेतला होता. प्रत्येकाची मनोरचना व विवेचनपद्धति इतरांपेक्षां निराळी असल्यामुळें अशा प्रार्थनांत आपोआपच नाविन्य

व वैचित्र्य उत्पन्न होत. कव्यांची सांगण्याची पद्धति मोठी गंभीर व वाणी खणखणीत असून त्यांच्या सांगण्यांत सत्कार्यावरची श्रद्धा व स्वभावांतील दृढनिश्चय प्रतीत होत. दिवेकर हे एकनाथ, नामदेव व विशेषेंकरून तुकाराम यांचा एकादा अभंग खड्या व सुरेल आवाजांत म्हणत व त्याचेंच साध्या शब्दांत रसाळ विवरण करीत. मायदेव ज्ञानेश्वरींतील एकादी ओवी म्हणत व तिचें विवेचन करीत, किंवा आधुनिक कवीचें एकादें काव्य ठसकेदार चालीवर गाऊन दाखवून त्यांतील सुंदर कल्पना समजावून सांगत. वामनरावांचा प्रकार मात्र कांहीं निराळाच असे. गाणें-बिणें म्हणण्याच्या भानगडींत ते स्वतः कधीं पडत नसत. त्यांच्या विवेचनाचा विषयहि कधीं भारतरामायणादि पुराणांतला किंवा नव्याजुन्या कवींच्या काव्यांतला नसे. उपरणें पांघरून घरून निघून गीतामंदिरांत पाऊल ठेवीतों जें कोणतें संस्कृत सुभाषित ओठावर येईल तें, किंवा टाईम्समध्यें अग्रभागीं दिलेला मुख्य दैनिक विचार अथवा खालीं कोपऱ्यांत दिलेली कोटी यांपैकीं जें कांहीं वाचलेलें आठवत असेल तें, किंवा शाळेंतील व्हरंड्यावरून सुपर्व्हिजन करतांना जे कांहीं बेशिस्तपणाचे प्रकार पाहण्यांत आले असतील ते—यांपैकीं कोणताहि विषय घेऊन वामनराव त्यावर विवेचन करीत आणि आपल्या विनोदी पद्धतीनें हंसत व हंसवीत श्रोत्यांना शहाणें करून सोडीत. या त्यांच्या विषयांत पौराणिक विषयांची रम्योदात्तता नसे किंवा वाङ्मयीन विषयांतली सांस्कृतिक अभिजाततांहि नसे. तरीपण ते आजच्या जीवनांतले, खरेखुरे घडलेले, असे असल्यामुळें त्यांच्या विवेचनांत एकप्रकारची वास्तविकता व अद्यावतता वाटत असे. पण याच गुणांमुळें तें विवेचन सामान्य मुलींना व विशेषतः लहान मुलींना मुळींच आवडत नसे. त्या कंटाळून पेंगायला तरी लागत, नाहीं तर, एकमेकींच्या पाठीवर बोटानें लिहिणें, वेण्यांशीं खेळणें, समोरच्या मुलींना खुणा करणें—असल्या माकडचेष्टा तरी करीत. अशा मुलींना वामनराव एकादे वेळीं इसापनीतींतल्या सारखी एकादी गोष्ट तेथल्या तेथें बनवून सांगत, आणि मग कांहींतरी कारणांनीं मोठा थोरला हशा पिकवीत. कधीं कधीं एखादा विषय घेऊन त्यावर सॉक्रेटिसाच्या पद्धतीप्रमाणें मुलींशीं संवाद करीत व त्यांना पदोपदीं आडवून त्यांच्या अज्ञानाचा प्रत्यय आणून देत. कांहीं कांहीं वेळां मानसशास्त्रांतील एकादा प्रयोग करण्याचीहि त्यांना लहर येई. अशा प्रयोगाचें एक उदाहरण सौ. शांता अत्रे यांनीं आपल्या आठवणींत दिलें तें तसेंच पुढें दिलें आहे.

" सगळ्या मुली एकत्र जमल्या असतांना त्यांपैकीं चार मुलींना बाहेर म्हणजे त्या हॉलमधील कांहींही बोललेलें ऐकूं न येईल अशा ठिकाणीं एकी नंतर एक अशा दोन दोन हात अंतरावर उभ्या केल्या. नंतर एका मुलीला असा एक निरोप सांगितला कीं " शिवाजीचा जिवश्चकंठश्च मित्र तानाजी हा कोंडाण्यावर उदयभानूशीं लढत असतां मरण पावला. " हा निरोप एकीनें दुसरीच्या कानांत, दुसरीनें तिसरीच्या व तिसरीनें चौथीच्या कानांत जसाच्या तसा सांगावयाचा. पण प्रत्येकीनें तो निरोप दुसरीस सांगतांना स्वतःचा शब्द त्यांत नकळत घुसडून दिला व शेवटच्या मुलीस सर्व मुलींच्या समोर येऊन तो निरोप सांगण्यास सांगितलें तों तिनें सांगितलें " शिवाजीचा आवडता मित्र कोंडाण्यावर पराक्रमानें लढत असतां मरण पावला म्हणून कोंडाण्याचें नांव सिंहगड ठेवलें. " आतां ह्या निरोपांत किती फेरबदल झाला आणि मूळ राखलें नाहीं तर कित्येक वेळां अर्थाचा अनर्थहि कसा होतो हें मुलींना पटलें. उद्भवलेल्या अनर्थपरंपरेचा वामनरावांनीं भरपूर फायदा घेऊन ऐकीव बातम्या, कंड्या, गप्पा, प्रवाद, गैरसमज वगैरे गोष्टी समाजांत कशा पसरतात, व म्हणून आपण प्रत्येक गोष्ट–ती घेण्यापूर्वीं–कशी पारखून पाहिली पाहिजे हें उत्तम रीतीनें दाखवून दिलें.

वामनरावांचीं प्रार्थना घेण्याची पद्धती ही अशी असल्यामुळें तिचे योगानें विचारांचें उद्बोधन होई, बुद्धि जागी होई, आज आपण कांहींतरी नवीन शिकलों असें वाटे हें खरें; पण मनाला प्रसन्नता वाटणें, आनंदी वातावरण उत्पन्न होणें, सद्भावना जागृत होणें, देवाधर्मावरील निष्ठेंत भर पडणें इत्यादि–जीं जीं कार्यें असल्या प्रार्थनांचे योगानें व्हावयास पाहिजेत–तीं तितक्या प्रमाणांत होत नसत हेंहि कांहीं खोटें नाहीं. अर्थात् 'प्रार्थनेनें हींच कार्यें झालीं पाहिजेत असें तरी कशावरून '? असें वामनरावांसारखा एकादा उलटहि विचारूं शकेल.

वामनराव हिंगण्यांत रहात असतांना त्यांना भेटण्याच्या निमित्तानें कितीतरी मोठमोठ्या व्यक्ति अधूनमधून त्यांजकडे येत, व थोडा–फार मुक्काम करून जात. त्यांचे दोघे थोरले बंधू–आण्णा व नाना, अकोल्याचे वासुदेवरावजी चिपळूणकर, मुमुक्षुकार पांगारकर, प्रो. बापूसाहेब चाफेकर, काकासाहेब कालेलकर, सेनापति बापट, माधवराव पटवर्धन, कवि यशवंत व गिरीश अशांसारख्या कितीतरी विद्वान व रसिक लोकांचा हिंगण्यास येणें हा एक वार्षिक कार्यक्रम ठरून गेल्यासारखा झाला होता. घरच्या बैठकींत जो कांहीं काव्य–शास्त्र–विनोद व्हावयाचा तो झाल्या-

वर विद्यार्थिनींकरितां म्हणून ‘ गीतामंदिरांत ’ प्रार्थनेच्या वेळीं एक खास कार्यक्रम होई व आलेल्या अभ्यागतांचीं जीं कांहीं भाषणें, व्याख्यानें, पुराणें, प्रवचनें, भजनें, काव्यगायनें वगैरे होत त्यांचा लाभ विद्यार्थिनींना अनायासें मिळे. अशा प्रसंगीं विद्वत्ता, बहुश्रुतता, रसिकता, वाक्पटुता इत्यादि गुणांचे उत्तमोत्तम आदर्श त्यांना पाहावयास सांपडून त्यांच्या त्या त्या गुणांत व एकंदर संस्कृतींत तर भर पडेच, पण त्याहिपेक्षां जास्त म्हणजे या मोठमोठ्या व्यक्तींचें प्रत्यक्ष दर्शन घडून सहज-पणें बोलण्यासवरण्यास सांपडल्यामुळें विद्यार्थिनींना एक प्रकारची अपूर्वाई व धन्यता वाटे. हे असले प्रसंग वामनरावांमुळें घडत आणि प्रार्थनेच्या निमित्तानें घडत व म्हणून वामनरावांबद्दल आणि प्रार्थना या संस्थेबद्दल हिंगण्याच्या मुलींना इतकें वाटे.

हिंगण्याच्या माळावर झाडें लावण्याचें व बाग करण्याचें कामहि वामनरावांनीं केलें आहे. पूर्वीं हिंगण्याच्या माळाचा बराचसा मोठा भाग अक्षरशः माळ व ‘निरस्तपादप’ होता, पण वामनरावांनीं वड, चिंच, लिंब, आंबा, गुलमोहोर, सिल्वर ओक, जांबुळ, वगैरेसारखे वृक्ष जागोजाग लावून माळावर बरीचशी छाया व शोभा निर्माण केली. हल्लींचा ‘ इचलकरजी हॉल ’ ज्या जागीं उभारण्यांत आला आहे तेथें पूर्वीं वामन-रावांनीं केलेली एक मोठी फुलबाग होती आणि हॉलचे भोंवतालीं हल्लीं उभे दिसत असलेले आंब्याचे व बुचाचे वृक्ष पहिल्या मूळ बागेभोंवतीं खडा पहारा करण्याकरितां म्हणून त्यांनीं लावलेले होते. ही बाग व हीं झाडें पाहून पाहणाराला पहिल्याप्रथम वामनरावांच्या तत्संबंधींच्या आवडीचें मोठें कौतुक वाटे; पण पुढें तो बारीक नजरेनें पाहूं लागला म्हणजे हीं झाडें एका रांगेंत नाहींत, तीं लावण्यांत कांहीं विशेष योजना नाहीं, बागेच्या जागेची निवडहि दूरदृष्टीनें केलेली नाहीं, तिच्यांतील वाफ्यांची, पाऊलवाटांची, पाण्याच्या पाटांची आंखणीहि फारशी सरळ, रेखीव, व बांधेसूत केलेली नाहीं असें दिसून येऊन त्याला वाटलेल्या पहिल्या कौतुकांत थोडेसें विरजण पडल्यासारखें होई.

खरें सांगावयाचें म्हणजे झाडें, फुलें वगैरे विविध व विपुल असावींत असें जितकें वामनरावांना वाटे, तितकें कांहीं तीं निवडक व नीटनेटकीं असावींत असें वाटत नसे. जातीनें तसेच दृष्टीनें व वृत्तीनेंहि ते पुरते देशस्थ होते असें म्हणण्यांत थोडासा खवचटपणा असला तरी बराचसा खरेपणाहि आहे.

मुलींना बरोबर घेऊन बागेंत काम करण्याचें त्यांचें धोरणहि तितकेंसें नियमयुक्त व

शिस्तशुद्ध नसे. शाळा सुटल्याबरोबर वामनराव काठी फिरवीत फिरवीत बागेंत येत; व कपडे सावरून कांहीं इकडे—तिकडे करायला लागत. त्यांना बागेंत आलेले खिडक्यांतून पाहिल्याबरोबर विद्यार्थिनीहि—खुराडयांतून कोंबडया बाहेर पडाव्यात तशा—धांवत धांवत तेथें येत. आणि आप-आपल्या वाफ्यांतून कामाला लागत. अर्थात् असें काम फार थोडा वेळच चाले. बाकीचा सर्व वेळ वामनरावांशीं व आप-आपसांत गप्पा-गोष्टी, थट्टा-मस्करी, हास्य-विनोद, वगैरे करण्यांत व संभाषणप्रसंगानें आपल्या कुरकुरी, तक्रारी, गाऱ्हाणीं वगैरे वामनरावांचे कानावर घालण्यांतच निघून जाई. अशा प्रकारें काम करतांना बागेंत काम करण्यापासून होणारे सर्व फायदे तर त्यांचे होतच; पण त्यांशिवाय त्यांचे आणखीहि दोन विशेष फायदे होत; वामनरावांच्या सहवासांत त्यांना काव्यशास्त्रविनोदाचा उच्च आनंद मनसोक्त लुटायला सापडे हा एक फायदा व शिक्षक, व्यवस्थापक वगैरेंसंबंधी मनांतून वाटत असलेल्या किल्मिषाला बाहेर पडायला राजरोस वाट मिळाल्यामुळें मनाला मोकळें वाटून एक प्रकारची प्रसन्नता येई हा दुसरा फायदा.

वामनराव फुलझाडें, फळझाडें वगैरे जितक्या असोशीनें लावीत तितक्या असोशीनें ते त्यांचा उपभोग मात्र घेत नसत; फूल तोडून त्यांनीं कधीं नाकापुढें धरलें आहे, किंवा डोळ्यापुढें धरून त्यांचा रंग पाहण्यांत ते दंग झाले आहेत, किंवा आपण लावलेल्या झाडाचें फळ म्हणून त्याचा विशेष अभिलाप त्यांना वाटला आहे असें कधीं दिसलें नाहीं. त्यांना फुलांचा आनंद होई तो त्यांचा सुबक आकार किंवा गोड सुवास, किंवा मऊ स्पर्श किंवा चित्रविचित्र रंग अशा इंद्रिय-जन्य स्वरूपाचा होत नसे तर त्यांची माहिती होऊन त्यांच्याबद्दलची जिज्ञासा तृप्त झाल्यामुळें व त्यांचें धारण करणाऱ्या सृष्टीच्या कर्तृत्वाची जाणीव झाल्यामुळें होत असे. फुलाफळांच्या दर्शनानें त्यांची भावना फुलण्याऐवजीं जिज्ञासा जागी होई आणि विचारशक्तीला चालना मिळे. आपल्या विद्यार्थिनींनींहि फुलांच्या नुसत्या सौंदर्यावर व सुवासावर संतुष्ट न राहतां त्यांच्यापासून मिळणारा ज्ञानानंदहि प्राप्त करून घ्यावा अशी त्यांची इच्छा असे.

'बागेंतील झाडांफुलांना कोणीं हात लावूं नये' अशा नोटिसा विद्यार्थिनींना, व 'मुलींना बागेंत जाऊं देऊं नका' अशा ताकिदी गड्यांना—वामनराव पुन्हां पुन्हां देत असत. त्यांना त्या नेहमीं नेहमीं द्याव्या लागत यावरूनच त्या पाळल्या जात्यात याबद्दल त्यांचा कितपत कटाक्ष असे हें दिसतेंच. खरें सांगायचें म्हणजे ताकिदी,

नोटिसा वगैरे देणें हें सगळें वरवरचें व थोडेंफार सहकाऱ्यांच्या समाधानाकरितां असे. पोटांतलीं खरी इच्छा अशी कीं, हीं निर्बंधनें वगैरे फारशीं नसावींत, असेल त्याचा आस्वाद मुलींना मनमुराद घेतां यावा. नियमांबद्दलची ही त्यांची अनास्था सदिच्छेच्या पोटीं जन्मलेली आहे हें ओळखण्याइतका शहाणपणा व सहृदयता ज्यांचे ठिकाणीं असत त्यांचा वामनरावांसंबंधीं गैरसमज होत नसे; इतरांचा मात्र झाल्यावांचून राहात नसे. एकादी मुलगी फुलें, फळें तोडतांना त्यांना आढळली, किंवा गड्यानें तिला पकडून आणून त्यांचेपुढें उभी केली म्हणजे त्यांनीं तिच्या अंगावर जोरानें ओरडावें, व ती विचारी भिऊन व शरमून परत फिरली म्हणजे आपण रागावण्याचें नाटक किती बेमालूम केलें या विचारानें हसावें! पण लगेच गंभीर होऊन म्हणावें, 'मला नेहमीं असं वाटतं कीं या ठिकाणीं खूप मोठमोठ्या बागा असाव्यात, त्यांत मुलींना राजरोसपणें जातां यावें, व अगदीं यथेच्छ फुलें-फळें तोडतां-खातां यावींत. येथें असलेल्या या सर्व गोष्टी कोणाकरतां? मुलींकरतांच ना? आणि आपण त्यांचें रक्षण करावयाचें तें तरी कशाकरितां? त्यांना त्या मिळाव्यात म्हणूनच ना! पण होतें काय, कीं 'हे जें रक्षण करतात तें आम्हां—मुलींकरितां नसून स्वतःकरितां आहे' असें मुलींना वाटतें आणि म्हणून त्यांचा आमच्या रक्षणावर विश्वास बसत नाहीं. आणि म्हणूनच त्या चोरून-मारून लुटण्याचा प्रयत्न करतात.' मुली नेहमीं आनंदांत असाव्या या सदिच्छेच्या भरांत वामनराव वरील-सारखें बोलून जात असले तरी त्यांतला हेत्वाभास त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहात नसे; व मग असमाधानाचा सुस्कारा टाकून ते म्हणत 'हें असंच चालायचं! शास्त्यांनीं नियम, कानू वगैरे करणें जितकें जरूरीचें आहे तितकेंच ते फारच गैरसोयीचे झाले म्हणजे शासितांना तोडावेसे वाटणें हेंहि स्वाभाविक आहे. पण मग त्याचे जे कांहीं परिणाम होतील ते भोगायची दोघांचीहि सारखीच तयारी असली पाहिजे.'

वामनरावांनीं लावलेलीं बहुतेक फळझाडें आतां चांगलीं बाजतीं झालीं आहेत. एकदां ते येरंडवण्याहून फारां दिवसांनीं हिंगण्यास येऊन आपण लावलेल्या झाडांची विचारपूस करीत बागेंत हिंडत होते. बरोबर असलेल्या व्यवस्थापिकेनें त्यांना 'यंदां इतके आंबे आले, इतके फणस लागले, इतकीं जांभळें निघालीं' असें मोठ्या कौतुकानें व फुशारकीनें सांगितलें. 'हं, हं' करीत वामनरावांनीं तिचें सगळें सांगणें ऐकून घेतलें, व डोळे मिचकावीत हळूंच विचारलें 'आम्हीं लावलेल्या झाडांची

तुम्ही निगा राखतां हें फार चांगलं आहे. पण यांतलीं थोडीं तरी फळें मुलींच्या तोंडांत पडतात ना ?' व्यवस्थापिकेनें वामनरावांकडे कसें पाहिलें असेल तें सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं.

झाडें, पानें, फुलें वगैरे निसर्गात्मक गोष्टींच्या आपल्या अज्ञानाबद्दल वामनराव अतिशय हळहळत, आणि त्या भरांत मुलींना म्हणत "अहो, पानें, फुलें, दगड-धोंडे-भोंवतालीं काय दिसेल त्याचें ज्ञान करून घ्या. स्वतःला नाहीं समजलें तर दुसऱ्याला विचारा; दुसरें कोणीं सांगायला नसलें तर पुस्तकांतून वाचा, नाहीं तर स्वतः शोधून काढा. पण खोट्या समाधानांत राहूं नका. नाहीं तर आम्हीं आपल्या रागिणींत हिमालयावर अंब्याचीं झाडें लावलीं, आणि काशींतल्या अगदीं अरुंद बोळकंड्यांतून रुंद रुंद गाड्या चालविल्या ! तुम्ही त्याच्याहि वरची ताण कराल, आमचें गेलें कसें तरी निभावून, पण तुमचें या आधुनिक शास्त्रीय जगांत नाहीं तसें चालायचें !"

अशाच एका प्रसंगानें वामनराव व त्यांची एक विद्यार्थिनी-कु. मालू डोंगरे-यांच्यांत झालेला संवाद-तिनें लिहून पाठविला आहे तो वाचण्यासारखा आहे. ती म्हणते:—

नेहमीं प्रमाणेंच सकाळीं फुलं आणायला गेलें होतें मी. माळ्याला चुकवून खूपशीं फुलं खुडलीं होतीं. आणि त्याच आनंदांत वसतिगृहाकडे परत फिरण्याचा विचार करीत होतें. इतक्यांत सिगारेटचा वास आला. चमकून मागें बघतें तर तात्या ! अरे बापरे, आतां चांगलीच तंबी बसणार तर ! पण तात्या आणि तंबी किती विसंगत वाटतात नाहीं हे दोन शब्द ?

"कां थांबलात कां ? तोडा तोडा फुलं; अहो खोलींत फुलं वगैरे ठेवावींत; तेवढंच बरं वाटतं मनाला !"

"पण माळी रागवतो ना !"

"अहो हें असं चालायचंच; त्याला आम्ही रागावतों, तो तुम्हांला रागावतो. बऽऽरं कसलीं, कसलीं फुलं आहेत हीं नांवं माहीत आहेत का ?" नकारार्थी माना हललेल्या पाहून म्हणाले, "नाहीं ना ? तुम्हा मुलींना उत्सुकताच नाहीं कसची, माळ्याला विचारावं, पुस्तकं बघावीं, तुकाराम ! ए तुकाराम !"

"तुकाराम इतक्यांत येत नाहीं तात्या, अजून उशीर आहे त्याला यायला !"

"बरं पण मग विचारा त्याला."

तसंच बोलत, बोलत, पुढें गेलों आम्ही. डोंगराच्या बाजूनीं पाणी वहात येत होतं; " हें पाणी कुठून येतंय ठाऊक आहे का ? " माना हलवून चालणार नव्हतं म्हणून उत्तर दिलं, " डोंगराच्या बाजूनीं येत असेल बहुतेक ! "

" येत असेल नाहीं, चला माझ्या बरोबर आपण शोधून काढूं या. " तात्यांच्या बरोबर फिरायला जाणं अत्यंत आवडत असे आम्हांला, पण मराठीचा निबंध लिहावयाला होता, आणि रात्रीं झोपेमुळें वेळ न झाल्यानें तोच वेळ कारणीं लावायला हवा होता. पण नाहीं कसं म्हणायचं तात्यांना ! तात्या पुढें आणि आम्ही मागें प्रवाश्याच्या थाटांत पाण्याच्या रोखानं चाललों होतों. वाटेंत अर्थातच आम्ही सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष्य करतों म्हणून तात्यांचं बोलणं सुरूच होतं. " हें बघा या सांचलेल्या पाण्यांतून पाणी येतंय" तें खूपसं पाणी एके ठिकाणीं सांठलं होतं त्याला पाहून तात्या म्हणाले; आणि बरेच प्रश्न तात्यांनीं विचारले, पण कशाचंच समाधानपूर्वक उत्तर मिळालं नाहीं त्यांना. शेवटीं थोडेसे चिडले ते आणि म्हणाले, " कसं लक्ष देत नाहीं तुम्ही मुली याकडे, आश्चर्य आहे ! "

तात्यांची अत्यंत इच्छा कीं, मुलींनीं चौकस बुद्धि दाखवावी, शोधक दृष्टींनीं त्यांनीं सर्व गोष्टींकडे बघावं म्हणून. तात्या मनाचे कवी होते. पण त्यांची दृष्टी मात्र शास्त्रज्ञाची होती; त्यांच्या लिखाणांत जशी त्यांची ही शास्त्रज्ञाची शोधक दृष्टी दिसते, त्याच दृष्टीनें ते व्यवहाराकडेही बघत असत.

आतां जातां जातां वामनरावांच्या आणखी एका कामगिरीचा उल्लेख करावयाचा आणि हें लांबलेलें प्रकरण पुरें करावयाचें. हिंगण्याची संस्था ही एक सार्वजनिक, त्यांतून शैक्षणिक, आणि त्यांतून महाराष्ट्रीयांनीं पुण्यास चालविलेली—अशा एकीपेक्षां एक वरचढ गोष्टी असल्यामुळें तिच्यांत मतभेद, गैरसमज, हेवेदावे, भांडणतंटे वगैरे असल्यास नवल नाहीं. इतर सर्व संस्थांतल्याप्रमाणें या संस्थेंतहि ते सर्व प्रकार झाले, व त्यांचे जे कांहीं दुष्परिणाम भोगावयाला लागावयाचे ते तिलाहि भोगावे लागले. पण ही दुःस्थिति फार थोडा काळ टिकून पुन्हां सर्वत्र सामसूम व स्थिरस्थावर झालें हें विशेष होय. हा स्थिरस्थावरपणा येण्यास, आणि संस्थेचें काम पूर्ववत् चालू राहण्यास ज्या कांहीं व्यक्तींचा समंजसपणा व चांगूलपणा कारण झाला त्यांत वामनरावांचा समावेश अवश्य करावयास पाहिजे. वामनराव कांहीं कमी भांडखोर होते, किंवा ते नेहमींच माघार घेत असत असें नाहीं. तत्त्वाचा व मानाचा प्रश्न आला असतांना ते कोणालाहि हार जाणारे नव्हते.

बोर्डाच्या सभांतून वादविवाद, भांडणें, हमरीतुमरी, डोक्यांत राख घालून राजीनाम्याच्या भाषेपर्यन्त मजल येणें–असले प्रकार नेहमीं घडावयाचे. पण असलीं भांडणें–तीं तत्त्वाकरितां असलीं तरी—शेवटीं नाशालाच कारणीभूत होतात हें तत्त्व वामनरावांना आजपर्यन्तच्या आयुष्यावरून पटलें असल्यामुळें म्हणा, किंवा माणसाचीं मतें निराळीं व चमत्कारिक असलीं तरी तो मूळांतच वाईट असतो असें नाहीं हें आपलें आवडतें तत्त्व ते सारखें डोळ्यांपुढें ठेवीत असत म्हणून म्हणा—ते स्वतः शान्त होत; आणि थोडेंसें सामोपचाराचें व थोडेंसें विनोदाचें बोलून व वेळीं पड खाल्ल्याचें दाखवून आपल्या विरुद्ध पक्षालाहि ते शान्त करीत.

सभा संपायचा अवकाश कीं लगेच वामनराव आपण इतका वेळ भांडलोंतंडलों हें विसरून जाऊन जमलेल्या सर्व सभासदांना—ज्यांच्याशीं ते भांडले असतील त्यांना सुद्धां—घेऊन स्वतःच्या घरीं जात व चहाकॉफीवरोबरच उरलासुरला रागहि पिऊन टाकायला लावीत. वामनरावांच्या या असल्या खिलाडू वृत्तीमुळें माणसाला —तो अगदींच खुनशी असल्याशिवाय...त्यांचेवर रागवावयाचें म्हटलें तरी पुरेसें रागावतां येत नसे, आणि वैरभाव कायमचा टिकत नसे. अशा प्रकारें सर्व आजन्म सेवकांना एकत्र गोटून ठेवण्याचे कामीं व त्यांचे हातून एकोप्यानें कामें करविण्याचे कामीं वामनरावांच्या गोडवेपणाचा व उदारपणाचा अतिशय उपयोग झाला आहे. जी गोष्ट आजन्म सेवकांची तीच वामनरावांच्या आसपास चाळींत राहणाऱ्या आम्हां सर्व चाळकरांची. तात्यांचा उपयोग त्यांना गाडीच्या वंगणासारखा होई. चाळकरांत कसलीहि कुरबूर सुरू होवो, वामनरावांनीं शब्द टाकण्याचा अवकाश कीं, सगळ्यांचीं तोंडें गप्प! ते सर्वजण जे अत्यन्त खेळीमेळीनें व गुण्यागोविंदानें एकत्र नांदत त्याचें बरेचसें श्रेय वामनरावांच्या शहाण्या व समंजस धोरणाला, न्याय्य व समानतेच्या वागणुकीला, स्नेहार्द्र व प्रेमळ वृत्तीला आणि गोड व विनोदी वाणीला असे यांत शंका नाहीं. वामनरावांच्या या कामगिरीचा उल्लेख त्यांच्या इतर कामगिऱ्यांप्रमाणें कागदोपत्री किंवा लेखांवगैरेंतून सांपडणार नाहीं हें जितकें खरें तितकेंच हेंहि खरें कीं तो उल्लेख त्यांचे वेळीं हिंगण्यास राहणाऱ्यांच्या अंतःकरणांतून कधींहि पुसून जाणार नाहीं.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८२५५

## अध्यापन ६

वामनरावांच्या अध्यापनकार्याची मोजदाद व किंमत करतांना त्यांनीं समर्थ विद्यालयांत केलेलें काम लक्षांत न घेतां येरंडवणें व हिंगणें या ठिकाणीं केलेलें काम लक्षांत घेतलें म्हणजे बास झालें. येरंडवणें येथील कॉलेजांत व हिंगणें येथील हायस्कुलांत दोहींकडे मिळून त्यांनीं एकंदर २५ वर्षें शिकविलें. १९४३ मध्यें वामनरावांची एकसष्टि साजरी करण्यांत आली त्यावेळीं त्यांचा साहित्यिक म्हणून बृहन्महाराष्ट्रभर जयजयकार झाला आणि त्यांच्या साहित्यांत असलेल्या उच्च गुणांचा व मनाच्या थोरपणाचा मोठा गौरव करण्यांत आला. अर्थात् हें सर्व व्हावें तसेंच झालें. पण कोणाहि वक्त्याला वा लेखकाला त्यांच्या अध्यापनकौशल्याचा योग्य तो उल्लेख करण्याची आठवण झाली नाहीं याचें थोडसें वाईट वाटतें. वास्तविक पहातां वामनरावांच्या वयाला साठ वर्षें पुरी झालीं त्याच वेळीं त्यांच्या अध्यापनकार्यालाहि २५ वर्षें पुरीं झालीं होतीं; आणि महाराष्ट्रांत नामवंत साहित्यिकांची जितकी बूज केली जाते तितकी नामवंत शिक्षकांची करण्याची प्रथा असती तर वामनरावांच्या अध्यापनकार्याचा रजतमहोत्सवहि त्याच वेळीं व त्याच समारंभांत आपोआप साजरा झाला असता. चिपळूणकर, भांडारकर, टिळक, आगरकर, आपटे वगैरे पहिल्या पिढींतील थोर थोर शिक्षकांची सर कोणा-

लाच यावयाची नाहीं असें म्हणून त्यांची गोष्ट सोडली तरी, अलीकडच्या पिढींत सुद्धां कितीतरी शिक्षक असे झाले आहेत कीं त्यांच्या अध्यापनाचें कौतुक सार्वजनिक रीत्या करणें सर्वच दृष्टीनें योग्य होणार आहे. कोणीहि शिक्षक सेवानिवृत्त होतांना त्यांचे प्रीत्यर्थ त्या त्या शाळांतून मुलांकडून साजरे होणारे समारंभ निराळे, व विशेष कर्तृत्ववान शिक्षकांचा सन्मान करण्याकरितां सार्वजनिकरीत्या केलेले समारंभ निराळे. ही प्रथा अजूनपर्यंत पडली नसली आणि नाईक, परांजपे, वामनराव वगैरेसारख्या शिक्षकांचा योग्य तो सन्मान आपल्या हातून व्हावयाचा राहून गेला असला तरी एव्हांपासून ती प्रथा सुरू केल्यास पुढें आपल्याला पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाहीं.

वामनरावांच्या साहित्यांतील गुण इतके उच्च आहेत कीं त्यांच्या मानानें त्यांच्या अध्यापनांतील गुण जरा ठेंगणेच दिसतात. परंतु साहित्याकडे न पाहतां नुसत्या अध्यापनाकडेच पाहिलें म्हणजे त्यांतील गुणांची खरी उंची लक्षांत येते. विद्यार्थ्यांच्या मनाचें आकलन करण्याला लागणारी कल्पना शक्ति व सहानुभूति, विषयाचें सांगोपांग ज्ञान करून देण्याला लागणारी बुद्धिमत्ता व त्यांत रंगून जाण्याकरितां लागणारी सहृदयता, मुलांत मिसळून जाऊन त्यांच्याशीं एकजीव होण्याकरितां लागणारा मनाचा मूलपणा ( बालिशता नव्हे. ), खेळकर व खोडकर स्वभाव, हंसत मुख, विनोदी वृत्ति, अंतर्यामीं असावें लागणारें ध्येयवादित्व व त्याकरितां पडतील ते कष्ट सोसण्याची मनाची तयारी, प्रेमळपणा तसाच कठोरपणा–थोडक्यांत म्हणजे आदर्श शिक्षकाला लागणारे बहुतेक महत्त्वाचे गुण वामनरावांचे ठायीं वसत होते. आणि म्हणूनच त्यांच्या विद्यार्थिनींना आपल्या गुरूचें गुणवर्णन करतांना प्रेमाचें व आदराचें इतकें भरतें येतें.

वामनराव जातीवन्त शिक्षक असूनहि त्यांना ' ट्रेंड ' असा शिक्का नव्हता. आणि म्हणून केवळ शिक्क्यावरच गुणांची किंमत करणाऱ्यांकडून कळत–नकळत कांहीं वेळां त्यांची उपेक्षा केली गेली. कोणा इन्स्पेक्टरानें यावें आणि ' तुम्ही ट्रेंड नाहीं, नाहीं का ? ' असें जरा ' यानें ' विचारावें ! वामनरावांपेक्षां कितीतरी कमी दर्जाच्या आम्हां त्यांच्या सहकाऱ्यांना शिक्षणसप्ताहांतून व्याख्यानें, पाठ वगैरे देण्यासाठीं बोलावणीं यावींत, आणि त्यांना येऊं नयेत वगैरे गोष्टी वामनरावांच्या लक्षांत येत व कधीं कधीं मनाला लागतहि. त्यांचें शिकवणें परिणामकारक व मनोवेधक असलें तरी, तें ठराविक घाटाचें व साचेबंद होत नसल्यामुळें असल्या

शिकविण्याची ज्यांना संवय जडली आहे अशा शिक्षकांना व विद्यार्थिनींना त्यांचें शिकवणें जरा कसेंसेंच वाटे. आणि त्यामुळें त्यांच्या शिकविण्यावर कॉलेजमधील विद्यार्थिनी जितक्या खूष असत तितक्या हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थिनी नसत हें श्री. रमाबाई बखले यांचें म्हणणें बरोबर आहे.

वामनराव हे पुष्कळसे सॉक्रेटिक पद्धतीप्रमाणें शिकवीत. शिकवून झालेल्या भागाची उजळणी करणें, विद्यार्थ्यांच्या लक्षांत कितपत राहिलें आहे हें पाहणें, आपण शिकवीत असतांना विद्यार्थ्यांचें लक्ष आहे कीं नाहीं हें अजमावणें, विद्यार्थ्याला स्वतःला अनुमानें काढायला व विचार करायला लावणें, भाग शिकवून झाल्याबरोबर त्याची पुन्हां आवृत्ति करणें वगैरे गोष्टींकरितां म्हणून जे जे प्रश्न विचारायचे असतात ते ते तर वामनराव विचारीतच; पण पुष्कळ वेळां प्रश्नांच्या माऱ्यानें ते विद्यार्थिनींना इतके छेडीत, बुचकळ्यांत पाडीत, गोंधळून टाकीत, घाबरून सोडीत व शेवटीं फजीत करीत कीं बिचाऱ्या मुली गोऱ्यामोऱ्या होत, व आपल्या अज्ञानाच्या प्रखर जाणीवेनें स्वतःच ओशाळून जात. एका विद्यार्थिनीनें म्हटल्याप्रमाणें वामनरावांच्या शिकविण्यानें कांहीं वेळां मुलींचा तेजोवध होई— त्यांचे मनांत कायमचा न्यूनगंड उत्पन्न होई. क्वचित् प्रसंगीं असा प्रकार होई यांत शंका नाहीं; पण तो बहुधा सुरुवातीलाच होई. विद्यार्थिनींना वामनरावांच्या स्वभावाची ओळख जसजशी होत जाई तसतसा तो परिणाम कमी जाणवे. आम्हांला खरे वामनराव शेवटीं शेवटीं–जातांना–दिसतात व कळतात असें बऱ्याचशा विद्यार्थिनींनीं आपल्या आठवणींतून कबूल केलें आहे. हिंगण्याच्या विद्यार्थिनी इतर विद्यार्थिनींपेक्षां वामनरावांना जास्त आवडत या आरोपांतील सत्यांश व त्याचें समाधान वरील गोष्टींतच सांपडतें. आपल्या या अतिरिक्त प्रश्नपद्धतीचा दुष्परिणाम लक्षांत आला म्हणजे वामनरावांना वाईट वाटे व ते म्हणत "हो, होतं खरं असं. पण माझा कांहीं इलाज चालत नाहीं. साध्या साध्या गोष्टीसुद्धां त्यांना समजत नाहींत त्याला काय करायचं!" आपण रागावतों हें बरें नाहीं याची जाणीव आहे, आणि राग तर आला आहे अशा स्थितींत ते नुसतेच विचारीत "तुमच्यावर रागवायाचें नाहीं, नाहीं का!" किंवा रागाच्या भरांत एकादा अपशब्द तर बोलावासा वाटतो आहे, पण तो बोलतां तर येत नाहीं अशा असहाय मनःस्थितींत म्हणत "आतां तुम्हांला काय म्हणायचं!"

मराठी शुद्धलेखन, इंग्रजी स्पेलिंग, व्याकरण वगैरेसारखे पाठ वामनराव कधीं

कधीं प्रयोगात्मक पद्धतीनें घेत. अर्थात् ते अत्यंत स्वाभाविक, वास्तविक व मनोरंजक वाटत असले तरी त्यांनीं साधलेला कार्यभाग जितका साधावयास पाहिजे तितका साधत नसे. उदाहरणार्थ ' फळें घेऊन ये ' असें लिहिण्याऐवजीं ' फळे घेऊन ये ' असें लिहिल्यामुळें एका मुलीनें टोपलींतल्या फळांऐवजीं वर्गांतले फळे आणले; व हशा पिकून अनुस्वारांचें औचित्य व उपयुक्तता हीं मुलींना पटलीं. पण वेळेचे मानानें हें कार्य थोडें झालें हें नाकारतां यावयाचें नाहीं.

कायदेमंडळांचें काम कसें चालतें हें हायस्कूलमधील वरच्या वर्गांना समजावून सांगतांना शुद्धलेखनाच्या प्रत्यक्ष व प्रायोगिक पद्धतीचाच उपयोग वामनरावांनीं एकदां केला होता. तो एक प्रॉजेक्ट असून उमेदवारानें निवडणुकीला उभें राहण्या-पासून तों बिलाचें वाचन होऊन त्याचा कायदा होईपर्यन्तच्या सर्व कृति त्यांनीं विद्यार्थिनींकडून शिक्षकांच्या साह्यानें व स्वतः भाग घेऊन करून दाखविल्या. हें काम प्रत्येक शनिवारीं–रविवारीं असें सुमारें सहा महिने चाललें होतें. पण त्यामुळें स्थानिक व प्रांतिक कारभारांतील कितीतरी गोष्टी कायमच्या कळून गेल्या. शिवाय प्रचाराचीं भाषणें करणें, लेख लिहिणें, बिलांचे कच्चे मसुदे तयार करणें, दुरुस्त्या करणें, शेवटीं त्यांना कायद्याचें सूत्रात्मक स्वरूप देणें, खंडनमंडनपर वादविवाद करणें अशासारख्या कितीतरी शैक्षणिक गोष्टी या एका प्रसंगानें विद्यार्थिनींना शिकतां आल्या.

शिक्षक या नात्यापेक्षां प्रोफेसर या नात्यानें वामनरावांचा जास्त लौकिक होता. त्यांच्या व्याख्यानाचा म्हणजे मोठा ओघ असे, किंवा तीं व्याख्यानें ज्ञानकोशासारखीं माहितीनें भरगच्च भरलेलीं असत, असें नाहीं. त्यांचें बोलणें संथ, थिमें थिमें, विचार करीत करीत चालायचें. पण त्यामुळें विषयाच्या समजुतींत मात्र कांहीं कमीपणा रहात नसे. जितका जितका विषय विचारोद्बोधक व वादग्रस्त तितकी तितकी ही त्यांची पद्धति परिणामकारक होई. कोणत्याहि विवाद्य विषयावरचीं ग्रंथकाराचीं मतें अगोदरच सांगून टाकण्याऐवजीं वामनराव स्वतःच उलट बाजू घेऊन ती इतक्या पराकोटीला नेऊन पोचवीत कीं विद्यार्थिनींना आपोआपच त्यांत कांहींतरी हेत्वाभास असावा असें वाटूं लागून ग्रंथकाराच्या मताच्या आसपास त्या येऊं लागत, आणि विद्यार्थिनींच्या मनाची अशी मजल आली म्हणजे ते ग्रंथकाराच्या म्हणण्याकडे वळत. या त्यांच्या पद्धतीनें ग्रंथकाराचीं मतें व त्याबरोबरच त्याच्या अनुकूल-प्रतिकूल जें जें म्हणून म्हणतां येण्यासारखें असतें तें सर्व माहीत होऊन

विद्यार्थिनी माहीतगार व चोकस बनत. वामनरावांच्या हुशार विद्यार्थिनींपैकीं एक–सौ. उषा सुलाखे, पी. ए. यांनीं वामनरावांच्या शिकविण्याचें–विशेषतः मानसशास्त्र शिकविण्याचें मोठें मार्मिक व मजेदार वर्णन केलें आहे. त्या म्हणतात—

"तासाच्या प्रारंभापासून शेवटपर्यन्त आपल्या वाक्सुधेचा अखंड, ओघवान व डौलदार प्रवाह चालू ठेवून विद्यार्थ्यांचीं मनें आकर्षून घेण्याच्या कित्येकांच्या यशस्वी हातोटीचा तात्यांच्यांत पूर्णतया अभाव असला तरी त्यांच्यांत असे कित्येक गुण होते कीं इतर कांहीं प्रोफेसरांच्या कडक वागणुकीमुळें तास चुकवावा असं खूऽऽप वाटत असलें तरी चुकवतां येत नसे, पण उलट या वरील गुणांमुळें व उदार धोरणामुळें, तात्यांचा तास चुकवतां येणं सहज शक्य होतें तरी त्यांच्या सुंदर शिकवण्यामुळें तो चुकवावा असं कधींच मनांत येत नसे. अगदीं सावकाश–मध्यें थांवून थांवून ते शिकवायचे. डोळ्यांत स्निग्धता, आवाजांत मार्दव, चेहऱ्या-वर वात्सल्य, वागण्यांत प्रेमळपणा, सर्वांच्यावर सारखें लक्ष व प्रेम करण्याची हातोटी, दररोज नवीन उत्साह, व बुद्धीची प्रगल्भता यांमुळें त्यांचा तास कधींच नीरस किंवा अगम्य असा वाटला नाहीं....एका तासांत एकच मुद्दा घेतील, तोच मुद्दा पुन्हां पुन्हां समजावून सांगतील, आठवून आठवून दृष्टान्त देतील–नाहींच आठवलें तर दाराकडे एकाग्रतेनें बघून आठवून देतील. मध्येंच सूक्ष्म विनोद करून हसवतील, नाहींतर एकाद्या मुलीची स्निग्ध थट्टा करतील अन् पुन्हां पहिला मुद्दा सुरू करतील....पुन्हां उदाहरणें देऊन, संस्कृत वचनें देऊन तोच विषय घंटा होईतों चालू ठेवतील. वर्गांतून जातांना कधीं कधीं दोनदां तीनदां परतून त्या विषयाला पुष्टी देत राहतील. शेवटीं विचारतील 'काय समजलं ना मी म्हणतों तें?' अन् मग एकदां स्मित, व मग जातील. आमच्या वर्गांतील कोणाहि विद्यार्थिनीला विचारलें 'तुला कोणता तास आवडतो?' तर ती म्हणेल, 'तात्यांचा सायकॉलॉजीचा'!"

वामनराव *Perception, association* वगैरे मानसशास्त्रीय तत्त्वें प्रयोगांनीं कशीं सुलभ करून सांगत याचें एक उदाहरण प्रो. चंपावती केतकर जी. ए. एम् ए. या देतातः—"तात्या म्हणाले 'मी फळ्यावर आतां कांहींतरी लिहितों, तें एक-दोन मिनिटें पहा, मग मी फळा उलटा करून ठेवीन. तें तुम्ही लिहून दाखवा! आम्हांला मौज वाटली. काय लिहिलें होतें फळ्यावर–तर *N. M. Athavale, V. M. Joshi, H. R. Divakar* हीं नांवें. आम्हांला वाटलें हीं पाहायला दोन मिनिटें तरी कशाला? व त्यांत काय चुका व्हायच्या? आम्ही भराभर वह्यांव-

लिहिलें *N. M. Athawale, V. M. Joshi, H. R. Divekar* आम्हांला वाटलें किती हुशार आम्ही ! सर्वांच्या वह्या पाहिल्या. आणि नेहमींच्या पद्धतीनें मोठमोठ्यांदा हंसूं लागले. आम्ही आश्चर्यचकित झालों. मग हळूंच म्हणतात—'आतां पहा बरं बोर्डाकडे.' पाहतों तों प्रत्येक नांवांत आम्ही चूक केलेली. त्यांनीं बोर्डावर प्रत्येक नांवाच्या स्पेलिंगमध्यें चूक केली होती. आमचें कशाला लक्ष जातें आहे स्पेलिंग्‌कडे ! *N. M. Athawale* म्हटलं कीं स्पेलिंग कोण पहातें ? अशा आम्ही चांगल्याच बनलों. या एका उदाहरणावरून तात्यांनीं आम्हांला कितीतरी मानसशास्त्रीय तत्त्वें समजाऊन दिलीं."

सौ. शांता कानिटकर बी. ए. लिहितात:—"तात्यांच्या मानसशास्त्रावरचीं व्याख्यानें अजून जशींच्या तशीं माझ्या मनांत प्रतिबिंबित झालीं आहेत. पहिल्याच तासाला 'मन म्हणजे काय,' 'मन कोठें आहे,' 'मन आहे का तुम्हाला' 'माझें मन अमक्यावर बसलें याचा अर्थ काय' अशा तऱ्हेचे अनेक प्रश्न विचारून त्यांनीं आम्हांला विचार करावयास लाविलें. आम्हीहि त्या प्रश्नांचीं वेडींवांकडीं उत्तरें देत होतों. आणि मग आमच्या त्या उत्तरांच्या पायावर त्यांनीं आपल्या विषयाची उभारणी व मांडणी अत्यंत कुशलतेनें करून दाखविली व आम्हांला थक्क करून सोडलें. प्रथम ते आम्हांला बोलवीत व आमच्या वेड्यावांकड्या व अप्रबुद्ध उत्तरांमुळें त्यांना आपला विषय जोरदारपणें मांडण्यास उत्साह येत असे. कलावंताचा सूर लागण्यास त्याच्या मनांत चेव उत्पन्न होण्याजोगा प्रसंग घडावा लागतो. प्रसिद्ध गवई रहिमतखां यांची अशी गोष्ट सांगतात कीं त्यांचेसमोर कोणी वेडेंवांकडें गाऊं लागला कीं त्यांस इतकी चीड येत असे कीं, ईर्षेनें ते गावयास लागत, व त्यामुळें इतरांना उत्कृष्ट गाणें ऐकावयास मिळे. तशीच स्थिति तात्यांच्या रसवंतीची पुष्कळ वेळां होई."

कु. लीला मोघे म्हणतात—"वर्गामध्यें आपलें मत एकदम न सांगतां, एकाच विषयाच्या सर्व बाजू ते (वामनराव) एकदम पुढें मांडीत आणि त्यांतली ग्राह्य कोणती तें ठरविणें विद्यार्थिनींवरच सोंपवीत. सर्व बाजू इतक्या सरसतेनें व तन्मयतेनें ते रंगवीत कीं त्यांतलें सत्य हुडकून काढण्यास खुल्या वादविवादाची जरूरी लागे, आणि बुद्धीची चांगलीच कसोटी लागे. विशेषतः मानसशास्त्र शिकवितांना त्यांच्या या प्रश्नोत्तरात्मक शिक्षणकलेचा उच्चतम विलास पाहायला मिळे."

सौ. रद्दी बी. ए. लिहितात:—"तात्यांच्या अध्यापनांत भीतियुक्त दबावदारपणा

कधींच नव्हता. एकादा रसायनशास्त्रज्ञ रसायन शास्त्रांतील निरनिराळे गंमतीबाज प्रयोग करून साधारण मनाला स्तिमित करतो, तद्वत् मानसशास्त्रांतील निरनिराळीं प्रमेयें तात्या शिकवायला लागले कीं मुली तल्लीन होऊन त्यांचे डोळे आनंदानें चकाकायला लागायचे !"

सौ. मनोरमाबाई लेले, बी. ए. म्हणतात:—"तात्यांच्या तासाविषयीं व विषयाविषयीं आम्हांला नेहमीं औत्सुक्य व गोडी वाटत असे. याला कारण त्यांचें व्यक्तिमत्व. ते स्वतः तीव्रबुद्धीचे, ज्ञानी, व सखोल अभ्यासक होते....तात्यांच्या या विशेष बौद्धिक शक्तीमुळें त्यांनीं एकादा विषय अम्हांस विशद करून सांगितला म्हणजे आम्हांला त्या विषयाचें कांहीं नवीन ज्ञान झाल्यासारखें वाटे, नवीन प्रकाश पडल्यासारखें वाटे. त्यांचें शिकवणें सूचक व मार्मिक असे; त्यामुळें त्यांच्या तासाला आमची बौद्धिक भूक व जिज्ञासा अगदीं उत्तम प्रकारें शमे."

कमळाबाई देशपांडे एक आठवण मोठ्या हळुवार हातानें देतात. त्या लिहितात— "त्यांच्या आठवणी म्हणजे दुःखद प्रसंगांची माळच. हिंगण्यास आले, पण दुसऱ्याच वर्षी पत्नी वारली. चार लहान मुलें, शकु तर दीड वर्षाची. पण तेंहि दिवस निघाले. घरची ही स्थिति असली तरी वर्गांत शिकवितांना आनंदी असत. प्रसंगोपात्त एकाद्या उदाहरणावरून मात्र मनचें दुःख बाहेर पडे. मानसशास्त्राचा तास चालू होता. नेहमींचीं व्यवहारांतील उदाहरणें, मुलाला काय हवें तें आईला लवकर कळतें इ. विवेचन चाललें होतें. ते म्हणाले "आज सकाळपासून शकू रडते आहे. तिला काय हवें तें मला कळत नाहीं. शेवटीं उठलों, व कपाटांतल्या साऱ्या बरण्या तिजपुढं मांडल्या; पण तिची समजूत होईना ! हीच तिची आई असती तर......" आणि त्यांना गहिंवर आला."

वामनरावजी मुख्यतः मानसशास्त्र, मराठी, निबंध हे विषय शिकवीत. वरील उतारे विशेषतः त्यांच्या मानसशास्त्र शिकविण्याच्या पद्धतीचें दिग्दर्शन करण्याकरितां दिले आहेत. त्यांच्या मराठी शिकवण्यासंबंधीं त्यांच्या विद्यार्थिनींचीं मतें काय आहेत हें खालील उताऱ्यांवरून दिसून येईल:—

सौ. मालतीबाई जोशी, बी. ए. लिहितात:—"वर्गांत ज्ञानेश्वरी चालली होती एकदां ! मी शांताबाई बोलत होतों एकमेकींशीं तें पाहिलं ( ता ) त्यांनीं, आणि राग आला त्यांना ! आणि 'अहो, शांताबाई, काय चाललं आहे तुमचं ? लक्ष नव्हतं ! उठा, उठा ! इलाज नाहीं ! उभं राहिलं पाहिजे ! अहो, आम्हांला मजा

का वाटते शिक्षा करायला ? पण काय करणार ? कर्तव्य आहे, केलं पाहिजे ! आमच्या शांताबाई रागावतील म्हणून दुर्लक्ष करून चालेल का ? शांताबाई रागावतील ठाऊक आहे आम्हांला, मीपणा आहे ना ? पण 'मी' म्हणजे कोण हें कुठें ठाऊक आहे त्यांना ? सांगा शांतावाई 'मी' म्हणजे कोण ?' तात्यांनी विचारलं.

शांताबाईः—'मी म्हणजे माझं शरीर'

तात्याः—अहो शांताबाई, माझ्या गोष्टीवर 'मी' चा ताबा असतो ना ? मग माझं शरीर म्हणतां तेव्हां कोणत्या 'मी' चं हें शरीर ? हा 'मी' कोण ?

शांताबाईः—'मी म्हणजे माझं मन'

तात्याः—'पुन्हां आपलं 'माझं' आहेच. अहो शांतावाई हें माझं सुटलं पाहिजे. 'मी' कोण हें माहीत नाहीं, आणि 'मी' चा ताबा कसा चालवितां ? ज्यावर 'मी' चा ताबा तें माझं. म्हणजे 'मी' निराळा, आणि माझं जें काय तें निराळं असलं पाहिजे. 'माझं' घर, 'माझा' हात, 'माझा' पाय, 'माझा' मेंदू, 'माझं' मन म्हणजे 'मी' कोणीतरी शरीराच्या बाहेर निराळा आहे, आणि त्या 'माझं' हें शरीर. 'माझा' आत्मा म्हणजे आत्म्यापासूनहि मी निराळा. मग असा 'मी' कोण ? सांगा. तें सांगतां येत नाहीं, 'मी' कोण तें सांगतां येत नाहीं, पण अहंपणा मात्र जात नाहीं ! बरं, बसा खालीं !

वेदान्त, आत्मानात्मविचार वगैरेसारखे कठीण विषयहि किती सुलभपणें, प्राप्तप्रसंगाचे निमित्तानें, व एकाद्या सांप्रदायिक बारकऱ्याच्या भाषेत वामनराव वर्गामध्यें सांगत आणि ते सांगत असतांना मूळ प्रसंग विसरून जाण्याइतके ते त्यांत कसे रंगून जात हें दाखविण्यासाठींच वरील उतारा—तो इतका लांब असूनहि दिला आहे.

श्री. रमाबाई वखले, बी. ए. लिहितात "कवितांचा तास आम्हांला फार आवडे. त्यांतल्यात्यांत नवनीत व त्यांतील 'नलदमयन्ती' आख्यान जेव्हां तात्या शिकवीत तेव्हां तर कमालीची मौज वाटे. तात्यांना घंटा होण्यापूर्वी वर्गांत हजर राहिलेलें आवडत असे. एकदां दहा मिनिटांच्या सुटीनंतर दुसरी घंटा झाली, व आम्ही वर्गांत जाण्यास निघालों हें तात्यांच्या दृष्टीस पडतांच भराभर पुढें जाऊन ते आमच्या आधींच वर्गांत शिरले, व आम्ही वर्गांत येण्याची परवानगी विचारतांच आम्हांस बाहेरच उभें राहण्यास सांगितलं. परंतु वर्गांत नलदमयंती आख्यान चालू असतांना अर्धा वर्ग बाहेर राहिल्याकारणानें आख्यानास जसा रंग चढावयास पाहिजे तसा चढेना. तेव्हां त्यांनीं आम्हांला आंत येण्याची परवानगी दिली, पण उभें राहण्याची

शिक्षा केलीच ! आमच्या आधीं लांब लांब पावलें टाकून आधीं वर्गांत जाऊन उलट आम्हांलाच शिक्षा या कल्पनेनें आम्हांला खरोखरच खूप वाईट वाटत होतें; व वरील आख्यानांतला अत्यन्त काव्यमय, विनोदपूर्ण, व श्लेषात्मक असा कथाभाग वर्गांत चालू होता तरी आमच्या चेहऱ्यावर हास्य तर दूरच राहो, परंतु रडवेपणा-खेरीज दुसरें कांहीं दिसत नव्हतें !

तात्यांनीं दोनतीनदां ' मुदेनें मोदेना ' ही कविता वाचली तरी आम्ही रडव्याच दिसत होतों, शेवटीं ' औषध नल गे हिजला ' हा चरण वाचून आमच्याकडे पाहूं लागले. आम्ही पूर्ववत चेहरें करून उभ्या होतों. तो प्रकार त्यांना खरोखर असह्य झाला, व ' बसा एकदांच्या; तुम्हाला शिक्षा करून चालत नाहीं. तुम्ही हसला नाहीं तर शिकवण्यांत मौज येत नाहीं ' असें म्हणाले. आम्ही खालीं बसलों हें सांगावयास नकोच. उलट पुढें आख्यान कमालीचें रंगलें. "

आख्यान कां रंगलें व दुसरा इतका लांब उतारा कां दिला हेंहि सांगावयास नकोच. हें झालें रघुनाथ पंडिताचें काव्य शिकविण्यासंबंधीं. वामनरावांच्या मोरोपंत शिकविण्यासंबंधीं श्री. बखले म्हणतातः–" मोरोपंताची कविता तात्यांखेरीज दुसऱ्या कोणींहि शिकवूं नये असें आमचें ठाम मत होतें. आर्यावृत्त ते कांहीं चमत्कारिक सुरांत वाचीत, परंतु तो सूर आम्हांस फार आवडे. आर्यभारतांतील सभापर्व त्यांनीं आम्हांस शिकवलें. त्यांतील प्रत्येक काव्यमय प्रसंगाप्रमाणें तात्या तें काव्य शिकवीत असतां प्रसंग ( डोळ्यापुढें ) येत व आम्ही त्यांबद्दल तासानुतास बोलत असूं. आम्ही कॉलेजमधें असतांना त्यांनीं नवरसांवर दिलेलीं व्याख्यानें जर अक्षरशः लिहून प्रसिद्ध केली असतीं, तर तो एक स्वतंत्रच व अत्यन्त रसात्मक असा ग्रंथ झाला असता. "

श्री. बखले यांचा जो अनुभव तोच माझाहि आहे. वामनराव बाह्यतः आर्ष, रुक्ष व तर्ककर्कश दिसले तरी त्यांचें अंतःकरण कवीचें होतें, आणि म्हणून खरें काव्य वाचतांना त्यांच्या वृत्ती हेलावल्यावांचून रहात नसत. त्यांना काव्य गातां येत नसे आणि काव्याच्या नुसत्या गेयतेमुळें त्यांना आनंद होत नसे हें खरें; पण त्यामुळें त्यांना काव्याचा आस्वाद स्वतः घेतां येत नसे किंवा दुसऱ्याला देतां येत नसे हा जो कांहींचा समज असे तो बरोबर नसे. सौ. शांता कानिटकर लिहितातः " त्यांनीं आम्हांला 'प्रतिभासाधन' व 'काव्यालोचन' यांसारखे ग्रंथ शिकविले. प्रतिभासाधना-सारखा विषय शिकवायचा म्हणजे किती अवघड काम आहे. प्रतिभा म्हणजे काय ?

ती ईश्वरी देणगी आहे का प्रयत्नसाध्य आहे ? प्रतिभा व वेड यांत कांहीं साम्य आहे काय ? भाषाशैली कशाला म्हणतात ? हा असा तांत्रिक व वस्तुतः किचकट वाटणारा विषय ते अत्यंत कुशलतेनें व परिणामकारक रीतीनें विशद करून सांगत असत. 'प्रतिभावान वेडे असतात' असें एकदां विधान करून तें आम्हांस पूर्ण पटवून द्यावयाचें. तो मुद्दा संपूर्णपणें मांडायाचा आणि मग वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें उत्कृष्ट दर्जाचें वाङ्मय निर्माण होत असलें पाहिजे असें म्हणून उलट बाजू तितक्याच सफाईनें मांडून दाखवून मग तात्पर्यार्थ सांगावयाचा. अशी त्यांची विषय-प्रतिपादनाची पद्धति असे "

वर्षांत लिहावयाच्या निबंधांवर कोण कोणतीं पुस्तकें वाचावयाचीं हें वामनराव प्रथम सांगत. व तीं पुस्तकें वाचल्याचा पुरावा निबंधांत पाहात असत. कांहीं लेखक देतात त्याप्रमाणें प्रथमच सर्व मुद्दे क्रमवार देणें हें त्यांना आवडत नसे. तसे दिलेले पाहून व 'हा काय निबंध कीं बाजारांतून हळद, चिंच, गूळ, मसाला आणण्याची यादी !' असें म्हणून वामनरावांनीं आपला निबंध फेकून दिल्याचें श्री. सुमित्रा सोहनी सांगतात. शुद्धलेखनावर तर वामनरावांचा अतिशय कटाक्ष. सौ. उषा सुलाखे नवीन शुद्धलेखनपद्धतीच्या खोट्या सबबीवर आपल्या चुकांचें समर्थन करूं लागल्या असतां वामनराव हंसून म्हणाले "तो नियम सध्यां तुम्हांला लागू नाहीं. तुम्ही जी. ए. होऊन लेख लिहायला लागलांत म्हणजे मग. सध्यां शुद्ध लिहायला आलेंच पाहिजे." लेखकानें स्वतःला सर्वज्ञ समजून भरमसाठ व निश्चितार्थी विधानें ठोकून देऊं नयेत, आपल्या ज्ञानाच्या अपूर्णत्वाची जाणीव बाळगून नेहमीं मर्यादित स्वरूपाचीं विधानें करावींत असें म्हणून "निश्चित व ठोकून केलेलें मुलीचें प्रत्येक विधान तात्या क्रियाविशेषणांनीं मर्यादित करीत. त्यामुळें शेवटीं एका विद्यार्थिनीनेंहि शिवाजीची माहिती लिहितांना 'शिवाजी हा महाराष्ट्रांत कदाचित् जन्मला व बहुतेक मेला' असें लिहून मर्यादित विधानांचा उच्चांक गांठला." असें कमळाबाई देशपांडे म्हणतात. मर्यादित विधानांप्रमाणेंच समतोल विचारसरणीवर व सांगोपांग मांडणीवर वामनरावांचा विशेष रोख असे.

मुली निबंध वेळच्या वेळीं लिहीत नसत याचा वामनरावांना मोठा राग येत असे. पण हा राग निबंध उशीरां देण्यापुरताच नसून त्याचें खरें कारण विद्यार्थिनींना वेळचेवेळीं काम न करण्याची दुष्ट खोड लागते असें असे असें कु० बडवे आपल्या आठवणींत म्हणतात. त्या लिहितात "जरा शांत झाल्यावर तात्या म्हणायचे

'अहो मला रागवायची हौस का आहे ? तुम्ही मुली वेळच्या वेळीं कामें करीत नाहीं म्हणून मी रागवतों. निबंधाचें काय पण वेळच्या वेळीं काम करण्याची संवय नको का ? ' पुढच्या आयुष्यांत जरी निबंध दाखवायचे नसले तरी कामाची संवय... वगैरे तत्त्वज्ञानाचे डोस प्यावयास मिळतात. कुठलीहि चांगली वाईट गोष्ट होवो, तात्यांचे व्यवहारामृताचे डोस तयारच. "

निबंध तपासून झाल्यावर त्यांवर ते जे शेरे देत तेहि इतरांपेक्षां निराळे असत. उत्तम, चांगला, बरा हे मामुली शब्द त्यांना नापसंत असत. अ,ब, क,ड, ही इंग्रजीची उष्टी नक्कल म्हणून त्यांना मान्य नव्हती. तेव्हां अ = उत्तम, आ = चांगला, ई = बरा, ऊ = वाईट, (अ + आ)/२ = साधारण बरा, असे शेरे देण्याची त्यांची पद्धति असे असें सौ. रड्डी सांगतात. प्रत्येक निबंधांत उपमा, अवतरणें, उद्धृतें, सुभाषितें, म्हणी वगैरे थोडीं थोडीं असावींत, म्हणजे त्याला एक प्रकारचा भारदस्तपणा व गांभीर्य येऊन वाचकांचें चित्त रमतें असें वामनराव विद्यार्थिनींना सांगत. पण त्यांनीं तें ऐकलें नाहीं म्हणजे असल्या गोष्टींचा आग्रह धरीत. मग मुलीहि वामनरावांची खोड मोडण्याकरितां सबंध निबंधच या गोष्टींनीं भरून काढीत. जरूर असो वा नसो निबंधांत जिकडे तिकडे अवतरणांचा, उपमांचा व सुभाषितांचा नुसता पाऊस पाडीत ! अशाच एका प्रसंगीं वामनराव जरा चिडले व म्हणाले "अहो, कोटेशन्स नको म्हणतों ना ! माझी कोटेशन्सूची हौस आतां फिटली ! तुम्ही मुली तरी अशा आहां कीं एकादी गोष्ट सांगितली तर तिचा अतिरेक करून सांगणारालाच हास्यापद करून सोडतां. " पण पुढें यावरूनच त्यांच्या एका हुशार पण वात्रट विद्यार्थिनीनें ( काशीच्या श्री० कृष्णाबाई वैशंपायन ) 'अहो, कोटेशन्स् नकोत !!! ' अशी एक सुंदर नाट्यछटा* लिहिली. अर्थात् वामनरावांच्या विनोदी

---

* **अहो, कोटेशन्स् नकोत !!!**

*श्रीमती कृष्णाबाई वैशंपायन*

"शंखान्दध्मुः पृथक् पृथक्" करून सांगितलें कीं मला कोटेशन्स आवडत नाहींत ! पान उघडलें नाहीं तों कोटेशन्सला सुरुवात ! आपल्या भाषेंत सांगा. "कौशल्य सारें रचनेंत आहे. " हं ! आज निबंधाचा तास ना ? मग ह्या टेबलावर चारच वह्या आहेत ? काय हो ? उभ्या कां ? बाहेर जायचें आहे ? जा ! तुम्ही हो ? तुम्हांलाही जायचें आहे ? जा ! "सर्व सारिखे, हांसावें मग कोणाला कोणी ? "

पान ११२ पहा

व खिलाडू वृत्तीमुळें त्याची त्यांना गंमतच वाटली. विद्यार्थिनींनाहि वामनरावांचा उद्देश समजत नव्हता असें नाहीं पण आपली एक गम्मत! वामरावांच्या या

पान १११ वरून चालू.

अहो! "एक लज्जां परित्यज्य" मग काय विजयच विजय!! या! उशीरसा केलात? घंटा नाहीं का ऐकली? आम्ही तर शाळेची घंटा ऐकून "हृदयानि व्यदारयन्" होत असूं. बसा! "आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढतीं पाहूं नको." घ्या मूठभर ज्ञान! बाकी आपण म्हणजे "लिप्यते नच पापेन पद्मपत्र-मिवांभसि" या वर्गांतले आहांत!·बरें, चला आतां, झालें तेवढें ईशस्तवन पुरें. निबंध आणलात का? कां, "नन्ना म्हणते मान" "प्रथमग्रासे मक्षिकापातः" आज पहिलाच निबंध आणि तोच लिहिला नाहींत! मग काय "आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः" असा विचार आला वाटतें? काय हो, तुम्ही आणलात का? अहो, बोला. "बोला हो, बोला हो, बोला हो! सर्व सभ्य बोला हो". "मुकीं विचारीं कुणी हका अशीं मेंढरें" कां बनतां? चला पुढें! तुमची वही? उठून उत्तर द्या. "उत्तिष्ठोत्तिष्ठ." नाहीं लिहिला? कां नाहीं? उत्तर द्या. अहो, खोलींत चांगल्या बोलतां आणि मग वर्गांतच उत्तर देतांना कां "वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते." खोलींतल्या वातावरणांत "मूकं करोति वाचालं" अशी शक्ति आहे वाटतें? पुढें तुमचा हो? पाहूं! नापास! मला कोटेशन्स आवडत नाहींत म्हणून सांगितलें ना! हा काय निबंध कीं "सुभाषितरत्नभांडार!' ही 'उष्ट्या पत्रावळी करूनिया गोळा' ची कवित्वकला मला आवडत नाहीं. कांहीं मनानें लिहा. बरोबर आलें तर उत्तम! "हतोवा प्राप्स्यसि स्वर्गं". प्रत्येक उदाहरण जर 'कोट' केलें तर मजा जातो. जसें येईल तसें लिहावें! 'पत्रं पुष्पं फलं तोयं' "कुछ न कुछ करजायेंगे" हें ध्येय ठेवा. बरें फूल नाहीं फुलाची पाकळी; लिहिलात हें काय थोडें झालें! हं, पांच मार्कस्. अहो वही फेकून काय होणार! जेवढे श्रम केले तेवढें फळ मिळालें. "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्." शाबास. तुम्ही आरंभापासूनच सुरवात केलीत. तुमचा निबंध वाचतांना हरदासाची कथा वाचल्याचाच भास होतो आहे. प्रत्येक शब्दाला जुने कवी, नवे कवी, मोरोपंत, वामन, गीता यांची उजळणी करतों कीं काय असा भास होतो आहे. कोटेशन्सनें भाषेला शोभा येते असें का वाटतें? 'अति सर्वत्र वर्जयेत्.' हा देखील अति झाला म्हणजे "शोभादायक नसे अलंकार." परत वाईट म्हणायची सोयच नाहीं. हं. चालूं द्या अश्रु-विमोचन. "शोक-क्षोभेच हृदयं प्रलापैरेव धार्यते." तुमचा हो। कोटेशन्स! ह्यापुढें कोणीही पांचापेक्षां जास्त कोटेशन्स वापरूं नयेत. हं समजला का नियम? "*Theirs not to reason why*" कां तुम्ही नाहीं सुरवात केलीत? बाकी

पान ११३ पहा

नादामुळें विद्यार्थिनींमध्यें वाचनाची विशेष आवड उत्पन्न झाली यांत शंका नाहीं. अशासारख्या प्रसंगांवरून शिक्षकाचा प्रेमळपणा, विद्यार्थिनींचा हुशारपणा, वर्गांतील खेळीमेळीचा घरगुतीपणा वगैरे कितीतरी दुर्मिळ गोष्टी दिसून येतात.

अवतरणें वगैरे व पाठान्तर यासंबंधीं सौ॰ रड्डी लिहितात. "समजून उमजून केलेल्या पाठांतरावर तात्यांचा फार भर असे. कालिदासाच्या दरबारांतील एकपाठी, दुपाठी, त्रिपाठी विद्वानांचें विद्यार्थिनींना कोडें वाटे. 'अहो त्यांत काय आहे? तुम्ही सुद्धां दुपाठी त्रिपाठी आहांत.' असें म्हणून त्यांचा आवडता श्लोक 'कस्यचित् किमपि नो हरणीयम्। मर्मवाक्यमपि नोच्चरणीयम्। इत्यादि श्लोक त्यांनीं अर्थासह सांगितला, व एका विद्यार्थिनीस म्हणावयास सांगितला. अर्थात् तिला म्हणतां न आल्यानें त्यांनीं मनांत अर्थ आणून तो श्लोक म्हणावयास सांगितला. व तसा तो तिला म्हणतांहि आला, याचें तिला स्वतःलाहि आश्चर्य वाटलें. दुसऱ्या व तिसऱ्या विद्यार्थिनींनीं तर तो श्लोक खाड खाड म्हटला." अभ्यासाव्यतिरिक्त प्रत्येक मुलीची सुभाषितांची किंवा तिनें वाचलेल्या वाङ्मयांतील निवडक भागांची वही असली पाहिजे असा वामनरावांचा कटाक्ष असे. ते स्वतःहि आपल्या वाचनांत आलेलीं सुंदर वचनें, सुभाषितें, टाईम्समधील कोट्या वगैरे व्हरंड्यावरील फळ्यावर अधून मधून लिहून मुलींना उत्तेजन देत.

वामनरावांचा शुद्धलेखनावर किती कटाक्ष असे यासंबंधीं सौ. शांताबाई कानिटकर लिहितात—" बहुव्रीहि, आशीर्वाद अशासारखे ठराविक शब्द ते आम्हांस लिहिवयास घालीत, व ते चुकीचे लिहिले गेले म्हणजे इतके रागावत कीं भराभर आमच्या वह्या तांबड्या रेघांनीं सौभाग्यवती करून टाकीत."

कोणताहि विषय शिकवितांना त्याची तात्विक व मौलिक छाननी करण्याकडे

---

पान ११३ वरून चालू.

"रडायातेंहि जीवातें या लोकीं भाग्य लागतें." आतां निबंध न आणणाऱ्या मुलींना मी शिक्षा करणार आहे. कारण "वज्रादपि कठोराणि" असें झाल्याशिवाय भागणार नाहीं. घ्या, पुढच्या तासाचा निबंध 'नदी.' काय? इतक्या छोट्या विषयावर लिहितां येत नाहीं? अहो! "साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे." प्रयत्न करा. "उद्यमेनहि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः" "चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे" हं, घंटा झाली. चला. 'पुनरागमनायच' मात्र पुढल्या तासाला वही आणा हं!!! (यशवन्तः एप्रिल १९२९)

वामनरावांच्या मनाचा मूळ कल असल्यामुळें त्यांचें शिकविणें—पुष्कळ वेळां—सहाजीकच रुक्ष व सामान्य विद्यार्थिनींना न पेलण्यासारखें असावयाचें. पण हें ओळखूनच विनोदाची संधि आली रे आली कीं तिचा फायदा घेऊन वामनराव विद्यार्थिनींना हसवीत, व विषयाच्या अवघडपणामुळें येऊं पाहाणारा कंटाळा व नीरसपणा घालवून जिकडे तिकडे अवधानाचें व आनंदाचें वातावरण निर्माण करीत. हा विनोद सामान्यतः उच्च व प्रसंगोपात्त असे; पण कधीं तो साधी शाब्दिक कोटी असेल, कधीं श्लेष असेल, कधीं अनवधानतेमुळें किंवा विमनस्कतेमुळें उद्‌भवलेला असेल, कधीं मुद्दामच अप्रस्तुत प्रश्न विचारून व मुलींना खजील करून काढलेल्या खजाळीच्या रूपाचा असेल. त्याचें स्वरूप कांहींहि असेल, पण त्याचा परिणाम मात्र हंसरेपणा व खेळकरपणा उत्पन्न होण्यांत होई येवढें खरें.

वामनरावांच्या विनोदासंबंधीं व त्यांच्या एकंदर अध्यापनपद्धतीसंबंधीं प्रो० मायदेव लिहितात—" त्यांचा विनोद मलिन नसतो. प्रतिपक्षावर डाव उलटण्या-करितां गमतीचें विषयान्तर करून त्याच्यांत कांहीं गुंतवणारीं उत्तरें काढून घेऊन ते कोट्या करतात. त्यामुळें अगदीं लहान वर्गाच्या मुलींपासून त्यांच्या तासाचा कंटाळा वाटत नाहीं. नाहीं म्हणावयास मोरोपंत, वामन, सामराज अगर बखरकार यांचे सुसंगत अर्थ लावण्यासाठीं चाललेली धडपड वरच्या वर्गांतील विद्यार्थिनींनीं पाहिली म्हणजे त्यांस हसूं लोटतें. पण हें ते कांहीं संशोधनांत भर हमखास टाकावी या बुद्धीनें करीत नसून संशोधनवृत्ति चांगली व ती आपणांस लागावी, निदान विद्यार्थिनींत उत्पन्न व्हावी या हेतूनें. मुलींनीं बोलावें, विचार करावा, धीट व्हावें, येवढ्यासाठीं, आपल्यावर टीका होत असली तरी ते होऊं देतात, अडचणी दाखवितात, व अशा तऱ्हेनें आयुष्याची नकळत तयारी करून देतात."

वामनरावांच्या हसत-खेळत शिकविण्याच्या पद्धतीसंबंधीं कितीतरी विद्यार्थिनी मोठ्या कौतुकानें लिहितात. सौ. मुलाखे सांगतातः—" फर्स्ट इयरमधलीच गोष्ट. मोरोपंत का कोणातरी अवघड कवीची कविता चालू होती. वर्ग फारच कंटाळला होता. तात्या एकदम खिडकींतून बाहेर पाहूं लागले; किंचित् स्मित, डोळे कोणत्या-तरी विचारांत गुंगलेले, अगदीं स्तब्ध,—अशी त्यांची अवस्था झाली कीं समजावें आतां विनोदी किंवा गंभीर विषय निघणार! अशा वेळीं वर्गांतली गडबड बंद पडून वर्ग त्यांचेकडे एकचित्त पाहूं लागायचा. तात्या वर्गाकडे पाहून म्हणाले 'आतां तुम्हांला मी सगळ्यांना फसवूं का? सगळ्या फसणार बघा-तुम्ही! हं सांगा बरं

पटकन्–केशवसुतांचे वडील कोण ?—वर्ग अगदीं गहन विचार करूं लागला, व स्मृति हाताळून पाहूं लागला. अर्थात योग्य उत्तर जरा वेळानें आलें, व वर्ग हसला, उत्तेजित झाला आणि तात्या पुढें शिकवूं लागले. ”

बोर्डिंगमधल्या कामाच्या पाळीमुळें एकदां एका विद्यार्थिनीला शाळेंत यायला उशीर झाला. ती वर्गाचे दाराशीं येतांच वामनरावांनीं तिला नेहमींप्रमाणें हटकलेंच. ‘ तात्या, बोर्डिंगचं काम होतं, मी तरी काय करूं ? ’ असं ती रडव्या स्वरानें सांगूं लागली. ती गोरीमोरी झालेली व गोंधळलेली पाहून वामनरावहि गाभुळले, व तिला आपण विनाकारण दुखवलें, आतां तिला हंसविलें पाहिजे अशा विचारानें ते एकदम बोलून गेले ‘ बरं, या आंत; तुम्हाला कोणाची आली आहे भीती ! ‘ कामातुराणां न भयं न लज्जा ’ ‘ काम ’ शब्दावर ताबडतोब सुचलेली कोटी पाहून वर्ग व वामनराव–दोघेहि पोटभर हसले.

एकादे वेळीं आरंभ विनोदपूर्व होऊन त्याचें पर्यवसान मात्र गांभीर्यांत होई; आणि मग वर्गांत संमिश्र स्वरूपाचें वातावरण उत्पन्न होई. कु. बनुबाई देशपांडे सांगतात— “ दुसऱ्या वर्षांत होतों आम्ही. शाकुंतल चाललें होतें. झाडांना पाणी घालणारी शकुन्तला भुंग्याला भ्यायला नी आमच्या वर्गांत एक भुंगा यायला एकच गांठ पडली. मुलीच आम्ही ! भ्रमराच्या गुंजनगीताबरोबर इ–ई–उ–ऊ चें गीत न गातों तरच नवल ! पण समोर होते तात्या. ते म्हणाले ‘ कांहीं उपयोग नाहीं बरं या आविर्भावांचा ! कोणाहि दुष्यन्ताला धांवत यायची छाती नाहीं व्हायची. कारण तुमचा हा कण्व यात्रेला नाहीं गेला दूर, हा येथेंच तुमच्या रक्षणार्थ बसलेला आहे डोळ्यांत तेल घालून ! ’ ” पण आतां हा कण्व अन्त्य यात्रेला गेल्यावर गुंगणाऱ्या भ्रमरांचें आणि घुटमळणाऱ्या दुष्यन्तांचें निवारण कोण करणार ? बनुबाईंच्या मनांत निराळाच विचार डोकावतो. त्या उद्गारतात “ आणि खरंच; प्रत्येक पिता जर पूर्ण दक्षतेनें आपल्या कन्येचें लालन पालन करील तर कितीतरी निष्पाप शकुंतलांना विनालांछन जीवित सुखासमाधानाचें काढतां येईल. ”

वर्गांतील वातावरण विनोदी व खेळकर ठेवण्याचे कामीं वामनरावांच्या विमनस्कतेमुळें व विस्मरणशीलतेमुळें उद्भवणाऱ्या चुका व उडणारे घोटाळे हींहि उपयोगी पडत. कमळाबाई देशपांडे अशा एका प्रसंगाचें वर्णन करतांना लिहितात— “ हिंगण्याला कॉलेज असतां तात्या एकदां द्वितीय वर्षाचा तास घेण्यास गेले. एकहि मुलगी हजर नव्हती. रागारागानें परत आले. संध्याकाळीं शांताबाई भाटवडेकर

आदि मुलींना बोलावणें गेलें. मुली गेल्या. तात्या दीड वर्षाच्या शकूला मांडीवर घेऊन डोलवीत बसले होते. ‘ आज तासाला कां आलां नाहीं ? ’ तात्यांनीं विचारलं. ‘ आज तास नव्हता ’ मुली म्हणाल्या. ‘ नव्हता कसा ? होता. हें पहा वेळा-पत्रक. ’ तात्या वेळापत्रकाकडे बोट दाखवून म्हणाले. शांताबाई म्हणत ‘ मी खरींच गोंधळलें थोडा वेळ. ’ वेळापत्रकांत पांचवा तास मराठी असं लिहलं होतं. पण मग वर पाहिलं व म्हटलें, ‘ अहो तात्या, पण हें वेळापत्रक मागच्या सहामाहीचं आहे. ’ हें म्हटल्याबरोबर मुली व तात्या सर्वच हसूं लागलीं. ‘ जाऊं द्या झालं ! ’ तात्या म्हणाले, ‘ रोज वेळापत्रक न पाहतां जातों तेंच वरं होतं. ’ आज वेळा-पत्रकाकडे पहावयाचें त्यांना सुचलें, पण मागच्या सहामाहीचें वेळापत्रक काढून टाकायचें विस्मरण झालें होतें. पण याबद्दल न रागवतां आपणच तात्या ही गोष्ट वर्गांत सांगत व म्हणत ‘ आमचं हें असं होतं वरं ’ !” विस्मरणशीलता, प्रांजलपणा, वात्सल्य वगैरे सगळ्या गोष्टी कशा एकवट उमटल्या आहेत ! नाहीं ?

हा झाला तासाचा घोटाळा. आतां वर्गाचा घोटाळा—सौ. सुलाखे सांगतात तो पहाः—“ एकदां चुकून वर्गांत दुसऱ्या प्रोफेसराच्या तासाला स्वतःच आले. आम्ही म्हणालों ‘ तात्या, तुमचा तास नाहीं. ’ खुर्चीवरून उठतां उठतां म्हणतात ‘ काय, नाहीं का ? मला वाटतं सारखं याच वर्गावर यावं म्हणून आलों. ’ आहे कीं नाहीं वेळ मारून नेण्याची शैली ! ” फळ्यावरील दुर्बोध लेखन, विचित्र चित्रकला, टेबलावर काठी विसरणें, वगैरे कितीतरी बारीक-सारीक गोष्टी वर्गांतील वातावरण आनंदी राखण्यास हातभार लावीत.

याचा अर्थ वामनरावांना राग बिलकूल येत नसे असा नाहीं. विद्यार्थिनींनीं कांहीं अपराध केला—अभ्यासाकडे दुर्लक्ष केलें, शंका मनांतल्या मनांत कुजवत ठेवल्या, व विशेषतः प्रश्नांचीं उत्तरें दिलीं नाहींत म्हणजे वामनराव चांगले रागवत. आणि ते मुलींच्या शाळेंतल्या ऐवजी मुलांचे शाळेंत असते तर–मला वाटतें–छडीचा उपयोग करण्यापर्यन्तहि कधीं कधीं त्यांची मजल गेली असती. पण ते मुलींचे शाळेंत पडल्यामुळें राग व्यक्त करण्याचे मार्गहि त्यांनीं त्यांचेपासूनच उचललेले दिसतात. पण यांचा राग मात्र त्यांचे इतका कधीं लांवत नसे. काय चढायचा तो चढला कीं मलेरियाच्या तापाप्रमाणें ताबडतोब उतरून पार नाहींसा होई. त्यांतूनहि एखाद्या कारणानें तो तसाच कांहीं काळ धुमसत राहिला तर वामनरावांना आंतल्याआंत अतिशय त्रास होई, आणि मग रागाचें रूपान्तर दुःखांत होऊन तो दुसऱ्यावर

काढण्याऐवजीं ते तो स्वतःवरच काढीत व स्वतः व्यथित होत. कांहीं वेळानें मूळच्या पितृतुल्य प्रेमाला पुन्हां पान्हा फुटे आणि मग ज्याचेवर आपण रागावलों त्याचीच मनधरणी करायला ते लागत. अशा रीतीनें सुरुवात जरी दुःखान्त झाली तरी शेवट मात्र सुखान्त होऊन पुन्हां वर्गांत प्रेमळपणाचें व खेळकरपणाचें वारें वाहूं लागे.

वामनरावांच्या रागाची ही तऱ्हा कु० बडवे यांनीं चांगल्या तऱ्हेनें वर्णिली आहे. त्या लिहितातः–" तात्या शिकवीत असतांना मुलींनीं लक्ष न दिल्यास, किंवा एकादी मुलगी खिडकीबाहेर पाहात असल्यास, किंवा त्यांच्या प्रश्नाला उत्तर न मिळाल्यास तात्यांच्या रागाचा पारा चढलाच ! " तुम्हीं शिकावं असं तुम्हांला बंधन नाहीं, तुम्ही येथें येऊन बसतां तेच आमच्यावर उपकार ! मला मात्र शिकविलं पाहिजे, कारण मी पगार घेतोय ! मला काय ? मी लेक्चर देईन, मग तुम्ही ऐका, नाहींतर नका ऐकूं. तुम्हांला नको असल्यास मी बागेकडे पाहून बडबड करीन. " एवढ्यावरच भागत नाहीं, तर तात्या खिडकीबाहेर बघून बोलतात, व मुलींच्याकडे पाहण्याची वेळ आल्यास डोळे मिटतात. पण तुम्हांला असें वाटतें का कीं तात्यांचें असें शिकविणें शेवटपर्यन्त टिकणार ! तो तास संपला कीं झालें ! पुढच्या तासाला तात्यांचे लक्षांत राहतेंय कशाला ? तात्या रागवायचे सुद्धां विसरतात. उलट त्यांना वाईट वाटतें. व मुलींना प्रेमळपणें म्हणतात, ' मी मुद्दाम रागवायचें म्हणून रागावलो नाहीं. सहज झालें. तुम्हां मुलींना विचारायला नको, उत्तरें द्यायला नको, मग शिक्षकानें कसें शिकवावें ? ' वगैरे वगैरे. "

वामनराव रागवायचें विसरत हें सौ. मालतीबाई जोशी यांचेहि आठवणीवरून आपल्याला अगोदरच माहीत झालें आहे. बडवे म्हणतात तितकाहि राग त्यांना अगदीं प्रथम प्रथम येत नसे. त्यांना त्यावेळीं रागवायचें ठरवावें लागे. कु. बनुताई देशपांडे म्हणतात—" प्रेमळ पिता म्हणून ते प्रसिद्ध आहेत. पण आम्हीं तर त्यांना आईच म्हणत असूं ! रागावणें माहीतच नव्हतें त्यांना; पुष्कळ वेळां म्हणावयाचे सुद्धां ते कीं न रागावण्याचा हा दुर्गुण काढून टाकला पाहिजे मला ! पण अतिपरिचयानें धीट बनलेल्या आम्ही खुशाल सांगायच्या कीं तात्या आम्ही गेल्यावर करा हा नवीन प्रयोग. सध्यां नाहीं साधणार ! " आणि वामनरावांना रागावण्याचा हा प्रयोग जन्मांत कधींच साधला नाहीं.

आपण विनाकारण रागावलों, रागावण्यांत आपली चूक झाली असें दिसून

आल्यास वामनराव तावडतोब व प्रांजलपणें आपली चूक कबूल करीत. व आपण कां रागावलों असलों पाहिजे याचीहि चिकित्सा विद्यार्थिनींपुढें करीत. श्री. सुमित्रा सोहनी यांनीं—आगरकरांचा निबंध वर्गांत चालू असतांना त्यांत अंगवस्त्र शब्द आला तेव्हां अंगवस्त्र म्हणजे काय असें अगदीं भाबडेपणानें विचारलें. सुमित्राबाई खवचटपणानें विचारीत आहेत असें वाटून वामनरावांना अतिशय राग आला. वर्गांत जिकडे तिकडे शांत—अगदीं चिडीचीप झालें. पण दुसऱ्या दिवसापर्यन्तहि सुमित्राबाईंचा चेहरा तसाच उतरलेला राहिलेला पाहून वामनरावांनींच त्यांस त्याविषयीं विचारलें, आणि त्यांना खरोखरचीच ती शंका होती अशी खात्री झाल्यावर त्यांनीं आपण विनाकारण रागावल्याबद्दल खेद व्यक्त केला. व म्हणाले 'त्याचं असं होतं उमाणी, वड्याचं तेल उगीचच एखादे वेळीं वांग्यावर निघतें !'

शिस्त लावण्याचे व शिक्षा करण्याचे प्रसंग वामनरावांना फारसे कधीं येत नसत. पण जेव्हां ते येत त्या वेळचे त्यांचे मार्ग मात्र अभिनव असत. वर्गांतील निबंध लिहावयास मुलगी विसरली तर तिला म्हणत, 'आज जेवतांना भाजी खाऊं नका म्हणजे आठवण राहील.' परवानगी न घेतां घरीं जाऊन राहिल्याबद्दल त्यांनीं एकदां वसतिगृहांतील विद्यार्थिनींना दहा दहा रुपये दंड केला होता. पण पुन्हां दंड जास्त होतो असें वाटल्यामुळें एक रु. दंड कायम ठेवून नऊ रु. परत करणार असल्याची नोटीस काढली. रेसिडेन्सींत चोरी झाल्यामुळें एकदां सर्व खोल्यांची तपासणी केली व पुढें त्यासाठीं मुलींची दिलगिरी प्रदर्शित करणारी नोटीस बोर्डावर लावली. या गोष्टी ऐकून कमलाबाईनीं त्यांना विचारलें "तात्या हें काय ? आधीं जास्त शिक्षा करतां कां व मग ती मागें घेतां कां ? आधीं जास्त करूं नये पण एकदां पाऊल टाकल्यावर तें मागें घेऊं नये." हाच कमळाबाई व वामनराव यांत फरक. त्यांना प्रेस्टीज्‌ची कल्पना आहे यांना नाहीं. एखाद्या मुलीनें फारच मोठा अपराध केला तर वामनराव तिला वर्गांत उभें करीत. पण तिला फारच वाईट वाटूं नये म्हणून दुसऱ्या बसलेल्यांनाहि तिच्या जोडीला उभ्या करीत ! अन् मला वाटतें शेवटीं स्वतःहि उभे राहत असतील !

स्वतः वामनराव प्रिन्सिपल सेल्बीसारख्यांच्या शिस्तींत वागल्यामुळें व शिस्तीचे सुपरिणाम त्यांना त्या काळीं दिसले असल्यामुळें आपल्याहि विद्यार्थिनींनीं शिस्तीनें वागावें असें वामनरावांना वाटे. पण आधुनिक मानसशास्त्राच्या व शिक्षणशास्त्राच्या वाचनानें भीतीवर–दराऱ्यावर–आधारलेल्या या शिस्तींतील फोलपणाहि

त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहात नसे. शिवाय आपल्या पुढें मुली आहेत ही जाणीव, आणि थोडीफार स्त्रीदाक्षिण्याची कल्पना. वामनरावांच्या कौटुंबिक दुःस्थितीची कींव येऊन मुलीहि कॉलेजबाहेरच्या एरवींच्या वागण्यांत विशेष आपलेपणा दाखवीत. दिवसेंदिवस वामनरावांचें वय वाढे तर कॉलेजमध्यें येणाऱ्या विद्यार्थिनींची सरासरी वयोमर्यादा कमी कमी होई. आणि अर्थातच गुरुशिष्यांच्या वयांमधील अंतर वाढून मुलींना वामनरावांबद्दल पितृतुल्य प्रेम वाटे आणि वामनरावांना मुलींबद्दल वात्सल्य वाटे. या सर्वांचा परिणाम म्हणजे वामनरावांना विचारानें शिस्त हवीशी वाटे, पण तिच्या योगानें दोघांमध्येंहि परकेपणा उत्पन्न होत असल्यास ती मनांतून नकोशी वाटे. अशा रीतीनें बुद्धि आणि हृदय यांच्यांत वेळोवेळीं तेढ येत असल्यामुळें वामनरावांचें वर्तन कधीं अतिशय शिस्तीचें तर कधीं त्याच्या उलट म्हणजे ढिलेपणाचें असें होई. त्यांच्या या प्रेममूलक शिथिलतेचा फाजील फायदा सुजाण विद्यार्थिनी सहसा घेत नसत. पण एखादी अजाण विद्यार्थिनी तो घेणारीहि निघे, आणि त्या वेळीं मात्र वामनरावांना मोठें वाईट वाटे !

समजून न वागणाऱ्या विद्यार्थिनींचा दुसराहि एक प्रकार असे. आणि त्यांच्याहि वागणुकीचा वामनरावांना त्रास होई. मानवी जीवन हें बहुविध, बहुरंगी व संमिश्र स्वरूपाचें असून तें यशस्वी रीतीनें जगायचें व सुख लाधून घ्यावयाचें तर माणसाला त्याचे हे निरनिराळे प्रकार व हीं निरनिराळीं अंगें समजलीं पाहिजेत, आणि निरनिराळ्या नात्यांनीं—त्या त्या नात्याला अनुसरून—वागतां आलें पाहिजे. एकाच नटाला नाटकांतल्या निरनिराळ्या भूमिका कराव्या लागल्या असतांना तो वेष, विचार, भाषा, वागणूक वगैरेंत बदल करून वागला, तरच तो कुशल नट गणला जातो; तसं माणसाला संसारांत निरनिराळीं नातीं प्राप्त झालीं असतां तो त्या त्या नात्याच्या धर्माप्रमाणें वागला तरच तो व्यवहारकुशल मनुष्य समजला जातो. अशा प्रकारचे विचार वामनरावांचे असत; आणि ते स्वतः हीं निरनिराळीं नातीं ओळखून व या निरनिराळ्या भूमिका समजून घेऊन वागत. खाजगी खोलींत सर्वजण बरोबरीच्या नात्याचे. हाताखालचा शिक्षक असो किंवा कारकून असो—अगदीं स्वतःच्या पाठचा थोडा तरी तक्क्या त्याला टेकायला देतील. पण सुपरिंटेंडेंटच्या खुर्चीवर बसल्यावर मात्र विचारूं नका. तोच शिक्षक कचेरींत कामाला आला असल्यास तो उभा असतांनाच स्नेहसंबंधाची जाणीव न देतां पुढें आलेलें काम वामनराव उरकून टाकतील. जी गोष्ट शिक्षकांसंबंधीं तीच विद्यार्थिनींसंबंधीं.

शाळेबाहेरचें तिच्याशीं वागणें अगदीं आपलेपणाचें. पण तीच कचेरींत विद्यार्थिनी म्हणून आल्यास वामनरावांच्या अंगांत सुपरिंटेंडेंट संचारल्यावांचून राहणार नाहीं. वामनरावांचें हें भूमिकान्तर व वृत्त्यन्तर सामान्य बुद्धीच्या विद्यार्थिनींस सहसा आकलन होण्यासारखें नसल्यामुळें त्यांना आपल्या वागणुकींत योग्य तो फरक करतां येत नसे आणि त्यामुळें प्रिन्सिपल किंवा प्रोफेसर 'वामनरावांशीं' त्या घरोब्यानें व सलगीनें वागायला जातां तर उलट आप्त व इष्ट 'तात्यांशीं' त्या परक्यासारख्या भिऊन व भेदरून वागत. अशा विद्यार्थिनी अर्थातच फार थोडया असल्यामुळें सर्वसामान्य विद्यार्थिनींमध्यें वामनरावांसंबंधीं जो प्रेमादरभाव वसत असे त्याला कोणत्याहि रीतीनें कमीपणा येत नसे.

वरीलसारख्या कांहीं थोडया विद्यार्थिनी वामनरावांशीं तितक्या समरस झाल्या नसल्या तरी वामनरावांनीं आपलें मन कधींहि कलुषित करून घेतलें नाहीं. उलट अशाच विद्यार्थिनींस ते इतरांपेक्षांहि जास्त मदत करायला नेहमीं तयार असत. खुनशीपणा म्हणून त्यांस कसा तो खपतच नसे. वामनरावांत ही जी खऱ्या शिकाऱ्याची उमदी वृत्ति आली होती, तिला कारण त्यांची अभिजात खेळाडू वृत्तिच होय. ते जातिवंत खेळाडू होते. डेक्कन कॉलेजमध्यें असतांना ते टेनिसचे चँपिअन होते. डेक्कन कॉलेज सुटून पुढें विजापुरकरांच्या समर्थ विद्यालयांत त्यांचें प्रयाण झालें. ती राष्ट्रीय संस्था पडल्यामुळें तेथें टेनिस वगैरे विलायती खेळ खेळणें शक्य नव्हतें, तर देशी खेळांत त्यांची आवड प्रकट झाली. पुढें स्त्रियांच्या संस्थेंत येऊन पडले. तेथें त्यांच्या सारख्यांना खेळण्याची फारशी सोय नसली तरी स्वधर्माला अनुसरून बॅडमिंटन, पिंगपांग, कॅरम, व्हॉलीबॉल वगैरे जे कांहीं पुरुषी बायकी खेळ खेळायला सांपडतील ते खेळायला त्यांची नेहमीं तयारी असे. सुटीचे दिवसांत मुली वगैरे नसल्या म्हणजे हेंहि जुळायचें नाहीं; तेव्हां लहान मुलें गोळा करून 'सायमन सेज' हा खेळ खेळून ते त्यांच्या व स्वतःच्या जीवाची करमणूक करून घेत. आपली ही खेळाची आवड आपल्या विद्यार्थिनींमध्येंहि उत्पन्न व्हावी अशी वामनरावांची फार इच्छा. आणि त्यासाठीं जें जें कांहीं करणें शक्य असे तें तें केल्यावांचून ते रहात नसत. त्यांच्या या खेळण्यासंबंधीं आणि विद्यार्थिनींना खेळा-वयाला लावण्यासंबंधीं कितीतरी विद्यार्थिनींनीं आपल्या आठवणींतून लिहिलें आहे.

सौ. मुलाखे लिहितात, "इतके वयस्क होते तरी पेन्शनरसारखे आम्ही आतां निरिच्छ या जाणिवेनें किंवा तुच्छतेनें दुड्ढाचार्यासारखे कधींच वागायचे नाहींत.

उलट खेळतांना ते अगदीं तरुण होत. जोडीला प्रोफेसर असो, खेळांत प्रवीण विद्यार्थिनी असो कीं नवशिकी विद्यार्थिनी असो, किंवा अनोळखी पाहुणा असो —कोणाशींहि खेळतांना ह्यांची आपली एकतानता.'' निरनिराळ्या प्रकारच्या विद्यार्थिनींना खेळायला लावायला वामनराव निरनिराळ्या क्लृप्त्या योजीत. कु. मालू डोंगरे जरा नाटकी पद्धतीनें लिहिते " 'चला खेळायला येणार का ?' 'चला ना.' 'पांचाच्याबर तुम्ही पॉइंटस घेतलेत तर मी कॉफी देईन, नाहीं तर तुम्हीं द्यायचीत वरं, का !' खेळायला आले आहेत, आणि त्यांनीं पैज मारली नाहीं असं कधींच झालं नाहीं. पैजा मारायचे, मुद्दाम वाकडे–तिकडे बॉल्स टाकायचे, मुलींना चिडवायचे आणि मग म्हणायचे 'अहो असं कांहीं केल्या-शिवाय तुमचा खेळ सुधारणार नाहीं. तुम्हांला सहज पॉइंटस मिळत गेले तर मग काय'—तात्यांच्या या मोकळेपणामुळेंच त्यांचा प्रिन्सिपलपणा नाहीसा झाला होता.''

सगळ्या विद्यार्थिनींना खेळायला यावं या इच्छेनें जसे वामनराव सर्वांशीं खेळत तसेच हे 'अमकीबरोबर मात्र खेळतात, आमकीबरोबर खेळत नाहींत' अशी पार्शालिटी कोणाला दिसूं नये, पेट—नापेट भावना मुलींत उत्पन्न होऊं नये म्हणूनहि ते सर्वांशीं खेळत. वास्तविक ते सर्वांशीं सारखे वागत, त्यांना सर्व विद्यार्थिनी सारख्याच–मुलीप्रमाणें–वाटत असूनहि सौ. मुलाखे म्हणतात " कांहीं विद्यार्थिनींचा तात्यांच्यावर पार्शल म्हणून आरोप असे आणि एखादी गोष्ट डावं-उजवं दाखवण्यासारखी त्यांच्या हातून घडतहि असे.'' स्वतःच्या बाबतींतच एकदा वामनरावांचे हातून पॉर्शलिटी कशी झाली हें सांगून त्या पुढें म्हणतात " पण तात्या ती हेतुपुरःसर करीत नसत. आई मुलांना सारख्याच प्रेमानें वागविते. पण मुलांना वाटतेंच ना कीं आई डावं उजवं फार करते. पण ती कांहीं तें मुद्दाम करीत नाहीं. तें तिच्या गांवींहि नसतें. थोडीफार पॉर्शलिटी होणं हा मनुष्य धर्म आहे.'' उषाबाईंची स्थिति सुद्धां थोडीशी वामनरावांसारखीच झालेली दिसते !

वामनराव स्वतः विवादपटु असल्यामुळें व विद्यार्थिनींनाहि ती कला अवगत असावी असें त्यांस वाटत असल्यामुळें कॉलेजमधील डिबेटिंग सोसायटीमध्यें ते पहिल्या पहिल्यांदा बराच पुढाकार घेत असत; आणि याचा परिणाम म्हणून कमलाबाई देशपांडे, कृष्णाबाई मोटे, कृष्णाबाई वैशंपायन, दुर्गाबाई जोशी, मालती-बाई बेडेकर, गंगूबाई पटवर्धन इत्यादि त्यांच्या पहिल्या पहिल्या विद्यार्थिनींनीं

वक्तृत्वांत बरेच नांव कमावलेलें आहे; पण आतांशें अशा सोसायटयांना सर्वत्रच जें कृत्रिम स्वरूप येत चाललें आहे तें पाहून, हल्लींच्या वर्तमानपत्रें, रेडीओ यासारख्या साधनांचे काळांत वक्तृत्वाचें व वादविवादपद्धतीचें पूर्वीचें माहात्म्य मर्यादित होणारच असें मनाशीं ओळखून व खरें म्हणजे विद्यार्थिनींची त्यासंबंधींची उदासीनता पाहून वामनरावहि अलीकडे या बाबतींत जरासे उदासीनच झाले होते. निरनिराळ्या विषयांतील तज्ञ व नाणावलेले वक्ते बोलवून त्यांचीं भाषणें–व्याख्यानें वगैरे करविण्यांत मात्र त्यांचा पूर्वीचा उत्साह कायम असे.

सहलींचे बाबतींतला उत्साहहि त्यांचा तसाच कायम असे. बरोबरीच्या मंडळींपैकीं कोणी येवोत–न येवोत, वामनराव मात्र नेहमीं एका पायावर तयार. अशा गोष्टी शालेय जीवनांत अभ्यासाइतक्याच महत्त्वाच्या आहेत; त्यांचे योगानेंच माणसाचें खरें शिक्षण होत असतें; त्यांनीं व्यवहाराचें, समाजाचें, मानवी स्वभावाचें ज्ञान वाढतें व विशेष म्हणजे शिक्षक आणि विद्यार्थी यांना परस्परांसंबंधींचें खरें ज्ञान अशाच प्रसंगानें होतें व त्याचाच उपयोग पुढें शिकण्यांत व शिकविण्यांत होतो असें वामनरावांना मनापासून वाटे. शक्यतों सर्व विद्यार्थिनींना सहलींत भाग घेतां यावा अशाबद्दल वामनरावांची खटपट असून त्यांच्या ज्या कांहीं अडचणी असतील त्यांचा निरास करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. गरीब विद्यार्थिनींची मुख्य अडचण म्हणजे पैशाची. पण तीहि ते हस्तें–परहस्तें भागवून त्यांना उल्हसित करीत. अशा प्रसंगीं वामनरावांच्या काव्यशास्त्रविनोदाचा व त्यांच्या आप्तोचित जिव्हाळ्याच्या वागणुकीचा जो कांहीं आनंद होई त्याचें आणि विशेषतः त्यांच्या जीवनांतील धीरोदात्त प्रसंग ऐकून जी कांहीं स्फूर्ति मिळे तिचें वर्णन सौ. लेले यांनीं आपल्या आठवणींत केलें आहे. पण विस्तारभयास्तव तें येथें देतां येत नाहीं.

वामनराव येरंडवण्यास कॉलेजचे आवारांतच राहात असल्यामुळें व विद्यार्थिनींचे स्थानिक पालकहि तेच असल्यामुळें विद्यार्थिनींचें त्यांचेकडे जाणें–येणें बरेंचसें असे. वामनरावहि चार मंडळींतले, माणूस यावेसें वाटणारे, व मनाचे प्रेमळ असल्यामुळें विद्यार्थिनी आपल्याकडे कारणपरत्वें आल्यास त्यांस आनंदच वाटे. मुलींनाहि अशा घरगुती वातावरणांत व अनौपचारिक रीत्या त्यांच्याशीं गप्पा वगैरे मारण्यांत, काव्यशास्त्रविनोद करण्यांत, व त्यांनीं दिलेल्या खाद्यपेयांचा अधूनमधून आस्वाद घेण्यांत आनंद व अभिमान वाटे. या सर्वांचा परिणाम स्वाभाविकतःच असा झाला होता कीं, रागावणें, चिडणें, रागें भरणें, उभें करणें वगैरे त्यांच्या वर्गांतील कृतींचें

मुलींना वाईट वाटलें तरी वामनरावांबद्दल वाटत असलेलें प्रेम व आदर हीं त्यांचे मनांतून कधींच नष्ट होत नसत. उलट त्यांना ते हवेहवेसे वाटत. वामनराव कांहीं तास बोलले नाहींत, कांहीं काळ दिसले नाहींत, त्यांनीं नेहमीसारखी थट्टा-मस्करी केली नाहीं, विनोद केला नाहीं तर विद्यार्थिनींना सुनें व चुकल्यासारखें वाटे. कारणपरत्वें आलेला तो पित्याचा प्रेमळ राग संपल्याबरोबर वामनरावांनाहि विद्यार्थिनींबद्दल मातेची काळजी वाटूं लागे, व त्याच काळजीनें ते त्यांचें शिक्षण, पालन, संगोपन करीत. विद्यार्थिनींचीहि त्यांच्याशीं वागणूक कन्योचित प्रेमाची असे. पण यासंबंधीं आतां स्वतः न लिहितां त्याच्या विद्यार्थिनींचे बोलच सादर करतों. कु. मालू डोंगरे लिहितेः—

" अगदीं शेवटचा परंतु अगदीं अविस्मरणीय प्रसंग म्हणजे सगळ्या परीक्षा आटोपल्या होत्या, परंतु गाण्याची तेवढीच शिल्लक राहिली होती. वसतिगृहांत फक्त आम्ही दोघीच जणी होतों. अर्थातच बराचसा वेळ तात्यांच्याकडेच जात असे. एक दिवस तात्या सकाळीं गांवांत निघाले. आम्हीहि गेलों अर्थातच. संध्याकाळीं नेहमींप्रमाणें तात्या बागेंत दिसेनात. आंत जाऊन पाहिलं तर तात्या अंथरुणावर. सकाळीं बैलगाडी आणि सायकलच्या टकरींत बरंच लागलं होतं त्यांना. मीं म्हटलं, ' तात्या, तुम्ही आज इथंच जेवा. मी पान वाढून आणत्यें. ' पण तात्या कसले ऐकायला ! ते तस्से वसतिगृहांत आले.

दुसऱ्या दिवशीं आम्ही जायला निघालों. तात्या म्हणत होते, ' लौकर जा स्टेशनवर, उगीच उशीर करूं नका, तेवढाच ताण पडतो मनाला. उगीच त्रास कशाला करून घ्यायचा ? टांगा वगैरे सांगितलात का ? उशीर होईल नाहींतर. ' आजारी असतांनाहि काय काळजी ही ! आणि दुसरें काळजी करायला लागलें कीं म्हणायचं ' अहो, आज तुम्ही काळजी घ्याल, पण उद्यां तुम्ही गेल्यावर......? '

हीच शेवटची भेट तात्यांची. सुटीहून परत आलें. बाग तशीच फुलली होती, छोटासा झरा तसाच वाहात होता. सगळं जसंच्या तसं होतं. फक्त या वातावरणांत आनंद, उत्साह निर्माण करणारी, घरापासून दूर राहिलेल्या आम्हा मुलींना घरची जाणीव न होऊं देणारी एक व्यक्ति मात्र नाहींशी झाली होती. एक व्यक्ति नाहींशी झाल्यानें जगांत बदल घडत नसेल, पण आमच्या या छोट्याशा जगांत मात्र निःसंशय बदल झालाय ! "

श्री. ताराबाई परांजपे लिहितातः—" पुढच्या वर्षी तात्या कॉलेजवर नाहींत ही

कल्पनाच असह्य होत असे आम्हांला त्या वेळीं; पण आज ? आज तर तात्या कुठें कुठें दिसायचे नाहींत जगांत. लहान पोरासारखं कितीदां तरी वाटतं अजून यायचेच आहेत तात्या मुंबईहून ! हो, त्या दिवशीं जातांना ते म्हणाले नव्हते का 'सोमवारचा तास घेणार आहें मी मानसशास्त्राचा; हं. सांगा मुलींना. वाढवावा लागेल दीड महिना !' किती आनंद झाला होता आम्हांला. आणि तात्यांनींसुद्धां किती झपाट्यानीं सुरुवात केली होती मानसशास्त्र शिकवायला ! पण त्यांच्यासारखे कळकळीनें शिकविणारे गुरु लाभायला आमच्या पुण्याईची तुटपुंजी शिदोरी अगदींच अपुरी पडली ! तात्या, तुमच्या मनासारखं वागतां आलं नाहीं आम्हांला कित्येकदां, म्हणून का तुम्ही इतक्या लौकर निघून गेलांत ? छे ! असं कसं म्हणूं मी ? तात्या, तुम्ही कधींच मुलींचा कंटाळा करणार नाहीं. तुम्हीच नव्हता का एकदां म्हणालांत 'मुली इथं असल्या, त्यांना इकडे तिकडे वावरतांना बघितलं म्हणजे बरं वाटतं जरा !' "

कॉलेजचें शिक्षण संपलें म्हणजे कांहीं ना कांहीं मुली दर वर्षी जायच्याच. पण असल्या या वार्षिक प्रयाणांचें दुःख सुद्धां वामनरावांना व विद्यार्थिनींना इतकें कांहीं असह्य होई, आणि एकमेकांविषयीं वाटणाऱ्या त्यांच्या प्रेमादराचा उद्रेक अशा कांहीं हृदयद्रावक रीतीनें होई कीं 'यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं' या कण्वोक्तीची आठवण होऊन तिऱ्हाइताचेहि डोळे पाणवावेत ! "तुम्ही जाणार म्हणून वाईट वाटतं; पण तुम्ही न जातां इथंच राहिलांत तरी कुठं बरं वाटणार आहे ? आणि एकादे वेळीं वाटलं तसं तरी तें बरं कसं दिसेल" अशी कांहींशी विनोदात्मक व उसन्या अवसानाची ते सुरुवात करतील, उपरण्याचा बोळा तोंडापाशीं धरीत ते आपलं बोलणं तसंच कांहीं वेळ चालूं ठेवतील, अवसान संपत आलं असं ओळखून 'यानि अस्माकं सुचरितानि, तानि सेवितानि, नो इतराणि' अशासारख्या एकाद्या सुभाषितानेंहि पुढें कांहीं बोलूं पाहतील, पण तेवढ्यांतच दुःखावेग असह्य होऊन गळा दाटून आल्यामुळें ते गप्पदिशीं खुर्चीत बसतील ! पहिल्यापहिल्यांदा निरोपा-निरोपीचीं हीं भाषणें समारंभाच्या सुरुवातीला होत; पण हा असला प्रकार होऊं लागल्यापासून काय जें खायचें-प्यायचें तें अगोदर करून नंतर हीं भाषणें होऊं लागलीं. आणि तेंहि ठीकच झालें; कारण वामनरावांचें शेवटीं होणारें भाषण ऐकून व त्यांची तसली स्थिति झालेली पाहून पुढें कोणालाच कांहीं सुचणें शक्य नसे. वामनरावांचीं दर वर्षाचीं हीं शेवटचीं भाषणें प्रसंगस्फूर्त, प्रसंगोचित, पात्रानुरूप, थोडक्यांत व अत्यन्त परिणामकारक होत.

"पार्टी रात्रीं चांदण्यांत व बागेंत होती." सौ. सरलाबाई कर्वे लिहितात, "इतरांचीं बोलणीं होऊन तात्या बोलायला उठले, व म्हणाले 'मुलींनो, या चांदण्याप्रमाणें वृत्ति शांत आणि या वृक्षलतांच्या कोंबाप्रमाणें मन उल्हसित ठेवा कीं कोठेंहि जुन्या नव्या वातावरणांत सुखी व्हाल.'" हें झालें पार्टिंग् फीस्टच्या वेळचें. आतां इतर वेळचें श्री. बखले लिहितात, "आम्ही निरोप घेण्यास गेलों तेव्हां त्यांनीं बराच वेळ गोष्टी केल्या व शेवटीं 'निरंतरच्या आयुष्यांत आपले समकालीन मित्र नेहमीं सारख्या परिस्थितीत राहतात असें नाहीं. त्यांपैकीं कांहीं जर दुर्दैवानें खालीं घसरले तर तें पाहण्यासारखें दुःख नाहीं. तरी तुम्ही खालच्यांच्याकडे नेहमीं प्रेमाच्या व सहानुभूतीच्या नजरेनें पाहण्याच्या प्रयत्न करा,' असा उपदेश केला."

कु० बनुबाई देशपांडे लिहितात–"शेवटचा तास होता तो कॉलेजांतला. सगळे विषय शिकून–नव्हे शिकवून–झाले होते. कुठें एकादे प्रोफेसर एकादं अडित सांगायचे कधींमधीं! असंच कांहीं अडलेलं विचारायला बोलावलं होतं आम्हीं तात्यांना. शंका समाधान झालं. संपलं तें निर्दोष आयुष्य, आणि वामनरावांनीं जातां जातां आशीर्वाद दिला 'विजयी व्हा. पण असमाधानी रहा.' आम्ही आश्चर्यचकित झालों तें ऐकून. हा का आशीर्वाद? हा तर शाप! पण तात्यांनीं ओळखला आमचा गोंधळ आणि ते म्हणाले 'निष्क्रीय निराशावाद्यांना माझा आशीर्वाद शापासारखा वाटेल हें कळतं मला. पण कर्तृत्ववान व्यक्तींनीं तो आशीर्वाद आशीर्वादच मानला पाहिजे. कारण शांति, समाधान, तृप्ति हीं कर्तृत्ववान व्यक्तीला माहीतच नसतात. अंगीं वकूब नसलेलीं माणसें मिळेल तेवढ्यांत समाधान मानून स्वस्थ बसतात. पण कांहीं करण्याची धमक असलेल्या माणसाला कितीहि मिळालें तरी आणखीची हांव केव्हांहि असणारच. जगाची आजची प्रगति या अशांतीनेंच झाली आहे. आणि म्हणून विचारपूर्वकच हा आशीर्वाद मी माझ्या विद्यार्थिनींना देत आहे." आणि असा कर्तृत्वशाली बनविणारा आशीर्वाद सद्भाग्यानें ज्यांना लाभतो त्यांना खरोखरच कधीं तृप्ति मिळणार नाहीं–"

श्री. ताराबाई परांजपे लिहितात "परवां सहज जुनी रोजनिशी चाळली. वीस जानेवारी १९४३! त्या पानावर तात्यांच्या वाढदिवशीं त्यांचा संदेश घेतला होता मीं 'जगांत गैरवर्तनापेक्षां गैरसमज अधिक आहेत. माणसें जितकीं चांगलीं वाटतात, तेवढी चांगलीं नसतात, वाईट दिसतात तेवढी वाईटहि नसतात!'

किती सत्य आहेत त्यांचे हे लाखाचे बोल ! आणि असल्या या गैरसमजांच्या जाचाला कंटाळूनच कीं काय तात्या आमच्यांतून निघून गेले ! ”

नू० म० विद्यालयाचा विद्यार्थी चि. प्र. नी. नवरे यांनीं वामनरावांच्या घरीं जाऊन त्यांचा संदेश लिहून मागितला असतां ते लिहितातः–“ मुलांनीं लहानपणापासूनच ध्येय ठरवावें असें म्हणतात, पण हें मला पटत नाहीं. अनुभव नाहीं, विचार नाहीं, जगाचें ज्ञान नाहीं, भविष्यकाळाविषयीं स्पष्ट कल्पना नाहीं, अशा स्थितींत ध्येय कोण कसें ठरविणार ?

पण एका अर्थी ध्येय ठरवितांहि येईल ‘ मी आपल्या वेळेचा सदुपयोग करीन, अभ्यास चांगला करीन, चोरी–चहाडी करणार नाहीं, आईबापांना, आप्तेष्टांना वगैरे सुख देईन, शक्य तों दुसऱ्याच्या उपयोगीं पडेन, अपशब्द बोलणार नाहीं, पुढें ज्या कोणत्या परिस्थितींत असेन त्या परिस्थितींत आपत्तींना न डगमगतां उद्योग करीत राहीन आणि शक्य ती समाजसेवा करीन. ’ अशा प्रकारचें ध्येय केव्हांहि ठरवितां येईल किंबहुना ठरविलेंच पाहिजे. ” साध्या भाषेचा, उच्च पण व्यावहारिक विचाराचा, विचारणाराच्या मनोवृत्तीला नेमका मानवणारा आणि सांगणाराच्या व्यक्तिमत्त्वाचें प्रतिबिंब उमटलेलें असलेला किती साधा व सुंदर संदेश आहे हा !

साहित्यसेवा सोडल्यास अध्यापन हेंच वामनरावांचें दुसरें महत्त्वाचें कार्य उरतें. तें ते सतत दोन तपांवर करीत होते. आणि म्हणून त्या कार्यांतील त्यांचें वैशिष्ट्य, गुण–दोष इत्यादींचें इतक्या पाल्हाळानें वर्णन केलें. या २५ वर्षांपैकीं ६ वर्षें हिंगणें येथील महिलाश्रम हायस्कुलावर मुख्याध्यापक व दोन वर्षें येरंडवणें येथील महिला पाठशाळा कॉलेजवर प्राचार्य ( *Principal* ) अशीं एकंदर आठ वर्षें त्यांनीं प्रमुखाचे नात्यानें व्यवस्थेचें काम केलें. विषयशिक्षकाच्या किंवा वर्गशिक्षकाच्या अंगीं जे गुण असावयास पाहिजेत ते सर्व गुण प्रमुखाचेहि अंगीं असावयास पाहिजेत. पण शिवाय पालक, जनता व सरकार यांच्याशीं त्याचा संबंध येत असल्यामुळें या तिघांशींहि त्याला नीट वागतां यावें लागतें. आपल्या मुलींना वामनराव उत्तम शिकवतात येवढेंच नव्हे तर ते त्यांना अगदीं घरोब्यानें वागवतात असा सर्व पालकांचा अनुभव असल्यामुळें ते त्यांचेवर एकजात खूष असत. वामनराव हे एक मोठे नामवंत साहित्तिक, देशसेवक, स्वार्थत्यागी, वागणु-

कीला सरळ आणि सौजन्ययुक्त आहेत अशी त्यांची ख्याति असल्यामुळें सर्व-सामान्य जनतेलाहि त्यांचेविषयीं नितान्त आदर वाटत असे.

वामनराव सुपरिंटेंडेंट असतांना त्यांचा व सरकारी खात्यांतील इन्स्पेक्टर वगैरे तपासनीसांचा वार्षिक तपासणीचे वेळीं कधीं मधीं संबंध येई; पण दोष काढणें येवढेंच आपलें मुख्य कर्तव्य अशी त्या काळच्या बहुतेक तपासनीसांची कल्पना असल्यामुळें, आणि त्यांनीं दाखविलेले दोष वामनरावांना पूर्णपणें पटत नसल्या-मुळें त्या लोकांचें आणि वामनरावांचें फारसें सूत नसे. नाहीं म्हणावयास त्यांच्या वेळचे शिक्षणखात्याचे मुख्याधिकारी ( *D. P. I.* ) ग्रीव्ह साहेब यांना स्वतःला वामनरावांच्या सरळ मनोवृत्तीबद्दल व स्पष्टवक्तेपणाबद्दल विशेष आदर वाटे, आणि पुढें जेव्हां जेव्हां ते भेटत तेव्हां तेव्हां वामनरावांची विचारपूस आठवण-पूर्वक करीत. वामनराव सरकारी टेक्स्टबुक कमिटीवर कांहीं वर्षें होते, पण त्यांचीं व्याकरण, शुद्धलेखन इत्यादि संबंधींचीं मतें तेथें पचण्यासारखीं नसल्यामुळें ते तेथें फार दिवस राहूं शकले नाहींत.

मुंबई युनिव्हर्सिटीच्या सीनेटवर फेलो म्हणून निवडून येण्याची वामनरावांची इच्छा असे–तसा त्यांनीं एकदां प्रयत्नहि केला होता. पण पुष्कळशा निवडणारांना त्यांचे ठिकाणीं गुणच अधिक दिसल्यामुळें त्यांनीं त्यांना निवडून दिलें नाहीं. अर्थात वामनरावांनीं *worth makes a man & want of it a fellow* असें म्हणून तेवढ्यापुरतें स्वतःचें समाधान करून घेतलें. मराठी विषयाचे परीक्षक म्हणून मात्र मॅट्रिकपासून एम्. ए. पर्यन्तच्या सर्व परीक्षांत त्यांची नेमणूक झालेली असून पीएच. डी. आणि तर्खडकर प्राइझ याकरितां सादर केलेल्या प्रबंधांची व पुस्त-कांची योग्यायोग्यता ठरविण्याकरितांहि त्यांची योजना होत असे. हें झालें वामन-रावांच्या मुंबई युनिव्हर्सिटीशीं असलेल्या संबंधासंबंधीं. भारत महिला विद्यापीठाचे तर ते एक मुख्य घटकच होते. प्रथम प्रथम निवडणुकींत निवडून येण्याच्या हक्कामुळें व नंतर प्रिन्सिपलच्या स्वयंसिद्ध हक्कामुळें ते या विद्यापीठाच्या सिंडिकेटवर व बोर्ड ऑफ स्टडीजवर पुष्कळ वर्षें असत. पण प्रमुख गणल्या गेलेल्या सभासदांचे युनिव्हर्सिटीसारख्या उच्च व उदार शिक्षणाकडे पाहण्याच्या व्यापारी दृष्टीमुळें, त्यांच्या वणिक्वृत्तीमुळें व विद्यापीठाच्या अतिमंद व तांत्रिक कार्य-पद्धतीमुळें वामनराव असंतुष्ट असत. उलट वामनराव हे एक तत्त्वज्ञानी, नुसते पुस्तकपंडित, व्यवहारानभिज्ञ आहेत अशी सभासदांपैकीं बहुतेकांची समजूत

असल्यामुळें ते त्यांची फारशी वूज राखीत नसत. एवंच, दुसऱ्या विद्यापीठांमध्यें वामनरावांना जो मान होता तो त्यांच्या स्वतःच्या विद्यापीठांतच त्यांस नव्हता. प्रथम प्रथम थोडासा कुठें असलाच तर शेवटीं शेवटीं तो नाहींसा झाला; आणि अगदीं शेवटीं तर अजिवात नाहींसा होऊन वर मानहानि झाली !

वामनराव हिंगणें येथील शाळेंत मुख्याध्यापक असतांना त्यांचे व त्यांच्या हाताखालील शिक्षकांचे संबंध अगदीं आदर्शवत् असत. वयानें, ज्ञानानें, अनुभवानें, कीर्तीनें-सर्वच गुणांनीं ते त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें त्यांचेबद्दल सर्वत्रांना गाढ आदर वाटत असे. उलट वामनरावांचेंहि आपल्या शिक्षकांवर पाठच्या भावासारखें प्रेम असे. शिक्षकांशींचसे काय–कारकून शिपाई, गडी यांच्याशींहि त्यांचे संबंध तितकेच प्रेमाचे व जिव्हाळ्याचे असत. आपल्या समजूतदारपणानें, सहानुभूतिपर धोरणानें, समानतेच्या वागणुकीनें ते सर्वांनाच सारखे प्रिय वाटत. पण वामनरावांचा दरारा व भीतीहि तितकींच वाटत असल्यामुळें त्यांच्या प्रेमळ व घरगुती वृत्तीचा फायदा कोणींहि सहसा घेऊं धजत नसे. अशा संबंधांच्या जोरावर वामनरावांनीं कितीतरी सुधारणा आपल्या आमदानींत घडवून आणल्या. येरंडवणें येथील कॉलेजांत ते शेवटीं प्रिन्सिपल झाले तेव्हां मात्र ही स्थिति बऱ्याचशा प्रमाणांत पालटली. पहिल्यांदा खांद्याला खांदा भिडवून काम करणारे कांहीं सहकारीच पुढें फटकून व फुटून वागूं लागले, आदर करणारे अनादर करूं लागले. कांहीं थोड्या प्रोफेसरांत जरी असें वृत्त्यंतर घडलें तरी बाकीचे प्रोफेसर व विशेषतः कारकून, शिपाई गडी वगैरे हे मात्र वामनरावांची आठवण सदैव मोठ्या कृतज्ञतेनें मनांत बाळगतील यांत शंका नाहीं.

आतां शेवटीं एक—दोन पेंचप्रसंगांचा व वामनरावांच्या त्या वेळच्या शिताफीच्या वागण्याचा ओझरता उल्लेख करून हें लांबलेलें प्रकरण पुरें करूं. त्यांचे सन्मान्य मित्र सेनापति बापट आपल्या वामनरावांवरील लेखांत लिहितातः–

" एकदां जोशीबुवा मला म्हणाला—अरे बापट, तुला एक गुपित सांगतों. चळवळीचे नेत्यांत माझे स्नेही आहेत, तुझे स्नेही आहेत; एक दिवस आले कांहींजण मजकडे व म्हणाले जोशीबुवा—आमच्या बैठकीला आजच्यापुरती कुठली तरी जागा मिळवून द्या—हें पहा बापट, मीं विचार केला, हीं माणसें इतकीं तळमळीनें काम करीत आहेत, अवघड काम–मला न होण्यासारखें काम; बैठकीला जागा मागत आहेत. दिली पाहिजे मिळवून. एवढा तरी भाग या देशकार्यांत आपला

असावा—असा विचार करून मिळवून दिली जागा मीं. सरकारच्या डोळ्यांस हें दिसलें असतें तर!—मनानें त्या परिणामाची तयारी करूनच मीं पाऊल टाकलें होतें. परंतु परिणाम कांहीं झाला नाहीं हेंच बरें झालें; नाहींतर माझ्या या सोवळ्या अंगीकृत कार्यावर आपत्ति येण्याचा संभव होता. डोळ्यादेखत पाहिल्याचें पातक लागायला नको म्हणून वामनराव घरांतून बाहेर निघून गेले–"

१९४२च्या ९ ऑगस्टच्या काँग्रेस चळवळीत विद्यार्थिनींनीं कॉलेजवर निरोधन केलें त्यासंबंधांत कु. लीला मोघे लिहितातः—"त्यांच्या जीवनसागरावर आजपर्यन्त अनेक वादळें होऊन गेलीं. त्यांतून त्यांनीं आपली व इतरांचीहि विचारनौका सुरक्षितपणें तारून नेली. त्यांच्याभोंवतीं असलेल्या आम्हां विद्यार्थिनींच्या त्यांना प्रिय असलेल्या चिमुकल्या जगांतहि नुकतेंच असें एक वादळ होऊन गेलें. काँग्रेसच्या चळवळीला सहानभूति म्हणून आम्हीं बरेच दिवस कॉलेजवर निरोधन केलें, आणि तात्यांसारख्या प्रेमळ प्रिन्सिपॉलला त्रास दिला. त्या वेळीं तात्या मोठ्या पेंचप्रसंगांत सांपडले होते. एकीकडे विद्यार्थिनींचें तर कौतुक करावयाचें, आणि पालकांचा रोष तर पत्करायचा नाहींः विद्यार्थिनीचें हित साधण्याची तर तळमळ, पण युनिव्हसिटीचे नियम व स्वतःची शिस्त तर पाळायला लावायची; सरकारची सहानभूति तर गमवायची नाहीं, पण स्वातंत्र्य तर हवं. प्राप्त परिस्थिति बिकट होती, आणि भावी काळाविषयीं तर अनिश्चितता! अशा या पेंचप्रसंगांतूनहि तात्यांनीं आपल्या गोड वाणीनें व प्रेमळ वृत्तीनें सुवर्णमध्य गांठला!"

# हिंगणें आश्रमांतील जीवन



१९१८ ते १९३६ पर्यंत म्हणजे सुमारे आठरा वर्षें वामनराव हिंगण्याच्या माळावर राहिले. प्रेमळ व कर्तव्यदक्ष पत्नी, निरोगी व खेळकर मुलेंबाळें, मायाळू आप्तेष्ट, जिवश्चकंठश्च मित्र, वेळप्रसंगी मदत करणारे शेजारीपाजारी, पडलेलं काम करायला हाताशीं दोन गडीमाणसं, मनाजोगतं व थोड्याफार मानाचें काम, नोकरीची शाश्वती, बेताचेंच पण निश्चित उत्पन्न, पुढें-मागें मोकळें आवार असलेलीं लहानशी पण स्वतंत्र जागा, खेडवळ पण निसर्गशुद्ध वातावरण वगैरे ज्या ज्या गोष्टी संसार सुसह्य आणि सुखाचा करायला कारणीभूत होतात, त्यांपैकीं बऱ्याचशा वामनरावांना या काळांत लाभल्या होत्या. आणि म्हणून हिंगण्यास येण्यापूर्वीचा त्यांचा काळ व ते हिंगणें सोडून गेल्या नंतरचा काळ या दोहोंशीं तुलना करतां वामनरावांचा हिंगण्याचा काळ आनंदाचा आणि समाधानाचा गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. आठरा वर्षांच्या या काळांत त्यांना कसलेंच दुःख सोसावें लागलें नाहीं असें अर्थातच नाहीं. हिंगण्यास आल्यापासून वर्षादीडवर्षांनींच त्यांची पत्नी निवर्तून मुलाबाळांची जबाबदारी त्यांचे अंगावर पडली. पुढें दहा वर्षांनीं थोरले बंधू आण्णा निवर्तून त्यांना भ्रातृवियोगाचें दुःख भोगावें लागलें; जेवणाखाण्याची आबाळ होऊन प्रकृति बिघडायला लागली; संस्थेवर भांडणाचे प्रसंग व पैशाच्या

अडचणी आल्यामुळें मानसिक अस्वास्थ्य वाढूं लागलें; अशांसारखीं दुःखें याच काळांत वामनरावांवर आलीं, नाहीं असें नाहीं. पण एकंदर सुखदुःखांचा भागाकार करतांना असल्या दुःखांना संक्षेप वसून तीं उडून जातां शेवटीं सुखाचाच अंश वामनरावांचे पदरांत जास्त प्रमाणांत पडला, असें म्हणावयास हरकत नाहीं. सर्व सुखदुःखांचा आढावा घेतांना हिंगण्याचा काळच आपल्या जीवनांत जास्त आनंदाचा गेला असें वामनराव स्वतःहि म्हणत.

त्यांतल्या त्यांत अत्यन्त आनंदाचा काळ म्हणजे वामनरावांचा पत्नीसमवेतचा वर्षभराचा हा होय. वामनरावांचा विवाह १९०२ सालीं म्हणजे वयाच्या विसाव्या वर्षी झाला होता हें मागें आलेंच आहे. त्यांच्या पत्नीचें नांव अन्नपूर्णा असें असून त्यांचा जन्म पनवेल तालुक्यांतील गुळसुंदे गांवच्या जोशी घराण्यांत झाला होता. राहणी खेडेगांवची, घराणें भिक्षुक, तेव्हां शिक्षण वगैरे फारसें नाहींच. रूपहि विशेष नाहीं– दहाजणींसारखेंच. पण अन्नपूर्णाबाई या वामनरावांच्या थोरल्या वहिनीच्या नात्यांतल्या व म्हणून सर्वांच्या माहितींतल्या असल्यामुळें रूप, शिक्षण वगैरेचा फारसा प्रश्न न उद्भवतां हें लग्न झालेलें दिसतें. १९०६ ते १९११ हा काळ अत्यंत धकाधकीचा व धामधुमीचा गेल्यामुळें व पुढचीं सहा–सात वर्षें अस्थिरतेचीं व हलाखीचीं गेल्यामुळें स्वतंत्र बिऱ्हाड करून पती–पत्नींनीं एकत्र राहण्यांतला आनंद या काळांत वामनरावांना मिळालाच नव्हता म्हटलें तरी चालेल. ‘ मेसेज ’ मध्यें काम करीत असतांना कांहीं दिवस वामनरावांनीं मुंबईस स्वतंत्र बिऱ्हाड केलें होतें. पण तेव्हां सर्वच प्रकारची ददात असल्यामुळें ‘ जिवाची मुंबई ’ तर राहिलीच, पण संसारांतलीं साधीं सुखेंहि या जोडप्याला मिळालीं नाहींत. शेवटीं शेवटीं तर पगार थकल्यामुळें इतकी कांहीं हलाखीची स्थिति झाली कीं धान्य विकत आणण्यासाठीं वामनरावांना बायकोच्या हातांतल्या पाटल्या मोडाव्या लागल्या असें तुळजापूरकर सांगतात.

ही ददात व हलाखी हिंगण्यास आल्यापासून नाहींशी झाली होती. मुंबईचें बकाली, बिनघरोब्याचें व रोजच्या काळजीचें जीवन संपून आतां माहेरच्या राहणीला जुळणाऱ्या, घरोब्याच्या व मानाच्या परिस्थितींत येऊन पडल्यामुळें आणि संवईनें नवऱ्याच्या स्वभावालाहि रुळल्यामुळें अन्नपूर्णाबाई आतां जरा खुशींत आल्या असतील, नाहीं ? हिंगण्याला व तेथील जीवनाला त्या अगदींच नवख्या होत्या असें

नाहीं. सुमारें दहा वर्षांपूर्वी वामनरावांनीं त्यांना हिंगण्यास शिकायला म्हणून ठेवल्या होत्या. पण पुढें लवकरच थोरली मुलगी गंगू हिचा जन्म व्हावयाचा असल्यामुळें अन्नपूर्णाबाईंना शिक्षण आणि हिंगणें दोन्ही सोडावीं लागलीं. त्यांचें शाळेंतलें असें शिक्षण फारसें झालें नसलें तरी त्या वामनरावांच्या कादंबऱ्या वाचूं शकत व त्यांतील आनंदहि चाखूं शकत. ' बरं झालं, ती हल्लींच्या बायकां-सारखी सुशिक्षित नव्हती म्हणून. नाहींतर माझ्या कादंबऱ्यांवर घरांतूनच–व तेहि स्वतःच्या बायकोकडून टीकेचे-हल्ले झाले असते' असें वामनराव थट्टेनें म्हणत. अन्नपूर्णाबाई घरांतल्या कामांत मोठ्या कुशल असून नवऱ्याचें सर्व व्यवस्थित करीत. वामनरावांच्या पोषाखांत आणि रहाणींत पुढें दिसून येणारी आवाळ अन् अनास्था त्या काळीं नव्हती असें सांगतात; आणि पगडी, गंध, घब्याळाचा छेडा अशा पोषाखांतला वामनरावांचा तो जुना फोटो पहाणाराला तें खरेंहि वाटतें. त्या मनानें प्रेमळ असून नवऱ्यानें सोसलेल्या हालांची त्यांना पूर्ण कल्पना होती. शेजारीं–पाजारीं गेल्या असतांना कोणीं त्यांच्या हातावर कांहीं खाण्याचा जिन्नस ठेवला, तर त्यांतला निम्मा नवऱ्याकरितां वगळल्यावांचून त्यांच्यानें तो कधीं खाववला नाहीं; आणि कोणीं म्हटल्यास म्हणत, " नाहीं, हो ! त्यांचे तुरुंगांत भारी हाल झाले आहेत. " पण वामनरावांचे हाल अजून तरी कोठें संपले होते ? शेवटली मुलगी शकुंतला हिचे जन्मानंतर थोड्याच दिवसांनीं अन्नपूर्णाबाई हिंगणें येथें निवर्तल्या.

त्यांचे संबंधीं वामनराव दोन आठवणी सांगत. एकदां वामनरावांनीं १०० रु. ची नोट हरवल्याचें खोटेंच ढोंग केलें. बायकोला अर्थात् वाईट हें वाटलेंच; पण त्याच्यापेक्षां नवऱ्याचा बावळटपणा पाहायला मिळाल्यामुळें व तो चारचौघांदेखत ' काढायला ' मिळाल्यामुळें तिला आनंदच जास्त झाला. उलट कांहीं वेळानें ती नोट वामनरावांनीं पुढें करतांच तिला नोट सांपडण्याच्या आनंदापेक्षां आपलं बोलणं फुकट गेलं याचंच वाईट वाटलं ! ही आठवण वामनराव नेहमीं सांगत असूनहि प्रत्येक खेपेस पहिल्या इतके हसत व हसवीत. दुसरी आठवण सांगतांना मात्र ते अतिशय गहिंवरून येत. पत्नीला थंडीची हुडहुडी भरली. शाल, ब्लँकेट, गादी, सतरंजी वगैरे होतीं नव्हतीं तीं सर्व पांघरुणें घातलीं तरीहि थंडी थांबेना. आणखी घाला पांघरूण असें पत्नीनें सांगितल्यावर आतां वर लाकडें घालूं कीं काय ? असे उद्गार कावलेल्या वामनरावांच्या तोंडून सहज निघाले ! दुर्दैवानें त्याच आजारांत त्यांच्या पत्नीचा अंत झाला ! आपल्या या अशुभ उद्गारांमुळें आपल्या पत्नीला

मृत्यु आला असें मानण्याइतके कांहीं वामनराव भोळसट नव्हते; पण केव्हांहि ही आठवण सांगण्याचा प्रसंग आला म्हणजे त्यांचे डोळे पाण्यानें भरून येत.

पत्नीनिधनायेवढें एक दुःख सोडल्यास वामनरावांचें बाकीचें आयुष्य अद्यापि बऱ्यापैकीं होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. शेजाऱ्यापाजाऱ्यांचें व सहकारी शिक्षक मंडळीचें तर त्यांना अतिशयच सुख मिळालें.–इतकें कीं इतर शाळांतल्या लोकांना हिंगण्याच्या शिक्षकांमधील एकीचें, व वामनरावांच्या त्यांच्याशीं असलेल्या वागणुकीचें कौतुक वाटावें ! वामनरावांचे जांवई प्रो. द. के. केळकर या शेजार-सुखाचें व ऐक्याचें वर्णन खालीलप्रमाणें करतातः—

" हिंगण्यास सर्व शिक्षक एका चाळींत शेजारी शेजारी रहात असल्यानें एकाच व्यवसायांतील मंडळी एकत्र जमली असतां मोकळ्या शिळोप्याच्या गप्पांचें वातावरण नेहमीं खेळतें राही. त्यांत वामनरावांनाहि गप्पांची आणि वादविवादाची मना-पासूनची हौस. व वादविवादानंतर चहा–पाणी. यामुळें वामनरावांच्या भोंवतीं मित्र-मंडळीचें कडें पडलेलें असावयाचें. वामनरावांच्या खेळीमेळीच्या स्वभावानें शेजाऱ्या–पाजाऱ्यांत देखील औपचारिकपणाच्या व मानापमानाच्या कल्पना वगैरे पार नाहींशा झाल्या होत्या. कोणालाहि चहा पिण्याची लहर आली कीं शेजारच्या कोणत्याहि खोलींत डोकवावें, आणि जेथें कोठें चूल पेटलेली दिसेल तेथें चहाची मागणी करून सर्वांनीं मिळून चहा घ्यावा. दारावरून उसाची मोळी विकण्याकरितां कोणीं घेऊन चालला असला तर कोणीं तरी एकानें–बहुतेक वेळां वामनरावांनींच–ती सबंध मोळी खरेदी करावी, आणि मग सगळ्यांनीं व्हरांड्यांत जमून तिचा फन्ना उडवावा. हिंगण्याहून गावांत–पुण्यास कोणी गेला कीं परत येतांना सगळ्यांची खरेदी त्यानें करावी. असें एका मोठ्या सामाइक कुटुंबाचें स्वरूपच या शिक्षक–मंडळीला प्राप्त झालें होतें. आणि आपल्यांत आपल्या बरोबरीनें वागणाऱ्या वामनरावांची योग्यता इतर शिक्षक जाणून असल्यानें शिक्षकांच्या या फडाचें केंद्रत्व साहजिकच वामन-रावांकडे आलें होतें. सर्वांनीं मिळून संध्याकाळीं आसपासच्या डोंगरांवर हिंडावें, झाडांवर चढून चिंचा, कैऱ्या, जांभळें, पेरू–खावीं, उन्हाळ्यांत आसपासच्या विहिरीतून पोहावें–डुंबावें, टेनिस्- बॅडमिंटन् वगैरे खेळावें असा नेहमींचा कार्यक्रम असे. "

शिक्षकांनीं नेहमीं नवीन कांहीं वाचावें–सवरावें, वादविवाद करावा वगैरे उद्देशांनीं वामनरावांनीं शिक्षकाशिक्षकांचें एक ' जिज्ञासू–मंडळ'हि काढलें होतें. प्रत्येकानें

एकादा ठराविक विषय घेऊन, त्याचें सांगोपांग वाचन करून, ठरलेल्या दिवशीं इतरांचे समोर त्याचा उपन्यास करावा, व अशाप्रकारें सर्वांना सर्वांच्या अभ्यासाचा फायदा मिळावा अशी वामनरावांची मूळ कल्पना होती; पण वामनरावांची जिज्ञासा इतरांचे ठिकाणीं फारशी नसल्यामुळें हें मंडळ लवकरच दुसरें एक कॉफीमंडळच बनलें व पुढें थोडेंच दिवसांत विराम पावलें.

हिंगण्याच्या माळावरचें हें जीवनच वामनरावांना इतकें आवडे, व एरंडवण्यास गेल्यानंतरहि त्यांचा जीव मागें हिंगण्यास इतका घोटाळे कीं ते आतां कायमचे गेले असले तरीहि–मला वाटतें–तो अधून मधून रात्रीं–अपरात्रीं हिंगण्यास येत असेल आणि तेथल्या त्या हृद्य व रमणीय आठवणींचा आस्वाद घेत घेत बेभान होऊन एकदम स्वतःचा स्वतःशींच बोलूं लागत असेल:— " हा पहा हिंगण्याचा डोंगर. दहा पंधरा वर्षांपूर्वी याच्या पठारावर आपण कितीदां तरी हिंडायला जात असूं. बिचारा आज हजारों वर्षें उभाचा उभा आहे. कितीतरी घडामोडी याच्या साक्षीनें घडल्या असतील. यानें शिवाजीच्या गनिमी धांवपळी, व बाजिरावाच्या घोडदौडी पाहिल्या असतील. यानें आण्णांचा रखडणारा खटारा व भास्कररावांची धावती मोटारही पाहिली आहे. आणि कोणास ठाऊक—एकाद्या सवाई भास्कररावांचें भरारी विमानहि हिंगण्याच्या माळावर चढत-उतरत असतांना हा पाहील ! ही पहा वनदेवी. बिचारीच्या पुढें कितीतरी पोरींनीं नवसाचे नारळ फोडले असतील. ती त्यांना खरीच पावत होती, का पावण्याचें ढोंग करीत होती कोणास ठाऊक ! हें पहा या ओहोळांतले स्मशान. येथेंच पंचवीस वर्षांपूर्वी बिचारीवर लांकडें रचून व पेटवून त्यांच्या शेकानें तिची थंडी कायमची जाळून टाकली ! तीर्थरूप आण्णांच्या अस्थि येथेंच पुढें दहा वर्षांनीं विसर्जन करण्याचें नशिबीं आलें. हो, हेंच तें तात्या गाडगिळांनीं त्या काळीं काढलेल्या मॅडमेन्स क्लबाचें कार्यक्षेत्र. कार्य काय—तर डोंगरावरील धोंडे खालीं आणून रस्त्यावर भर घालायची !

हाच तो माळाभोंवतालचा कालवा. आतांचा तलाव नव्हता तेव्हां. कितीतरी परकऱ्या पोरींना यांत पहिल्या पोहणीला सोडलें! याच्याच कांठच्या झाडांवरील फळें हातांतल्या काठ्यांनी नि पायांतल्या वाहणांनीं आम्हीं तेव्हां पाडलीं. कैऱ्या, चिंचा, बोरें– तारुण्यांतल्या आंबटशोकीपणाचाच प्रकार ! हा पहा कृष्णतलाव. याच जागीं फार पूर्वी आपलं टेनिस-कोर्ट होतें, नाहीं का ? काय तो थाट-खेळणारांचा आणि त्यांच्या खेळाचा ! धुळीचे लोट जिथं उडत तिथंच आतां पाण्याचे फवारे उडताहेत !

हींच तीं आम्हीं लावलेलीं रोपटीं तशींच खुजट अन् खुरटीं वाढलीं आहेत ! मुळाशींच जर खडक तर वरच्या पाण्यानें काय होणार ?

ही आमची चाळ. याच खोलींतून बारा वर्षांपूर्वी दिवेकरांनीं आपल्या सामानासुमानासह बाहेर पडून संस्थेचा शेवटचा निरोप घेतला. येतांना आले होते कोणत्या आशेनें, आणि जातांना गेले कोणत्या निराशेनें ! येथेंच व्हरांड्यावर आपल्या मोडक्या खुर्चीत बचुभाई आपल्या 'पोरीलोकांचे कागद' तपाशीत बसत. बिचाऱ्याला निवृत्त होऊनहि दहा वर्षें झालीं असतील ! येथेंच काकू गाडगीळ चटईवर बसून वीस वर्षांपूर्वी माझ्या आईविना पोरींची वेणी-फणी करीत. फाळके, अंबेकर, चितळे आले तसे गेले सगळे ! कोठेंहि काय–सुखी असोत. काय तो तेव्हांचा पाहांटेचा चहा, आणि तीं सकाळ-संध्याकाळचीं फिरणीं. देशपांडे मात्र तस्सा टिकून राहिला. जबरा कर्मठ अन् कामसू! हा आमचा 'तात्या–कॉर्नर'! मंडळींचे फड पडलेले असायचे चकाट्या पिटीत अन् चुरमुरे फाकीत. खोल्यांतलं ऐश्वर्य तर कांहीं पुसूंच नका. हीं आम्हां खुद्दांची खोली. ही काय स्टडीरूम का जुन्या पुस्तकांची वखार ! मोने याच व्हरांड्यावर आपल्या व्याकरणाचीं प्रुफें तपासीत बसावयाचे ! ही देवांची खोली. अजूनहि आंत जाऊन एकादी बिडी ओढावीशी व एखादें सुभाषित, नाही तर एकादी मार्मिक गोष्ट ऐकावीशी वाटते. आमचा नवा संसार जानकी काकूंनींच थाटून दिला. माई—शकींचं—त्या अगदीं लहान असतांना—यांनींच सगळं पाहिलं. ही आमच्या व्हाईट जोश्यांची जागा. आली तेव्हां जशी मूर्ति होती तशीच अद्याप आहे. कांहींतरी 'झांगड्' करून लेसन रंगवायचा बेटा ! ही येथें पूर्वींची मायदेवांची खोली. नवराबायको आप-आपल्या उद्योगांत कशी दंग असायचीं ! लोणचें, पापड वगैरेंचा वार्षिक खुराक पुरवायचा यमूताईनीं जसा कांहीं मक्ताच घेतला होता. ही पहा—पूर्वींची केळकरांची खोली. स्वारी टाईम्समध्यें डोकं खुपसून अजून तशीच उभी असलेली डोळ्यापुढें येते. एक वेळ टाइम्स खलास होईल, पण यांचा हा हातांतला अंक कांहीं संपणार नाहीं. आणि या पहा—पूर्वींच्या मोडकांच्या खोल्या. कोपऱ्याच्या जागेकरितां कोण खटपट !

"हा आला शाळेचा चौक. येथेंच गाजली आमची सुपरिंटेंडेंटशिप्. शाळाहि गेली दुसरीकडे, अन् सुपरिंटेंडेंटसाहेब तर अजिबातचत नाहींसे झाले ! ही पहा 'हिंदमाता'. सीमेंटचा हात वरचेवर फिरत नसल्यामुळें बिचारीचं नुसतं पाकिस्तान बनलं आहे ! हा आला 'इचलकरंजी हॉल'. धन्य त्या बाबासाहेबांची–नाहीं तर आज याच

ठिकाणीं आमची ती पूर्वीची फुलबाग जीर्णावस्थेंत, अस्ताव्यस्त पसरलेली दिसली असती. हा आमचा विद्यालयाचा चौक. येथेंच मुली ' गुरुराज थोर अण्णा, लाधोत श्रीमहर्षि' असें मागणें मागत रोज पहांटे प्रार्थना करायच्या. हें आमचें सनातन अन्नपूर्णागृह. येथल्याच अन्नावर आमचा पिंड पोसला. किती दिवस येथें जेवलों असूं कोणास ठाऊक ! काकू गाडगीळ, मावशी, दुर्गाताई किर्लोस्कर, अक्का चिपळू-णकर–कितीतरी मेट्रना आल्या नि गेल्या ! आमचीं ताटं नि डबे चालूंच होतीं सतत पंधरा वर्षे ! धन्य त्या माऊल्या ! आमचं इतकं चांगलं तरी कोण करणार होतं ! अरे, पण हीं आंब्याचीं झाडं अगदीं कौलाघरावर आलीं. लावलीं तेव्हां कल्पना नव्हती–येवढीं वाढून थेट डोक्यावरच चढतील म्हणून !

“हें पहा आलें गीतामंदिर–नि वाचनालय. पूर्वी कशीं वर उठून दिसत होतीं, आतां डोक्यावरील शाळेखालीं चेंगरून गेलेलीं दिसतात. काय तीं आमचीं त्यावेळचीं व्याख्यानें नि प्रवचनें. कितीजणींना त्यांचा उपयोग झाला असेल देव जाणे ! ही पहा आश्रमाची ' मूळ झोपडी'. आण्णांच्या सुरुवातीच्या कार्याचें आणि बायांच्या आतांच्या संसाराचें जसें कांहीं प्रतीकच आहे ! या आल्या भास्कररावांच्या खोल्या, आम्ही प्रथम आलों तेव्हां आठवले, दिवेकर, चिपळूणकर वगैरेसारखी वडी वडी मंडळी राहायची त्यांतून. कोण हेवा वाटायाचा आम्हांला या चाळीचा तेव्हां. कोण ती स्वच्छता, अन् काय ती झक्पक्. आम्ही त्याला हिंगण्याचें वेस्ट एन्डच म्हणूं. या आल्या दिवेकरांच्या पहिल्या खोल्या. वाचन अन् स्वयंपाक–दोन्हीहि एकदम चाललेलीं असायचीं–चुलीपुढें बसून. अजून आठवतं सगळं. या पहा शारदाबाईंच्या आतांच्या खोल्या. याच खोल्यांत पूर्वी बारूबाई, बाळूबाई, शांताबाई–किती-तरीजणी निरनिराळ्या काळीं राहून गेल्या. या व्हरांड्यावरील खुर्च्या आराम करीत तशाच पडल्या आहेत. बारूबाई दमून-भागून, बाळूबाई पुस्तक घेऊन, शांताबाई आपलें बिणणें-शिवणें घेऊन त्या खुर्च्यांतून बसलेल्या अद्याप दिसताहेत. गेल्या बिचाऱ्या सगळ्या खुर्च्या सोडून. या खुर्च्याच बेटचा खऱ्या आजन्म सेविका !” वामनरावांच्या जीवाला अजून किती तरी आठवणी होण्यासारख्या आहेत. एक वेळ त्याची शक्ति संपेल, त्याची वेळ संपेल; पण आठवणी संपणार नाहींत.

हिंगणें येथील वास्तव्यांतील वामनरावांची दिनचर्या मोठी मजेची होती. ते पहांटेपासूनच जागे होत. घरांत घड्याळें कितीहि असलीं तरी वेळेवर कोणतेंच उपयोगी पडत नसल्यानें उठण्याचे बाबतींत त्यांना बोर्डिंगच्या उठण्याच्या पहिल्या

घंटेवरच विसंबून रहावें लागे. उठल्यावरचें पहिलें काम म्हणजे स्टोव्ह पेटवून चहाचें अधण ठेवणें व मुलीला 'शकाराम्! शका!' इत्यादि प्रकारें आळवीत आळवीत उठवणें हें होय. स्टोव्हचा भोंगाणा ऐकून आसपासची मंडळी जमूं लागतांच तीं जितकीं जितकीं जमतील तितकें तितकें पाणी वाढवीत एकदांचा चहा तयार होई; निजलेल्या शकूकरतां व मोलकरणीकरतां थोडासा वगळून ठेवून ते बाकीचा चहा मंडळीसह पिऊन टाकीत. सुपारीचें खांड नाहीं तर नुसतीच एकादी लवंग तोंडांत टाकून व विडी शिलगावून ते शिकवायचें पुस्तक घेऊन वाचायला बसत नाहींतर नुसतेंच दुपारच्या उद्योगाच्या विचारांत इकडे तिकडे फेऱ्या घालीत. इतक्यांत प्रार्थनेची घंटा होत असे. ती ऐकल्याबरोबर ते शाल किंवा चादर अंगावर घेऊन शाळेच्या चौकांत जात. भूपाळ्या ऐकण्याची लहानपणचीं आवड म्हणूनच केवळ नव्हे तर एक शिस्त म्हणून ते स्वतः प्रार्थनेला जात व ती शिस्त विद्यार्थिनींना लागली पाहिजे असा आग्रह धरीत. प्रार्थनेहून आल्यानंतर दाढीवरून वस्तरा ओढून व थोडेसें ओरखडून घेऊन तें स्नानाला जात. तें उरकून येत असतांना दुसरे जें कोणी चहाला हांक मारील त्याचेकडे जाऊन ते पुन्हां चहा वगैरे घेत; व गप्पागोष्टी व थट्टामस्करी करीत एकदां व्हरांड्यावरून फेरी मारीत. नंतर कांहीं वेळ स्वतःच वाचन करून ते शाळेकडे जात व तेथें सुभाषितें वगैरे फळ्यावर लिहिणें, गैरहजर शिक्षकांचे 'चट' काढणें, नोटिसा वगैरे लिहून ठेवणें व सर्व काम चालूं असतानांच येईल त्या विद्यार्थिनीला ती विचारील तें समजावून देणें इत्यादि कामें करीत. नंतर बोर्डिंगांतून आलेला डबा उष्टावून, ते सुपारी-विडी वगैरे उरकीत व कपडे करून शाळेंत जात. दुसरी घंटा होईतों ते व्हरंडयावर येरझारा घालीत व येणाऱ्या-जाणाऱ्या मुलीवर देखरेख करीत. पहिले एक-दोन तास घ्यावयाचे ते घेतल्यावर व पोस्ट वगैरे पाहिल्यावर ते येरंडवण्यास कॉलेजमध्यें जात, व तेथील काम आटोपून चारच्या सुमारास परत हिंगण्यास येत.

तोंवर इकडे शेवटचा तास सुरू झालेला असावयाचा; स्वतःचा तास असल्यास तो घेऊन, किंवा एक नुसतीच फेरी मारून ते घरीं परत येत. कॉलेजमध्यें चहा नीट जमला असला तर ठीकच; नाहीं तर पुन्हां एकदां हला करून व विडी पेटवून आराम खुर्चीवर जरा लवंडत. इतक्यांत शाळेची शेवटची घंटा झाल्यामुळें ते काठी घेऊन बाहेर पडत व मुलींना हांक मारून त्यांना बागकामाला लावीत व स्वतः लागत. ( हें काम कसल्या स्वरूपाचें असे व कोणत्या प्रकारें चाले हें आपण

मागें पाहिलेंच आहे. ] नंतर संध्याकाळीं बोर्डिंगमधून आलेलें जेवण जरा चवीनें व सावकाशीनें जेऊन, लवंग तोंडांत टाकून व विडी ओठांत धरून ते वेळ असल्यास टेकडीकडे फिरायला जात, नाहींतर गीतामंदिराच्या बागेंत किंवा वाचनालयांत घुटमळत. इतक्यांत प्रार्थनेची घंटा होऊन मुली गीतामंदिरांत जमत व प्रार्थनेला सुरुवात होई. अर्धा-पाऊण तास प्रार्थना घेऊन घरीं आल्यावर दुसऱ्या दिवशींच्या शिकविण्याची तयारी करीत, अगर अर्धवट वाचलेलें पुस्तक संपवीत; नाहीं तर देवमास्तरांकडे किंवा नाना पटवर्धनांकडे जाऊन कांहीं सुखदुःखाच्या गोष्टी करीत. माळावरचे विजेचे दिवे दहाला बंद होत असल्यामुळें व कंदिलाचा प्रकाश त्यांस हळूं हळूं अपुरा पडूं लागल्यामुळें ते अंथरुणावर पडत, व दिवसाची शेवटची विडी ओढीत झोंपी जात.

हिंगण्याच्या या दिनचर्येंत येरंडवण्यास गेल्यावर फारसा फरक पडला होता असें नाहीं. तेथें सकाळ–संध्याकाळ प्रार्थना नसत, त्यांऐवजीं पिंगपांग, टेनिस वगैरे खेळ असत. तेहि पुढें बंद झाल्यावर ते हिंडण्याच्या निमित्तानें पहांटेचेच बाहेर पडत, व लकडीपुलावरील ‘ लकी ’मध्यें जाऊन वर्तमानपत्रें वाचीत वाचीत एक तब्बल कप् चहा घेत. एकादे वेळीं एकलेपणाचा अगदींच कंटाळा आला तर अचानक उठून प्रो. नारळकरांकडे जात व त्यांनीं सांगितलेल्या विनोदी चुटक्यांवर किंवा हसत हसत केलेल्या मार्मिक टीकेवर मनमोकळें हंसून वशींतील खाद्याचा समाचार घेत. बोर्डिंगांतील डब्याचा फारच कंटाळा आला, किंवा कोणी पाहुणे आले असले म्हणजे हल्लीं हल्लीं ते स्वयंपाकाला बाई ठेवीत; पण मजा अशी कीं तिनें यांच्या आवडीनिवडींना जपायच्या ऐवजीं यांनाच तिच्या लहरींप्रमाणें वागतां वागतां नकोसें व्हायचें ! तिनें केलेल्या स्वयंपाकाला तिकडे तोंडानें बरें म्हणत पण इकडे तोंड वांकडें करीत ते जे काय दोन घांस जातील ते खात, आणि भरलें ताट तसेंच टाकून उठून जात. मनासारखें मिळत नसल्यामुळें म्हणा, तोंडाला चव नाहीं व पोटांत भूक नाहीं म्हणून म्हणा, किंवा त्याकडे लक्ष नाहीं म्हणून म्हणा–त्यांचें नेहमींचें जेवण साधारणपणें लहान मुलाप्रमाणें अच्यावच्याच असे. मनासारख्या जेवणासंबंधींचशी काय कसल्याच सुखाची अपेक्षा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं अशी त्यांची वृत्ति बनत चालल्यामुळें वामनरावांची चाललेली आबाळ पहातांना इतरांना जें दुःख होई तें स्वतः त्यांना होत नसे.

अशाच एका प्रसंगासंबंधानें श्री. ताराबाई परांजपे लिहितात.– “ एक दिवस

तात्या जेवण करून घरीं गेले. मी त्यांच्या मागोमाग कांहीं तरी विचारावयाला म्हणून गेले. तात्यांच्याकडे गेल्यावर कांहींतरी इकडचीं तिकडचीं बोलणीं निघायचींच. मीं म्हटलं ‘ कसला रद्दी स्वयंपाक होतो आपल्या क्लबमधला. काय ती आमटी तरी करतात काकू ’! सिगारेटचा धूर सोडीत त्याच्या वलयांकडे पाहात पाहात तात्या म्हणाले ‘ हंऽऽ, आम्ही त्या अन्नाची तुलना करतों खानावळीच्या अन्नाशीं, म्हणून तें आम्हांला कितीतरी गोड लागतें. तुम्ही तुलना करतां घरच्या अन्नाशीं. ’ आणि मग माझं मलाच वाईट वाटलं. तात्यांना घरचें सुख असें मिळालेंच नव्हतें फारसें! त्याची जाणीव अशीच कधीं तरी होत असे त्यांना; आणि आज मी त्यांना ती जाणीव करून देण्यास कारण झालें याचें दुःख झालें मला. अजून त्या वेळचा त्यांच्या चेहऱ्यावरचा किंचित् करुणभाव आणि स्वरांतील औदासिन्य आठवलें कीं मनांत कालवाकालव होते. ”

तसेंच पाहिलें तर वामनरावांना एका काळीं कांहीं कांहीं आवडी असाव्यातसें दिसतें. पापड, सांडगे, मेतकूट, नारळाची चटणी, वालाची डाळ, आळवाची भाजी, घावन, मोदक अशासारखे–विशेषतः कोकणांत खायला मिळणारे पदार्थ ते आवडीनें व चवीनें खात. हल्लीं हल्लीं मात्र या आवडी थोड्या कमी झालेल्या दिसत. चहाची आवड मात्र अगदीं शेवटच्या क्षणापर्यंत जीव धरून होती असें म्हटलें तरी चालेल. अगदीं पूर्वीं स्वदेशी चळवळीचे भरांत त्यांनीं साखर व चहा सोडण्याचा प्रयत्न केला. साखरेचे ऐवजीं कांहीं काळ गुळावर निभूं शकलें; पण चहाची जागा मात्र दुसरें कोणतेंही पेय घेऊं शकलें नाहीं. जी स्थिति चहाची तीच विडीची. हें व्यसन चांगलें नाहीं—विशेषतः शिक्षकाला तर नाहींच नाहीं असें त्यांना मनांतून वाटे. पण तें नुसतें वाटणेंच राही. एका प्रसंगीं मात्र स्वारीनें जिद्दीस पेटून कांहीं दिवस विडी अजीबात सोडली. विद्यार्थिनींना आगगाडींत बसवून देण्याकरितां म्हणून ते स्टेशनावर गेले असतां सर्व व्यवस्थित पार पडलें अशा सुखात्मक जाणिवेनें विद्यार्थिनींदेखतच त्यांनीं एक विडी पेटविली. कोणी चंद्रसूर्यांनीं हें पाहून हिंगण्याच्या देवांकडे चहाडी केली. अर्थात् दुसरे दिवशीं एक कानपिचकी ऊर्फ ‘हिंट’ मिळायची ती मिळालीच. पण हें स्मशानवैराग्य फार दिवस न टिकून वामनराव पुन्हां पूर्ववत्–कदाचित् जास्तच जोरानें—विडी ओढूं आगले.

आणि वामनरावांना विडी ओढतांना आणि विशेषतः कादंबरीचें एखादें प्रकरण मनासारखें लिहून झाल्यावर ओढतांना–पाहण्यांत एक प्रकारचा आनंद वाटे.

आणि त्यावेळीं असें म्हणावेंसें वाटे कीं ' वामनराव, विडीच्या एका झुरक्यानें जर तुमचा लिहिण्याचा सगळा शीण जात असेल, आणि अशींच उत्तमोत्तम प्रकरणें लिहिण्याला तुम्हांला नव्यानें स्फूर्ति येत असेल तर विडी सोडून व त्यामुळें सुचेनासें होऊन स्वस्थ बसण्यापेक्षां विडी ओढून पुन्हां नवीन स्फूर्तीनें तुम्ही कामाला लागणें हेंच आम्हां सर्वांच्या दृष्टीनें उपकारक ठरेल ' ! ' महाराष्ट्र'चे ओगले व वामनराव या दोघांना विडी ऐटीनें ओढतां येत नाहीं यानें काकासाहेब कालेलकरांच्या सौन्दर्य-लोलुप दृष्टीला जरा खुपल्यासारखें वाटतें. पण वामनरावांच्या जीवनांत एकट्या जरूरीलाच काय ती जागा मिळत असल्यामुळें ऐट, शौक, हौस, विलास वगैरेंची अपेक्षा काकासाहेबांनी कां करावी ?

नाहीं म्हणायला वामनरावांचा एक शौक मात्र शेवटपर्यंत राहिला; आणि तो म्हणजे टेनिस खेळण्याचा; पण त्यांतहि खऱ्या शौकाचा अन् विलासाचा भाग नव्हताच. कधीं त्यांनीं टेनिसशूज वापरले आहेत, का तो विशिष्ट पोशाख घातला आहे, का एकादी विशेष घडणीची रॅकेट घेतली आहे–कांहीं नाहीं. खेळलं नाहीं तर प्रकृतीच बिघडते म्हणून खेळायचं झालं.

वर्तमानपत्रें, मासिकें वगैरेचा शौक त्यांना होता. पण तोहि तीं त्यांचेकडे फुकट येत म्हणूनच. गायन, चित्रकला, सुन्दर स्थळें वगैरेंचें आकर्षणहि त्यांना कधीं नव्हतें. व्याख्यानांचे निमित्तानें ते कितीतरी मोठमोठ्या प्रेक्षणीय स्थळीं गेलेले आहेत. पण कधीं तेथील चित्रसंग्रह पाहतील, का बागा, राजवाडे, ऐतिहासिक स्थळें वगैरे पाहतील–कांहीं नाहीं. व्याख्यान झालं रे झालं कीं पहिल्या गाडीनें पुण्यास परत ! एकदां कॉलेजच्या मंडळींनीं मोठ्या हौसेनें हिराबाईचें गाणें केलें. ' उपवनि गात कोकिला'चे आलाप सुरू झाले. वामनराव त्यावेळीं काय करीत असतील अशी कल्पना आहे ? बाहेर व्हरांड्यावर काळोखांत असलेल्या एका आराम खुर्चीवर ढाराढुर घोरत होते !

बाकी, वामनरावांचें आणि गाण्याचें हें वांकडें अलिकडचें होतें असें नसून तें पहिल्यापासूनच तसें होतें. सुशिक्षित मुलींच्या अपेक्षा फार वाढत चालल्यामुळें त्यांचीं लग्नें जमणें दिवसेंदिवस कठीण होत जाईल यावरून गोष्टी निघतांना सौ. मालतीबाई जोशी ( त्या वेळच्या कु. मालती शेवडे ) यांचेबद्दल वामनराव म्हणतात—" बाकी आमच्या मालतीबाईंना नको इतकं निराश व्हायला. तुमचं होईल मालतीबाई लग्न. कारण शिक्षणाचा डिफेक्ट तुमच्यांत आला असला तरी तुम्हांला

देवानें गोड गळ्याची देणगी दिली आहे ना ! बाकी माझ्यासारखाच जर का एखादा निघाला तर त्याचाहि कांहीं उपयोग नाहीं. मालतीबाई आम्हांला तुमच्या गाण्यांतलं कांहीं समजत नाहीं. सगळे लोक माना डोलावतात. आम्ही आपले डोलावतों ! आमच्या मालतीबाईंना वाईट वाटूं नये म्हणून आम्ही ऐकतों, झालं. त्यांचं गाणं सगळे छान म्हणतात, आम्ही छान म्हणतों ! आमच्या मालतीबाईंना उत्तेजन येतं असं म्हटलं म्हणजे ! पण खरं खरं जर मला विचारलंत तर गाण्याचे बाबतींत आमचे कान आहेत—झालं ! ”

कपड्यांच्या बाबतींतहि वामनरावांच्या आवडी–निवडी कांहीं नसत. अकरावारी शुभ्रकाठी धोतर; पांढऱ्या मांजरपाठी कापडाचा, सरळ बाह्यांचा व उंच गळपट्टीचा एक शर्ट; बदामी किंवा पांढऱ्या रंगाच्या कापडाचा एक लांब कोट व त्याचे आंतून तसल्याच रंगाचें एक जाकीट–हा कायमचा पोषाख. कॉलेजमध्यें शिकवायला जातांना डोकीला पांढरा रुमाल, एकाद्या समारंभाला किंवा अध्यक्ष म्हणून व्याख्यानाला जातांना पिवळट रंगाचा कोषा, आणि एरवीं काळी टोपी. हल्लीं हल्लीं तर सर्वच प्रसंग एका काळ्या टोपीवरच साजरे होत. तीच गोष्ट उपरण्याची. पूर्वी ते खरोखरचें अंगवस्त्र असे; हल्लीं असलें–असलें, नसलें–नसलें. बूट पायमोज्यांचा एका काळीं शौक होता, हल्ली मद्रासी वहाणांवरच तिन्ही काळ निभावत. काळा गरम कोट व पिवळसर गरम शर्ट थंडीचे दिवसांत त्यांचे अंगावर दिसत; पण ते थंडीच्या काळजीनें म्हणून किंवा थंडींत तसे कपडे घालणें ही फॅशन असते म्हणून वामनराव वालीत असत असें नव्हे, तर ते त्यांच्या नानांनीं दिलेले म्हणून घालीत असत. आणि हें त्यांच्या भारी किंमतीच्या कापडावरून व अघळपघळ आकारावरून कोणाच्याहि लक्षांत सहज येई. विलायतला जातांना केलेले आपले कपडे जरा जुनसर झाले म्हणजे नाना ते वामनरावांना देत. आणि असे कपडे देण्यांत नानांनाहि कांहीं संकोच वगैरे वाटत नसे, आणि ते घेण्यांत वामनरावांनाहि कांहीं वाटत नसे; वाटतच असेल तर तें उलट प्रेम आणि भूषणच.

वामनरावांचे कपडे जरी सामान्य कापडाचे आणि साधे असत तरी त्यांवर होणारा एकंदर खर्च मात्र भरमसाट होई. याचेंकारण म्हणजे बिनहिशेबीपणा आणि औदार्य. वर्षाचे कांठीं सहा धोतरजोडया तरी त्यांना लागत. कांहीं धोतरें मोलकरीण धुतांना फाडी, कांहीं काळीं होत, कांहीं गहाळ होत, कांहीं लोक घेऊन जात. एकाद्या सणासमारंभाचे वेळीं वामनरावांचें धोतर हटकून मळकें आणि

फाटकें निघायचें ! रुखवत खाऊन वधूमंडपीं लग्नाला निघालेल्या पूर्वीच्या नवरदेवाची आठवण व्हावयाची ! एकदां श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या भेटीला म्हणून वामनरावांची स्वारी निघाली. धोतर गुडघ्यावर नेमकें फाटकें निघालें ! गुडघ्यावरचे गुडघ्यावर धोतराला कसे तरी टांकें घालून स्वारीला कसंतरी मोटारींत बसवलं ! सयाजीरावांचं लक्ष माणसाच्या डोक्याकडे असून गुडघ्याकडे नसे व त्यांनीं वामनरावांचा योग्य तो मानसन्मान केला ती गोष्ट निराळी. ‘ गुणी गुणिनम् वेत्ति, ’ दुसरें काय ? जी अनास्था एका धोतराची तीच इतर कपड्यांची.

वामनरावांच्या कपड्यांसंबंधींच्या अनास्थेचें मार्मिक वर्णन प्रो. मायदेवांनीं केलें आहे तें तसेंच उद्‌धृत करतों:—

“ तात्या कितीहि चांगले कपडे शिवोत, ते वेळेवर त्यांनीं धुवायला टाकले आहेत, का धुवून आल्यानंतर त्यांना गुंड्या वगैरे आहेत किंवा नाहींत हें पांहिलें आहे हें कधींहि होत नसे. आधीं गुंड्या वेळेवर सांपडत नसत. बरें त्या गुंड्यांनीं तरी सांपडावें कसें ? आमच्या सबंध चाळींत कोणाचें दार जर कोणत्याहि वस्तूसाठीं खुलें आढळांत असें असेल तर तें तात्यांचेंच. कोणीहि यावें, वाटल्यास ड्रॉवर उघडावा, गुंडी नसल्यास गुंडी घ्यावी व चालूं लागावें. हवे ते पदार्थहि ! अर्थात् मालकाला त्यांशिवाय बाहेर पडावें लागे. त्यामुळें शर्टला गुंड्या नाहीत, हातोपे गुंड्यांशिवायच अगर साध्या दोऱ्यानेंच बांधलेले. कोटाच्या गुंड्या–त्याहि पहिल्या काजांत दुसरी गुंडी अशा तऱ्हेनें लावलेल्या थाटांत. बरेच दिवस न धुतलेला व वेडावांकडा गुंडाळलेला रुमाल घातलेले अगर ब्रशही न केलेली पगडी घातलेले तात्या वर्गांत शिकवायला आलेले कितीतरी वेळां विद्यार्थिनींना व शिक्षकांना दिसत.

“ वेषच काय, पण घरीं कधीं दौतींत शाई सांपडली आहे, का टांकाला टोकें नीट आढळलीं आहेत ? का डब्यांत सुपारी सांपडली तर अडकित्ता सांपडला आहे ? का सतरंजी घातली असली तर तक्या कोठें दिसला आहे ? हें कधीं व्हायचें नाहीं. घरांतल्या वस्तूंना त्याच्या मालकाशिवाय इतरांकडेच जाण्याचा मोह होत असे याला तात्या काय करतील विचारे !

तात्यांच्या असल्या भोंगळ कारभाराचा व्यवस्थित शेजाऱ्यांना राग येई. पण या सर्वांच्या मागें सदैव आढळून येणारें त्यांचें औदार्य, मोठें मन, बहुश्रुतता, विद्वत्ता, स्वार्थत्याग, व दुसऱ्यासाठीं झीज सोसण्याची तयारी या गोष्टी ध्यानीं

आल्या कीं मुली काय किंवा सहकारी काय, वामनरावांचा हा राग येण्याइतका आढळणारा भोंगळपणा व पोषाखांतील बावळेपणा ते पार विसरून जात." उलट त्यांना सौ. मालतीबाई जोशी किंवा श्री. बखले यांचेप्रमाणें असें वाटे कीं या "तत्त्वज्ञानांत गढलेल्या या स्थितप्रज्ञ विद्वानाच्या पोषाखासंबंधीं आपण तरी काळजी घ्यावी, आपण त्यांचे ते शाळाविद्यार्थ्यासारखे शाईच्या डागाचे कपडे धुवावे, त्यांची खोली साफसूफ ठेवावी, त्यांचें लिहिण्यापुसण्याचें सामान जिथल्या तिथें ठेवावें."

जेवणाच्या आणि कपड्यांच्या बाबतींत वामनरावांची जी अनास्था अन् उदासीनता दिसून येई तीच त्यांच्या राहण्याच्या जागेबाबतहि दिसे. त्यांच्या खोल्या कधीच व्यवस्थित आढळावयाच्या नाहींत. संसाराचं सामान, पुस्तकं, अडगळ वगैरे सगळं कांहीं त्या तीन खोल्यांत सांठवायचं. घरांत बघायला व आवरायला काळजीचं कोणी माणूस नाहीं. या सर्व गोष्टी खऱ्या, पण त्यांना स्वतःलाच व्यवस्थितपणाचें तितकें अगत्य असतें, तर अशाहि परिस्थितींत त्यांना तो राखतां आला नसता असं नाहीं. पण आणखी एक गोष्ट त्यांचे आड येत असे; आणि ती म्हणजे त्यांची फाजील माणुसकी व अतिरेकाला गेलेली उपकारबुद्धि. स्वाभाविकपणेंच वामनरावांच्या जागेला मोफत धर्मशाळा, मोफत वाचनालय व मोफत आरामस्थान असं तिहीरी स्वरूप प्राप्त झालं होतं! कोणास कोठें बसावयास जागा नसली, बसा वामनरावांकडे. लिहावयास टेबल नसलें, बसा वामनरावांचे टेबलापुढें. वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें हवीं असतील, तर धुंडाळा वामनरावांचें शेल्फ, अन् उस्कडा त्यांचें कपाट. चहा, दूध, साखर वगैरेसारखें कांहीं हवें असेल—करा हल्ला त्यांच्या दुधादुभत्याच्या फडताळावर! "फार काय—" मायदेव म्हणतात—"एखाद्या माणसानें ट्रंकेंतले त्यांचे कपडे काढून नेले तरी, वामनरावांना कळणार नाहीं; बरें त्यांची परीक्षा पाहण्याकरितां त्यानें ते अंगावर घालून त्यांना मुलाखत दिली तर वामनरावांना ते आपलेच कपडे आहेत असें आधीं ओळखतां येणार नाहीं, आणि ओळखतां आलेंच तरी ते बोलणार नाहींत!"

अगदीं असाच जरी नाहीं तरी तसलाच थोडासा प्रकार झाल्याचें श्री. ताम्हनकर व श्री. रमाबाई जोशी सांगतात. "तात्या, नाना, शकू व इंदु यांचा एक ग्रूप फोटो तात्यांचे टेबलावर होता, तो आम्हांला इतका आवडला कीं तो त्यांचेपाशीं

एकसारखा मागवासा वाटे. पण मन माघार घेई. शेवटीं शकूला तें कळलें व तिनें तो गुपचूप आणून आम्हांला दिला. पण तात्यांना न कळवतां आणलेला फोटो बरोबर घेऊन जाणें बरें वाटेना म्हणून आम्हीं जातांना शेवटीं भेटायला गेलों तेव्हां तो त्यांचेपुढें ठेवला; व झालेली हकीगत सांगितली. तोंपर्यंत त्यांचे लक्षांतहि आलें नव्हतें कीं टेबलावरचा फोटो तेथून नाहींसा झाला आहे म्हणून. पण लक्षांत आलेलें असल्याचा बहाणा करून ते म्हणाले 'मला माहीत होतें चोर कोण तें. पण म्हटलं जाऊं द्या. आपोआप देतील आणून. बरें, पण हा आतां तुम्हीच ठेवा. आमचा फोटो आम्हींच काय पाहायचा? त्यापेक्षां तुम्ही बरोबर नेऊन आमची आठवण ठेवणें हेंच चांगलें नाहीं कां?"

वामनरावांचें जें औदासिन्य खाण्यापिण्याचे व कपड्यांचे बाबतींत दिसे तेंच प्रकृतीच्या बाबतींतहि असे. त्यांनीं आपल्या प्रकृतीची अतिशय आबाळ केली. कितीतरी विधुर पुरुष जपून वागून, खाण्यापिण्याची टूक संभाळून निकोप राहूं शकतात; आणि वामनरावांनाहि तसें राहतां येण्याला हरकत नव्हती. पण इतकें कोण जपतो? आणि कशाला जपायचें? धडधाकट प्रकृतीचेहि मरायचे झाले म्हणजे मरत नाहींत का? आणि वाढत्या वयाविरुद्ध आणि निसर्गाविरुद्ध डॉक्टर, वैद्य वगैरे तरी काय करणार? भावी अनिश्चित सुखासाठीं पथ्यानें व नियमनानें जगण्यापेक्षां आतांचें वाटेल तसें वागण्याचें सुख व स्वातंत्र्य कां दवडावयाचें? अशा प्रकारचें कांहींसें निराशेचें, कांहींसें दैववादाचें, कांहींसें कंटाळलेल्या वृत्तीचें ते बोलत. आणि स्वतःच मोठ्यानें हंसून दुसऱ्याला निराळ्याच विषयाकडे नेत.

वास्तविक पहातां वामनरावांची मूळ प्रकृति चांगली दणकट होती. लहानपणीं खाण्यापिण्याच्या सुबत्तेत वाढलेला त्यांचा पिंड चांगला पोसलेला असला पाहिजे. कॉलेजमध्यें असतांनाच त्यांचा एकादा फोटो पहावयास मिळाला असता तर बहुतेक ते कणखर हाडापेराचे, मांसल व पिळदार स्नायूचे, आणि घाटदार बांध्याचे असलेले दिसले असते. पण कष्टाच्या आणि हालअपेष्टांच्या मधल्या एका तपांत त्यांची प्रकृति पुष्कळच ढासळली आणि मूळव्याध, ॲनिमिआ वगैरेसारख्या व्यथा त्याच काळांत उद्भवल्या असें ऐकतों.

१९२१ सालांत वामनरावांना प्रथम पाहिलें तेव्हांसुद्धां ते चांगले उंचेपुरे व अंगानें बऱ्यापैकीं दिसल्याचें आठवतें. लांबलांबच्या पायीं सहली ते एका दमांत व सहज लीलेनें उरकीत. पुढें दहा वर्षें त्यांची प्रकृति साधारणपणें चांगली राहिली

होती. नागपूरच्या साहित्यसंमेलनानंतर जबलपुरास गेल्यावेळीं मात्र ते एकाएकीं आजारी पडले, आणि तेव्हांपासून मलेरिया, पांथरी, आंव, एनिमिआ वगैरे रोग उद्भवून वाढीस लागले. त्याच वेळीं पथ्यपाण्यावर राहून व योग्य औषधोपचार करून त्यांचा जोराचा प्रतिकार केला असता तर ते रोग हटून वामनराव पुन्हां पूर्ववत् झाले असते. डॉ. फाटक, डॉ. रानडे वगैरे त्यांचे स्नेही त्यांना सर्वप्रकारची मदत करायला नेहमीं सज्ज असत. पण स्वतःची स्वतःला आंच असल्यावांचून दुसरा कोण किती मदत करणार? १९३० च्या गोव्याच्या साहित्यसंमेलनाच्या वेळचा वामनरावांचा फोटो पाहिला असतांहि त्यांच्या मूळच्या रुबाबदार चेहऱ्याची, डोळ्यांतील चमकेची, बुद्धिमत्त्वदर्शक उंच कपाळाची, विचाराकुलता दाखविणाऱ्या कपाळावरच्या वळ्यांची, चेहऱ्यावरील मिस्किल हास्याची, मर्यादित सुखोपभोगाची इच्छा दर्शविणाऱ्या उन्नत हनुवटीची साक्ष पटते. पण शरिराचें आणि चेहऱ्याचें हें सारें वैभव पुढें आस्ते आस्ते नाहींसें होऊन शेवटीं शेवटीं तर त्यांचें शरीर क्षीण आणि निःसत्त्व व चेहरा निस्तेज आणि भेसूर दिसूं लागला होता. बाहेर काम करतांना वामनराव उभे दिसत, पण घरांत आले कीं असे कांहीं थकून पडत कीं पाहणाराच्या पोटांत धस्स होई!

वामनरावांच्या शरिराला शेवटीं शेवटीं ही जी क्षीणता यावयाला लागली, त्याचीं शारीरिक कारणें पुष्कळ असलीं तरी मानसिक कारणेंहि कांहीं कमी नव्हतीं. सुखाच्या आशेनें म्हणून केलेल्या सगळ्या गोष्टी अंगलट येऊन दुःखाला कारणीभूत होणें; मित्र म्हटलेले प्रथम अमित्र व पुढें शत्रू होणें; मुलगा, पुतण्या वगैरेसारख्या आप्तांचें अकालीं मृत्यु पावणें वगैरेसारख्या मानसिक आधींनीं शारीरिक व्याधींना मदत केली आणि दोघींनीं मिळून त्यांचा पाहतां पाहतां बळी घेतला. वृत्तींतील अनौत्सुक्य, औदासिन्य, दुर्लक्ष्य हीं सारीं या आधीव्याधींमुळें उत्पन्न झालीं आणि त्याचा परिणाम म्हणून वामनराव प्रत्येक गोष्टींत—खाण्यपिण्यांत, पोषाखांत, घरादारांत–आबाळ करूं लागले. मनाची तत्त्वज्ञानप्रवणता, साधेपणाची स्वाभाविक आवड, उच्च विचारांच्या मननानें नेहमींच्या जीवनाविषयीं वाटणारी निरासक्ति, यांतच वरील गोष्टींची भर पडून वामनरावांची झाली ही स्थिति झाली. दोष तरी कोणाला द्यावयाचा? जें व्हायचें तेंच झालें असें त्यांच्यासारखेंच म्हणून स्वस्थ बसावें झालें!

## साहित्यसेवा

८

[ वामनरावांच्या साहित्यसेवेसंबंधीं स्वतःच कांहीतरी व कसेंतरी लिहिण्यापेक्षां त्यांच्याच तोडीच्या व तोलाच्या साहित्यिकाकडून तें लिहून घ्यावें अशा उद्देशानें मी श्री. वि. स. खांडेकर यांजकडे गेलों आणि त्यांना त्यासंबंधीं विनंति केली. वामनरावांवरील भक्तीमुळें व मजवरील लोभामुळें भाऊसाहेबांनीं माझी विनंति मान्य केली व हें समग्र प्रकरण लिहून दिलें. याच विषयावर भाऊसाहेब स्वतंत्रपणें व विस्तृतपणें लिहीत असून तें योग्य काळीं प्रसिद्ध होईलच. वामनरावांच्या जीवनांतील महत्त्वाच्या प्रसंगांसंबंधीं व विशेष घटनासंबंधीं लिहिण्याबद्दल ज्या ज्या योग्य व अधिकारी व्यक्तींना विनंति केली त्यांनीं त्यांनीं ती आनंदानें मान्य केली हा वामनरावांच्या पुण्याईचाच प्रभाव नाहीं काय? ]

दुपारच्या रणरणणाऱ्या उन्हांतून कपाळावरला घाम हातानें निथळून टाकीत चालणाऱ्या वाटसरूला अचानक एखादा आम्रवृक्ष दिसला तर तो त्याच्या छायेंत आनंदानें विसावा घेतो. पुढें केव्हांहि या प्रसंगाची आठवण झाली कीं त्याला त्या वृक्षाच्या सुखकारक सावलीचेंच सप्रेम स्मरण होणें स्वाभाविक आहे. त्या आम्रवृक्षाच्या फळांना—तीं कितीहि रसाळ असलीं तरी—त्याच्या स्मृतिसंपुटांत पहिलें

स्थान मिळणें कठिण आहे. पण दूरदूरच्या अनेक माणसांना त्या आम्रवृक्षानें जो आनंद दिलेला असतो तो सावलीचा नाहीं, तर फळांचा–अमृत मधुर अशा रसाच्या आस्वादाचा !

वामनरावांच्यासारख्या साहित्यसेवकांची स्थिति या आम्रवृक्षासारखीच असते. ज्यांना त्यांच्या सहवाससुखाचा लाभ मिळाला आहे, ज्यांना त्यांच्या संभाषणाचा आनंद लुटतां आला आहे, ज्यांना त्यांच्या अखंड आणि अनुपम सौजन्याच्या गंगाप्रवाहांत मनःपूर्वक निमज्जन करण्याचें भाग्य लाभलें आहे, त्या माणसांना वामनरावांचें वाङ्मय त्यांच्यापेक्षां मोठें आहे असें कधींच वाटणार नाहीं. पण स्थळाच्या दृष्टीनें दूर असलेले आजकालचे हजारों मराठी वाचक आणि काळाच्या दृष्टीनें दूर असलेल्या उद्यांच्या मराठी रसिकांच्या पिढ्या वामनरावांच्या स्मृति-मूर्तीला जीं फुलें वाहतील तीं त्यांच्या वाङ्मयाविषयींच्या प्रेमामुळें, त्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेल्या त्यांच्या प्रसन्न आणि प्रभावी व्यक्तिमत्वाविषयींच्या आदरामुळें.

वाङ्मयांत प्रतिबिंबित होणाऱ्या व्यक्तित्वाच्या बाबतींत वामनराव मोठे भाग्य-वान आहेत. कांहीं लेखकांच्या बुद्धीची आणि अंतःकरणाची उंची मोठी असूनही वाङ्मयनिर्मितींत पडलेलें त्यांचें प्रतिबिंब अनेकदां खुरटें किंवा खुजें वाटतें. त्यांचें साहित्य म्हणजे मनुष्याची आकृति विकृत करून दाखविणारा आरसाच म्हटला पाहिजे. साहित्यसेवकांचें हें एक टोंक झालें. दुसऱ्या टोंकाला असलेल्या लेखकांच्या बाबतींत बरोबर उलट अनुभव येतो. त्यांच्या खासगी जीवनाचा परिचय होणें हें वाचकाचें दुर्भाग्यच म्हणावें लागेल. चार घटकांच्या साध्या संभाषणांत-सुद्धां अहंकार, मत्सर, क्षुद्रता इत्यादि विकारांचें प्रदर्शन केल्याशिवाय या पंडितांना राहवत नाहीं ! पण त्यांचें वाङ्मय वाचायला घ्या—तें मनावर मोहिनी टाकल्या-शिवाय राहत नाहीं. सुंदर भाषाशैली, उत्तुंग कल्पनाविलास, मार्मिक कोटिक्रम किंवा आवेशपूर्ण विचार यांच्या आड त्यांचें तें क्षुद्र व्यक्तिजीवन सहज लपून जातें ! एरवीं सामान्य दिसणारी स्त्री पडद्यावर अतिशय सुंदर दिसूं शकतेच कीं नाहीं ? तसेच हे लेखक असतात.

या दोन्ही वर्गांत ज्यांची कुणीहि कधींहि गणना करणार नाहीं असे अभिजात साहित्यिक नेहमींच थोडे असतात. यांचें व्यक्तिजीवन आणि वाङ्मयजीवन यांच्यांत काडीचाहि फरक नसतो. तुम्ही त्यांच्याशीं दोन तास गप्पा मारा,

तुम्हांला त्यांच्या एखाद्या पुस्तकाचीं पांचपंचवीस पानें वाचल्याचा आनंद होईल. तुम्ही एकांतांत त्यांचें पुस्तक घेऊन वाचीत पडा, स्वारी रंगांत येऊन तुमच्या-बरोबर संभाषण करीत आहे असा तुम्हांला भास होईल. आगरकरांपासून साने-गुरुजीपर्यंत या वर्गांत पडणारे जे थोडे मराठी साहित्यिक आहेत त्यांच्या अग्रभागीं वामनरावांना नेहमीं स्थान मिळेल यांत मुळींच शंका नाहीं.

साहित्यांतली ही दुर्मिळ सिद्धि वामनरावांना सहज कशी साध्य झाली? तंत्र-दृष्ट्या त्यांच्या कादंबऱ्यांचे अनेक दोष आजचा बी. ए. चा विद्यार्थी सुद्धां दाखवूं शकेल. आणि ज्यांच्या नाटकावरून नाट्यलेखनाचे प्रमुख गुण या लेखकापाशीं नव्हते एवढेंच अनुमान रसिक बांधतील, त्या वामनरावांचें सहृदय आणि विचार-पूर्ण व्यक्तित्व त्यांच्या वाङ्मयांत संपूर्णतेनें प्रतिबिंबित व्हावें हा एक प्रकारचा चमत्कारच नाहीं का? वरवर पाहिलें तर तो चमत्कार वाटतो! पण थोडा विचार केला तर ती एक अतिशय स्वाभाविक गोष्ट आहे असें दिसून येईल. वामन-रावांच्या सत्यभक्तीनेंच त्यांचें वाङ्मय सुंदर केलें आहे. त्यांच्या प्रामाणिकपणा-नेंच त्यांत सखोलता आणली आहे. त्यांच्या सहृदय वृत्तीनेंच त्यांत जिव्हाळा ओतला आहे. 'रागिणी'पासून 'स्मृतिलहरी' पर्यंतचें त्यांचें कुठलेंही पुस्तक घेतलें तरी लेखनाकरतां मुद्दाम सुंदर मुखवटा चढवून बसण्याची कल्पनाहि त्यांच्या मनाला कधीं शिवली नाहीं–असाच वाचकाचा ग्रह होतो! जें बुद्धीला पटतें किंवा ज्यानें अंतःकरण हलतें तें आणि तेवढेंच वाचकापर्यंत नेऊन पोंचविणारे लेखक होते ते!

वामनरावांना महाराष्ट्रांत कवि म्हणून कुणी ओळखीत नाहीं. पण ते अंतःकर-णानें कवि होते. विनोदी लेखक असा शिक्काछापही त्यांच्या नांवावर रसिकांनीं कधीं मारला नाहीं. पण ते खरोखरींच मोठे सुसंस्कृत वृत्तीचे विनोदी पंडित होते. ते शास्त्रज्ञ आहेत, ते तत्त्वज्ञ आहेत असें म्हणण्याचा 'रागिणी' आणि 'नीतिशास्त्रप्रवेश' यांच्यापासून जो प्रघात पडला तो पडलाच. पण ते मोठे तत्त्वज्ञ असले तरी काव्य-विनोदांत रमून जाणारे तत्त्वज्ञ होते. त्यांच्या प्रतिभेची प्रकृति रुक्ष शास्त्रज्ञाची नाहीं किंवा केवळ चिकित्सक अशा तत्त्वज्ञाची नाहीं. काव्य आणि शास्त्र, विनोद आणि विचार, रसिकता आणि चिकित्सा, यांचा त्यांच्या वृत्तींत—प्रतिभेंत जो एक वैशिष्ट्यपूर्ण मेळ पडला होता त्यामुळेंच त्यांच्या सर्व वाङ्मयांत अवीट गोडी निर्माण झाली.

'रागिणी 'ला 'काव्यशास्त्रविनोद' असें वैकल्पिक दुसरें नांव ठेवण्यांत आपल्या प्रतिभेची ही विशिष्ट ठेवण लोकांनीं लक्षांत घ्यावी अशीच त्यांची अपेक्षा असावी! रागिणीच्या जन्माच्या वेळीं ती अंशतः तृप्तहि झाली! मात्र अगदीं अलीकडे पांडित्याचा पोकळ आव आणणाऱ्या टीकाकारांनीं रागिणींत काव्य नाहीं, शास्त्र नाहीं आणि विनोदहि नाहीं म्हणून हाकाटी करायला सुरवात केल्यावर वामनराव स्वत:शीं एवढेंच म्हणाले असतील 'बिचाऱ्यांनीं जन्मांत हितोपदेश वाचला नसावा! 'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्' एवढी ओळ या विद्वानांना ठाऊक असती तर त्यांचे टीकालेखनाचे श्रम तरी वाचले असते!'

डेक्कन कॉलेजमध्यें असतांनाच वामनराव लिहूं लागले. पण कॉलेजांत शेंकडा दहा-पंधरा विद्यार्थी तरी लेखक असतातच. पुढें 'विश्ववृत्ता'चे सहसंपादक म्हणूनहि कारणपरत्वें त्यांनीं थोडें लेखन केलें असेल. पण लौकिक दृष्ट्या त्यांनीं साहित्यक्षेत्रांत जें पहिलें पाऊल टाकलें तें 'रागिणीच्या' रूपानेंच. या कादंबरीची लोकप्रियता किंवा योग्यता आज ती किती वाचली जाते यावरून ठरविणें अत्यंत अरसिकपणाचें होईल. कोल्हटकरांचे 'सुदाम्याचे पोहे' आजकाल कितीसे वाचले जातात? खाडिलकरांचें 'कीचकवध' हल्लीं वाचनमंदिरांतून कितीसें बाहेर पडतें? काळाबरोबर अभिरुचिहि बदलते. शिवाय कालचा क्रांतिकारक हा आजचा सुधारक आणि उद्यांचा सनातनी ठरावा हा निसर्गनियमच आहे! वाङ्मय तरी त्याला कुठून अपवाद असणार?

पण 'रागिणी' ज्या वेळीं मनोरंजनांतून क्रमशः प्रसिद्ध होत होती त्यावेळीं दर महिन्याच्या प्रारंभीं कॉलेजमधल्या तरुणांचें लक्ष टपालाच्या शिपायाच्या वाटेकडे लागलेलें असे—घरून येणाऱ्या मनी ऑर्डरी करतां नव्हे,—तर 'मासिक मनोरंजना'च्या अंकाकरतां. मनोरंजन मासिक थोडें अनियमित निघत असल्यामुळें या आतुर विद्यार्थ्यांची अनेकदां निराशा होई. पण अंक आला रे आला कीं रागिणीचीं प्रकरणें वाचण्याकरतां सर्वांच्या त्यावर उड्या पडत. हरीभाऊंची 'पण लक्षांत कोण घेतो' करमणुकींतून क्रमशः प्रसिद्ध होत असतांना तत्कालीन तरुण पिढीला जी उत्सुकता वाटली असेल किंवा फडक्यांची 'दौलत' 'रत्नाकर' मधून सुरू झाली तेव्हां ज्या उत्साहानें तरुण वाचकांनीं तिचें स्वगत केलें, तीच उत्सुकता आणि तीच उत्साह 'रागिणी'च्याही वांट्याला आला होता.

१९१४—१५ च्या वाचकांना असा नव्या नवलाईचा आनंद देणारे अनेक

गुण 'रागिणी'त होते म्हणूनच तिचें असें अपूर्व स्वागत होऊं शकलें. हरिभाऊ आपटे हे त्यावेळीं कादंबरी क्षेत्राचे अधिराज होते हें खरें. पण हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांतले कौटुंबिक प्रश्न १९१०–१९१५ च्या सुशिक्षित तरुण पिढीला थोडे जुने वाटूं लागले होते. हरिभाऊ चित्रित करीत असलेल्या व्यक्ती मध्यम वर्गांत विपुल प्रमाणांत वावरत होत्या. [पण उच्च शिक्षण घेतलेल्या आणि मधल्या दहा पंधरा वर्षांतल्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक चळवळींचे संस्कार झालेल्या तरुण–तरुणींना आपल्या अंतःकरणांतल्या नव्या नव्या खळवळींचीं प्रतिबिंबें हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत फारशीं दिसत नव्हतीं. 'रागिणीनें'च त्यांची ही इच्छा प्रथम तृप्त केली. भय्यासाहेब व आनंदराव हे दोन प्रमुख पुरुष आणि रागिणी व उत्तरा या दोन प्रमुख स्त्रिया यांचें वामनरावांनीं केलेलें चित्रण पाहिलें म्हणजे बेझंट बाईच्या थिऑसफीचा त्यावेळच्या तरुणांवर बसलेला पगडा, शास्त्रीय संशोधन व नव्या नव्या उद्योगधंद्यांची स्थापना हा देशोद्धाराचा एक प्रमुख मार्ग आहे या विचारसरणीचे बंगालपासून महाराष्ट्रापर्यंत नव्या पिढीच्या मनांत उठूं लागलेले पडसाद, जुने पातिव्रत्याचे आणि एकनिष्ठतेचे संस्कार आणि नवे पुनर्विवाहाचे व व्यक्तिस्वातंत्र्याचे विचार यांच्या ओढाताणींत तरुण विधवेच्या मनाची होणारी कुचंबणा, पुरुषांनीं आजपर्यंत आपल्याला दास्यांत ठेवलें होतें या भावनेनें सुशिक्षित स्त्रीच्या मनांत निर्माण झालेला बंडखोरपणा इत्यादि १९०५ ते १९१५ या दशकांतल्या उच्च व मध्यम वर्गाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रवृत्तींचें आणि प्रवाहांचें आपण प्रतिबिंबच पाहात आहों असें वाटतें. वास्तव कथानकानें किंवा आवश्यक सुधारणेच्या पुरस्कारानें सुशिक्षित समाजाचें समाधान होण्याचा काल तेव्हां राहिला नव्हता. त्याला चर्चेची, विचारांची, नव्या तत्त्वज्ञानाची भूक लागली होती. पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति यांचा मेळ घालतां घालतां त्याच्या डोक्यांत जो गोंधळ निर्माण होत होता तो जाणणारा, त्याची चर्चा करणारा, त्यांतून बाहेर कसें पडावें हा मार्ग दाखविणारा कादंबरीकार त्यांना हवा होता. ही उणीव वामनरावांनीं 'रागिणी'नें उत्तम रीतीनें भरून काढली. स्वाभाविकच वामनराव हरिभाऊंच्या तोडीचे मोठे कादंबरीकार मानले जाऊं लागले.]

नाथमाधव व ना. ह. आपटे हे दोन लोकप्रिय लेखक वामनरावांच्या पूर्वीपासून कादंबऱ्या लिहीत होते. दोघांनींहि पुढें विपुल कादंबरी वाङ्मय निर्माण

केलें. पण मोजक्या कादंबऱ्या—आणि त्याहि विचारप्रधान—लिहून वामनरावांना रसिकांच्या दृष्टीनें हरिभाऊंच्या शेजारीं जें स्थान मिळालें तें या दोघांना कधीच लाभलें नाहीं. याचें कारण उघड आहे. वामनराव हे आरामखुर्चींतले, माजघरांतले किंवा आगगाडींतले लोकप्रिय कादंबरीकार नसले तरी सुशिक्षितांच्या अभ्यासिकेंत ( Study Room ) त्यांना मानाचें आणि महत्त्वाचें स्थान होतें. मध्यम वर्गाच्या—विशेषतः स्त्रियांच्या जीवनांत हरघडी उत्पन्न होणाऱ्या विविध समस्यांचा अत्यंत साहानुभूतीनें आणि तितक्याच समतोलपणानें मराठी लेखकांत जर कुणीं विचार केला असेल तर तो वामनरावांनींच. कथानकाच्या कृत्रिम रंगतीसाठीं आपल्या कादंबरींतल्या पात्रांच्या जीवनांत त्यांनीं आवास्तव फेरफार कधींच केले नाहींत. आपल्याला प्रतीत झालेल्या जीवनाच्या भागाचें वैचारिक चित्र रेखाटण्या-साठीं त्यांनीं कादंबऱ्या लिहिल्या : साहजिकच तंत्र, कलाविलास, वाचकांना गुदगुल्या करणारीं कुठल्याही प्रकारच्या सौंदर्याचीं वर्णनें इत्यादि गोष्टीकडे त्यांचें दुर्लक्ष झालें. किंबहुना त्यांनीं त्या साध्य करण्याचा प्रयत्न केला असता तरी त्यांना तें जमलें नसतें असेंच म्हणावें लागेल. आपल्या शर्टचीं बटणें दररोज शोधावीं लागणाऱ्या मनुष्याला प्रकरण कुठें सुरू करायचें आणि कुठें संपवायचें, विस्मयाचा धक्का कसा द्यायचा, समरप्रसंग नसला तरी कसा निर्माण करायचा इत्यादि गोष्टींची कृत्रिम दगदग कधींच सहन झाली नसती ! या साऱ्या भानगडी व्यवस्थित करायला लेखक बराचसा वहिर्मुख वृत्तीचा असावा लागतो. पण वामनराव सर्वस्वी अंतर्मुख होते. हाच कादंबरीकार या नात्यानें त्यांचा मुख्य गुण आणि मुख्य दोष !

या अंतर्मुख वृत्तीमुळें त्यांना आपल्या भोंवतालच्या जीवनाच्या पृष्ठभागाखालीं खोल खोल जातां आलें, तिथल्या सुखदुःखांचा कानोसा घेतां आला आणि तिथें चाललेली ध्येयवादाची धडपड चित्रित करणेंही सुलभ झालें. त्यांच्या कादंबऱ्यांना कुठल्याही कृत्रिम सौंदर्याचा निकष लावणें अन्यायाचें होईल. त्यांचें खरें बळ विचार–विलासांत आहे, त्या विलासानें वाचकाच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या उदात्त विचार–तरंगांत आहे. दोन चांगल्या प्रकारच्या वाङ्मयांतला हा भेद त्यांनींच एके ठिकाणीं अतिशय चांगल्या रीतीनें विशद करून सांगितला आहे. ते म्हणतात ‘ पूर्वींच्या कलाकृतींत, उदाहरणार्थ, हरिभाऊ आपटे किंवा शिवरामपंत परांजपे यांच्या कलाकृतींत पुष्कळ दोष असत. पण त्या अधिक गुणयुक्त असत. कोंकणांतल्या नारळी-पोफळीच्या वाड्या आणि शहरांतल्या लहानशा विलायती फुलांच्या बागा यांतील

जो भेद तोच मला इथें सूचित करायचा आहे. कोकणांतल्या नारळी–पोफळींचीं झाडें एका रांगेंत नसतील, समांतर नसतील, ताडामाडांना पोकें आलेलीं असतील, आंब्यांचीं झाडें अगदीं गोलाकृती नसतील; पण तेथील पाण्याच्या पाटांनीं आणि झाडांच्या उंचीमुळें, फलयुक्ततेमुळें आणि छायाबाहुल्यामुळें तेथें जी शोभा दिसते ती शोभा शहरांतल्या बंगल्यापुढच्या लहानशा टुमदार बागेंत नसते. उद्यानांत शोभा नसते असें नाहीं; पण या दोन शोभांमध्यें मला तरी फरक दिसतो ! '

हा फरक गुणांचा नाहीं, जातीचा आहे. एक भव्य तर दुसरें रम्य, पहिलें उदात्त तर दुसरें सुंदर. हा फरक नीट लक्षांत वागवून कालक्रमानें वामनरावांच्या पांच कादंबऱ्या वाचल्यास त्यांची वास्तवता, विचारप्रेरकता आणि वाङ्मयीन सामर्थ्य हीं उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलीं आहेत असेंच दिसून येईल. ' रागिणी ' आणि ' सरला ', किंवा ' उत्तरा ' व ' इंदु ' यांची या दृष्टीनें तुलना करणें अनुचित होणार नाहीं. (या पांच कादंबऱ्या वाचल्या म्हणजे वामनरावांनीं नवी स्त्री नुसती निर्माण केली नाहीं, तिला कालमानाप्रमाणें वाढविण्याची दक्षताहि त्यांनीं घेतली, असेंच टीकाकारांना कबूल करावें लागेल.)

(वामनरावांच्या कादंबरीचें बीज नेहमीं कथात्मक नसून विचारात्मक असतें ' इंदु काळे आणि सरला भोळे ' ही त्यांची उत्कृष्ट कादंबरींच घ्या.) या कादंबरींतल्या एका पत्रांत विनायकराव भोळे लिहितात ' मनुष्यजन्म हा ज्ञानप्राप्तीकरतां नसून देहधर्म सांभाळून शक्य तेवढें ज्ञान मिळवावें, शक्य तेवढा कलाविलासाचा आनंद उपभोगावा, शक्य तेवढें इतरांच्या उपयोगीं पडून त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करावा, एवढ्याकरतां मनुष्यजन्म आहे. केवळ देहसुखानें समाधान व्हायचें नाहीं. कारण आपण पशु नाहीं. केवळ ज्ञानमार्गानें समाधान व्हावयाचें नाहीं. कारण आपणांला जिज्ञासेशिवाय इतर आकांक्षाहि आहेत. केवळ कलेच्या पाठीमागें लागून उपयोग नाहीं; कारण एकटी कला ज्ञानाची व नीतीची भूक भागवूं शकत नाहीं. केवळ कर्ममार्ग उपयोगाचा नाही; कारण ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे व कलेशिवाय आयुष्य नीरस आहे. '

या छोट्या उताऱ्यावरून नारायणराव पाठक, इंदु काळे व विनायकराव भोळे हीं तीन स्वभावचित्रें वामनरावांच्या मनांतल्या विचारसंघर्षांतून प्रथम अस्पष्ट-

पणें निर्माण झालीं असावींत आणि मग इतर आवश्यक पात्रें भरीला घालून त्यांनीं कादंबरी जुळवीत नेली असावी हें अगदीं उघड होतें. ( 'आश्रमहरिणी 'चें कथाबीज 'सुलोचने ' च्या परिस्थितींत आणि तिच्या विचारकलहांत आहे.) 'सुशीला ' ही स्त्रीमनाच्या विकासाचें प्रतीक म्हणूनच त्यांनीं रंगविली.

मात्र वामनरावांच्या (कादंबऱ्या वैचारिक भूमिकेवर उभारलेल्या) असल्या तरी केतकरांच्याप्रमाणें सामाजिक प्रश्नांची किंवा व्यक्तींच्या आचाराविचारांची ते चिरफाड करीत बसत नाहींत. त्यामुळें त्यांच्या कादंबऱ्या तात्त्विक आणि चर्चात्मक असूनहि त्यांत सुसूत्रता असते. त्यांचें विचारसौंदर्य नुसतें आकर्षकच वाटत नाहीं; अनेकदां तें रसपरिपोषकहि होऊं शकते.

'रागिणीनें ' वामनराव एकदम लोकप्रिय झाले याला त्यांच्या विचारविलासाइतकीच त्यांची विशिष्ट भाषाहि कारणीभूत आहे. हरिभाऊंची भाषा सुबोध होती, प्रसादपूर्ण होती, ते ज्या मध्यम वर्गाचें चित्रण करीत होते, त्याचें वास्तव प्रतिबिंब रेखाटण्याला ती अत्यंत अनुरूप होती. पण 'रागिणीं 'त जसा कथाविषयाचा आणि समाजाच्या ज्या वर्गांतून पात्रें घ्यायचीं त्याचा बदल झाला, तसा तो तिच्या भाषेंतहि दिसून आला. सुशिक्षित वाचकांचें सुबोध भाषेनें नेहमींच समाधान होतें असें नाहीं. पोषाखाप्रमाणें भाषेच्याहि बाबतींत त्याच्या नव्या नव्या आवडी निवडी निर्माण होत असतात. नोकझोंक, नाविन्य, सजावट इत्यादिकांकडे त्याचा कल नकळत झुकतो. वामनरावांनीं कादंबरी क्षेत्रांत प्रवेश करण्यापूर्वीं दहा पंधरा वर्षें अशा प्रकारचा मोहक भाषाविलास श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीं आपल्या नाटकांच्या द्वारें सुशिक्षितांत लोकप्रिय केला होता. सामान्यतः तीच धाटणी उचलून वामनरावांनीं आपल्या स्वतःच्या वैचारिक आविष्काराला साजेसें स्वरूप तिला दिलें. तत्त्वज्ञामधें सहसा न आढळणारी शाब्दिक कोटिक्रमाची आवड वामनरावांच्यांत जी विशेषत्वानें दिसून येते, तिचें मूळ त्यांची भाषाशैली घडत असतांना तिच्यावर झालेल्या या संस्कारांत आहे.

पण वाङ्मय समीक्षेंत अत्यंत कुशाग्रबुद्धि चालवूनहि त्यांनीं जसें आपल्या कथारचनेंतल्या वैगुण्यांकडे लक्ष पुरविलें नाहीं, तशी आपल्या शैलीत डोकावून पाहणाऱ्या अव्यवस्थितपणाचीहि त्यांनीं कधीं काळजी केली नाहीं. त्यांच्या शैलींत कल्पकता आहे, अर्थवाहकता आहे, आकर्षकता आहे. पण नादमाधुर्य आणि डौलदार रचनेचें चातुर्य मात्र त्या मानानें फार कमी आढळून येतें. त्यांनीं अखंड कादंबरीलेखन केलें

असतें तर कदाचित् सरावानें हे दोष नाहींसे झाले असते. पण या बाबतीत त्यांनीं स्फूर्तीवर विसंबणाऱ्या लहरी कवींनाहि मागें टाकलें. 'रागिणी', 'आश्रम-हरिणी' व 'नलिनी' या साधारणतः योग्य अंतरानें लोकांपुढें आल्या. पण १९२०-१९३० या दशकांत त्यांच्या प्रतिभेचा पाळणा हाललाच नाहीं. १९२९—३० मध्यें 'सुशीलाचा देव' प्रसिद्ध झाली. पुढें तीनचार वर्षांनीं त्यांनीं 'इंदु काळे व सरला भोळे' लिहिली. त्यानंतर शेवटचीं नऊ वर्षें त्यांची प्रतिभा पुन्हां मुकी झाली. तिची मूळचीं प्रकृति कथालेखकाची नव्हे हें एक तर या अल्प निर्मितीचें कारण होतेंच पण केवळ पैशासाठीं किंवा लौकिकासाठीं लिहायचा अप्रामाणिकपणाचा विचार स्वप्नांतहि तिला शिवला नाहीं. त्यामुळें [त्यांच्या कादंबऱ्यांची संख्या एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच झाली. पण एका सहृदय तत्त्वज्ञाचा मोहक विचारविलास म्हणून या कादंबऱ्या अभिजात वाचकां-कडून नेहमींच वाचल्या जातील; आणि 'इंदु काळे आणि सरला भोळे' ही कादंबरी तर मराठी ललित वाङ्मयाचें एक भूषण मानली जाईल.]

कादंबरी लेखनाच्या पहिल्या भरांत वामनरावांनीं कांहीं गोष्टींहि लिहिल्या त्या 'नवपुष्पकरंडक'मध्यें आल्या आहेत. त्या थोडयाफार मनोरंजक असल्या तरी एकं-दरींत सामान्यच वाटतात. त्याचवेळीं त्यांनीं अनुवादित केलेलें 'सॉक्रेटिसाचे संवाद' व स्वतंत्र रीतीनें लिहिलेलें 'नीतिशास्त्रप्रवेश' या दोन गंभीर पुस्तकांवरून वामनरावांच्या मनाचा खरा ओढा कशाकडे आहे हें सहज दिसून येईल. दुसऱ्या एखाद्या ललित लेखकाला 'सॉक्रेटिसाचे संवाद' या पुस्तकाचें भाषांतर करणें ही सक्तमजुरीची शिक्षा वाटली असती. पण वामनरावांनीं हें काम निव्वळ हौसेनें—वर्तमानपत्राच्या धंद्यांत जें लेखन–वाचन करावें लागतें तें बहुवा क्षणमात्र महत्त्वाचें असतें असा अनुभव आल्यावर आपल्या हातून उच्चतर आणि अधिक महत्त्वाचें वाचनलेखन व्हावें या अत्यंत सात्त्विक इच्छेनें—अंगिकारलें व तें आनंदानें पार पाडलें. चर्चा, चिंतन आणि चिकित्सा यांना ज्या लेखनवाचनांत भरपूर अवसर तें वामनरावांना अधिक प्रिय हा त्यांच्या या आवडत्या उद्योगावरून निघणारा निष्कर्ष 'नीतिशास्त्रप्रवेश' वाचलें कीं पूर्णपणें खरा वाटूं लागतो. अभ्यास, चर्चा, प्रतिपादन, मांडणी, भाषाशैली इत्यादि अनेक दृष्टींनीं मराठींतल्या अपूर्व ग्रंथांत या पुस्तकाची सदैव गणना होईल. 'गीतारहस्या'च्या जोडीनें पूर्वी त्याचा उल्लेख होत असे; आणि आज या ग्रंथाला दोन तपें होऊन गेलीं असलीं, नीतिशास्त्रविषयक

पाश्चात्य वाङ्मय पूर्वीपेक्षां आतां विपुल प्रमाणांत उपलब्ध होत असलें आणि जगांतल्या विविध आणि वादळी स्थित्यंतरांमुळें नीतिशास्त्रविषयक नवे नवे प्रश्न समाजापुढें नित्य उत्पन्न होत असले तरी या सुंदर पुस्तकाला मागें टाकणारा ग्रंथ अद्यापि मराठींत निर्माण झालेला नाहीं. आपल्या हातून व्हावें तितकें स्वतंत्र, चिकित्सक आणि पांडित्यपूर्ण प्रबंधलेखन झालें नाहीं ही मनांतली रुखरुख आपल्या एकसष्टीच्या समारंभाच्या वेळीं वामनरावांनीं बोलून दाखविली होती. आयुष्य लाभलें असतें तर 'नीतिशास्त्र-प्रवेशा'ला मागें टाकणारा ग्रंथ त्यांच्याच हातून कदाचित् निर्माण झाला असता. 'ज्ञान हें विष कीं अमृत' सारखे सुंदर पण चिकित्सक प्रदीर्घ निबंधहि त्यांनीं लिहिले असते. पण—जगांतलें सारें दुःख 'पण' या दोन अक्षरीं शब्दांत येऊन सांठलें आहे हेंच खरें !

नीतिशास्त्राप्रमाणें साहित्यशास्त्रांतहि वामनरावांचा अधिकार असामान्य होता. उत्तम ललितवाङ्मयनिर्माता हा उत्कृष्ट टीकाकार होऊं शकतोच असें नाहीं. पण श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या जोडीनें सूक्ष्म दृष्टीचे पण समतोल साहित्यचिकित्सक म्हणून वामनरावांचा निर्देश उद्यांच्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासकाराला करावा लागेल. 'विचारलहरींतील' 'दुटप्पी कीं दुहेरी' हें एकच परीक्षण वाचलें तरी टीकाकार या नात्यानें वामनरावांच्या अंगीं असलेले अनेक बहुमोल गुण वाचकाच्या प्रत्ययाला येतात. पण ते नुसते गुणसंपन्न टीकाकार नव्हते; साहित्यविषयक प्रश्नांचें मौलिक आणि मार्मिक विवेचन करणारे शास्त्रज्ञहि होते ! 'विचारसौंदर्य' या पुस्तकांतलें 'कांहीं साहित्यविषयक प्रश्न' व 'वाङ्मयाची प्रवृत्ति व त्याचीं ध्येयें' हे दोन निबंध त्यांच्या रसाळ विवेचक शक्तीचे अमर साक्षीदार आहेत. मराठी वाङ्मयाच्या भावी प्रगतीला परिपोषक होईल असा साहित्यशास्त्रावरला सुंदर ग्रंथ निर्माण करण्याचें सामर्थ्य त्यांच्या बुद्धींत आणि रसिकतेंत निःसंशय होतें. शेवटच्या दहा वर्षांत प्रकृति खालावली नसती, ज्या संस्थेच्या सेवेंत त्यांनीं आपल्या आयुष्याचा उत्कृष्ट भाग वेंचला, तिच्यावर आलेल्या गंडांतरामुळें आणि अन्य कारणांमुळें अशा ग्रंथलेखनाला अत्यंत आवश्यक असलेलें मनःस्वास्थ्य त्यांना दुर्मिळ झालें नसतें तर नीतिशास्त्रप्रवेशा'च्या बरोबरीनें त्यांचा साहित्यशास्त्रावरला ग्रंथहि आज वाचनमंदिरांत रसिकांचा करभार घेत राहिला असता.

'विचारसौंदर्यांत' सखोल वाङ्मय—विवेचन आहे तर 'विचारलहरीं'त वामनरावांच्या प्रासंगिक लेखनांतसुद्धां किती जिव्हाळा, किती प्रामाणिकपणा आणि किती

मार्गदर्शन असूं शकतें याचें प्रत्यंतर पटविणारे अनेक लेख आहेत. वामनराव कट्टर सुधारक होते, पण ते आंधळे सुधारक नव्हते हें ‘ विवाहित स्त्रियांचीं कांहीं कर्तव्यें ! ’ हा एकच लेख वाचला तरी कळून येईल. वामनराव विभूतिपूजक होते; पण ते अंधभक्त नव्हते हें विजापूरकर आणि कर्वे यांच्यावरच्या त्यांच्या लेखांतून दिसून येईल. वामनराव मोठे साहित्यिक होते; पण कलाकारांत नेहमीं आढळणारा स्वतःच्या निर्मितीविषयींचा अवास्तव अहंकार त्यांच्यापाशीं औषधालासुद्धां नव्हता, हें ‘ मी आणि माझीं पुस्तकें ’ हा लेख सहज चाळला तरी कळून येईल.

जिव्हाळा, प्रामाणिकपणा, विनोददृष्टि, लहानशा गोष्टींत मोठा अर्थ पाहण्याची शक्ति, इत्यादि लघुनिबंधकारांचे गुण वामनरावांच्या प्रतिभेंत भरभूर होते असें असूनहि ज्याला कांटेकोरपणानें लघुनिबंध ही संज्ञा देतां येईल असें लेखन त्यांनीं केलेलें नाहीं. मात्र तसलें लेखन ते किती सुंदर करूं शकले असते याचा पुरावा म्हणून त्यांच्या ‘ स्मृतिलहरी ’ या शेवटच्या गोड पुस्तकाकडे निःशंकपणानें बोट दाखवितां येईल. लघुनिबंध व आत्मचरित्र यांचें एक विलक्षण पण मधुर मिश्रण या पुस्तकांत झालें आहे. वामनरावांच्या हातच्या या शेवटच्या गोड घासाचा आस्वाद घेतांना तांब्यांच्या ‘ रिकामे मधुघट ’ या कवितेची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं. आतां माझ्याजवळचा काव्यमधु संपला हें सांगण्याकरतां तांब्यांनीं ही कविता लिहिली. पण त्यांतली करुण भावना त्यांनीं इतक्या आर्ततेनें आळविली कीं ही त्यांची कैफियतहि त्यांच्या उत्कृष्ट कवितांइतकी रसपूर्ण वठली. वामनरावहि शेवटीं शेवटीं ‘ सांगायसारखं माझ्यापाशीं कांहीं उरलं नाहीं ’ असें म्हणत असत. पण हें म्हणतां म्हणतां संपादकांच्या आग्रहाखातर त्यांनीं मधून मधून जें स्फुट लेखन केलें त्याला.त्यांत त्यांच्या वृत्तींतलें मार्दव आणि माधुर्य किती कांठोकांठ भरलें आहे हें ‘ स्मृतिलहरी ’ वाचणाऱ्यांना मुळींच सांगायला नको. वामनरावांचें प्रशान्त पण प्रभावी व्यक्तित्व या पुस्तकांतल्या पानापानांत प्रतिबिंबित झालें आहे. इंदु काळे व सरला भोळे, नीतिशास्त्रप्रवेश आणि विचारसौंदर्य यांच्याप्रमाणें ‘ स्मृतिलहरी ’ हेंहि मराठीच्या ग्रंथभांडारांतलें एक सुंदर रत्न आहे.

वामनरावांनीं आपल्या आयुष्यांत शेंकडो विद्यार्थिनींना विद्यादान केलें, पित्याच्या वत्सल दृष्टीनें त्यांचीं सुखदुःखें पाहिलीं, त्यांना सदैव सहानुभूतीनें सल्ला आणि साहाय्य दिलें. त्यांच्या मर्त्य देहाबरोबर त्यांची ही भूमिका संपली. पण त्यांचें

कार्य अजून संपलें नाहीं. तें दीर्घकाल चालणार आहे. महाराष्ट्राच्या पुढील पिढ्यांतल्या लक्षावधी तरुणांना आणि प्रौढांना ते आपले गुरुच वाटतील. त्यांच्या ग्रंथांतून मिळणारा सात्त्विक आनंद, त्यांचीं पुस्तकें वाचून उत्पन्न होणारें उदात्त वातावरण, मानवी जीवन सुखमय व्हावें म्हणून त्यांनीं केलेलें मार्गदर्शन ह्या साऱ्या गोष्टी मराठी जगाच्या स्मृतिभांडारांत चिरंतन स्थान मिळवितील. मराठी शारदेच्या मंदिरांत टिळक, आगरकर, शिवरामपंत परांजपे, हरिभाऊ आपटे, डॉक्टर केतकर, इतिहासाचार्य राजवाडे, आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जवळच त्यांची मंद पण मधुर स्मित करणारी ती मूर्ति आतां विराजमान झाली आहे. ती गंभीर वाणीनें आजच्या आणि उद्यांच्या मराठी साहित्यिकांना सदोदित एकच संदेश देत राहील:—

[' असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतारकृत्य आहे. अर्थात् कंसादिकांना ज्याप्रमाणें कृष्णाची भीति वाटत होती त्याप्रमाणेंच दुर्जनादिकांना आपली भीति वाटली पाहिजे. दौर्जन्य कोठेंहि व कोणत्याहि क्षेत्रांत असो, तें आपणांस असह्य झालें पाहिजे. अन्याय हा सरकारचा असो किंवा संस्थानाधिपतींचा असो, तो नाहींसा करण्याकडे वाङ्मयाची प्रवृत्ति झाली पाहिजे. हें काम निर्भयपणें झालें पाहिजे. परतंत्रता कोणत्याहि क्षेत्रांतली असो, ती सामाजिक असो, धार्मिक असो, वाङ्मयात्मक असो आपणांस ती अवंद्य असली पाहिजे व सर्वांना ती अवंद्य होईल अशी आपली वाङ्मयप्रवृत्ति पाहिजे. दास्य राजाचें असो, संस्थानिकांचें असो, रूढीचें असो किंवा पुरातन शास्त्रांचें असो, त्याचें निर्मूलन करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तींचेंच ध्यान, भजन व पूजन आपण केलें पाहिजे व कृत्रिम रूढि, परंपरा, संकेत, इत्यादिकांचें दास्य, वर्चस्व, किंवा बंधकत्व पार झुगारून दिलें पाहिजे व झुगारून देण्यास लोकांना शिकविलें पाहिजे. हें व्रत आपण स्वीकारलें व आपली वाङ्मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर तुष्टि, पुष्टि, व शांति यांचा लाभ आपणांस व जगास मिळून दैवी संपत्तीचें जगांत साम्राज्य होईल. व उच्चत्तम कलाविलासांत रममाण होऊन अलौकिक अशा सात्विक आनंदाचे आपण वांटेकरी होऊं. ']

## वामनरावांचीं विविध दर्शनें ९

साहित्यिक व प्राध्यापक या नात्यानें वामनरावांची ओळख आपणांस अगोदरच झाली आहे. वामनराव या दोनच नात्यांनीं लोकांपुढें ठळकपणें वावरत असले तरी वक्ते, परीक्षक, टीकाकार अशासारख्या निरनिराळ्या नात्यांनींहि ते थोडे फार ओळखले जात असत. आणि त्या त्या नात्यांनीं त्यांची ओळख झाल्याशिवाय आपल्याला वामनरावांचें साकल्यानें दर्शन झालें असें मानतां यावयाचें नाहीं. तेव्हां आतां त्यांचीं हीं निरनिराळ्या नात्यांचीं दर्शनें घेऊं.

पण त्याचेहि पूर्वी आपण त्यांच्या संसाराकडे डोकावून संसारी, कुटुंबी, गृहस्थ या नात्यानें त्यांची भूमिका काय होती, तींत त्यांना कितपत यश आलें, त्यांची वृत्ति काय होती वगैरेसंबंधीं थोडेसें पाहूं. वामनरावांचा विवाह १९०२ मध्यें झाला आणि त्यांच्या पत्नी १९१८ मध्यें निवर्तल्या हें आपण मागें पाहिलेंच आहे. मधला १६ वर्षांचा काल–कांहीं विद्यार्थीदशेंत, कांहीं तुरुंगांत, कांहीं परिस्थितीशीं झगडण्यांत–थोडक्यांत सांगायचें म्हणजे अस्थिर, अनिश्चित अशा स्थितींत गेलेला असल्यामुळें सुखाचा, स्थिरतेचा, शांततेचा असा संसार उपभोगण्याचें भाग्य वामनरावांना फारसें कधीं लाभलेंच नाहीं. त्यांची पत्नी निवर्तल्यावर तर ते बोलूनचालून विधुर बनले. ‘ गृहिणी गृहमुच्यते ’ या न्यायानें गृहिणी गेली म्हणजे घरच संपलें असें

म्हणतात. पण वामनरावांची गृहिणी गेली तरी त्यांचें घर व त्यांचेमधील गृहस्थ-पणा हीं शेवटपर्यंत कायम होतीं. गृहस्थ म्हणून असणाऱ्या त्यांच्या इच्छा–आकांक्षा अद्याप अतृप्त होत्या. गृहस्थानें करावयाचीं कर्तव्यें व उपभोगावयाचे भोग अद्याप अकृत व अनुपभुक्त अशाच अवस्थेंत होते.

वडील माणसें असावींत, पत्नी, मुलेंबाळें असावींत; खाण्यापिण्याची चंगळ व सुखसोयींची समृद्धि असावी; आपलेकडे आप्त, इष्टमित्र, स्नेहीसोबती वगैरेंनीं यावें, रहावें, खावें, जेवावें, हसावें, खेळावें, पै-पाहुण्यांचा व अतिथिअभ्यागताचा आदर-सत्कार व यथायोग्य संभावना आपले हातून घडावी, अशा प्रकारच्या गृहस्थाश्रमी-यांच्या ज्या कांहीं सात्त्विक व सुखात्मक आशा–आकांक्षा असतात त्या सर्व वामन-रावांचे ठिकाणीं उत्कटत्वानें होत्या. आणि त्या थोडयाफार प्रमाणांत पूर्णहि झाल्या असल्या तरी पूर्णत्वानें पूर्ण न झाल्यामुळें ते शेवटपर्यंत असमाधानी असत. त्यांना मातृसुख अगदींच मिळालें नाहीं असें नाहीं, पण तेवढयावर त्यांचें समाधान झालें नाहीं. महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान मिळून स्वतःचा गौरव होत असतांना त्यांना जितका आनंद होतो तितकाच हा गौरव पाहायला आपली आई नाहीं याचा त्यांना विषाद वाटतो. थोरले बंधु आण्णा यांच्यावर तर त्यांची इतकी भक्ति कीं आचाराविचारानें पूर्णपणें भिन्न असतां दोघेहि भावनेनें अगदीं एक. आण्णांच्या आवडी–निवडी त्याच तात्यांच्या. त्यांचे इष्टमित्र तेच यांचे. कार्यक्षेत्रें व विचारप्रवाह अगदीं निराळीं असलीं तरी नानांसंबंधींची तात्यांची भावनाहि तितकीच आदराची व प्रेमाची; पण आण्णा जरा अकालींच गेले म्हणून, व नानांची प्रकृति इतकी क्षीण कीं तेहि तसेच एकादे वेळीं चालते होतील कीं काय ही नित्याची धास्ती म्हणून तात्या नेहमीं दुःखी व चिन्ताक्रान्त असत. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं पत्नी अकालींच दिवंगत झाली, आणि तेव्हांपासून त्यांना गृहिणीशिवायच गृहपालन करावें लागलें होतें.

मुलांबाळांसंबंधींच्या बाबतींत त्यांच्या इच्छा अपूर्त राहिलेल्या नव्हत्या. दोघी मुली स्वभावानें चांगल्या असून दोघीहि आतां सुगृहिणी आणि सुमाता झाल्या असल्यानें तात्यांना समाधान असे, आणि जांवई तर अपेक्षेपेक्षांहि चांगले मिळाले याचा त्यांना विशेषच आनंद होत असे. मुलांच्या बाबतींत मात्र ते तितके सुखी नव्हते. पहिला मुलगा तर अकालीच वारला म्हणून आणि दुसरा एरवीं पुष्कळच चांगला असला तरी स्वतःच्या संसाराच्या बाबतींत तो अवास्तव उदासीन असतो

म्हणून त्यांना वाईट वाटल्यावांचून राहात नसे. त्यानें आतां लग्न करून संसार करावा व मुलींच्या मुलांप्रमाणेंच मुलाच्या मुलानेंहि लौकरच आपल्या मांडीवर खेळूं लागावें असें त्यांना आतांशें वाटूं लागलें होतें. दोघां बंधूंचीं मुलें सर्वच दृष्टीनें चांगलीं निघालीं असल्यामुळें तात्यांना आनंद वाटे पण नानांची एक होतकरू मुलगी व आण्णांचे दोन कर्ते सवरते मुलगे भर तारुण्यांत काळाला बळी पडल्यामुळें तात्यांचा हा आनंदहि तितकासा शुद्ध राहिला नाहीं.

तसें पाहिलें तर तात्यांची प्राप्ति अगदीं चांगलीच नसली तरी अगदीं वाईटहि नव्हती. खाजगी संस्थेंत काम करणारा प्रोफेसर आणि अगदीं सामान्य जनतेच्या आहारीं न जातां त्यांनाच आपल्यामागें खेचून आणणारा–तसें करण्याचा प्रयत्न करणारा–लेखक सामान्यतः जितका पैसा मिळवितो तितका त्यांनाहि मिळत असे.* पण मिळालेला पुरा पडेल तर ना? नातेवाईक, आप्तेष्ट, पाहुणेरावळे, विद्यार्थि-विद्यार्थिनी यांचें करण्यांतच बहुतेक सर्व खलास होऊन कित्येक वेळां तात्यांना पहिल्या तारखेची वाट पहात बसावें लागे. गृहिणीचे अभावीं गृहस्थाश्रमाला उचित, घरचेंघरींच, व घरगुती उपचारांनीं आलेल्यांचें स्वागत आपले हातून होत नाहीं याची हळहळ तात्यांना अतिशय वाटे व ती उणीव भरून काढण्याच्या

*वामनरावांच्या पगारासंबंधीं प्रोफेसर येरवडेकर लिहितात : "समर्थविद्यालयांत त्यांना दरमहा फक्त ४० रु० पगार मिळत असे. केसरी ऑफिसमध्यें ७० रु. पगार होता. मेसेजमधील द. म. रु. १२५ पगाराचा उल्लेख वर आलाच आहे. सध्यां त्यांना १२५ रु. पगार मिळतो. ते बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, नागपुर युनिव्हर्सिटी, महिला विद्यापीठ वगैरे विद्यापीठांचे परीक्षक असतात. पण ही प्राप्ति अनिश्चित व थोडीशीच असते. मागें पांच-सहा वर्षांपूर्वी ते मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकचे परीक्षक होते, व यंदां बी. ए. चे आहेत. वाङ्मय लेखनापासून द्रव्यप्राप्ति किती झाली याचा विचार याच लेखांत पुढें स्वतंत्रपणें करायाचा आहे (ती सुमारें रु. ३४०० भरते). हे आंकडे लक्ष्मी व सरस्वती यांचें 'निसर्गभिन्नास्पदत्व' स्पष्टच दर्शवितात."

वाङ्मयनिर्मितीपासून वामनरावांस एकंदर रु. १०,००० मिळाले असावेत असें पुढें दाखविलें आहे. महिला विद्यापीठाचे पगारांत मध्यन्तरीं कांहीं वर्षें बरीच घट झाली होती.

याचसंबंधीं वामनरावांचे बंधु नाना लिहितात : " तात्या चैनी नव्हते, पण पैसा खर्च करण्यांत सढळ हात होता. शिवाय ते पुण्यास रहात असल्यामुळें आण्णा सुटट्यांमध्यें मुलांबाळांसह पुण्यास येऊन रहात, व माझीं मुलेंहि सुट्टीमध्यें पुण्यास येत. त्यामुळें त्यांचे पैसे संपून जात. परीक्षक म्हणून मिळालेले व पुस्तकांमध्ये मिळालेले पैसे वरीलप्रमाणे खर्च होऊन संपून जात."

भरांत एकादे वेळीं तात्या घर असं कांहीं भरून टाकीत कीं खप न झाल्यामुळें सगळें फुकट जावें. घरांत माणूस एकाद दुसरेंच असलें तरी २॥–३ शेर दूध पातेल्यांत असलेंच पाहिजे. उरून अंवून गेलें तरी हरकत नाहीं, पण नाही असें होतां कामा नये. जी गोष्ट दुधाची तीच इतर गोष्टींची. पदार्थांना ताळमेळ नाहीं, अर्थात खर्चालाही नाहीं. शिवाय हिशेब ठेवण्याची संवय नाहीं, इच्छाहि फारशी नाहीं. मिळालेला पैसा वावगा खर्च होत नाहीं येवढी स्वतःची खात्री असल्यावर तो मांडून ठेवण्यांतच काय मोठा पुरुषार्थ आहे! मिळवायचें कशाला? तर योग्य वेळीं खर्च करायला यावा म्हणून; आणि तो जोंपर्यंत भागतो आहे तोंपर्यंत संचयाची विवंचना करा कशाला अन् कुल्या–कुलपं हवींत कशाला? ही त्यांची विचारसरणी! त्यांचे पैसे पुष्कळ वेळां चोरीस जात. पण पक्कें समजल्यावांचून धरायचें कोणाला? आणि सर्व उपाय संपल्यावर गरिवांनीं चोरी करायची नाहीं तर काय करायचें? एकट्या दुकट्या चोराला धरून भागायचें नाहीं. समाजांतल्या सर्वच प्रतिष्ठित चोरांना चोपलें पाहिजे, असें ते म्हणत. असें कांहीं विचित्र पण औदार्यमूलक त्यांचें वागणें असे. आपलें चुकतें आहे हें त्यांना कळत नव्हतें असें नाहीं, पण वाटत असलेलें बरोबर आचरणांत आणलेंच पाहिजे. अशी पोटतिडीकहि त्यांस उत्पन्न होत नसे. खिशाची गरिबी असली तरी मनाची श्रीमंती असल्यामुळें चारुदत्ती समाधानांतच समाधान मानून घेण्याचा ते प्रयत्न करीत आणि उलट दारिद्र्याची खंतहि करीत. अशी कांहीं विलक्षण वृत्ति त्यांची बनली होती.

'गृहस्थाश्रमी' या नात्याचें वामनरावांचें वर्णन पुरे करण्यापूर्वी त्यांच्या आयुष्यांतल्या एका नाजूक व रहस्यमय बाबीचें दिग्दर्शन करावयाचें आहे. तें जरूरीचें नसलें तरी सामान्य माणसाचे मनांतील एक रिकामटेकडी जिज्ञासा तेणेंकरून तृप्त होईल येवढें खरें. ही बाब म्हणजे वामनरावांनीं दुसरें लग्न कां केलें नाहीं ही होय. १९१८ सालीं त्यांची पत्नी निवर्तली. त्या वेळी त्यांचें दुसऱ्या लग्नाचें वय नव्हतेंच असें नाहीं, आणि सुशिक्षित व योग्य वयाची वधू त्यांना मिळाली नसतीच असेंहि नाहीं. पण विधुर रहावयाचें त्यांनीं एकदां जें ठरविलें तें शेवटपर्यंत. पुनर्विवाह पुरुषांनींचसा काय, पण स्त्रियांनींहि करावा येवढेंच नव्हे तर प्रसंगीं त्यांनीं द्विपतिकत्वहि आचरण्यास शास्त्राचा व रूढीचा प्रतिबंध असूं नये असें लेखांतून प्रतिपादणाऱ्या 'लेखक' तात्यांनीं स्वतःवर पाळी

आली असतांना शास्त्रसिद्ध व रूढिप्रतिष्ठित असा साधा विवाह करायलासुद्धां 'खऱ्या' तात्यांनीं तयार होऊं नये याचें आम्हां जवळच्यांना आश्चर्य वाटून आम्ही त्यांना त्यासंबंधीं थोडेंसें हिणवीतहि असूं. पण त्यावर ते असें म्हणत कीं, स्वतः प्रचारिलेल्या सुधारणांचा फायदा सुधारकानें स्वतःच घेणें बरें दिसत नाहीं. त्यांत त्याचा स्वार्थ दिसून तो गैरसमज पसरविण्यास कारण होतो. सुधारकानें सीझरच्या पत्नीप्रमाणें नेहमीं संशयातीत असलें पाहिजे. ही तात्त्विक बाजू सोडून ते एकादे वेळीं अर्धवट थट्टेनें म्हणत 'अहो, लग्न करावेंसें वाटत का नाहीं? पण आतां करायचें म्हणजे तें मोठ्या व सुशिक्षित मुलीशींच केलें पाहिजे. पण मोठी मुलगी–अन् तीहि सुशिक्षित–करायची तर तिच्या आवडी–निवडी, आशा–आकांक्षा, विचार–विकार वगैरे सर्व कायम बनलेले असणार. स्वातंत्र्याच्या व समानतेच्या तिच्या स्वतःच्या कांहीं कल्पना असावयाच्या, आर्थिक व सामाजिक दर्जासंबंधींच्या कांहीं किमान अपेक्षा असावयाच्या, आणि त्या सर्व माझेकडून पुऱ्या झाल्या नाहींत तर तिला दुःख आणि ती दुःखी म्हणून मलाहि दुःख. दोन जीवांना जन्माचे दुःखी करण्यापेक्षां मी एकटाच दुःखी राहिलेलों काय वाईट? शिवाय घरांत सावत्र संबंध उत्पन्न होऊन नवीन मुलांचें सर्व सुखरूप करण्याचे भरांत जुन्यांची जर थोडीफार आबाळ कळत–न कळत तिचे हातून झाली–अन् ती होणें मनुष्यस्वभाव जो आहे तो लक्षांत घेतां साहजीकच आहे–तर स्वतःला सुख लाधलं तरी मुलाबाळांचें दुःख पाहवणार नाहीं; एवंच त्याहि दृष्टीनें दुसरें लग्न अपेशी ठरणार. माणूस कितीहि शिकलें–सवरलें तरी त्याला दुसऱ्याचा संसार स्वतःचा असें कसें वाटूं लागणार? अशा स्वरूपाची त्यांची विचारसरणी असे. पतीशीं ऐक्य व तादात्म्य पावण्याचे बाबतींत एकादे वेळीं अशिक्षित स्त्रीच जास्त बरी असेंहि ते म्हणण्यास–विशेषतः स्त्रियांना खिजविण्याकरितां–कमी करीत नसत. आणि उदाहरण म्हणून सांगत कीं 'रागिणी' समजूतदारपणें वाचून माझ्यावर टीकेची झोड उडविणाऱ्या विद्वान् बायकोपेक्षां ती न समजतांच माझें कौतुक करणारी व उत्तेजन देणारी थोडीशी कमी शिकलेली बायको काय वाईट? पण या विचारसरणींतील हेत्वाभासहि ते स्वतःच स्पष्ट करतील आणि आपल्या स्वतःच्या विचारासंबंधीं लोकांना संशयांत पाडतील.

सुशिक्षित व मोठ्या वयाच्या पत्नीशीं आपलें जुळलें नसतें ही एक भीति-

आपलें जुळलें तरी मुलांचें जमलें नसतें ही दुसरी भीति. आणि आपल्या आप्तेष्टांना—पुतणे-पुतण्या यांना—आपलेकडे परकेपणा वाटून तीं घर वर्ज करतील ही तिसरी भीति. (अशी भीति तात्यांना वाटत असल्याचें त्यांचे पुतणे लिहितातच.) आणि म्हणून वामनरावांनीं लग्न केलें नाहीं हें वर सुचविलेल्या प्रश्नाचें उत्तर आहे. पण येवढ्या खुलाशानें खरें समाधान न होऊन कांहींनां पुन्हां विचारावेंसें वाटतें. 'वामनरावांच्या मनांतूनच नव्हतें, का असून जमलें नाहीं? किंवा अगदीं खरें विचारावयाचें म्हणजे त्यांचा प्रेमभंग वगैरे कांहीं झाला होता कीं काय? एकदमच सांगायचें म्हणजे असें कीं, प्रेमभंग कांहीं झाला नव्हता. पण त्यांच्या मनांत लग्न करायाचें असून तो विचार कांहीं काळ घोळत होता येवढें मात्र खरें. श्री. कमलाबाई देशपांडेच या बाबतींत जास्त चांगलें सांगतील. त्या म्हणतातः—

१९२१।२२ सालची गोष्ट असेल. मी आजन्मसेवक होऊन हिंगण्यास बोर्डिंग सुपरिंटेंडंटचें काम करूं लागलें होतें. जोशी कॉलेजांत प्राध्यापक असून जेवावयास बोर्डिंगमध्यें येत असत. मुलांच्या शाळेंतच सर्व काम केल्यानें मुलींच्या शाळेंत व मिश्र समाजांत काम करतांना स्वीकारावयाचें विशिष्ट धोरण त्यावेळीं त्यांचे अंगीं बाणलें नव्हतें. त्यामुळें अजाणतां कांहीं गोष्टी करीत, व हिंगण्याच्या वरिष्ठ मंडळाचे वातावरणांत त्यामुळें थोडा वेळ चर्चा होई. मुलींच्या वसतिगृहांतील खोल्यांत पुरुषांनीं एकदम जावयाचें नाहीं ही प्रथा तात्यांच्या लक्षांत आली नाहीं व संध्याकाळीं बोर्डिंगकडे जेवावयास आले असतां मुलींना कांहीं पुस्तकें देण्यास ते थेट माडीवर गेले. याची चर्चा सुरू झाली व ही जबाबदारी कमळाबाईची आहे, त्या बोर्डिंग सुपरिंटेंडेंट आहेत असेंहि बोलणें सुरू झालेलें कानीं पडलें. तात्यांना याबद्दल सूचना देणें हें माझें कामच होतें व त्यांचें मन न दुखवितां सूचना देण्यास योग्य संधीची वाट पहावी तर तेवढ्या वेळांत बोर्डाचे सभेंत हा प्रश्न दुसऱ्या बाजूकडून निघावयाचा व मग त्यावर उभय पक्षांचा त्रागा होऊन शेवटीं ठरावयाचें कीं हें कमलाबाईचें चुकलें! हा पुढचा सर्वच प्रसंग टाळावा व तात्यांचेंहि मन शक्य तितकें कमी दुखावलें जावें या हेतूनें बाकीची पार्श्वभूमि न सांगतां मीं तात्यांना म्हटलें "तात्या, तुम्हांला एक सांगू का? तुम्ही बोर्डिंगांत जाऊं नका." तात्यांनीं होकार दिला व तो प्रश्न संपला.

पुढें सुमारें १९२७ सालची गोष्ट. साताऱ्याहून मी पुण्यास आलें होतें. पुण्याच्या कन्याशाळेंतील एका शिक्षकास तेथील मंडळींनीं शाळा सोडण्यास भाग

पाडलें होतें. तात्या त्या शाळेच्या बोर्डाचे सभासद होते. अशा तऱ्हेनें शाळा सोडावयास लावल्यानें शिक्षकास अन्याय होत नाहीं काय याबद्दल त्यांचा व माझा वाद चालला होता. “ तात्या तुमची खात्री झाली आहे काय त्या शिक्षकाच्या अनैतिक वर्तनाबद्दल ? तुम्ही काय म्हणून ठरावाला अनुकूल मत दिलेंत ? ” मीं विचारलें. “ मी कोठें म्हणतों आहे त्याचा अपराध असेलच म्हणून ” तात्या म्हणत होते. ‘ कदाचित् नसेलहि ! पण ज्या वेळीं अशा तऱ्हेचा प्रश्न येतो तेव्हां संशयाचा फायदा विरुद्ध पक्षाला मिळून पुरुषांस त्रास सोसावा लागतो. आणि कमलाबाई, तुम्हीं नाहीं कां माझ्या बाबतींत असें केलेंत ? मला बोर्डिंगांत येण्याची बंदी केलीत ! ” तात्या एकदम गंभीर होऊन म्हणाले. हे शब्द ऐकून मी आश्चर्यानें तात्यांच्या तोंडाकडेच पहात राहिलें. माझे डोळे भरून आले व मीं म्हटलें “ तात्या, तुमच्या-कडून अशा उत्तराची मीं अपेक्षा केली नव्हती, आधीं हें घडलें कुठें व केव्हां ? शिवाय माझी तुमच्या ठिकाणीं पितृतुल्य भावना आहे हें तुम्ही जाणतां; असें असतां तुमच्याबद्दल मला असा संशय येईल, व त्यासाठीं मी तुम्हांला बोर्डिंगांत येण्याची बंदी करीन असें तुम्हांला वाटलेंच कसें ? ती गोष्ट लक्षांत ठेवून आज सहासात वर्षांनीं सांगतां त्यापेक्षां ज्या वेळीं वाटलें त्या वेळीं ताबडतोब माझ्याशीं भांडायला कां आला नाहींत ? मागच्या वर्षीं तुमची विद्यार्थिनी म्हणून अभिमानानें लोकांना सांगणारी मी जी. ए. होऊन सुपरिंटेंडेंट होतांच तुम्हांबद्दल संशय घेण्या-येवढी शिष्ट बनलें असें तुम्हांला वाटलेंच कसें ? ”

माझ्या या सरबत्तीनें तात्याहि गहिंवरले. डोळे पुसून ते म्हणाले “ कमलाबाई, मीं त्याबद्दल तुमच्यावर राग धरला नव्हता. तुम्हांला शिस्तीच्या दृष्टीनें तें करणें इष्ट वाटलें असेल. पण आतां उदाहरण म्हणून सांगितलें इतकेंच.” तात्यांनीं मागचा प्रसंग केव्हां घडला हें सांगितल्यावर मग मला त्या गोष्टीची आठवण झाली. त्या वेळची सर्व परिस्थिति मीं त्यांना सांगितली व म्हटलें “ या कारणासाठीं तुम्हांला मनस्ताप होईल तो टळावा यासाठीं बाकी कांहीं न सांगतां मी फक्त बोर्डिंगांत विचा-रल्याशिवाय येऊं नका म्हणून सांगितलें. व तुम्हींहि ती सूचना इतकी पाळलीत, व पुढेंहि माझ्याशीं इतकें सरळ वागलांत कीं ती सूचना ज्या भावनेनें मीं दिली त्याच भावनेनें तुम्हीं घेतलीत असें मला वाटलें. ”

“ ती गोष्ट माझे मनास लागली खरी, पण ती कां बोचली याचें मानसशास्त्र-दृष्ट्या स्पष्टीकरण मला आतां दिसतें आहे. ” तात्या पुढें म्हणाले, “ आतां

तुम्हांस सांगतों. त्यावेळीं लग्न करण्याचा माझा विचार होता. मला वाटलें कीं तुम्हांस हें माहीत आहे व त्या दृष्टीनें मी बोर्डिंगांतील मुलींशीं संभाषणाचे प्रसंग आणतों आहें असें तुम्हांस वाटलें असावें."

"ही गोष्ट मी तुमचे तोंडून प्रथमच ऐकतें" मीं म्हटलें. "आमच्या त्या वेळच्या ध्येयप्रधान विचारसरणींत तुम्ही दुसऱ्या लग्नाचा विचार कराल हेंच मला कधीं शक्य वाटलें नव्हतें. आणि करतां असें कळतें तरी तुमच्या बाबतींत असली सावधगिरी घेणें माझ्या स्वप्नांत आलें नसतें."

या उताऱ्यांत मुख्य मुद्द्याचें दिग्दर्शन तर झालेंच आहे; पण त्याशिवाय स्त्रियांचे संस्थेंत काम करणाऱ्या पुरुषाला कसल्या नाजूक परिस्थितींत वागावें लागतें, वामनरावांसारख्या सीध्या, व सरळ वृत्तीनें वागणाराच्या हातून अनवधानतेनें कशा कांहीं किरकोळ चुका घडतात, त्या तशा कळल्या म्हणजे हळव्या अंतःकरणाच्या माणसाला कसा त्रास होतो, वामनरावांचें मानसावगाहनच त्यांस अधूनमधून त्रास द्यावयास कसें कारण होई, कमळाबाईसारख्या दोन्ही बाजूनें पाहणाऱ्या व कोणालाहि न दुखावण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला दोघांच्याहि गैरसमजाला व रोपाला कसें बळी पडावें लागतें वगैरे गोष्टीहि आपोआप कळत असल्यामुळें तो इतका विस्तारानें दिल्याबद्दल बिलकूलच वाईट वाटत नाहीं.

मुख्य मुद्यासंबंधानें आणखी स्पष्ट माहिती हवी असल्यास आपले मित्र हरीभाऊ गोळे ती देतात ती पहाः—"वामनराव हिंगण्यास रहावयास गेल्यावर त्यांना वरचेवर माझेकडे येणें, किंवा मी त्यांचेकडे जाणें शक्य नव्हतें. म्हणून अधूनमधून मलाच ते हिंगण्यास दोन तीन दिवस राहण्यास बोलावीत. या अवधींत मी वरचेवर त्यांस म्हणे "तुम्हीं लग्न करावें हें चांगलें."

"मला सांगतां, मग तुम्ही कां नाहीं करीत?"

"माझी गोष्ट वेगळी आहे. माझा idealism पुरा झाला होता व तसें भाग्य दोनदां वांट्याला येणें केवळ अशक्य आहे. शिवाय माझ्या मुलांचा सांभाळ करणारीं मायेचीं माणसें आहेत. तीं माझ्या मुलांचें माझ्यापेक्षांहि जास्त करीत आहेत. तसें तुमचें नाहीं. मुलांच्याकरितांच मुख्यत्वें हें मी तुम्हांस म्हणतों."

"पण मुलांचें सगळें करण्याची जबाबदारी पतकरणारें कोण मिळणार?" कांहीं वर्षांनंतर मी हिंगण्यास गेलों असतां त्यांनीं सांगितलें; "लग्नाचा विचार येऊं लागला आहे. एका व्यक्तीस विचारणार आहे." पण त्यानंतर पुन्हां गांठ पडली

तेंव्हां त्यांनीं सांगितलें कीं, " तें कांहीं जमत नाहीं." आणि पुन्हां मग तो विचार त्यांनीं मनांत आणला नाहीं."

यासंबंधांनीं त्यांचे नाना काय म्हणतात तेंहि शेवटीं पाहण्यासारखें आहेः– " दुसऱ्या विवाहासंबंधानें आण्णा किंवा मी तात्यांजवळ बोललों असूं. परंतु तात्यांच्या मनाचा कल पाहून फारसा आग्रह धरल्याचें मला स्मरत नाहीं. तात्यांनीं मात्र कधींहि इच्छा दर्शविली नाहीं. मुलांच्याच हिताच्या दृष्टीनें त्यांनीं दुसरा विवाह न करण्याचें ठरविलें असलें पाहिजे."

वक्ते म्हणून वामनराव फारसे प्रसिद्ध नव्हते. प्रतिपाद्य विषयासंबंधीं अतिरिक्त जिव्हाळा, बोलण्याचा ओघ व आवेश, खणखणीत आवाज, जोरदार अंगविक्षेप, प्रतिपक्ष्याची बाजू कमकुवत दाखविण्यासाठीं लागणारा अतिरंजित विनोद किंवा बेछूट शिवराळपणा वगैरे यशस्वी वक्त्याला लागणारे गुण वामनरावांमध्यें नव्हते. उलट त्यांची सर्व भिस्त बिनतोड कोटिक्रम, सप्रमाण युक्तिवाद, समतोल विचारसरणी, सुसंबद्ध कारणमीमांसा, संथ व सावकाश भाषण यांवर असे. आणि हे गुण मोठी सभा जिंकायला तितकेसे उपयोगी पडत नसत. वसंत व्याख्यानमालेमध्यें महादेव मल्हारांचीं व्याख्यानें जितकीं गाजत, रंगत, सर्वतोमुखीं होत त्याच्यापेक्षां कितीतरी कमी प्रमाणांत वामनरावांचीं होत. वादविवादामध्यें उपवक्ता म्हणून पूर्वपक्ष झाल्यानंतर उत्तरपक्ष करून विषयाची दुसरी बाजू मांडण्याचें काम मात्र वामनराव फार चांगलें करीत. सभा आणि फड जिंकणारे पट्टीचे वक्ते जरी ते नसले तरी एखाद्या प्रश्नाचा थोडक्यांत उपन्यास करायला, किंवा मुख्य वक्त्याची ओळख करून द्यायला किंवा व्याख्यानाचे शेवटीं विषयाचा उपसंहार करून व्याख्यात्याचे व अध्यक्षाचे आभार मानायला एक प्रो. पोतदार सोडले म्हणजे वामनरावांसारखी दुसरी लायक व्यक्ति सहसा मिळायची नाहीं.

आणि खुद्द अध्यक्षाचें काम करायलाहि पहिले तात्यासाहेब केळकर सोडले म्हणजे दुसरे वामनरावच उरत. सबंध महाराष्ट्रांत या दोन व्यक्ति जितक्या वेळां अध्यक्ष झाल्या आहेत तितक्या वेळां–मला वाटतें—तिसरी कोणीहि व्यक्ति झालेली नसेल. तात्यासाहेब किंवा वामनराव अध्यक्ष असणें हल्लीं हल्लीं इतकें ठरून गेल्यासारखेंच झालें होतें कीं पुढें तें उपमानास्पद व थोडेंफार उपहासास्पदहि होऊं लागलें होतें. पण मजा अशी कीं, चेष्टा करणारे आणि हंसणारेच त्यांना अध्यक्ष होण्याची गळ घालीत, आणि एकादे वेळीं ते नसले आणि विषयाचा समारोप नीट मनासारखा

झाला नाहीं म्हणजे हळहळून म्हणत, ‘ आज तात्यासाहेब अध्यक्ष पाहिजे होते, निदान वामनराव तरी हवेच होते ’ कारण उघडच आहे. विषयाच्या सर्व बाजूंचें ज्ञान, वक्ता-उपवक्ता यांच्या बोलण्यांतलें सार काढून त्यांचा समन्वय करण्याचें चातुर्य, श्रोत्यांची मनोवृत्ति, काळ, परिस्थिति वगैरे ओळखण्याची समयज्ञता, वृत्तीचा न्यायीपणा, वाणीचा गोडवा वगैरे जे गुण खास अध्यक्षाला म्हणून लागतात ते सर्व तात्यासाहेबांचे खालोखाल आमच्या तात्यांतहि असलेले दिसत आणि म्हणून ते व्याख्याते यापेक्षां अध्यक्ष म्हणून जास्त प्रिय असत. केवळ वामनराव अध्यक्ष असल्यामुळें कितीतरी वादग्रस्त प्रश्न मोठ्या युक्तीनें सुटले, कितीतरी भांडणें निमूटपणें मिटलीं. कारण वामनरावांचीं अध्यक्षीय भाषणें होतच तशीं सर्वमान्य, सर्व समावेशक, सर्व समान्वयक. वामनरावांना स्वतःच्या कर्तृत्वाचा व वक्तृत्वाचा अशा प्रसंगीं मोठा अभिमान वाटून आनंद व्हायचा. नाहीं म्हणावयास वीर सावरकरांच्या एकसष्टीसमारंभांत पुण्याच्या साहित्तिकांनीं दिलेल्या मानपत्राचे प्रसंगीं वामनरावांनीं केलेलें अध्यक्षीय भाषण त्यांच्या पूर्वीच्या लौकिकास साजेसें व प्रसंगोचित झालें नाहीं; आणि ही गोष्ट वामनरावांच्या जिवाला अतिशय लागली. गोखले हॉलमधून बाहेर पडतांच वामनराव एकदम उद्गारले “ आतां एकेक आटोपतें घ्यावें हें उत्तम. करायला गेलों एक आणि झालें भलतेंच ! ”

चार मंडळींतल्या गप्पांत किंवा खाजगी बैठकींतल्या संभाषणांत वामनरावांच्या ठिकाणचें वक्तृत्वचातुर्य जितक्या उत्कर्षाप्रत गेलेलें सापडे तितकें दुसरे कुठेंच सापडत नसे. त्यांची बहुश्रुतता, सात्त्विक सहृदय विनोद, चतुर कोटिबाजपणा, दिलखुलास मोकळेपणा इत्यादि गुण तेथें प्रकर्षानें दृष्टीस पडून ऐकणाराला खरा खरा आनंद प्राप्त होई. ( कवि तांबे किंवा माधवराव पटवर्धन यांच्या संभाषणांतूनच असा ‘ मजा ’ येई. ) वामनरावांच्या विनोदी बोलण्याची खरी लज्जत अशा घरगुती प्रसंगांतून जितकी चाखायला मिळे तितकी सार्वजनिक स्वरूपाच्या मोठ्या सभांमधून मिळत नसे. रा. नवरे यांनीं आपल्या आठवणींत उल्लेखिलेलीं ‘ मला गम्य नाहीं ’ किंवा ‘ न नटा न विटा न गायकाः ’ अशासारखीं प्रसंगोचित विनोदात्मक प्रत्युत्तरें वामनरावांच्या रोजच्या बोलण्यांत शेंकडोवारीनें यावयाचीं. तीं सगळीं रा. नवरे यांजप्रमाणें टिपून ठेवण्याची सद्बुद्धि झाली असती तर आजला त्यांचा एक मोठा संग्रह झाला असता. [ टाईम्समधील

पॉप्च्या विनोदप्रसंगांचा किंवा दुसऱ्या कोट्यांचा असा एक संग्रह मराठींत करून त्याचे आधारें विनोदावर एक पुस्तक लिहिण्याचें वामनरावांचे मनांत वारंवार येई.] वामनरावांच्या प्रासंगिक विनोदाचा एक नमुना—नाहीं म्हणतां—याच क्षणाला आठवतो आहे. कु. बाळुबाई खरे—आतांच्या सौ. मालतीबाई बेडेकर—हिंगण्याचा आश्रम सोडून जातांना त्यांना निरोप देण्याचा एक समारंभ झाला. इतर गुणांबरोबरच बाळूबाईंच्या आंगच्या तडफीचें व विजेसारख्या चपल हालचालींचें वर्णन तेथील एक शिक्षक माधवराव देशपांडे यांनीं केलें. नंतर वामनराव बोलावयाला उठले. बाळूबाई गेल्यामुळें विद्यार्थिनींचें किती नुकसान होणार आहे वगैरे सांगून त्यांनीं आधींच्या भाषणांतल्या विजेच्या उपमेचा उल्लेख केला आणि मोठ्या भावपूर्ण आवाजांत ‘ अयि विद्युत् प्रमदानां त्वमपि च दुःखं न जानासि ’ ही अर्थपूर्ण ओळ म्हणून जिकडे-तिकडे दुःखगर्भ आनंदाचें स्निग्ध वातावरण निर्माण केलें! वामनरावांचा बहुतेक विनोद अशा प्रकारचा प्रसंगनिष्ठ व सहृदयतेवर आधारलेला असल्यामुळें, आणि कोट्या वगैरे सुचल्या तरी औचित्याच्या जाणीवेनें त्या ते सहसा करीत नसल्यामुळें अत्रे वगैरेंच्या सारखे ते विनोदी वक्ते म्हणून लोकांपुढें येऊं शकले नाहींत. तथापि त्यांच्या लिहिण्यांत मात्र विनोदाचें सुंदर स्वरूप दिसल्यावांचून राहात नसे. आतां ‘ जातां जातां एक मौजेची गोष्ट सांगून ’ विनोदाचें हें वर्णन पुरे करूं. वामनराव स्वतःच नभोवाणीवरून श्रोत्यांना विचारतात “ जातां जातां एक मौजेची गोष्ट सांगू का ? लेखकाचें मन स्वतःला कसं फसवीत असतं हें त्यावरून कळून येईल. माझ्या विनोदांत कोठें कोठें सूक्ष्म आणि सौम्य विनोद आहे असं मला आपलं वाटतं. पण पुष्कळांना तसं वाटत नाहीं. विनोदाची चर्चा चालली म्हणजे माझं नांव कोणीच घेत नाहीं हें पाहून मी मनांत थोडासा हसतों आणि थोडासा दुःखी होतों. सामान्य स्त्रीला आपल्यांतलें सौंदर्य दुसऱ्यांना कसं दिसत नाहीं याचं आश्चर्य वाटत असावें व दुःखहि होत असावं, तशांतली माझी गत आहे. पण मनांत मी लोकांना हसतों; आतां लोकांनीं मला हंसावं म्हणून हें सांगत आहे ! ”

वक्त्याचे रूपांत वामनराव कसे दिसत हें पाहतां पाहतां न कळत आपण त्यांच्या लेखनापावेतों आलोंच आहों. तेव्हां लेखक म्हणून म्हणजे प्रत्यक्ष साहित्यनिर्माता म्हणून नव्हे, तर लेखनाची बैठक मांडून लेखनाला प्रारंभ करूं पाहणारा म्हणून — त्यांचें दर्शन घेऊन आपण पुढें चलूं. लेखकाच्या कांहीं संवयी असतात,

त्याला कांहीं विशिष्ट काळ, वेळ, वृत्ति, स्थिति, साधनसामुग्री वगैरे गोष्टी लागतात असें म्हणतात. कोणाला अगदीं एकान्त लागतो तर कोणाला प्रियारूपी मेघ घररूपी आकाशांत, ओरडत रूपी गर्जेत असल्याशिवाय त्यांचा स्फूर्तिरूपी मोर नाचूं लागत नाहीं. कोणाला मन सुखांत, सुस्थितींत असल्यावांचून लिहितां येत नाहीं तर कोणाला दुःखांत व दुःस्थितींतच लिहायला सुचतें. कोणाला मध्यरात्रीं घरदार बंद करून घेतल्याशिवाय लिहितां येत नाहीं, तर कोणाला भर बारा वाजतां तिकटचावर जाणाऱ्या-येणाऱ्याच्या भर गर्दींत बसल्याशिवाय भागत नाहीं; कोणाला विडचा, चहा व आणखीहि कांहीं जलाल पेयें प्याल्यावांचून लेखणी चालवितां येत नाहीं तर कोणाची लेखणी कांहीं नसलें तरच चालते. वामनरावांचे बाबतींत विशेष असें कांहींच नसे. त्यांचें बहुतेक लिखाण नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें असून संपादकाचें निकडीचें पत्र आल्याशिवाय वामनराव लिहिण्यास बसत नसत आणि लिहिलेलें नेण्यासाठीं माणूस येऊन दाराशीं उभा राहिल्याशिवाय लिहिणें संपवीत नसत. सर्व लिखाण अशा रीतीनें गर्दींत, आणि धांदलींत झाल्या-मुळें त्यांत रफ-फेअर, घांसणें पुसणें, झिलाई देणें वगैरे कांही नसे. पहिली कॉपी तीच थेट छापखान्यांत जायची. यासंबंधीं वामनरावांचे पुतणे श्री. पी. एम्. जोशी लिहितात : "सुशीलेचा देव' या कादंबरीचीं प्रकरणें ते दर महिन्यास 'रत्नाकर' कडे पाठवीत असत. पाठविण्याची तारीख आली म्हणजे दोन-तीन दिवस आधीं लिहावयास बसत व भराभर तीन-चार प्रकरणें लिहून काढीत. आधी विचार करीत असावेत असें वाटत नाहीं. त्यामुळें नांवाचा घोटाळा झाल्याचें स्मरतें. पहिल्या प्रकरणांत हेडमास्तरांचें नांव एक व पुढच्या वेळेस निराळें असा प्रकार झाला." अशाच प्रकारच्या आणखी एक-दोन चुका वामनरावांचे मित्र रा. मुरुडेश्वर यांनींहि दाखविल्या आहेत.

भोंवतालीं कितीहि गडबड असो, वामनराव किती एकाग्रतेनें लिहीत, त्यांच्या लिहिण्याचा एकंदर थाट कसा असे याचें खेळकर वर्णन सेनापति बापटांनीं केलें आहे. ते लिहितात : "जोशीबुवा लिहावयास लागला कीं त्याची लेखणी त्याच्या आजूबाजूला कितीहि गडबड चालली असली, त्याच्या अंगावर मुलें खेळत असलीं, माझ्यासारख्यानें त्याचा चित्तविक्षेप करण्याचा प्रयत्न केला तरी त्याची लेखणी एकाग्रतेनें, तन्मयतेनें, आपलें काम चालू ठेवीत असे. मी पुण्यास १९१५ सालीं आल्यानंतरची गोष्ट आहे. शनवार पेठेंत तांब्यांच्या वाडयांत जोशीबुवांचें बिऱ्हाड

होतें. मी कधीं कधीं त्यांचेकडे जात असें. एकदां मी गेलों तेव्हां तो लिहीत बसला होता सतरंजीवर, मांडीवर कागद ठेवून. त्याचा वंडचा व इतर मुलें त्याच्या अंगावर खेळत होतीं. कोणी पाठीवर थाप मारीत होतें, कोणी जवळचे कागद उचलून पाहात होतें, कोणी मांडीवर बसूं पहात होतें; तोंडानें सर्वांची किलबिल चाललेली होती, नाना गोष्टी सांगत होते. जोशीबुवाला अशा विक्षेपमय परिस्थितींत कुणावरहि न रागवतां, कुणाला कांहीं–कुणाला कांहीं उत्तर देत, गोष्ट सांगणाराला हूं हूं म्हणत जोशीबुवा आपलें ग्रंथलेखनाचें काम (साक्रेटिसाचे संवाद लिहीत होता). हसत–खेळत करीत होता. मराठा पत्रासाठीं तो लेख लिहीत असतां मीं त्याची पेन हिसकावून घ्यावी,–वगैरे केवळ त्याची एकाग्रता कसाला लावून तिचें कौतुक करण्यासाठींच मी हें करीत असें. जोशीबुवा मजवर कधीं रागावला नाहीं. लेखणी पुन्हां मिळाली कीं लेखन पुढें सुरू करी. पूर्वीचें वाचण्याचीहि गरज त्याला वाटत नसे. इतकी 'विक्षेप–प्रूफ' एकाग्रता त्यानें कशी संपादन केली असेल त्याचें त्याला ठाऊक ! माझी स्थिति अगदीं उलट असल्यानें जोशीबुवांच्या या एकाग्रतेच्या गुणाचें मला फार कौतुक वाटतें. मीं जें काय थोडें लिहिलें तें जेलच्या एकांतांतच बहुतेक लिहिलें आहे. बाहेर जें लिहिलें तें रात्रीं सर्व निजानीज झाल्यावर, किंवा दिवसां जेव्हां केव्हां अगदी पूर्ण एकान्त मिळे तेव्हां लिहिलें."

लेखनसाहित्याबद्दल वामनरावांचा कांहीं आग्रह नसे. जो कागद नी जी शाई नी जें नीफ असेल त्यावर त्यांचें चाले. कधीं कधीं तर पाठखडर्यावर आणि नीफ चांगलें नसलें तर टाकाव्या मागील टोकानेंही त्यांनीं लिहिलेलें आहे. मन प्रसन्न असलें म्हणजे त्यांचें लिखाणहि मोठें प्रसन्न उतरत असे यांत शंका नाहीं, पण बहुतेक लिखाण १९१२ ते १९१८ च्या दरम्यान म्हणजे आयुष्यांतील अत्यंत चिंतेच्या आणि मनस्तापाच्या काळांत झालेलें असल्याचें आपणांस दिसेल. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर किंवा ना. सी. फडके यांचेप्रमाणें गोष्टींचीं किंवा कादंबऱ्यांचीं कथानकें, त्यांचे शेवट, त्यांतील पात्रें, त्यांचें स्वभावरेखन वगैरेसंबंधीं सुरुवातीलाच ठरलेलें व निश्चित असल्याचें वामनरावांचें फारसें दिसत नसे. एकादी मुख्य घटना, विचार कल्पना किंवा पात्र मनांत आलें कीं ते लिहिण्यास सुरवात करीत आणि मग वाटतील तितक्या उपकथा, उपविषय, उपपात्रें वगैरे घालून एकंदर कथेचा किंवा कादंबरीचा विकास करीत. आणि असें असूनहि त्या इतक्या प्रमाणांत तंत्रशुद्ध दिसतात हें विशेष आहे.

ग्रंथलेखनापासून वामनरावांना किती प्राप्ति झाली याची माहिती मिळावी अशी एक इच्छा सामान्य लोकांना असते. त्यांना प्रो. येरवडेकरांच्या लेखांतील पुढील उतारा उपयुक्त वाटेल— " खपाच्या दृष्टीनें पाहतां फक्त ' रागिणी ' व ' नीतिशास्त्र प्रवेश ' या पुस्तकांच्या दोन आवृत्त्या निघाल्या आहेत. रागिणीच्या दोन आवृत्त्या व पहिलें मनोरंजनांतील प्रकाशन या सगळ्याबद्दल वामनरावांना अवघे सुमारें १४०० रुपये मिळाले. नीतिशास्त्रप्रवेशाची पहिली आवृत्ति खुद्द त्यांनींच छापविली होती. त्याचे त्यांना सुमारे एक हजार रुपये मिळाले. दुसऱ्या आवृत्तीबद्दल आर्यभूषण छापखान्यानें १२०० रु. दिले. अशा रीतीनें २२०० रुपये नीतिशास्त्रप्रवेशावर मिळाले. आर्यभूषण छापखान्याचे आगींत या सर्व प्रती जळून गेल्या. आश्रमहरिणी व नवपुष्पकरंडक या पुस्तकांबद्दल प्रत्येकीं ५० रुपये असे एकंदर सारे १०० रुपये मिळाले. या मिळकतींतून ' नलिनी ' स्वतःच छापविली. त्या व्यवहारांत आलेला तोटा सुमारे ३०० रुपयांचा वजा घातला म्हणजे येवढ्या मोठ्या वाङ्मयाच्या पसाऱ्याचें किती थोड्या द्रव्यांत रूपांतर होतें हें वाचकांना कळून येईल. महाराष्ट्रांत तरी अद्याप नाटकांशिवाय व शालोपयोगी पुस्तकांशिवाय इतर प्रकारच्या वाङ्मयावर—मग तें कितीहि चांगलें असो—उपजीविका करतां येणें शक्य नाहीं. हौस म्हणूनच वाङ्मयलेखन करावें, चरितार्थाचा धंदा वेगळाच असलेला बरा. "

प्रो. येरवडेकरांनीं दिलेला सदरहु हिशेब १९३० सालापर्यंतचा असून त्यानंतरच्या बारा वर्षांत वामनरावांनीं ' विचारविलास ' ' वाङ्मयमाला ' ' सुशीलेचा देव, ' ' इंदू काळे, सरला भोळे, ' ' स्मृतिलहरी ' इ० जें वाङ्मय निर्माण केलें त्याचा हिशेब आला नाहीं. त्या प्रत्येकाचे निश्चित आंकडे वामनरावांकडून मिळविण्याची कधीं गरज पडली नाहीं, कधीं इच्छाहि झाली नाहीं. आणि म्हणून त्यासंबंधीं निश्चित कांहीं सांगतां येणार नाहीं. तथापि आणखी सहा-सात हजार रुपयांची भर मूळ रकमेंत घालून एकंदर रकम दहा-बारा हजारांपर्यंत न्यावयास हरकत नाहीं. पण हें सर्व सुमारे तीस वर्षांच्या वाङ्मयसेवेचें फळ हेंहि लक्षांत धरलें पाहिजे. ' अस्तु. '

आपल्या विद्वत्तेमुळें आणि लोकप्रियतेमुळें वामनराव मुंबई, नागपूर वगैरे विद्यापीठांच्या, भारत महिला विद्यापीठाच्या आणि अजमीर बोर्डाच्या मराठी विषयाच्या परीक्षांना परीक्षक नेमले जात. मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक ते एम्. ए. पर्यन्तच्या सर्व परीक्षांना ते परीक्षक असत. त्यांचे प्रश्न साधे, सरळ, ढोबळ, विद्यार्थ्यांच्या

आंवाक्यांतले पण मार्मिक व विचारोद्बोधक असत. विद्यार्थ्यांना काय येत नाहीं हें पहाण्यापेक्षां त्यांना काय येतें हें पाहण्यावर त्यांचा भर असे. एम्. ए. सारख्या परीक्षांना जेव्हां १५–२० पुस्तकें लावलेलीं आणि प्रश्न तर अवघे ५–६ काढायाचे असतात तेव्हां सर्व पुस्तकांचा समन्वय करण्यांत त्यांचें कौशल्य विशेष दिसे. विद्यार्थ्यानें पुस्तकें प्रामाणिकपणें वाचलेलीं असल्याचें दिसून आलें व जें कांहीं आपलें मत असेल तें त्यानें सप्रमाण मांडलें असलें म्हणजे वामनराव खूष होत.

परीक्षक म्हणून वामनराव किचकट नसले तरी एकंदरींत खवचटच. एम्. ए. च्या तोंडी परीक्षेंतहि ( पूर्वी अशी परीक्षा असे. ) एकाद्या विद्यार्थ्याला ते 'ध्वन्यर्थ' शब्द लिहावयास सांगत. आणि त्यानें 'वाच्यार्थ' शब्दासारखाच 'ध्वन्यार्थ' असा आकारमध्य शब्द लिहून दाखविला म्हणजे ते मोठ्या मिस्किलपणें हसत! व्याकरण पुष्कळ विद्यार्थी वाचीतच नाहींत असा अलीकडे अनुभव आल्यावरून ते उमेदवाराला 'व्याकरण नको ना विचारूं?' असा साधा साळसूद प्रश्न विचारीत व तो खजील झाल्याचें दिसून आल्यास दुसऱ्या विषयावरील प्रश्नाकडे वळत! अर्थात् विद्यार्थी त्यांचे हातून सहसा नापास होत नसे ही गोष्ट निराळी. पण त्याला आपल्या अज्ञानाची जाणीव करून दिल्याशिवाय कांहीं ते त्याला सुखासुखी सोडीत नसत. मार्क देण्यांतहि ते उदार असत. पीएच. डी. करितां लिहिलेले प्रबंध व युनिव्हर्सिटीच्या 'तर्खडकरबक्षिसा'करितां लिहिलेले ग्रन्थ यांच्या परीक्षणाचें कामहि वामनरावांना मोठ्या अगत्यपूर्वक देण्यांत येई, व तेंहि ते तितक्याच हौसेनें व काटेतोलपणानें बजावीत. त्यांच्या या कामगिरींबद्दल खुद्द श्री. बी. एस्. तर्खड जे. पी. यांस काय वाटत असे हें त्यांच्या खालील उद्गारांवरून दिसून येतें. वामनरावांच्या मृत्यूनंतर नानांना पाठविलेल्या आपल्या दुखवट्याच्या पत्रांत तर्खडसाहेब लिहितात :

"Among the three Examiners, that I was privileged to nominate for the 'Dadoba Pandurang Tarkhadkar Prize'—it was not possible to omit Wamanrao—a versitile and finished Marathi writer and scholar...... He willingly helped me and the Bombay University for ten long years."

कांहीं वक्ते आपल्या व्याख्यानाच्या वेळीं अध्यक्ष होण्याबद्दल जसा वामनरावांना आग्रह करीत तसाच आग्रह लेखक आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याबद्दल

किंवा ‘ परीक्षण ’ करण्याबद्दल करीत. कारण दोघांनाहि ‘आपल्या गुणांचें योग्य तें कौतुक वामनराव करतील, किंवा आपले कांहीं दोष असले तरी वामनराव आपल्याला संभाळून घेतील ’ असा पूर्ण विश्वास असे. लेखक नवथर असेल तर ते त्याच्या गुणांचें थोडें जास्तच कौतुक करून त्यांला उत्तेजन देतील. तो बरोबरीचा असेल तर त्याच्या गुण–दोषांची समान छाननी करून दोषांचें माप पदरांत टाकतील, पण पुन्हां गुणांची थोरवी गातील. तोच एकादा वडा लेखक असेल तर अर्जुनानें भीष्माचार्यांना प्रथम आदरानें नमस्कार करून नंतर त्यांजवर हल्ला चढवावा तसें वामनराव वागतील. [ या दृष्टीनें ‘ श्रीयुत केळकर व कांहीं साहित्यविषयक प्रश्न ’ हा ‘ केळकर ’ ग्रंथांतील वामनरावांचा लेख मोठा पाहण्यासारखा आहे. ] थोडक्यांत म्हणजे एखाद्या अभिजात खेळाडूप्रमाणें प्रतिपक्षी पाहून त्याच्याशीं कसें वागावयाचें हें वामनराव ठरवीत.

टीका करतांना किंवा अभिप्राय देतांना वामनरावांची वृत्ति साधारणपणें गुणग्रहणाकडे असे असें सांगितलें; पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांना दोष दिसत नसत. त्यांची दोषदृष्टि फार तीक्ष्ण असूनहि केवळ सौजन्य व औदार्य त्यांना गप्प बसवीत असत. जिथें स्वतःवर टीका करायलाला सुद्धां ते सोडीत नसत तिथें इतरांचा काय मुलाहिजा ! स्वतःच्या व प्रो. फडके यांच्या किंवा इतरांच्या कादंबऱ्यांची वर्गांत तुलना करतांना आपल्या कादंबऱ्यांतील दोष ते अगदीं न कचरतां सांगत. ‘ रागिणीं ’तील कृत्रिम वर्णनांचा वीट आला म्हणून ‘ सुशीलेच्या देवां ’त त्यांनीं तसल्या वर्णनाला अजिबात फाटा दिला. पण त्यामुळेंच ती कांहीं वाचकांना आवडत नसल्याचें दिसून आलें. यासंबंधीं बोलतांना ते एकदां विनोदानें म्हणाले “ लोकांचा तरी काय दोष ? माझेंच चुकलें. म्हाताऱ्या विजवर नवऱ्याप्रमाणें मला तसल्या गोष्टींत कांहींच राम राहिला नाहीं. पण तरुण वाचकांच्या मनोवृत्ति व आवडीनिवडी लक्षांत घ्यावयास पाहिजे होत्या. माझ्या सुशीलेची मूर्ति धनुष्याकृति भुवया असलेल्या नायिकांप्रमाणें वाचकांच्या डोळ्यांपुढें ठरतच नाहीं. त्याला बिचारे वाचक तरी काय करणार ? लेखक लिहितो तें थोडेंसें तरी लोकांकरितां असल्यामुळें लेखकानें त्यांच्या आवडीनिवडींची सर्वस्वीं उपेक्षा करून चालावयाचें नाहीं. ‘ उत्पत्स्यतेऽपि मम कोऽपि समानधर्मा ’ असें म्हणणारा भवभूति उभ्या वाङ्मयांत एकच आणि त्यानेंहि आपल्यांतील उणीवेची जाणीव होऊनच हें लिहिलें नसेल कशावरून ? ”

वामनरावांच्या आणखी एका भूमिकेचें दर्शन करून हें प्रकरण आटोपूं: ही भूमिका म्हणजे एकाद्या संस्थेचा अध्यक्ष या नात्याची. वामनराव हल्लीं महाराष्ट्रांतील श्रेष्ठ व ज्येष्ठ साहित्यिकांपैकीं एक मानले जात असून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्याध्यक्षाचें महत्त्वाचें पद त्यांना देण्यांत आलें होतें. कार्याध्यक्षाचें हें कार्य वामनरावांनीं किती उत्कृष्टपणें केलें याचें वर्णन त्याच परिषदेचे हल्लींचे चिटणीस प्रा० वा. दा. गोखले यांनीं केलें असून तें जसेंच्या तसेंच येथें दिलें आहे.

"१९३० सालीं मडगांव येथील महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे वामनराव अध्यक्ष झाले आणि साहजिकच म. सा. परिषदेशीं त्यांचा संबंध अधिक जवळचा आला. त्यानंतरच्या काळांत विशेषतः जळगांत येथील संमेलनप्रसंगीं परिषदेच्या घटनेसंबंधीं कडाक्याचा वाद सुरू होऊन पक्षोपपक्ष निर्माण झाले. या पक्षोपपक्षांत सलोखा घडवून आणण्याचें धोरण कै. वामनरावांनीं आपल्या स्वभावानुसार स्वीकारलें होतें. १९३७ सालीं वामनराव नवीन घटनेप्रमाणें कार्याध्यक्ष म्हणून निवडून आले ही एकच गोष्ट त्यांच्या सलोखा करण्याच्या प्रवृत्तीचें निदर्शन आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. १९३७ पासून १९४२ पर्यंत परिषदेच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी कै. वामनरावांनीं स्वीकारली होती आणि मोठ्या यशस्वी रीतीनें ती पार पाडिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या महाराष्ट्राच्या प्रातिनिधिक संस्थेंत मतमतांतरांचा गलबला नेहमींच असावयाचा. कित्येकदां हीं मतांतरें व मतभेद विकोपालाहि जाण्याचे प्रसंग उद्भवले, परंतु या सर्वांत एक विशेष गोष्ट दिसून येत असे ती ही कीं प्रत्येक पक्षाचा किंबहुना प्रत्येक व्यक्तीचा विश्वास वामनरावांवर पूर्णपणें दिसून येई. कोणत्याहि मताला आग्रहाचें स्वरूप द्यावयाचें नाहीं, तर्कशुद्धबुद्धीनें प्रत्येक मतांतील ग्राह्यांश घ्यावयाचा व तो स्पष्ट बोलून दाखवावयाचा हें वामनरावांच्या स्वभावधर्माचें वैशिष्ट्य असे. प्रतिपक्षाच्या निरर्गल टीकेनें अगर असंबद्ध प्रलापांनीं वामनरावांना अतिशय दुःख होत असे. तें दुःख त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसे. पण अशी टीका करणाऱ्या किंवा निरर्गल प्रलाप काढणाऱ्या व्यक्तींवर वामनराव चुकूनहि कधीं रागावलेले दिसले नाहींत. महाराष्ट्रांत गाजलेल्या फडके–अत्रे वादांत अत्र्यांच्या एका बाल अनुयायानें 'वामनरावांच्या मेंदूचा भांबुर्डा झाला' अशा प्रकारचे बाल बुद्धीला शोभणारे अचरट उद्गार काढले. वामनरावांच्या वाचनांत ते आल्यावर 'अजून पोर आहे, त्याला काय समजतें' याच उद्गारांनीं वामनरावांनीं या टीकेचा

परामर्श घेतला. अनाग्रही स्वभावाचें यापेक्षां दुसरे सुंदर उदाहरण कोणतें सांपडेल !

परिषदेच्या कार्यांत वामनरावांनीं मनःपूर्वक भाग घेतला. शेवटीं शेवटीं ज्या संस्थेंत ते प्रिन्सिपलचें काम करीत होते त्या संस्थेंतील त्यांच्या सहकाऱ्यांत बरेंच विशुद्ध वातावरण निर्माण झालें; वामनरावांचें चित्त उद्विग्न झालें. असे उद्विग्नतेचे कांही विशेष प्रसंग आले म्हणजे विश्रांतीचें स्थान म्हणून वामनराव परिषदेच्या कार्यालयांत येऊन आमच्याशीं गप्पागोष्टी करीत बसावयाचे. आमच्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांना वामनरावांचें नांव फार आधारभूत होत असे. वामनरावांच्या नांवावरच आम्हीं कित्येक समारंभ पार पाडले, कित्येक वादविवाद जिंकले, परिषदेंतील मतभेदाचे कित्येक प्रसंग टाळले. अशा मतभेदांपैकीं उल्लेखनीय असा एक प्रसंग म्हणजे प्रा. दत्तो वामन पोतदार यांनीं लिहावयास घेतलेला महाराष्ट्र–साहित्य–परिषदेचा इतिहास हा होय. हें इतिहास–प्रकरण बरेंच दिवस धुमसत होतें. परंतु केवळ वामनरावांच्या प्रेमळ स्वभावामुळें व चिकट आग्रहामुळें हें चिघळणारें प्रकरण समाधानकारक रीतीनें तडीस गेलें. अशाच प्रसंगांना उद्देशून परिषदेचे कोशाध्यक्ष प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांनीं वामनरावांच्या निधनानिमित्त भरलेल्या पुण्याच्या सभेंत पुढील उद्गार काढले आहेतः—' महाराष्ट्रांत क्षुल्लक वादांत मोठमोठीं माणसें गुरफटलीं जातात. महाराष्ट्रांत सात्त्विकपणा कमी आहे. महाराष्ट्र मताचे बाबतींत आग्रही व हटवादी आहे. अहंकार हा समाजविघातक आहे, सात्त्विकपणा जितका येईल तितका तो हवा असतो, बुद्धिवादी माणूस हा हटवादी केव्हांहि नसतो. वामनरावांच्या ठिकाणीं हा सात्त्विकपणा होता. ते बुद्धिवादी होते, म्हणून त्यांची भूमिका जिज्ञासूची असे. त्यांचा कटाक्ष मतावर नव्हता, तर दुसऱ्याचीं मनें पारखून घेण्यांत ते नेहमीं तत्पर असत. साहित्यिकांतील आग्रही आणि हटवादी स्वभाव परिषदेलाहि भोंवला, परंतु वामनरावांच्या सात्त्विकपणामुळें परिषदेंतील अनेक वाद निकालांत निघाले.'

१९३९ सालीं कवि माधव जूलियन् कैलासवासी झाले. श्री. वि. द. घाटे प्रभृति माधवरावांच्या मित्रांनीं माधवरावांच्या स्मारकाचा बेत केला. या स्मारकाचा परिषदेशीं निकटचा संबंध असल्यामुळें श्री. वामनराव हे स्मारक कार्यांत जातीनें लक्ष घालूं लागले. पैसे जमविण्याच्या कामीं त्यांनीं श्रम घेतले इतकेंच

नव्हे तर मृत्यूपूर्वी दोन महिनेच आपल्या सत्कारसमारंभांत मिळालेल्या थैलीचे पैशांतून परिषदेनें उभारलेल्या कर्जातील ५०० रुपयांचीं डिवेंचरें घेऊन त्यांनीं परिषदेला साहाय्य केलें होतें. निधनापूर्वी सहा महिनेच म्हणजे जानेवारी १९४३ पासून त्यांना परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. त्यांच्या मार्गदर्शकत्वाखालीं कार्यकारी मंडळानें अनेक वाङ्मयीन योजना आंखल्या व त्या अमलांत आणण्यास सुरुवातहि केली. १९४३ च्या जून महिन्यांत भरलेली इतिहासविषयक विद्वत्परिषद ही या अनेक योजनांपैकीं एक होती. या परिषदेचें अध्यक्षस्थान रियासतकार रा. ब. गो. स. सरदेसाई यांनीं स्वीकारलें होतें व स्वागताध्यक्ष म्हणून कै. वामनराव होते. त्या वेळीं स्वागतपर असें झालेलें त्यांचें भाषण हें शेवटचेंच असेल अशी चुकूनहि आम्हांस कल्पना नव्हती. परंतु तेंच भाषण शेवटचें ठरून वामनरावांच्या सात्त्विक मार्गदर्शनास परिषद मुकली. वामनरावांच्या निधनानंतर पुण्यांत भरलेल्या दुःखप्रदर्शन सभेंत वामनरावांचे मित्र फलटणचे दिवाण रा. ब. गोडबोले यांचें पत्र वाचून दाखविण्यांत आलें. तें वामनरावांच्या स्वभावावर व व्यक्तिमत्वावर पूर्ण प्रकाश पाडणारें असल्यामुळें त्यांतील जरूर तो भाग खालीं दिला आहे.

" कै. वामनरावजी यांच्याबद्दल आमच्या सर्वांच्या मनांत नितांत आदर वसत असे हें आपण जाणतांच. त्यांचे व माझे व्यक्तिविषयक स्नेहसंबंधहि फार जुने व जिव्हाळ्याचे होते. एक अत्यंत चिकित्सक तत्त्वज्ञानी, उच्च प्रतीचे साहित्यिक, वैचारिक कादंबरीकार, अहिंसक टीकाकार, प्रामाणिक देशभक्त, विद्वानांत अग्रेसर, शिक्षकांचा " धुरिकीर्तनीय ", स्वतःस " संशयात्मा " म्हणविणारे, परंतु सर्वांचे संशय फेडणारे, वर्तनानें शुद्ध, मनानें सरळ व बुद्धीनें तेजस्वी असे प्रि. वामनरावजी जोशी हे अकल्पित रीतीनें दिवंगत झाले असें ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयास धक्का बसल्याखेरीज राहिला नाहीं. साहित्यपरिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारून त्यांनीं परिषदेचा गौरवच केला असें म्हणावें लागतें. "

## स्वभाव-रेखा व विचारदर्शन

## १०

( १ ) वामनरावांच्या विशेष अडचणीच्या काळांत मींहि साधारण बऱ्या प्राप्तीच्या स्थितींत असतांना त्यांस उपयोगी पडावें म्हणून लहान रक्कम ( २०–२५ रुपये ) एकदां दिली असतां हे कशासाठीं म्हणून त्यांनीं लगेच विचारलें. मी शरमून थोडा गोंधळून उत्तरलों कीं तुमच्याकडे तुमच्या पुस्तकांच्या सवलतीच्या मागण्या येत असतील त्यांपैकीं अशा एखाद्या मागणीची यांतून पूर्तता करावी, अशा बुद्धीनें हें दिलें आहे. तीन–चार महिन्यांनीं मला आभारप्रदर्शनाचीं दोन पत्रें—एक सांगली व एक गोवें येथून—आलीं कीं आपल्या देणगीनें आम्हास वामनरावांचीं पुस्तकें मिळालीं त्याबद्दल आभारी आहों.

—*अच्युतराव उपाध्ये*

( २ ) एक आप्त गरीब विद्यार्थी आला असतां त्याच्या राहण्याची चौकशी केली व त्या भागांत डासांचा त्रास असतो असें ऐकून नुकतीच विकत आणलेली मच्छरदाणी तेथें होती ती त्यास त्यानें न मागतां देऊन टाकिली.

—*अच्युतराव उपाध्ये*

( ३ ) आम्ही कॉलेजपासून थोड्या अन्तरावर असलेल्या देवळांत वडाऱ्यांच्या मुलांना शिकवत असूं. पण मग कांहीं कारणांमुळं देवळांत जाऊन शिकवणं अशक्य

होऊन बसलं. सुरवात तर केलेली. जागा तर नाहीं. तात्यांना कळलं तर म्हणतील मला विचारल्याखेरीज केलीत कां ही गोष्ट ? ही भीति. अन् तीच खात होती मनाला सारखी. शेवटीं केला हिय्या एकदाचा. गेलों तात्याच्याकडे. त्यांना सगळं सांगितलं. तर लगेच ते म्हणाले, “ हात्तिच्या मग आपल्या वऱ्हांड्यांत शिकवा ना त्यांना. ” काय आनन्दांत उड्या मारल्या त्यावेळीं आम्हीं. उगीचच भीति बाळगली होती तात्यांच्या बद्दल.

—*यमु कुम्भारे*

( ४ ) आपल्या बुद्धीला पटलेलें किंवा विचारांतून स्फुरलेलें कोणतेंहि मत बोलून दाखविण्यास ते कचरत नसत. राष्ट्रसभेचीं व महात्मा गांधींचीं सर्वच्या सर्व मतें त्यांना संमत नव्हतीं, तर तसें प्रकट करून, तीन वर्षांपूर्वींच्या एका दिवाळी अंकांत त्यांनीं निर्भीडपणें असें मत दिलें कीं, ‘ आजच्या प्रसंगीं कॉंग्रेसच्या विरुद्ध जाऊन सरकारशीं सहकरिता करण्याचें धोरण डॉ. मुंजे, बॅ. सावरकर, आणि जम्नादास मेहथा या पुढाऱ्यांच्या भाषणांवरून जें सूचित होतें तें मला उद्वेगजनक वाटतें. खाजगी आपत्ति आली म्हणजे जसें दुःख होतें तसेंच मला या समयीं होत आहे. आईच्या, बंधूंच्या किंवा पत्नीच्या मृत्यूमुळें मला जसें दुःख झालें तसें दुःख वाटतें असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. ’

—*दा. न. शिखरे*

( ५ ) राष्ट्राच्या सुखदुःखाशीं त्यांचा जीव इतका समरस सदैव होत असे. या उदात्त वृत्तीचा आविष्कार एका व्याख्यानांत पुढील शब्दांनीं त्यांनीं सहज केला: ‘ हा एकच एक काळा कोट मी वर्षानुवर्षे घालीत आहें. या दारिद्र्याचें मनाला दुःख वाटतें. पण लगेच लक्षांत येतें कीं असा एक कोटहि ज्यांना उभ्या जन्मांत अंगांत घालायला मिळत नाहीं असे माझे असंख्य बांधव आहेत. ’ ‘ बाले बालः विदुषि विबुधः ’ अशा कोटींतील निरहंकार वृत्तीनें वागणाऱ्या व महाराष्ट्राला चिकित्सक बनविणाऱ्या वामनरावांचें ऋण महाराष्ट्राच्या स्मरणांत सदैव राहील.

—*दा. न. शिखरे*

( ६ ) वामनरावांचें वाडिया कॉलेजांत विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण झालें होतें. त्यासंबंधींची सविस्तर बातमी ज्ञानप्रकाशमध्यें आली होती. ती मीं वाचून दाखविली. ती अशी, ‘ विद्यार्थीविद्यार्थिनींनीं एकमेकांस प्रेमपत्रें पाठविणेस हरकत नाहीं, व

कोणीं अशीं प्रेमपत्रें पाठविल्याचें नजरेस आल्यास, प्रिन्सिपलसाहेबांनीं त्या पत्रांचे लेखकांस शिक्षा करूं नये. ' या मजकुरावर मीं टीका केली कीं " वामनरावांसारख्या तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसरांनीं मुलांना अशा प्रकारचा उपदेश करणें सर्वथैव गैर आहे. " प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तुमहाफला " या तत्त्वाचा या ठिकाणीं उपदेश केला पाहिजे. " वामनरावांनीं न रागावतां उत्तर देतांना सांगितलें कीं " कोणी कांहीं म्हणो माझें तसें मत आहे. "

—कृ. गो. मराठे

( ७ ) तात्यांना धीट विद्यार्थिनी अधिक प्रिय होत्या असा माझा समज आहे. प्रश्न विचारला असतां लाजणें-मुरडणें त्यांना अगदीं अवडत नसे. तसेंच त्यांना नवीनता व आधुनिकता पण पसंत होती. आमच्या वेळीं आमच्या कॉलेजमध्यें जरी आधुनिकतेचें वारें फारसें शिरलें नव्हतें तरी त्या काळीं चालू असलेल्या फॅशनच्या बाबतींत त्यांनीं कधीं टीका केल्याचें स्मरत नाहीं.

—श्री. रमाबाई बखले

( ८ ) एका विद्यार्थिनीनें एकदां ' विज्या काव्या सर्वत्र विस्तारिल्या ' असें त्यांचें वर्णन त्यांस बहाल केलें होतें, तर एका संमेलनांत आम्ही त्यांच्या अक्षराची टिंगल करण्याकरितां--ही कपाळांतील लिपी वाचायला--आफ्रिकेंतील जाडा विद्वान् बोलवावयाचा फार्स केला होता. पण त्यामुळें तात्यांच्या कपाळाला कांहीं आंठी पडली नाहीं. उलट या दिव्य अक्षरामुळें आपल्या सर्वांगसुंदर ' रागिणीला ' कित्येक दिवस कोणी रसिक संपादक स्वीकारीना ही माहिती त्यांनींच आम्हांला पुरविली.

—कु. बनुबाई देशपांडे

( ९ ) वामनरावांची बुद्धि जात्याच तत्त्वगामी असल्यामुळें त्यांचें लक्ष बाह्य गोष्टींकडे फारसें नसे. त्यांतच विसराळूपणाची भर पडली म्हणजे तर कांहीं विचारावयासच नको. पुन्हां पुन्हां पाहिलेले चेहरे किंवा पुन्हां पुन्हां केलेल्या प्रवासांतील स्थळें देखील वामनरावांच्या लक्षांत रहात नसत. एकादा मनुष्य दोन-तीनदां येऊन बोलून—बसून गेलेला असावा. तोच फिरून चवथ्यांदा आला तरी वामनरावांची स्थिति तो पहिल्यांदा पाहिल्याप्रमाणेंच होई. त्याच माणसानें मागची ओळख दिली म्हणजे वामनराव ' त्याचं असं होतं, हल्लीं नीटसं लक्षांत राहात नाहीं अन् नेहमीं मंडळी येतात त्यामुळें जास्तच गोंधळ उडतो ' अशासारखें कांहींतरी आत्मसमर्थनपर बोलून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत. एकदां उज्जयनीचे

प्रो. पराडकर वामनरावांस तिसऱ्यांदा भेटण्याकरीतां आले. त्या वेळीं तरी वामनरावांनीं आपल्यास खास ओळखलें असेल अशा समजुतीनें त्यांनीं एकदमच बोलण्यास सुरवात केली. परंतु वामनरावांची पुन्हां पूर्वींचीच गोंधळलेली मुद्रा पाहून त्यांच्यानें राहवलें नाहीं; आणि ' त्याचं असं होतं, हल्लीं तुम्हांला नीटशी आठवण राहात नाहीं, अन् नेहमीं मंडळी येतात ' वगैरे नेमके वामनरावांचेच शब्द वामनरावांच्याच सुरांत वामनरावांनाच म्हणून दाखवून ' मीं उज्जयिनीचा पराडकर ' अशी पुन्हां एकदां त्यांनीं आपली ओळख करून दिली.

—ना. म. पटवर्धन

( १० ) एकादी गोष्ट तज्ज्ञाचे हातांत दिली म्हणजे मग त्यांत कांहीं सुद्धां बोलूं नये असें वामनरावांचें धोरण. केस कातरीत असतांना, न्हाव्यानें विचारलें ' बघा रावसाहेब, केस आणखी पातळ करूं का ' ? तर वामनराव त्यास म्हणतील ' तुझ्या हातांत डोकं दिलं आहे, तुला त्याचं काय करायचं असेल तें करून घे ' ! कोणता दांत दुखतो आहे म्हणून दंतवैद्यानें विचारलें असतां तुम्हीच ठरवा असें वामनरांनीं एकदां विनोदानें उत्तर दिलं. दंतवैद्याला हंसू आलेलं पाहातांच वामनरावांनीं खुलासा केला कीं मागचे खेपेस एका डॉक्टराला हा दात दुखतो म्हणून सांगितलें. तो म्हणाला ' छे ! तो दुखणें शक्य नाहीं ! त्याच्या शेजारचा दुखत असला पाहिजे. तुम्हाला, तें सिंपथेटिक पेनमुळें तसं वाटत असेल ' तेव्हांपासून ठरविलें कीं दांत आणि दंतवैद्य, काय वाटेल तें करा !

—ना. म. पटवर्धन

( ११ ) तात्या मुंबईला बेकार असतांना एक मुलगा त्यांच्याकडे शिकावयाला येई; व तात्या नेमानें त्याला शिकवीत. ' हा मुलगा कोण ? ' असें मीं एकदां विचारलें तेव्हां तात्या म्हणाले " हा मुलगा आमच्या समर्थ विद्यालयांत विद्यार्थी होता. समर्थ विद्यालय बंद पडलें आहे, आणि त्यांतल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कोणत्याच सरकारी किंवा सरकारमंजूर शाळेंत घेत नाहींत. या मुलाच्या घरची स्थिति फार गरिबीची आहे. खाजगी शिकवणी ठेवायला त्याला ऐपत नाहीं. आमच्या राष्ट्रीय शिक्षणाला तो बळी पडला; अर्थात् शक्यतोंवर त्याला पुढील शिक्षण देणें ही माझी जबाबदारी आहे असें मला वाटलें आणि म्हणूनच मी त्याला फुकटच शिकवीत असतों.

—पु. गो. काणेकर

( १२ ) आम्ही मोठे झाल्यावर व तात्यांचा मोठेपणा समजल्यावर आम्ही तात्यांना दोन गोष्टींबद्दल दोष देत असूं. पहिली म्हणजे कपड्यांतील गबाळेपणा व दुसरी म्हणजे स्वतःच्या मोठेपणाचा संपूर्ण विसर! कपड्यांतील गबाळेपणा तर सर्वांना माहीतच आहे. पण दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण एवढे मोठे विद्वान् व प्रथितयश कादंबरीकार आहों याची तात्यांना कल्पनासुद्धां नसे! वाटेल त्या माणसानें वाटेल तेव्हां यावें, व तात्यांशीं खुशाल गप्पा माराव्यात व त्यांचा वेळ घ्यावा. स्वतः उठून कोणाच्याहि घरीं जाण्यास तात्यांना कांहीं कमीपणा वाटत नसे. या गोष्टीबद्दल तात्यांना आम्ही दोष देत असूं, पण तात्यांनीं त्याकडे कधीच लक्ष दिलें नाहीं. आतां असें वाटतें तात्यांच्या त्या दोषामुळेंच आम्हाला तरी तात्यांशीं एवढ्या मोकळेपणानें बोलण्याची व वागण्याची संधि मिळाली.

—*परशुराम महादेव जोशी*

( १३ ) जोशांच्या माईच्या लग्नांतील गोष्ट. ती माझी काकू व्हावयाची. लग्नाचे आधले दिवशीं मी त्यांचे घरीं गेलें. मी वरपक्षाकडील, व ते वधूपक्षाकडील. तेव्हां माझें स्वागत करण्यास वधूगृहीं जोशी पुढें आले. त्यांना ही मौज वाटली. ते म्हणाले, "कमळाबाई! मौज पहा. तुमची पायरी चढती, व माझी उतरती. प्रथम तुम्ही विद्यार्थिनी व मी प्राध्यापक; पुढें तुम्ही आजन्मसेवक झालांत व आपण दोघे व्यवसायबंधुभगिनी या नात्यानें समान दर्जाचे झालों. आणि आतां तुम्ही वरपक्षाकडील व मी वधूपक्षाकडील, तेव्हां तुमचें पारडें जड!"

—*कमलाबाई देशपांडे*

( १४ ) रीतसर शिक्षा पुरी करून वामन मल्हार जेव्हां सुटले, तेव्हां त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एक पोलीस नेमण्यांत आला होता. तो त्यांना बंधमुक्त झाल्यानंतर देखील मोकळेपणानें कोठेंहि जाऊं देईना व आपला हुकूम ते ऐकत नाहींत म्हणून त्यानें वामनरावांना यथेच्छ मारलें! महाराष्ट्रांतील एक देशभक्त कैदेंतून सुटत असल्यामुळें त्याचें स्वागत करण्यासाठीं माझे मित्र व आजचे राष्ट्रीय सभेचे सर चिटणीस ( श्री. जीवतराम कृपलानी ) गेले होते. त्यांनीं हा प्रकार प्रत्यक्ष पाहिला व त्यांच्याकडूनच मीं तो ऐकला. आम्हां तरुणांना असे प्रसंग म्हणजे स्वराज्यदीक्षारूपच होत. ब्रिटिशसाम्राज्याची पाशवी शक्ति या क्षुल्लक

पोलिसांमध्यें अवतीर्ण होऊन आमच्यापैकीं अत्यंत सन्मान्य अशा देशसेवकाची काय स्थिति करते, याची कल्पना आल्यानंतर आम्हांस दुसरें काय सुचणार !

—*काकासाहेब कालेलकर*

( १५ ) तत्त्वज्ञानी झाला म्हणजे अत्यंत न्यायनिष्ठ असला पाहिजे हा आदर्श वामनरावांनीं इतक्या उत्कटतेनें स्वीकारला आहे कीं, स्वतःच्या सिद्धान्तापेक्षां पूर्वपक्षाचीच मांडणी त्यांना अधिक साधते. आणि मला वाटतें, यांतच त्यांच्या लोकप्रियतेचें बीज आहे. ज्याप्रमाणें जगाला कष्टाळू सेवक आवडतात, सत्कृत्य केल्यानंतर त्याचें श्रेय कोणीहि घेवो अशी बेपर्वा बाळगणारे लोक आवडतात, त्याचप्रमाणें प्रतिपक्षाला उदारपणानें आणि समर्थपणानें सजविणारे लोकहि आवडतात. असें सांगतात कीं, वामनरावांचें हें प्रतिपक्षाविषयीचें दाक्षिण्य पाहून लोकमान्यांनीं त्यांना सांगितलें कीं वर्तमानपत्राच्या संपादकामध्यें हा मोठा दोष आहे. संपादकानें न्यायाधीश व्हावयाचें नसून लढवय्या वकिलाची भूमिका सजवावयाची असते.

—*काकासाहेब कालेलकर*

( १६ ) ॲडिसनूचा सर रॉजर डी कॉव्हर्ले स्वतःचें अज्ञान झांकण्यासाठीं पुष्कळदां म्हणतो '*Much can be said on both sides.*' आणि निर्णय देण्याचें टाळतो. वामनरावहि निर्णयावर येण्याचें टाळतात. पण त्याचें कारण मात्र अगदीं उलटें आहे. त्यांना प्रत्येक विषयाच्या सगळ्या बाजू एकसारख्याच प्रत्यक्ष होत असल्यानें त्यांचें तीव्र ज्ञानच त्यांना निर्णय करूं देत नाहीं. आणि त्यांतच प्रेमळ व गोड स्वभावाची अहिंसा अंगीं असल्यानें जीवनव्यवहारांत देखील ते बरेचसे मऊ आहेत, असें त्यांची मित्रमंडळी म्हणते.

—*काकासाहेब कालेलकर*

( १७ ) वामनराव ज्या ज्या निरनिराळ्या बाजू आपणांपुढें मांडतात त्या सर्व त्यांच्याकडे त्यांच्या विशाल व चौकस वाचनामधून आल्या आहेत, का तत्त्वज्ञ-सुलभ अशा मननामधून आल्या आहेत, असाहि विकल्प पुष्कळ वेळां मनांत येतो; आणि वाटतें कीं वाचनाहून मनन अधिक असतें तर कदाचित् बुद्धि अधिक निश्चयात्मक झाली असती. पण जो मनुष्य गुणग्रहणशील आहे व ज्याच्या चित्त-वृत्तीमध्यें प्राधान्येंकरून मार्दव आहे, त्याच्यामध्यें ग्राहकवृत्ति अधिक असते.

—*काकासाहेब कालेलकर*

( १८ ) वामनराव कोणत्याहि आदर्शाचे ‘ मिशनरी ’ ऊर्फ ‘ प्रेषित ’ कधींच व्हावयाचे नाहींत. त्यांच्या जीवनामध्यें वीरत्वाची झुळूक आहे पण त्यांच्या तत्त्वज्ञानाला ती फारशी मानवलेली दिसत नाहीं. व त्यामुळें त्यांच्या सारखा धडाडीचा राजकारणी पुरुष सामाजिक परिस्थितीचा निरीक्षक, वाचनलोलुप जनतेचा प्रेरक, आणि महाराष्ट्र महिलांचा अध्यापक बनून संतोष मानीत आहे. नाहींतर ज्या सहानुभूतीनें व नाजूक हातानें त्यांची अगदीं ताजी कादंबरी ‘ इंदु काळे आणि सरला भोळे ’ ही लिहिली आहे, त्याच सहानुभूतीचा परिपाक होऊन त्यांनीं आपल्या जीवनांत ध्येयनिष्ठेपासून ओढवणाऱ्या महान् आपत्तींमध्यें केवढा उदात्त रस आहे हें केवळ महाराष्ट्रासच नव्हे तर अखिल भारतवर्षास दाखवून दिलें असतें. वामनराव हे हाडाचे ध्येयोपासक वीर आहेत याविषयीं शंका नाहीं. त्यांनीं जर त्यांच्या तिसऱ्या बंधूप्रमाणें भारतसेवेचा मार्ग पत्करला असता, तर खात्रीनें ते राष्ट्रीय सेवेचे एक अग्रगण्य सेवक झाले असते; आणि प्रत्येक बाजूची महती ओळखणाऱ्या त्यांच्या वृत्तीमुळें ते केवळ राजकारणी पुरुष झाले नसते, तर राष्ट्रकारणी पुरुष झाले असते.

—काकासाहेब कालेलकर

( १९ ) केसरींतील जाहिरातीवरून मी नोकरी मागण्याकरितां हिंगण्यास गेलों आणि वामनराव सुपरिंटेंडेंट होते त्यांस भेटलों. इकडली तिकडली चौकशी केल्यावर त्यांनीं मला जरा गंभीरपणानें विचारलें “ स्पष्ट विचारतों हं, माफ करा. आमच्या संस्थेंत आम्ही विवाहितांना नोकरी देतों. तुमचें लग्न झालें आहे काय ? लग्न झालें नसेल तर तुम्ही दुसरीकडे नोकरी शोधा. ” मीं जरा चिडूनच सांगितलें, “ माझी मुलगी दीड वर्षाची आहे. पण तुमच्या शाळेंत ब्रह्मचाऱ्यांना मज्जाव आहे तसा विधुरांनांहि असेल नाहीं ? कारण ब्रह्मचारी व विधुर हे दोन्हीहि या संस्थेंत घातुकच. मी तर म्हणतों ब्रह्मचाऱ्यांपेक्षां विधुर अधिक भयंकर ! ” मी हें झोकांत बोलून गेलों, पण रा. वामनरावच विधुर असतील याची जाणीव मला नव्हती. मात्र वामनरावजींनीं नेहमींच्या पद्धतीनें ‘ तुमच्या म्हणण्यांत थोडा तथ्यांश आहे; पण नियम म्हणजे नियम; व तो काटेतोल पाळलाच पाहिजे ’ इतकेंच सांगितलें. अर्थात् या *interview* नंतर वामनरावजींनीं मला जून-मध्यें आपल्या हायस्कुलांत नोकरी दिलीच.

—ना. ग. फाळके

( २० ) वामनरावजींचा विशेष परिचय झाल्यावर एकदां मीं सहज म्हटलें:— " तात्या तुमचा पुतण्या अवधूत एल्एल्. बी. च्या टर्म भरून येथें घरींच अभ्यास करीत आहे. एकाद्या व्यवहारचतुर गृहस्थानें माझे जागीं पहिल्यांदा त्याचीच या संस्थेंत वर्णी लावून दिली असती. आणि तुम्हीं त्याला घ्यायचें ठरविलें असतेंत तर मला बिलकुल वाईट वाटलें नसतें. " तात्या उद्गारले " अहो, सारें खरें. पण बोवा, अवधूताचें घोडें पुढें ढकलणें मला कांहीं जमलें नाहीं. मीहून त्याला चिकट-वावा हें धाडस मला झालें नाहीं. "

—ना. ग. फाळके

( २१ ) १९३८–३९ सालीं सांगली सिटी हायस्कूलच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून येण्याचें तात्यांनीं कबूल केलें. अमक्या दिवशीं अमक्या गाडीला निघून बुधगांवला उतरायचें वगैरे सर्व ठरलें. मी कार्याध्यक्ष म्हणून स्टेशनवर त्यांना घ्यावयास गेलों. बुधगांवला गाडी येऊन, थांबून पुन्हां चालू झाली तरी तात्या कोठें दिसेनात. शेवटीं हांकाहांक होऊन ते इंटरच्या डब्यांतून धडपडत खालीं उत-रले आणि गाडी सुटली. मिनिटभरानें तात्या डोकें खाजवूं लागले तेव्हां माझ्या लक्षांत आलें कीं स्वारी कपडे, बॅग बर्थवर ठेवूनच खालीं आली. तथापि त्यांची एकाद्या लहान मुलासारखी समजूत काढून मी स्टेशनमास्तरांना पुढच्या स्टेशनावर म्हणजे मिरजेस फोन करून त्यांचे कपडे व बॅग सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था कर असें विनविलें. त्यावेळीं दोन स्टेशनमास्तरमधील झालेलें बोलणें शक्य तों जसेंच्या तसें देत आहे.

बु० बुधगांवः—हॅलो, इंटरच्या डब्यांत बर्थवरील एक पॅसेंजर येथें उतरला आहे. गडबडींत त्याचें सामान बर्थवरच आहे. तेवढें काढून घ्या.

मि० मिरजः—कोणचें सामान! तपशील द्या.

बु०:—एक कोषा, एक लोंकरीचा कोट.

मि०:—होय हे जिन्नस आहेत.

बु०:—एक बॅग पोलादी, चपटी, कुलूप घातलेली, प्रो. व्ही. एम्. जोशी असें नांव असलेली.

मि०:—अशी बॅग नाहीं. एक बॅग् विनकुलपाची आहे. त्यावर मिस एस्. व्ही. जोशी अशीं अक्षरें आहेत.

बु०:—होय, तीच बॅग. (तात्यांनीं शकूची बॅग बरोबर आणली असेल, पण आपली बॅग आहे असा त्यांचा भ्रम असेल या समजुतीनें तात्यांच्याकडे विचारून मी बुधगांव स्टेशनमास्तरला पुढील प्रश्न सुचवीत होतों.)

मि०:—बॅगमधील सामानाचा तपशील सांगा.

बु०:—वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांचा सेट, एक शर्ट, एक उपरणें, एक धोतर आणि टुवाल.

मि०:—या जिनसा नाहींत. एक ब्लाऊज् व पातळ आहे. इंग्रजी दुसरी-तिसरीचीं दोन बुकें आहेत; एक पेन्सिल व एक टाक आहे; सुइदोऱ्याचें बंडल आहे.

बु०:—ठीक आहे, पॅसेंजर म्हणतो हे जिन्नस माझेच. इतराचे कोणाचे नसतील तर ठेवून घ्यावेत.

मी हा सर्व प्रकार छपवून ठेवण्याचा सारखा प्रयत्न करीत होतों. पण तात्यांनींच दुपारच्या अध्यक्षीय भाषणांत तो रंगवून रंगवून व हंसत हंसत सांगितला!

—*ना. ग. फाळके*

(२२) तात्यांनीं स्थितप्रज्ञता प्रयत्नतः कमावली असली तरी त्यांचें मन मूलतः अतिशय हळवें व भावनाशील होतें. शकूच्या लग्नाचे वेळचा प्रसंग. लग्न लागलें, आणि शकू सासरीं जाण्यास निघाली. तिच्या जन्मापासून आई आणि बाप अशा दोन्ही भूमिका पत्करून तात्यांनीं जिला तळहातावरचे फोडाप्रमाणें जपून वाढविली होती ती मुलगी आपलें घर सोडून परक्याच्या घरीं नांदायला चालली होती. शाकुन्तलाच्या चौथ्या अंकांतील देखावाच तो! 'शके!' म्हणून एकदांच तिला हाक मारून क्षणभरच तिला घट्ट पोटाशीं धरतांना तात्यांना एवढा मोठा हुंदका आला कीं त्याचा आवाज जमलेल्या सर्व मंडळींच्या कानीं पडून अनेकांच्या डोळ्याला पाणी आलें. त्यानंतर मात्र त्यांनीं आपलें मन आवरलें, आणि मंडळी गेल्यावर आम्ही घरचींच माणसें राहिलों तेव्हां सर्व गोष्टी विसरण्याकरितां पत्ते खेळावयास बसले. मग सर्वांकरितां लेमन, रॅासबेरी, वगैरे पेयें मागविलीं आणि हंसत खेळत कितीतरी वेळ आम्ही रात्रीं गप्पा मारीत बसलों.

—*अ. म. जोशी*

( २३ ) त्यांचा मुलगा वंडू हा येरवड्याला वेड्याच्या इस्पितळांत होता, व तेथेंच तो वारला. त्याला ते तीन वर्षांत एकदांहि भेटायला गेले नाहींत. महिना दोन महिन्यांनीं आमच्यापैकींच कोणाला तरी त्याला भेटून यायला सांगत. ‘ तुम्ही एकदां तरी कां जाऊन येत नाहीं ? ’ असें विचारलें असतां ते म्हणत “ छे ! मला तें दृश्य पाहावायचें नाहीं. ”

—अ. म. जोशी

( २४ ) १९३३ च्या एप्रिलमध्यें मी एम्. ए. च्या परीक्षेला बसणार होतों. तात्यांनीं नेहमींप्रमाणें परीक्षकीकरितां अर्ज केला होता, व त्यांना परीक्षक नेमलेंहि होतें. परीक्षेला सुमारें दीड महिना असतांना युनिर्सिटींतील एक मोठे अधिकारी माझ्या थोरल्या बंधूंजवळ सहज बोलले, “ काय, हो, तुमचा भाऊ एम्. ए. ला बसत असतांना तुमच्या चुलत्यांना परीक्षक नेमलें हें कसें काय ? आपला पुतण्या परीक्षेला बसत आहे ही गोष्ट बहुधा त्यांनीं अर्जांत नमूद केली नसावी. ” ही गोष्ट तात्यांच्या कानावर गेली. अर्थात् ही गोष्ट आपण अर्जांत लिहिली आहे किंवा नाहीं हें त्यांना निश्चित स्मरेना. जर लिहिली नसली तर आपल्यावर अप्रामाणिक-पणाचा आरोप येऊं नये, म्हणून त्यांनीं तावडतोब विद्यापीठाकडे आपल्या परीक्ष-कीचा राजीनामा पाठवून दिला. परंतु विद्यापीठाच्या रजिस्ट्रारकडून “ तुमचा पुतण्या परीक्षेस बसत आहे ही गोष्ट तुमच्या अर्जांत नमूद केली आहे, आणि हें ज्ञात असूनहि आपणांस विद्यापीठानें परीक्षक नेमलें आहे, तरी कृपा करून राजीनामा परत घ्यावा. ” असें उत्तर आलें. त्यानंतर अर्थात् तात्यांनीं राजीनामा परत घेतला.

—अ. म. जोशी

( २५ ) एम्. ए. च्या परीक्षेमध्यें असाच एक प्रसंग घडला. मराठीच्या एका प्रश्नपत्रिकेंत दोन विभाग असून प्रत्येकांतून तीन तीन प्रश्न असे एकूण सहा प्रश्न सोडवायचे होते. मी चुकून एका विभागांतून चार व दुसऱ्यांतून दोन असे सहा प्रश्न सोडविले. पेपर तात्यांच्याकडेच होता. तपासतांना तात्यांच्या लक्षांत माझी चूक न येऊन त्यांनीं चारी प्रश्नांस मार्क दिले होते. मी घरीं येतांच तात्या मला म्हणाले “ पेपर फक्कड लिहिलायस तूं. ” ( मार्क मात्र सांगितले नाहींत. ) मला आनंद झाला, परंतु मीं केलेली चूक त्यांना सांगितली व बाकीच्या पांचच प्रश्नांस पूर्ण मार्क देतां येतात हेंहि सांगितलें.

तात्या म्हणाले, "छे ! नको, तें बरें दिसत नाहीं. युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्याच्या ही गोष्ट लक्षांत आली तर ते माझ्यावर पक्षपातीपणाचा आरोप करतील. दुसरा कोणी विद्यार्थी असता तर मीं तसें केलें असतें. तुझी गोष्ट निराळी पडते." आणि लागलीच त्यांनीं एका प्रश्नाला दिलेले मार्क खोडून टाकले. कोटून त्यांना सांगायला गेलों, आणि हात दाखवून अवलक्षण करून घेतलें असें मला झालें !

—अ. म. जोशी

( २६ ) भाषाशास्त्राचा पेपर लिहून मीं घरीं आलों, आणि तात्यांना म्हटलें "आजच्या माझ्या पेपरमध्यें तुम्ही एकहि चूक काढूं शकणार नाहीं !" तात्यांनीं दुसऱ्या दिवशीं पेपर तपासला. आणि प्रथम शेंकडा ९२ मार्क दिले. नंतर दुसऱ्या परीक्षकाशीं विचारविनिमय केल्यावर ९२ चे ८७ मार्क केल्याचें त्यांनीं मला सांगितलें. मीं कारण विचारतांच ते म्हणाले,

"××× म्हणाले कीं ९२ मार्क म्हणजे फार होतात. कमी करावे." "मींहि विचार केला आपल्या पुतण्याला जास्त मार्क दिले असा यांना संशय येईल. म्हणून मीं मार्क कमी करण्याचें कबूल केलें." मला हें त्यांचें तर्कशास्त्र चमत्कारिक वाटलें. परंतु 'लोकापवादात् भयम्' हें भर्तृहरीनें सांगितलेलें लक्षण आम्हां सर्व जोशी मंडळींत आहे असा विचार करून मी कांहीं बोललों नाहीं. शेवटीं निकालांत असं आढळून आलं कीं लोकापवादाकरितां गेलेले हे मार्क जर मिळाले असते तर परीक्षेंत पहिला वर्ग मिळाला असता !

—अ. म. जोशी

( २७ ) सेंट झेविअर कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या वार्षिकोत्सवाचे वामनराव अध्यक्ष होते त्यांचें अध्यक्षीय भाषण आटोपल्यावर सौ. हिराबाई बडोदेकरांचें गायन सुरू झालें. तेव्हां ते मजकडे आले आणि म्हणाले 'पाध्ये, मला कांहीं संगीत आवडत नाहीं, तेव्हां तुमची हरकत नसेल तर आपण घरीं जाऊंया.' मला हिराबाईचें संगीत प्रिय होतें, परंतु वामनरावांच्या सहवासाची गोडी कितीतरी अधिक असते हें अनुभवानें माहीत होतें. माझ्या बरोबरीच्या एका गानलोलुप मैत्रिणीला मात्र हिराबाईच्या गाण्याचा त्याग करवेना. पण माझ्या मुर्वतीसाठीं तीहि आमच्याबरोबर आली. सुमारें तासभर काव्यशास्त्रविनोद करून आम्ही परतलों तेव्हां माझी ती मैत्रीण अगदीं खूष होऊन म्हणाली 'बरं झालं बाई, आपण

( २३ ) त्यांचा मुलगा बंडू हा येरवड्याला वेड्याच्या इस्पितळांत होता, व तेथेंच तो वारला. त्याला ते तीन वर्षांत एकदांहि भेटायला गेले नाहींत. महिना दोन महिन्यांनीं आमच्यापैकींच कोणाला तरी त्याला भेटून यायला सांगत. ‘ तुम्ही एकदां तरी कां जाऊन येत नाहीं ? ’ असें विचारलें असतां ते म्हणत “ छे ! मला तें दृश्य पाहावायचें नाहीं. ”

—अ. म. जोशी

( २४ ) १९३३ च्या एप्रिलमध्यें मी एम्. ए. च्या परीक्षेला बसणार होतों. तात्यांनीं नेहमींप्रमाणें परीक्षकीकरितां अर्ज केला होता, व त्यांना परीक्षक नेमलेंहि होतें. परीक्षेला सुमारें दीड महिना असतांना युनिर्व्हिसिटींतील एक मोठे अधिकारी माझ्या थोरल्या बंधूंजवळ सहज बोलले, “ काय, हो, तुमचा भाऊ एम्. ए. ला बसत असतांना तुमच्या चुलत्यांना परीक्षक नेमलें हें कसें काय ? आपला पुतण्या परीक्षेला बसत आहे ही गोष्ट बहुधा त्यांनीं अर्जांत नमूद केली नसावी. ” ही गोष्ट तात्यांच्या कानावर गेली. अर्थात् ही गोष्ट आपण अर्जांत लिहिली आहे किंवा नाहीं हें त्यांना निश्चित स्मरेना. जर लिहिली नसली तर आपल्यावर अप्रामाणिक-पणाचा आरोप येऊं नये, म्हणून त्यांनीं तावडतोब विद्यापीठाकडे आपल्या परीक्ष-कीचा राजीनामा पाठवून दिला. परंतु विद्यापीठाच्या रजिस्ट्रारकडून “ तुमचा पुतण्या परीक्षेस बसत आहे ही गोष्ट तुमच्या अर्जांत नमूद केली आहे, आणि हें ज्ञात असूनहि आपणांस विद्यापीठानें परीक्षक नेमलें आहे, तरी कृपा करून राजीनामा परत घ्यावा. ” असें उत्तर आलें. त्यानंतर अर्थात् तात्यांनीं राजीनामा परत घेतला.

—अ. म. जोशी

( २५ ) एम्. ए. च्या परीक्षेमध्यें असाच एक प्रसंग घडला. मराठीच्या एका प्रश्नपत्रिकेंत दोन विभाग असून प्रत्येकांतून तीन तीन प्रश्न असे एकूण सहा प्रश्न सोडवायचे होते. मी चुकून एका विभागांतून चार व दुसऱ्यांतून दोन असे सहा प्रश्न सोडविले. पेपर तात्यांच्याकडेच होता. तपासतांना तात्यांच्या लक्षांत माझी चूक न येऊन त्यांनीं चारी प्रश्नांस मार्क दिले होते. मी घरीं येतांच तात्या मला म्हणाले “ पेपर फक्कड लिहिलायस तूं. ” ( मार्क मात्र सांगितले नाहींत. ) मला आनंद झाला, परंतु मीं केलेली चूक त्यांना सांगितली व बाकीच्या पांचच प्रश्नांस पूर्ण मार्क देतां येतात हेंहि सांगितलें.

तात्या म्हणाले, "छे ! नको, तें बरें दिसत नाहीं. युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांच्या ही गोष्ट लक्षांत आली तर ते माझ्यावर पक्षपातीपणाचा आरोप करतील. दुसरा कोणी विद्यार्थी असता तर मीं तसें केलें असतें. तुझी गोष्ट निराळी पडते." आणि लागलीच त्यांनीं एका प्रश्नाला दिलेले मार्क खोडून टाकले. कोठून त्यांना सांगायला गेलों, आणि हात दाखवून अवलक्षण करून घेतलें असें मला झालें !

—अ. म. जोशी

( २६ ) भाषाशास्त्राचा पेपर लिहून मीं घरीं आलों, आणि तात्यांना म्हटलें "आजच्या माझ्या पेपरमध्यें तुम्ही एकहि चूक काढूं शकणार नाहीं !" तात्यांनीं दुसऱ्या दिवशीं पेपर तपासला. आणि प्रथम शेंकडा ९२ मार्क दिले. नंतर दुसऱ्या परीक्षकाशीं विचारविनिमय केल्यावर ९२ चे ८७ मार्क केल्याचें त्यांनीं मला सांगितलें. मीं कारण विचारतांच ते म्हणाले,

"××× म्हणाले कीं ९२ मार्क म्हणजे फार होतात. कमी करावे." "मींहि विचार केला आपल्या पुतण्याला जास्त मार्क दिले असा यांना संशय येईल. म्हणून मीं मार्क कमी करण्याचें कबूल केलें." मला हें त्यांचें तर्कशास्त्र चमत्कारिक वाटलें. परंतु 'लोकापवादात् भयम्' हें भर्तृहरीनें सांगितलेलें लक्षण आम्हां सर्व जोशी मंडळींत आहे असा विचार करून मी कांहीं बोललों नाहीं. शेवटीं निकालांत असं आढळून आलं कीं लोकापवादाकरितां गेलेले हे मार्क जर मिळाले असते तर परीक्षेंत पहिला वर्ग मिळाला असता !

—अ. म. जोशी

( २७ ) सेंट झेविअर कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या वार्षिकोत्सवाचे वामनराव अध्यक्ष होते त्यांचें अध्यक्षीय भाषण आटोपल्यावर सौ. हिराबाई बडोदेकरांचें गायन सुरू झालें. तेव्हां ते मजकडे आले आणि म्हणाले 'पाध्ये, मला कांहीं संगीत आवडत नाहीं, तेव्हां तुमची हरकत नसेल तर आपण घरीं जाऊंया.' मला हिराबाईचें संगीत प्रिय होतें, परंतु वामनरावांच्या सहवासाची गोडी कितीतरी अधिक असते हें अनुभवानें माहीत होतें. माझ्या बरोबरीच्या एका गानलोलुप मैत्रिणीला मात्र हिराबाईंच्या गाण्याचा त्याग करवेना. पण माझ्या मुर्वतीसाठीं तीहि आमच्याबरोबर आली. सुमारें तासभर काव्यशास्त्रविनोद करून आम्ही परतलों तेव्हां माझी ती मैत्रीण अगदीं खूष होऊन म्हणाली 'बरं झालं बाई, आपण

आलों तें. हिराबाईचें गाणं मीं हज़ारदां ऐकलंय. पण तात्यांच्या गप्पांची मजा कांहीं निराळीच ! '

—प्रभाकर पाध्ये

( २८ ) प्रो. वामनराव हे ' संशयात्मा ' म्हणून प्रसिद्ध—किंवा अधिक अचुक बोलायचं तर कुप्रसिद्ध आहेत. परंतु संशयात्मा असूनहि 'संशयात्मा विनश्यति' अशी त्यांची स्थिति कां झाली नाहीं हें मात्र त्यांचे आक्षेपक सांगत नाहींत. माझ्या मतें वामनरावांवर ' संशयात्मा ' असा आरोप करतांना जो अभिप्राय आक्षेपकांच्या मनांत असतो त्या अभिप्रायाच्या दृष्टीनें वामनरावांना संशयात्मा म्हणणें बरोबर नाहीं. कारण ' इरसाल संशयात्म्या ' प्रमाणें यांत काय आहे, त्यांत काय आहे अशी वृत्ति त्यांची नाहीं. यांत कांहीं अर्थ नाहीं, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, कशांतच कांहीं अर्थ नाहीं असे तुच्छतापूर्वक आवाज काढणारे निरर्थवादी वामनराव नाहींतच. उलट, प्रत्येक लहानसहान गोष्टींत कांहींतरी अर्थ, कांहींतरी आशय, कांहींतरीं चांगूलपणा दिसतोच. जगाकडे अशा स्वागतपर दृष्टीनें पाहणाऱ्या सार्थवादी तत्त्वज्ञान्याला विनाशाची वाट चालणारा संशयात्मा ( म्हणजे खरोखर शंकेखोर ) म्हणणें म्हणजे शब्दांची केवळ विटंबना नव्हे काय ?

—प्रभाकर पाध्ये

( २९ ) मानवी जीविताबद्दल त्यांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं ' काव्यांतले प्रसंग वाचण्यापेक्षां स्वतःचें जीवनच काव्यात्मक करावें, व मग दुसऱ्यांनीं वाटल्यास त्यासंबंधीं काव्यें करावींत किंवा वाचावींत ! संशयस्थानांनीं परिपूर्ण असा इतिहास वाचण्यापेक्षां किंवा लिहिण्यापेक्षां आपल्या पराक्रमानें नवा इतिहास बनविला तर अधिक चांगलें. हे उद्गार विनाशाच्या गर्तेत पावलें रुतलेल्या ' संशयात्म्या ' चे आहेत काय ?

—प्रभाकर पाध्ये

( ३० ) दोन वर्षांपूर्वी, एका प्रकाशकातर्फे, त्यांना आत्मचरित्र लिहिण्याची विनंति करण्यासाठीं मी भेटलों, तेव्हां त्यांनीं मला नकार दिला; आणि आपला भित्रेपणा हेंच या नकाराचें कारण सांगितलें. ' अहो, आत्मचरित्र लिहावयाचें म्हणजे त्यांत कित्येक व्यक्तींवर टीका करावी लागते आणि तेवढें मला धैर्य नाहीं. ' धैर्य नाहीं हें सांगण्याचें धैर्य ज्या गृहस्थापाशीं आहे त्याची ही सबब तितकीशी

बरोबर नसावी हें उघड होय. मला तरी वामनरावांच्या या नकाराचें कारण वेगळेंच दिसतें. आयुष्यांत ज्या व्यक्ति वाईट वाटल्या त्या खरोखरच वाईट नसाव्यात, किंवा जे अनुभव कटु वाटले ते तितकेसे कटु नसावेत ही जाणीव त्यांच्या आंतर्मनांत खोल कोठेंतरी दडून बसली आहे, आणि तिच्यांतूनच आत्मचरित्र लिहिण्याची ही अनिच्छा उद्‌भवली असावी असें मला वाटतें.

*—प्रभाकर पाध्ये*

( ३१ ) जगांत चांगलें पहावयाचें व जगाला चांगलें द्यावयाचें हा वामनरावांचा स्वभाव बनला आहे. त्यांच्या मनमोकळ्या आणि प्रेमळ वर्तणुकीचें हेंच रहस्य आहे. दुसऱ्याशीं ते झटकन् समरस होतात आणि या त्यांच्या वृत्तीमुळेंच, मला वाटतें, ते कोणत्याहि वादांतला पूर्वपक्ष इतका चांगला रंगवूं शकतात. इतरांशीं समरसता साधण्याच्या भरांत, ते स्वतःला कधीं कधीं इतके विसरतात कीं, वादांत त्यांनीं स्वतःच रंगवलेला पूर्वपक्ष त्यांच्यावर मात करतो—त्यांचा उत्तरपक्ष फिका पडतो. ‘ ज्ञान हें विष कीं अमृत ’ हा त्यांचा प्रबंध या विधानाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रतिपक्षाचा दृष्टिकोन पाहण्यांत वामनरावांचा हातखंडा आहे आणि म्हणूनच कोणत्याहि वादांत शिष्टाई करण्यास त्यांच्यासारखा मध्यस्थ नाहीं.

*—प्रभाकर पाध्ये*

( ३२ ) माझ्या एका प्रकाशक मित्राच्या वतीनें मी त्यांना नवीन कादंबरी लिहावयाला घेण्याचा आग्रह केला. तेव्हां ते मला म्हणाले “ अहो, कादंबरी लिहावयाची, म्हणजे कांहीं तरी विषय आणि कथानक डोक्यांत घोळत असलें पाहिजे ना ? सध्यां माझ्या डोळ्यापुढें कांहीं विषय नाहीं. मग लिहिणार कशावर ? या त्यांच्या उत्तरावरून ही गोष्ट तुम्हांला कळून येईल कीं, ते धंदेवाईक कादंबरीकार किंवा लेखक नाहींत. त्यांचें ललित लेखन हें सुद्धां कांहीं एक नैतिक भावनेनें प्रेरित आणि नियमित झालेलें आहे. आपल्याजवळ कांहीं सांगावयाला आहे कीं नाहीं याच्या शंकेनें ज्याची लेखणी घोटाळते, तो लेखक भराभर किंवा भाराभर कादंबऱ्या कशा लिहिणार ? मीं त्यांच्या या उत्तरावर त्यांना म्हटलें “ हा तुम्हीं टोमणा दिला आहे आम्हां झपाझप कादंबऱ्या लिहिणाऱ्या अलिकडल्या लेखकांना ” ! त्यावर ते म्हणाले “ नाहीं हो ! मला तुम्हां नवीन मंडळीप्रमाणें विषय व कथानकें सुचत नाहींत लवकर ! ”

*—ग. त्र्यं. माडखोलकर*

( ३३ ) विद्यापीठासाठीं देणग्या मिळविण्याकरितां ते मुंबईस आले होते. त्या वेळीं भारतसेवक समाजाच्या निवासांत आम्ही कांहीं मित्रमंडळी त्यांना भेटावयाला गेलों असतां, विद्यापीठांतील प्राध्यापकाचे आधींच कमी असलेले पगार या आपत्तीमुळें आणखी कमी होणार असल्याची जी बातमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली होती, तिला अनुलक्षून आमच्यापैकीं एकानें त्यांना विचारलें " तात्या या नेहमीं हलाखींत दिवस काढण्याच्याः स्थितीबद्दल तुम्हांला वाईट नाहीं वाटत का कधीं ? " त्यावरोबर ते अगदीं प्रसन्न मुद्रेनें चटदिशीं म्हणाले, " वाईट कां वाटेल ? मीं स्वेच्छेनें हा जीवनक्रम पत्करला आहे. मग त्याबद्दल मला खेद कां वाटावा ? " या त्यांच्या उत्तरांत त्यांच्या जीवनांतील प्रसादाचें सारें रहस्य सांठविलेलें आहे.

—ग. त्र्यं. माडखोलकर

( ३४ ) आश्रमांतल्या सुवासिनी विद्यार्थिनीहि बोर्डिंगच्या बाथरूममधून आंघोळ करून कुंकवाविना स्वच्छ कपाळानं चाळीपर्यंन्त जात. तात्यांना हें बिलकूल आवडत नसे. तथापि ते त्यांना कधींहि रागावले नाहींत. एकदां आम्हींच त्यांना त्यांचें खरे मत सांगण्याचा आग्रह केला असतां ते म्हणाले, ' काय करायचीं आहेत तुम्हांला माझीं मतं ! चालायचंच. जग पुढें जात आहे. आपण पण पुढं पुढं सरकलं पाहिजे. नाहीं तर विनाकारण दुःख होईल आमच्यासारख्यांना. आमचीं मतं नव्या पिढीवर लादलीं तर ती दुःखी होईल. '

—सौ. सरलाबाई कर्वे

( ३५ ) तीन वर्षांपूर्वी गुरु० आण्णांच्या वाढदिवसाला मी गेलें असतांना डान्स वगैरे प्रोग्राम झाल्यावर तात्या मला म्हणतात ' काय ! वाईट वाटत असेल नाहीं ? राग येत असेल तात्यांचा कीं आमच्या वेळीं इतक्या मोकळेपणानें वागण्याची परवानगी नसे म्हणून. अहो ! पण तो काळ तसा होता, आतां बदलला आहे. दहा वर्षं पुढं गेला काळ तेव्हां आपण पण काळाबरोबर पुढें गेलं पाहिजे. वाईट वाटून घेऊं नका, कालमानाला अनुसरून झालं तें सर्व ठीकच झालं, व होताय्. अहो ! आतां आम्ही मुलींना शर्ट–चड्डया घालून मॅच्‌ला पण पाठवितों. ' तात्या हें सर्व इतक्या मोकळेपणानें सांगत होते कीं, जशी कांहीं ती त्यांच्या आवडीचीच गोष्ट. पण तात्यांना मी ओळखत असल्यानें दरएक काळाशीं समरस होण्याच्या त्यांच्या स्वभावविशेषाचा हा भाग आहे हें समजून चुकलें.

—सौ. सरला कर्वे

( ३६ ) मला त्या वेळीं शाळेचें वातावरण नवें, मराठी भाषा त्याहून नवी, तात्यांचें किंचित् परिहासपूर्ण ( *Satirical* ) विनोदी भाषण ! मी अगदीं भांबावून जात असें. त्यांनीं आम्हाला निबंध लिहून आणावयास सांगितलें होतें. इतर मुलींनीं लिहिले. मला कांहीं लिहितां येईना. घाबरटपणानें तोंडांतून कधींच शब्द काढीत नसल्यानें माझें कोठें अडतें हें तात्यांच्या लक्षांत येईना. एक निबंध लिहून न आणल्यामुळें आठवड्यांतून दोन निबंध लिहिण्याची त्यांनीं शिक्षा केली. पुढच्या आठवड्यांत ते चार झाले. अर्थातच मूळ निबंध व शिक्षेमुळें भूमिति श्रेढीनें वाढलेले निबंध कोणतेच लिहून झाले नाहींत. फक्त त्यांची संख्याच फुगली. शेवटीं प्रवेशवर्ग परीक्षेच्या तयारीसाठीं समाप्त व्हावयाच्या दिवशीं तात्यांनीं समारोपाचें भाषण केलें. विद्यार्थिनीं व तात्या सगळ्यांचींच अंतःकरणें गहिंवरून आलीं होतीं. अशा मनःस्थितींत तात्यांनीं मला टेबलाजवळ बोलावलें व सांगितलें " आज मी तुमच्या नांवावर साचलेल्या सर्वच निबंधांची सूट देतों. कारण परत तुमच्या गांवाला जातांना तुमच्याबरोबर रेल्वेला न लिहिलेल्या निबंधांचें ओझें नको ! " एकदम वर्गभर हंशा पिकला, व आमच्या मनावर जें एक गंभीर उदासीनतेचें दडपण बसलें होतें तें एकदम दूर झालें.

—सौ. सुशीला कोटीवान

( ३७ ) माझ्या दृष्टीनें स्त्रीशिक्षणाबद्दल ते आमच्या कॉलेजमध्यें आले त्या वेळीं त्यांची वृत्ति साशंक असावी. कित्येक वेळां सामान्यपणें बोलतांना तर वाटेच. परंतु माझ्या विशेष लक्षांत राहण्यासारखी गोष्ट म्हणजे गमतीनें बोलतांना देखील कित्येक वेळां ते म्हणत 'आतां आमच्या या मालतीबाई, कमळाबाई ( कुकडे ) मनांत मांडे खात असतील कीं आतां आपण ग्रॅज्युएट होणार, तेव्हां तरुण, कुलिन, गोरा, हंसतमुख नवरा आपल्याला मिळेल ! पण अहो मालतीबाई चूक आहे तुमची ! नाहीं, ती आशा बाळगून आतां उपयोगी नाहीं ! एक वेळ तुम्ही काळ्या असलांत तरी तुम्हांला हुंड्यानें गोऱ्या केल्या असत्या. पण आतां तुम्हीं शिकलांत ! तुम्ही जसजशी डिग्री मिळवाल तसतशी लग्नाच्या बाजारांत तुमची किंमत घसरली म्हणून समजा. अहो पुरुषांना तुमच्याशीं लग्न करायला भीति वाटते ! तुमच्या आकांक्षा वाढलेल्या, तुमचं *Standard of living* वाढलेलं. तें सगळं पुरं पाडायचं ! मन कचरतं तुमच्याशीं लग्न करायचं म्हणजे. आमच्या आपल्या अशिक्षित मागच्या बायका कश्या ! त्यांना ज्ञान, रुति-सगळं अगम्य ! त्यामुळें

नवऱ्याच्या प्रत्येक गोष्टीचं तिच्याजवळ कौतुक असे! थोड्या कर्तबगारीवर प्रेस्टिज मोठं राखतां यायचं! तुम्हांला *B. A.* नवऱ्याचं काय हो कौतुक? त्याचं ज्ञान काय तें तुम्हांला माहीत, मग तुमच्याशीं लग्न करण्यांत कांहीं काव्य रहात नाहीं! तुम्ही का लहान मुलीसारख्या लाजणार आहांत? हातांत हात घालून तुम्ही म्हणणार चला फिरायला! अहो, या पूर्वीच्या गोष्टींत जें काव्य होतं तें सगळं जातं. म्हणून म्हणतो कमळाबाई, मालतीबाई, लग्न करायचंच असलं तुम्हांला तर तुमच्या नशीवीं सेकंड हँड्!!

"सेकंड हँड् तरी करील का लग्न आमच्याशीं? त्याला नाहीं का भीति वाटणार?" त्यावर ते म्हणत "अहो पहिल्या लग्नाचे वेळचे मनोरथ, हौस, का कुठें दुसऱ्या लग्नाचे वेळीं राहिलेली असते? कुणीकडून विस्कटलेला संसार जुळवायचा! मग शिकलेली असली तरी निदान वयानें जोडीला येते म्हणून होतात मग ते तयार तुमच्याशीं लग्न करायला!"

—सौ. मालती जोशी

(३८) तात्यांनीं मला लिहिलेल्या पत्रांतील उतारे पुढें देत आहें. त्यांनीं त्यांचें जीवन आणि वाङ्मयीन कार्य यांवर बराच प्रकाश पडेल:—

—सौ. सुधा जोशी

[१] "तुमच्या सर्वांचा लोभ पाहून आनंद होतो. 'त्याग' वगैरे जें कांहीं लिहिलें जातें तें अतिशयोक्त आहे त्यांत तथ्यांश येवढाच कीं मी सांगकाम्याप्रमाणें किंवा टाकभाड्याप्रमाणें काम केलें नाहीं. बहुंशीं त्यांत मन घातलें आहे. चारित्र्याबद्दल जें लिहिलें जातें तें बाह्य उपचारांबाबतच खरें. मन अद्यापी अटोक्यांत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. मानसशास्त्रदृष्ट्या मनांत वाईट विचार येऊं न देणें हें कठीण दिसतें. तेवढें वळण मी आपल्या मनाला लावूं शकलों नाहीं.

[२] 'वाङ्मयीन कार्य करा' असें तुम्हीं इतरांप्रमाणें लिहिलें नाहींत हे उपकारच आहेत. कारण आतां कार्य होणें कठीण आहे. लोकांनीं अपेक्षा कराव्यात व आपण त्या पुऱ्या करूं शकत नाहीं ही जाणीव थोडीशी दुःखद. पण मी *reconcile* झालेला आहें. तांबे कवींच्या मधुघटांप्रमाणें माझा मधुघट रिकामा झाला आहे. ही गोष्ट केव्हांतरी व्हायचीच होती ती झाली. यांत दुःख कसलें करायचें? मोठे शब्द वापरायचे म्हणजे अवतारकृत्य संपलें असें म्हणावें.

आपला—वा. म. जोशी

( ३९ ) " नवीन आलेले प्रो. वा. म. जोशी हे आम्हाला मराठी शिकवणार हें निश्चित कळल्यावर जो आनंद झाला तो अवर्णनीय तर होताच; पण त्या आनंदांत निदान माझ्या मनांत तरी अशी एक आशा बिलगून होती कीं ' रागिणी ' कर्त्यांनीं जर आपणांस मराठी शिकवलें तर आपणहि लौकरच एखादी अशीच कांदवरी लिहिण्यास समर्थ बनूं. ! आमच्या प्रवेशवर्गाला त्या वर्षी अनेक पुस्तकांपैकीं, ' पण लक्षांत कोण घेतो ' ही श्री. हरिभाऊ आपट्यांची मनास चटका लावून सोडणारी सामाजिक कादंबरी होती. आमची अपेक्षा अशी कीं आमचे नवे शिक्षक सुधारक, म्हणून ते यमू व तिच्या नवऱ्याच्या पत्रांशीं अगदीं तन्मय होतील. पण त्याऐवजीं ते शंकर मामंजींच्या पात्राची उठावणीच विशेष विशद करीत. हें पाहून आमच्या पुढारलेल्या सुधारकी विचारास जरासा धक्का बसला. !

—*शांताबाई भाटवडेकर*

( ४० ) असाच एकदां केव्हांतरी वामनरावजींच्या विधुरावस्थेचा प्रश्न निघाला. वामनराव त्या दिवशीं बऱ्याच मोकळ्या मनानें बोलत होते. ते हंसत हंसत मिष्किलपणानें म्हणाले ' अहो जोशीबुवा—माझी बायको मेल्यानंतर मीं ठाम निश्चयानें लग्न केलें नाहीं—असा जो तुमचा भ्रम आहे तो अजिबात चूक आहे. खरं म्हणाल तर माझ्या मनांत पुन्हां लग्न करायचं होतं—पण मी तत्त्वज्ञानी असा माझा लौकिक पसरला होता; तेव्हां माझ्या मित्रमंडळींनींच ठरवलं कीं मी आतां पुन्हां लग्न करणार नाहीं; आणि माझ्या लग्नाचा विषय माझ्यापर्यंत पोहोंचूंच दिला नाहीं ! अशींच चार—पांच वर्षे गेलीं आणि मग विधुरावस्था माझ्या आंगवळणीं पडली; आणि मग ठरवायचें कांहीं कारण नव्हतें—तरी मीं मनाशीं ठरविलें कीं आतां आपण लग्न करायचें नाहीं !

—*य. गो. जोशी*

( ४१ ) वामनरावांचा मुलगा वारल्यानंतर कितीतरी दिवसांनीं एकदां आम्ही भेटलों होतों. तेव्हां त्यांच्या मुलाच्या मृत्यूचा विषय निघाला. पुष्कळसें बोलणें झाल्यावर वामनराव हळू हळू म्हणाले " मला वाटतें, जोशीबुवा, माझ्या आणि आमच्या मोठेपणामुळें माझा मुलगा वारला. त्याच्या मनाला नेहमी खात असे—आपले वडील—इतके नांवलौकिकवान्, चुलते प्रख्यात, आणि आपण—! त्यांत त्याला कमीपणा वाटे—जोशीबुवा, मोठेपणाचे हे लपवलेले हाल आणि कुचंबणा !

—*य. गो. जोशी*

( ४२ ) एकदां आमच्यावर रागावण्याचा प्रसंग आला व सांगितलें कीं मी रागावलों म्हणजे कोणाचें ऐकत नसतों. पण त्यांची शिक्षा म्हणजे आम्ही जरा वेळ मान खालीं घालून उभें राहिलेलों दिसलें म्हणजे त्यांना वाटत असे खरोखर चुकल्याची जाणीव झालेली दिसते व आतां पुढें रागावूं नये. एवढें झाल्यावर पुन्हां असें करूं नको इतकें सांगून, लगेच अरे जा दोन कप चहा ठेव व तुला चहा ठेव एवढें ऐकून निघून गेलों म्हणजे तात्यांच्या मनांतले राग थंड होई. "

—सय्यद अजिमुद्दीन
( कॉलेजचा शिपाई )

( ४३ ) " कॉलेजवर आमच्या सर्वांचा चहाचा क्लब म्हणून आहे. त्याच्याबद्दल गड्यांना एक रुपाया वाटून घ्या असें दर महिन्याला देत असत. ( त्यांच्या घरांत दुसरें कोणी नसल्यानें त्यांना वाटत असे गड्यांना घरांतील काम पडतें ) व सर्वजण चहा घ्या असें सांगत व मुंबईस आजारी असतांनाही आमची आठवण आली व सागडे यांना पत्रांतून कळविलें कीं माझ्या पगारांतून दोन रुपयें सर्व गड्यांना चहाला वांटून घ्या असें लिहिलें. खरोखर तात्यानां आमच्याबद्दल आपलेपणा किती होता व आम्हासहि घरच्याप्रमाणें वाटत व आनंद होई, असे आमचे तात्या अधिकारी असून आम्हांस वागवून घेईत. त्यांचा आम्हांस कधींहीं विसर होणार नाहीं. "

—सय्यद अजिमुद्दीन

( ४४ ) प्रो. वामनरावांच्या बोलण्यांत नेहमीं येणारी व वर्तनांत सतत दिसणारी एक गोष्ट म्हणजे ते असें सांगत कीं, शिक्षण हें मनोविकासाकरितां आहे, व या विकासाची साक्ष मनुष्याच्या वर्तनांत पटली पाहिजे. उदाहरणार्थ शिक्षित मनुष्यानें आपल्या विरोधी किंवा न आवडणाऱ्या माणसांशीं किंवा पक्षाशीं अथवा पंथाशीं वागतांना रागलोभातीत, सौजन्यपूर्ण व सभ्यतेनेंच वागलें पाहिजे. सूडबुद्धि व हीनतेची वागणूक हीं केवळ रानटी अशिक्षितपणाच दाखवितात. प्रो. वामनरावांचें हें म्हणणें खरेंच नव्हे काय ?

—दुर्गाबाई जोशी

( ४५ ) आमच्या प्रोफेसरांच्यामध्यें श्री. दिवेकर व प्रो. वामनराव जोशी यांचे तास म्हणजे अगदीं घरगुती वातावरणाप्रमाणें–बंधुभगिनी चर्चा करितात तसेच जात असत. इतकें मोकळेपणानें, कळकुळीनें, व आपलेपणानें या दोघांचें वागणें

असे. आणि म्हणूनच प्रसंगीं आपल्या सार्वजनिक जीवनांतील व खासगी जीवनांतील कांहीं विशेष गोष्टी एखाद वेळ ते बोलून जात.

प्रो. ह. रा. दिवेकर व प्रो. वामनराव हे दोघेहि टिळक गांधींचे सारखेच भक्त असून जेल यात्रा करून आलेले असल्यानें मला ते फार मोठे वाटत, व म्हणूनच त्यांनीं सांगितलेले अनुभव मला स्मरणीय वाटत.

वामवराव म्हणाले " केसरी ऑफीसमध्यें काम करीत असतांना माझ्या मनाला न पटणारा एक लेख लिहिण्याची लोकमान्यांची मला आज्ञा झाली. मी माझा मत-भेद सांगितला परंतु लोकमान्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं; लेखाचें स्वरूप सांगून ते निजण्यास गेले. प्रतिपक्षावर हल्ला करण्याचा तो प्रश्न होता. मी तसाच विचार करीत पुष्कळ वेळ बसलों होतों. सुमारें बारा वाजण्याच्या सुमाराला लोकमान्य माझ्या ऑफीसमध्यें आले व म्हणाले, " काय वामनराव अजून तुम्ही विचारांतच दिसत आहांत! लेखाला सुरवातहि झालेली दिसत नाहीं. आहो पक्ष म्हटला कीं हें असेंच चालावयाचें. मनाला पटत नाहीं म्हणून कसें चालेल. आगरकरांचा व माझा नेहमीं असाच मतभेद होत असे. "

बोलतां बोलतां, आपल्या गतमित्राच्या स्मरणानें लोकमान्यांचें मन व्यथित झालें, कंठ जड झांला व त्यांच्या नेत्रांतून आश्रू गळले.

वामनराव म्हणाले " कर्तव्य-कठोर व करारी असा हा थोर पुरुष कधीं कोण· त्याहि मोठ्या कारणाकरितां आश्रू गाळील ही गोष्ट मला कधीं स्वप्नांतहि खरी वाटली नसती. यावरून केसरींत व सुधारकांत नित्य एकमेकांच्यावर तुटून पडणाऱ्या या दोन महापुरुषांचें एकमेकांवर केवढें अनुपम प्रेम होतें हें मला कळलें. कठोर तत्त्व-निष्ठा व परमोच्च मित्रप्रेम हीं एका ठिकाणीं पाहून मी थक्क झालों ? "

—*दुर्गाबाई जोशी*

( ४६ ) जून, जुलैचा सुमार होता तो! सगळीकडें वादळी वारे वाहूं लागले होते! त्याचे पडसाद आमच्याहि वसतिगृहांत घुमत होते. तात्यांशीं–किंचित् भांडून मी, शकी, कुमी, माली ७ ऑगस्टला राष्ट्रसभेच्या मण्डपांत गेलों होतों. ७ ऑगस्ट उजाडली अन् मावळली! पण त्या· दिवशींचा तो अपूर्व देखावा मात्र आमच्या हृदयांत कायमचा उमटला! ७ ऑगस्ट गेली आणि अखिल भारताला धक्का देणारी ९ ऑगस्ट उजाडली! मोठ्या विचित्र मनःस्थितींत आम्ही पुण्यास परतलों होतों!

राष्ट्रींय आंदोलन सुरू झालें ! आम्ही भांबावून गेलों होतों ! भावनावेग अनावर होत होता ! पण –कसं आणि काय करायचं हें समजत नव्हतं ! आण्णा, तात्या, सरदार, लागू या गुरुजनांच्या मदती खेरीज त्या गोंधळांतून बाहेर पडून खरा ध्येयमार्ग आम्हांला सांपडणं–नव्हे तो नुसता शोधतां येणं सुद्धां अशक्यच होतं ! आम्ही सर्वांशीं बोललों ! प्रत्येकानें आपल्या परीनं मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला...त्याची कांस आम्हाला कितपत धरतां आली तो प्रश्न वेगळा ! पण त्यावेळीं तात्या म्हणाले होते " ज्या त्यागाचा भावी जीवनांत कधींही पश्चात्ताप होणार नाहीं–उलट त्याच्या स्मृतीनं आनंदच होईल असा त्याग खुशाल करा ! " हा उपदेश तात्यांचा होता. ना. दा. ठा. वि. च्या प्रिन्सिपॉलांचा नव्हे हं ! त्या भूमिकेवरून निराळ्याच धोरणानं त्यांना आमच्याशीं वागणं भाग होतं ! मला त्यावेळीं त्यांच्या त्या बोलण्याचा अर्थ समजलाच नसावा नीट ! पण आतां मात्र मागें दृष्टी टाकतें त्यावेळीं तात्यांच्या सांगण्यांत मला वाटतं त्यापेक्षां निराळाच आणि अधिक खोल अर्थ भरलेला आहे असं वाटतं ! तात्यांनीं सांगितलेला त्याग करायला तपश्चर्येचं केवढं बळ पाहिजे मागं—!

—*सिंधु खाडीलकर*

**स्त्रीअधिकाऱ्यांसंबंधीं वामनरावांचीं मतें:**—स्त्रियांच्या संस्थांत शाळेच्या व बोर्डिंगच्या प्रमुखांच्या जागा स्त्रियांनाच द्यावयास पाहिजेत कारण त्यांना स्त्री-जीवनाचें ज्ञान असून स्त्रियांबद्दल विशेष आपुलकी आणि सहानुभूति वाटते असें जें सरसहा मानलें जातें तें खरें आहे असें वामनरावांना वाटत नसे. उलट—कल्पना, सहानुभूति, मनाचें औदार्य, कोणत्याहि गोष्टीकडे साकल्यानें पाहण्याचें तारतम्य, वागवून व नांदवून घेण्याचें धोरण वगैरे गुण—जे आदर्श प्रमुखाचे ठिकाणीं असावयास पाहिजेत ते स्त्रियांचे ठिकाणीं तितक्याश्या प्रमाणांत दिसून येत नसल्यामुळें त्या पुष्कळ वेळां पुरुषापेक्षां जास्त कठोर, जास्त कडक, जास्त कायदेबाज असतात असें वामनराव म्हणत. आणि याचा पुरावा म्हणून ते स्वतःचा म्हणून असा एक अनुभव सांगत कीं ज्या गोष्टी विद्यार्थिनी स्त्री-अधिकाऱ्यांपाशीं मोकळेपणानें बोलत नसत त्या गोष्टी त्या त्यांचेपाशीं सांगत; त्यांना त्यांचा जितका विश्वास व आपलेपणा वाटत नसे तितकाच वामनरावांबद्दल वाटत असे. वामनरावांचा असा हा स्वानुभव असे; यांत शंका नाहीं. दुसऱ्या कित्येकांचाहि कदाचित् तसा असेल. पण त्यावरून सर्वच पुरुषाधिकाऱ्यांबद्दल सर्वच स्त्रीविद्यार्थिनींना सर्व स्त्रीअधिकाऱ्यांपेक्षां जास्त विश्वास व आपलेपणा वाटतो असें विधान करणें बरोबर होणार नाहीं; आणि वामनरावहि तसें कधीं करीत नसत.

मुख्याधिकाऱ्याला चांगली व्यवस्था ठेवतां आली म्हणजे झालें, त्याला चांगलें शिकवतां आलेंच पाहिजे असें नाहीं अशी जी एक समजूत असते तीहि वामनरावांना बरोबर वाटत नसे. मुख्याधिकारी हा उत्तम शिक्षकहि असला पाहिजे असें त्यांचें म्हणणें. आणि या दंडकाप्रमाणें आजन्मसेविकांपैकीं ज्यांना उत्तम प्रकारें शिकवितां येत नसे त्यांच्यांत शाळेवरील अधिकारी व्यक्ति या नात्यानें कमीपणा उरतो असें वामनरावांचें मत होतें.

**स्त्रीशिक्षिकांसंबंधीं वामनरावांचें मतः**—सर्वसामान्यतः विचार करतां, स्त्रिया शिकविण्याचे बाबतींत पुरुषांच्या बरोबरीला येऊं शकत नाहींत असें वामनरावांचें मत असे. शिक्षिका कुमारिका असल्या तर त्यांच्या ध्येयांत, वृत्तींत वगैरे स्थैर्य नसतें. लग्न होणार का नाहीं, झाल्यास, आपण कुठें ‘पडणार’ आहोंत, आपलें पुढें काय होणार आहे, याची कांहींच कल्पना त्यांना नसल्यामुळें त्यांचें सबंध जीवन अधांत्रीं तरंगत असतें; व याचा परिणाम त्यांच्या शाळेंतल्या वागणुकीवर व शिकविण्यावर होत असतो. शिक्षिका सधवा असून त्यांना मुलें-बाळें असलीं म्हणजे त्यांचें बरेचसें लक्ष घरीं लागलेलें असतें. मुलां-माणसांचें करण्यांतच त्यांची सर्व शक्ति नाहींशी होते. शाळेची शिस्त पाळणें त्यांचे हातून होत नाहीं. शिकवण्याव्यतिरिक्त दुसऱ्या शालेय कामांत त्यांना भाग घेतां येत नाहीं. आणि या सर्वांमुळें त्यांचें काम समाधानकारक होत नाहीं. शिक्षिका विधवा असल्या तर त्यांचे वृत्तींत औदासीन्य, अतृप्तता, असमाधान वगैरे असतात. त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून त्या चिडखोर व चिरचिऱ्या बनतात, आणि मुलींना आवडेनाशा होतात.

स्त्रियांचें वाचन व सामान्य ज्ञान अपुरे पडत असल्यामुळें त्या शिकवण्यांत रंगून गेलेल्या आढळत नाहींत अशी वामनरावांची तक्रार असे. त्या शिकविण्याची तयारी पुरती करीत नाहींत, चालढकल करण्याकडे त्यांची वृत्ति जास्त असते, वह्या वगैरे तपासण्यांत किंवा ऑफिसचें काम करण्यांत त्या जितक्या दक्ष असावयास पाहिजेत तितक्या नसतात. या सर्वांचें कारण त्यांना वेळ नसतो, आणि घरांतलीं व बाहेरचीं अशीं दोन्हीं कामें करावीं लागत असल्यामुळें त्या दमून जातात हें होय; आणि हीं कामें त्यांनीं केलीं नाहींत व पुरुषांप्रमाणें कुटुंबाकडे दुर्लक्ष करून त्यांनीं फक्त शाळेकडेच लक्ष दिलें तर समाजाला तें आवडत नाहीं. अशा प्रकारे अशा स्त्रियांची दोन्हीकडून कुचंबणा होते, व त्याला समाजपद्धतीच पुष्कळशी

कारण आहे. आणि ती बदलली म्हणजे स्त्रियाहि पुरुषांइतक्याच कार्यक्षम होतील असें वामनराव म्हणत; व सर्व गोष्टी निभावून नेत.

' स्त्रियांचे हातून शिक्षणाचें काम नीट न होण्याला कारणें असलीं तरी तें नीट होत आहे असें तर म्हणतां येणार नाहीं ना? पोट दुखायला कारणें असतील, तीं कारणें नाहींशीं झालीं म्हणजे तें दुखायचें थांबेल, हें सर्व खरें. पण आतां तें दुखतें आहे किंवा नाहीं असें कोणीं निक्षून विचारल्यास दुखतें आहे असेंच म्हणावयास पाहिजे ना?' असें वामनराव विचारीत. पुणें ट्रेनिंग कॉलेजमधील रा. नवरे मास्तर यांनीं वामनरावांना यासंबंधीं प्रश्न केला असतां वामनरावांनीं पुढीलप्रमाणें सांगितलें असें रा. नवरे म्हणतात, " माझें असें मत होत चाललें आहे कीं स्त्रीशिक्षक नेमूं नयेत." कां? म्हणून विचारतां " स्त्री-शिक्षिका मुलींना सहानुभूतिपूर्वक वागवीत नाहींत, त्या मुलींना फार बोलतात, त्यापेक्षां शारीरिक शिक्षा पुरविली असें मुलींना वाटतें. असा अनुभव त्यांनीं सांगितला." वामनरावांचें हें उत्तर जरा 'चिन्त्य'च नाहीं का?

**आजचे कॉलेज विद्यार्थी:—** अलीकडच्या कॉलेज–विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्याबद्दल माझें मत थोडक्यांत यथार्थतेनें सांगणें कठीण. पण अजिबात टाळाटाळी करणेंहि युक्त नव्हे, म्हणून चार शब्द लिहितों.

( १ ) अलीकडील विद्यार्थ्यांना विविध प्रकारची माहिती पूर्वीपेक्षां अधिक आहे. एकाच विषयाचा सखोल अभ्यास मात्र कमी असें वाटतें.

( २ ) शिस्त जरा कमी. पण याचा अर्थ मुलें-मुली वाईट आहेत असें नव्हे. ज्यांचा कायमचा स्वभाव वाईट ते वाईट. हल्लींचा क्वचित् प्रसंगीं दिसून येणारा उच्छृंखलपणा कायम स्वरूपांतला नव्हे. क्षणिक वृत्ति आहे ती. सभेंत गोंधळ करणारे अगदीं थोडे. ' कांहींजण गोंधळ करूं नका ' असें ओरडून अजाणता गोंधळांत भर घालतात !

( ३ ) मुलगे आणि मुली यांचे संबंध वाईट असतात असा आरोप करतात तें खोटें आहे. साहजिक आकर्षण असावयाचें तें असतें. शिट्या वाजविणें, खाकरणें, कागदाचे बोळे व विमानें फेकणें वगैरे गोष्टी क्षणिक वृत्तीच्या निदर्शक आहेत. अंतस्थ कीड लागली आहे असें त्यावरून मानणें चुकीचें होईल. कांहीं वाईट प्रकार घडत असतील–घडतातच; पण हे अपवादात्मक. मुलगे-मुली अधिक मिसळतात

म्हणून हे प्रकार होतात असें म्हणतात. मी म्हणेन आणखी अधिक मिसळले तर मुलांमुलींना जें उगाच आकर्षण वाटतें, जो नसता चांगलेपणा एकमेकांत दिसतो, ज्या भलत्या कल्पना एकमेकांबद्दल असतात, जें काल्पनिक सौंदर्य परस्परांमध्यें दिसतें, तें सर्व नष्ट होऊन बौद्धिक निरोगिता उत्पन्न होईल. योग्य देखरेख पाहिजेच आणि कांहीं मर्यादा अर्थात् पाळल्याच पाहिजेत.

(श्री. विद्याकुमार शेरे यांस लिहिलेलें व 'किर्लोस्कर' मध्यें प्रसिद्ध झालेलें पत्र.)

**वाङ्मय आणि जीवनः**—" जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे, आणि केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं, या दोन गोष्टी आपण पाहिल्या. तिसरी गोष्ट म्हणजे वाङ्मय हें केवळ जीवनाचा विसर पाडण्यासाठीं नाहीं. *Literature is an escape from life into life* असें हें खरें वाक्य आहे. परंतु पुष्कळ वेळां सर्व वाक्य कोणी वाचीत नाहीं. जीवनाचा विसर म्हणजे वाङ्मय एवढेंच वाक्य उच्चारूं लागले. परंतु एवढेंच नाहीं. या जीवनाचा विसर पाडून दुसऱ्या एका जीवनांत घेऊन जाणें म्हणजे वाङ्मय. उच्चतर जीवनांत प्रवेश करावयाचा. हें अफूचें विसरणें नव्हे, ही गुंगी नव्हे. विसर पाडावयाचा, परंतु दुसऱ्या उदात्त जीवनाची स्मृति द्यावयाची. त्या उदात्त जीवनाच्या कल्पनेनें आपणांस आनंद होतो.

*—कॉंग्रेस–अंमळनेर २४ जुलै १९३९*

**कला व नीतिः**—" खरें पाहिलें तर रसिकता, ज्ञान व नीति या गोष्टी अलग नाहींत. आपण व्यवहारासाठीं हे भाग अलग कल्पिले तरी ते तसे केवळ अलग नाहींत. *तिन्ही भाग गुंतलेले आहेत.* माझा डोळा एक अलग भाग आहे. परंतु डोळा बिघडला तर डोकें दुखूं लागतें. लिव्हर बिघडलें तर सर्व शरीरभर परिणाम होतो. दिसायला भाग अलग, पण एकावरचा आघात दुसऱ्यावरही होतो. आत्मा अविभाज्य आहे, अखंड आहे. ही अखंडतेची कल्पना जीवनांत फार आवश्यक असते. आपले प्रत्येकाचे संसार पृथक् आहेत. परंतु सर्वांचा मिळून एक विराट संसार आहे. आपण सर्वांच्या सामुदायिक अखंड संसाराची आठवण ठेवली नाहीं, केवळ अलग संसारांतच रमलों म्हणून तर आज दास्यांत आहोंत. कला, ज्ञान व नीति हीं अलग मानून अखंडहि माना. तरच मेळ राहील. कलेची नीति मोलकरीण नाहीं, त्या

वहिणी वहिणी आहेत. कोणी क्षुद्र नाहीं, कोणी श्रेष्ठ नाहीं. त्यांची एकवाक्यता आहे."

—*कॉंग्रेस–अमळनेर*

**चिरंजीव कलाः**—ज्याप्रमाणें केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं,—कांहींतरी आकांक्षा, कर्तृत्व, प्रेरणा यांतून सुख मिळतें—त्याप्रमाणें कलेंतील आनंद होतो तो विरोधामुळें होतो. झगड्यांतून आनंद होतो. हा झगडा जेवढा उच्च भूमिकेवरून होईल तितका अधिक आनंद. मुंबईला मी गेलों. ही ट्रॅम घेऊं का ती असा जीवनांत झगडा उभा राहिला. त्यावर कोणीं गोष्ट लिहिली. क्षणभर मौज वाटेल. उदात्त, अक्षय आनंद त्यापासून मिळणार नाहीं. परंतु एकाद्याची आई व त्याची बायको यांचें भांडण होतें. बायको नवीन काळांतील, आई जुन्या काळांतील. दोघींबद्दल त्याला आपलेपणा वाटतो. त्यानें कोणाची बाजू घ्यावी? कोणास टाकावें? हा झगडा अधिक उदात्त आहे. आणि प्रभु रामचंद्राचा झगडा? सीता सर्वस्वी निरपराध आहे, अशी रामाची खात्री, परंतु कोणी प्रजाजन निराळें म्हणतात. केवढा झगडा! झगडा जितका महत्त्वाचा, तितकी ती कलाकृति अधिक चिरंजीव व थोर होते.

—*कांग्रेस–अमळनेर*

**प्रश्नांचें महत्त्वः**—"वाचन हें ज्ञानाचें पहिलें साधन झालें. दुसरें साधन म्हणजे प्रश्न विचारले पाहिजेत. मी विद्यार्थी असतांना फार प्रश्न विचारीत असें. मी उत्तरेंहि देत असें. उत्तरें चुकतात, मुलें फसतात. परंतु आपलें अज्ञानहि कळून येतें. उत्तरें चुकायचींच. कधीं कधीं मी असे प्रश्न विचारीत असें कीं मास्तर हंसत. माझ्या शंकांचीं उत्तरें देणें त्यांना बरें वाटत नसे. मग 'गुरोस्तु मौनं व्याख्यानम्' असें व्हायचें. पुष्कळ मुलें प्रश्न विचारायला लाजतात. मुलींचें तर विचारूंच नका! लाजून कसें होणार? विचारावें. कारण आजचें समजलें नाहीं, तर उद्याचें कसें समजणार? मी कॉलेजमध्यें होतों. प्रो. बेन यांना गंभीरपणें प्रश्न विचारला. ते हसले व निघून गेले. मागून माझा प्रश्न वेडेपणाचा होता मला कळलें. प्रो. सेल्बी फारच कर्तव्यपरायण. प्रश्न विचारून त्यांना मी भंडवायचा. ते घरीं गेल्यावर माझे सर्व प्रश्न लिहून काढीत व त्यांचीं उत्तरें लिहून मला देत. मला लाज वाटे, आपण यांना किती त्रास देतों! परंतु त्यांचा आनंद होता तो. खऱ्या शिक्षकास प्रश्नांचा कंटाळा येत नाहीं......सारांश, प्रश्न विचारीत जा. मास्तर जर म्हणाले

म्हणून हे प्रकार होतात असें म्हणतात. मी म्हणेन आणखी अधिक मिसळले तर मुलांमुलींना जें उगाच आकर्षण वाटतें, जो नसता चांगलेपणा एकमेकांत दिसतो, ज्या भलत्या कल्पना एकमेकांबद्दल असतात, जें काल्पनिक सौंदर्य परस्परांमध्यें दिसतें, तें सर्व नष्ट होऊन बौद्धिक निरोगिता उत्पन्न होईल. योग्य देखरेख पाहिजेच आणि कांहीं मर्यादा अर्थात् पाळल्याच पाहिजेत.

(श्री. विद्याकुमार शेरे यांस लिहिलेलें व 'किर्लोस्कर' मध्यें प्रसिद्ध झालेलें पत्र.)

**वाङ्मय आणि जीवनः**—" जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे, आणि केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं, या दोन गोष्टी आपण पाहिल्या. तिसरी गोष्ट म्हणजे वाङ्मय हें केवळ जीवनाचा विसर पाडण्यासाठीं नाहीं. *Literature is an escape from life into life* असें हें खरें वाक्य आहे. परंतु पुष्कळ वेळां सर्व वाक्य कोणी वाचीत नाहीं. जीवनाचा विसर म्हणजे वाङ्मय एवढेंच वाक्य उच्चारूं लागले. परंतु एवढेंच नाहीं. या जीवनाचा विसर पाडून दुसऱ्या एका जीवनांत घेऊन जाणें म्हणजे वाङ्मय. उच्चतर जीवनांत प्रवेश करावयाचा. हें अफूचें विसरणें नव्हे, ही गुंगी नव्हे. विसर पाडावयाचा, परंतु दुसऱ्या उदात्त जीवनाची स्मृति द्यावयाची. त्या उदात्त जीवनाच्या कल्पनेनें आपणांस आनंद होतो.

—*कॉंग्रेस–अंमळनेर २४ जुलै १९३९*

**कला व नीतिः**—" खरें पाहिलें तर रसिकता, ज्ञान व नीति या गोष्टी अलग नाहींत. आपण व्यवहारासाठीं हे भाग अलग कल्पिले तरी ते तसे केवळ अलग नाहींत. तिन्ही भाग गुंतलेले आहेत. माझा डोळा एक अलग भाग आहे. परंतु डोळा बिघडला तर डोकें दुखूं लागतें. लिव्हर बिघडलें तर सर्व शरीरभर परिणाम होतो. दिसायला भाग अलग, पण एकावरचा आघात दुसऱ्यावरही होतो. आत्मा अविभाज्य आहे, अखंड आहे. ही अखंडतेची कल्पना जीवनांत फार आवश्यक असते. आपले प्रत्येकाचे संसार पृथक् आहेत. परंतु सर्वांचा मिळून एक विराट संसार आहे. आपण सर्वांच्या सामुदायिक अखंड संसाराची आठवण ठेवली नाहीं, केवळ अलग संसारांतच रमलों म्हणून तर आज दास्यांत आहोंत. कला, ज्ञान व नीति हीं अलग मानून अखंडहि माना. तरच मेळ राहील. कलेची नीति मोलकरीण नाहीं, त्या

बहिणी वहिणी आहेत. कोणी क्षुद्र नाहीं, कोणी श्रेष्ठ नाहीं. त्यांची एक-वाक्यता आहे. ”

—कॉंग्रेस–अमळनेर

**चिरंजीव कला:**—ज्याप्रमाणें केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं,—कांहींतरी आकांक्षा, कर्तृत्व, प्रेरणा यांतून सुख मिळतें—त्याप्रमाणें कलेंतील आनंद होतो तो विरोधामुळें होतो. झगड्यांतून आनंद होतो. हा झगडा जेवढा उच्च भूमिकेवरून होईल तितका अधिक आनंद. मुंबईला मी गेलों. ही ट्रॅम घेऊं का ती असा जीवनांत झगडा उभा राहिला. त्यावर कोणीं गोष्ट लिहिली. क्षणभर मौज वाटेल. उदात्त, अक्षय आनंद त्यापासून मिळणार नाहीं. परंतु एकाद्याची आई व त्याची बायको यांचें भांडण होतें. बायको नवीन काळांतील, आई जुन्या काळांतील. दोघींबद्दल त्याला आपलेपणा वाटतो. त्यानें कोणाची बाजू घ्यावी ? कोणास टाकावें ? हा झगडा अधिक उदात्त आहे. आणि प्रभु रामचंद्राचा झगडा ? सीता सर्वस्वी निरपराध आहे, अशी रामाची खात्री, परंतु कोणी प्रजाजन निराळें म्हण-तात. केवढा झगडा ! झगडा जितका महत्त्वाचा, तितकी ती कलाकृति अधिक चिरंजीव व थोर होते.

—कांग्रेस–अमळनेर

**प्रश्नांचें महत्त्व:**—“ वाचन हें ज्ञानाचें पहिलें साधन झालें. दुसरें साधन म्हणजे प्रश्न विचारले पाहिजेत. मी विद्यार्थी असतांना फार प्रश्न विचारीत असें. मी उत्तरेंहि देत असें. उत्तरें चुकतात, मुलें फसतात. परंतु आपलें अज्ञानहि कळून येतें. उत्तरें चुकायचींच. कधीं कधीं मी असे प्रश्न विचारीत असें कीं मास्तर हंसत. माझ्या शंकांचीं उत्तरें देणें त्यांना बरें वाटत नसे. मग ‘ गुरोस्तु मौनं व्याख्यानम् ’ असें व्हायचें. पुष्कळ मुलें प्रश्न विचारायला लाजतात. मुलींचें तर विचारूंच नका ! लाजून कसें होणार ? विचारावें. कारण आजचें समजलें नाहीं, तर उद्याचें कसें समजणार ? मी कॉलेजमध्यें होतों. प्रो. बेन यांना गंभीरपणें प्रश्न विचारला. ते हसले व निघून गेले. मागून माझा प्रश्न वेडेपणाचा होता मला कळलें. प्रो. सेल्बी फारच कर्तव्यपरायण. प्रश्न विचारून त्यांना मी भंडवायचा. ते घरीं गेल्यावर माझे सर्व प्रश्न लिहून काढीत व त्यांचीं उत्तरें लिहून मला देत. मला लाज वाटे, आपण यांना किती त्रास देतों ! परंतु त्यांचा आनंद होता तो. खऱ्या शिक्षकास प्रश्नांचा कंटाळा येत नाहीं......सारांश, प्रश्न विचारीत जा. मास्तर जर म्हणाले

"तुला कांहीं कळत नाहीं" तर सांगा 'कळत नाहीं, म्हणून तर शाळेंत येतों. कळतें तर येथें येण्याची जरूर काय ?' भगवान श्रीकृष्णानें सुद्धां ज्ञान मिळविण्या-साठीं 'परिप्रश्नेन सेवया' असे मार्ग सांगितले. अर्जुनानें प्रश्न विचारून पिच्छा पुरविला त्याचा. परंतु कृष्ण रागावला नाहीं. 'प्रज्ञावादांश्च भाषसे' अशी आरंभीं जरा गंमत केलीन्. परंतु पुढें सर्व शंका उत्कृष्टपणें त्यानें दूर केल्या."

**बिकट भविष्यः**—आतां तुमच्या समोरच्या बिकट भविष्यासंबंधीं सांगतों. जुनी व नवी पिढी यांच्यांत विसंगति आहे. जुन्या कल्पना व नव्या कल्पना यांच्यांत विरोध येतो. सामाजिक, राजकीय अशा अनेक प्रश्नांत तुमचे व वडील मंडळींचे मतभेद होतात. तुमचीं मतें सोडा असें नाहीं मी म्हणत. तुम्ही तुमच्याच डोळ्यांनीं पहा; तुमच्याच कानांनीं ऐका. आपल्या बुद्धीनें प्रत्येकानें चालावें. परंतु मोठीं माणसें, वडील माणसें काय म्हणतात तें ऐकावें. ऐकायला काय जातें ? शेवटीं कृति करायची वेळ येईल तेव्हां स्वतःच्या बुद्धीप्रमाणें वागावें. आज तुम्हीं सर्वांचें ऐकून घ्यावयाचें. नाना मतें ऐकावीं. विरुद्ध पक्षाचें तर आधीं ऐकावें. आज एकदम कृति करूं लागूं नका. ज्या वेळेस जीवनाची सर्व जबाबदारी स्वतःवर घ्याल त्या वेळेस स्वतःच्या विचाराप्रमाणें वागा. मी जेव्हां थोडें राजकारण करीत होतों तेव्हां टाइम्स आधीं वाचीत असें. एक आयरिश पुढारी म्हणत असे 'आमचें धोरण ठरलेलें आहे. सरकारच्या विरुद्ध' टाइम्सच्या विरुद्ध, असें आम्ही म्हणत असूं. परंतु टाइम्स काय म्हणतो, आपल्या काय चुका दाखवितो, त्यांना उत्तरें देतां येतील कीं नाहीं हें मी पहात असें.

सारांश, आज एकदम मनांत येईल तसें वागूं नका. पुढें विरोध येणारच आहेत. आईबापांशीं भांडावें लागेल, पण त्यावेळीं आपलीं मतें निश्चित असतील. जीवनांत ज्यांचेबद्दल आपणांस प्रेम व आदर वाटतात त्यांच्याशीं झगडण्याची वेळ येते. मोठा उद्वेगजनक प्रकार असतो हा. अर्जुनाला भीष्मांवर गुरुद्रोणांवर बाण सोडावे लागतात, काय हा प्रसंग ! खरी ट्रॅजिडी–शोकान्त प्रकार आहे हा ! ज्या पुढाऱ्यांबद्दल, नेत्यांबद्दल, आपल्यास अलोट आदर व प्रेम त्यांच्या विरुद्ध जावें लागतें. बाप हिंदुमहासभावाला, मुलगा काँग्रेसवाला, बाप काँग्रेसवाला, मुलगा कम्यूनिस्ट असे हे प्रकार होतात. परंतु असल्या प्रकारांनीं भिऊन जायचें नाहीं. मग तसें वागा-यचें. परंतु आजच नका गर्दी करूं. मीहि माझ्या वडिलांच्या विरुद्ध वागलों, सर-

कारी नोकरी धरली नाहीं. परंतु जबाबदारी अंगावर घेऊन मग वागलों. तसें पुढें वागणें अपरिहार्य होतें.

**स्त्रीशिक्षणाचें ध्येय:**—स्त्रियांचे कांहीं जन्मजात देहधर्म, मनोधर्म नित्य आहेत, ते कदापि बदलायचे नाहींत, आणि त्यांचीं कांहीं कुटुंबकार्यें, आणि समाज-कार्यें आहेत. तीं पुष्कळ वर्षें त्यांच्याकडेच राहणार आहेत. तेव्हां या गोष्टीकडे दुर्लक्ष न करतां त्यांचा शिक्षणक्रम आंखावा.

पण लगेच असा विचार येतो कीं स्त्रिया काय किंवा पुरुष काय, मनुष्यच ना? मनुष्य नात्यानें त्यांचेमध्यें सामान्यत्व आहे; तेव्हां मनुष्याच्या शिक्षणाचें ध्येय, शक्य तेवढा चांगला मनुष्य करणें, त्यामध्यें शक्य तेवढी माणुसकी आणणें, हेंच जर आहे तर स्त्रिया आणि पुरुष यांच्या शिक्षणामध्यें सामान्यत्वहि पुष्कळ असणार! स्त्री–पुरुष यांमध्यें भिन्नत्व आहे त्यापेक्षां उभयसामान्य गुणधर्म अधिक आहेत, या अत्यन्त महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून उभयतांमधील अल्पभिन्नत्वावर भर देणें सयुक्तिक आहे काय?

स्त्रियांना मनुष्य नाहीं असें कोणी म्हणत नाहीं. तेव्हां मनुष्याच्या सर्व सत्प्रवृत्तींचा, सर्व सद्गुणांचा आणि सर्व सामर्थ्यांचा विकास करणें, हेंच पुरुषांच्या-प्रमाणें स्त्रियांच्याहि शिक्षणाचें ध्येय असलें पाहिजे. मनुष्यमात्रामध्यें जिज्ञासा प्रवृत्ति आहे, तेव्हां पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचीहि जिज्ञासातृप्ति झालीच पाहिजे. मनुष्यमात्रामध्यें सुखलालसा आहे, तेव्हां पुरुषांना ज्याप्रमाणें सर्व सात्त्विक सुखांचा उपभोग घेतां येईल असें आपण शिक्षण देतों त्याप्रमाणेंच स्त्रियां-नाहि दिलें पाहिजे. मनुष्यमात्रामध्यें सौंदर्यप्रियता आहे, तेव्हां पुरुषांची सौंदर्याभिरुचि सुसंस्कृत करण्याचा आपण जसा प्रयत्न करतों, तसा स्त्रियांच्या बाबतींतहि केला पाहिजे. मनुष्यमात्राला सौंदर्यनिर्मितीमध्यें, कलाविलासामध्यें, आणि कलोपभोगामध्यें अलौकिक आनंद प्राप्त होतो; तेव्हां स्त्रियांना अशा प्रकारचे आनंद उपभोगतां येतील असें शिक्षण पुरुषांप्रमाणेंच द्यावयास नको काय? का त्या मनुष्यच नाहींत?

याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, मुलांमुलींचें शिक्षण शंभर टक्के एकाच साच्याचें आणि एकाच ठशाचें असावें. 'तरतम भाव,' 'सापेक्ष महत्त्व,' 'स्वभावानुरूपता' वगैरे कांहीं पदार्थ आपण मानले तर माझ्या म्हणण्यांत कांहीं विसंगतता दिसणार

नाहीं. स्त्रियांचे देहधर्म, त्यांच्यापैकीं बऱ्याच जणींना मिळणारें कुटुंबांतलें काम आणि स्थान, त्यांचे स्वाभाविक मनोधर्म, इत्यादिकांचा विचार करतां ठाकरसी विद्यापीठानें आंखलेला अभ्यासक्रम स्त्रियांना बराच उपयुक्त होईल असें मला वाटतें. आरोग्यशास्त्र, रोगशास्त्र, औषधिशास्त्र, रुग्णसेवाकला, यांचा अधिक समावेश व्हावा ही त्यांत मी एक सुधारणा सुचवीन. बाकी एकंदरींत मला तो बरा वाटतो.

तत्त्वदृष्ट्या पहावयाचें म्हणजे एवढें निश्चित म्हणतां येईल कीं मुलगे आणि मुली यांचे शिक्षणांत फरक करावयाचा तो कोणत्या विषयांना कोणच्या बाबतींत किती महत्त्व द्यावयाचें या मुद्यावर करावा लागेल, थोडक्यांत सांगायचें म्हणजे उभयतांच्या शिक्षणांत फरक जो होईल तो 'प्रमाणा'चा होईल, 'प्रकारा'चा होणार नाहीं."

—*मालवण-महिला* शिक्षण मंडळाचा खास अंक १९३९.

**'मराठी' माध्यमः**—"मराठींतून विषय शिकविल्यामुळें समजण्यास सोपे पडतील व वेळ वांचेल या म्हणण्यासंबंधीं विचार करायचा. वेळ थोडा वांचेल हें खरें. पण जितका कांहीं लोकांना वाटतो तेवढा वांचणार नाहीं. उदाहरणार्थ, गणित मुलांना मराठींत सांगितलें म्हणून तें सोडवितांना सोपें पडेल असें नाहीं, शिकवितांना थोडें सोपें पडेल, पण अशा ठिकाणीं मुख्य अडचण भाषेची नसते, तर तें गणित सोडविण्याच्या बाबतींत आवश्यक असलेल्या कल्पना डोक्यांत येण्याची व शिरण्याची ती असते. मराठीच्या द्वारें विषय शिकणाऱ्याला व शिकवणाऱ्याला वेळ थोडा लागतो, या मुद्यावर मी भर देत नाहीं. मराठींतून शिकवणारा त्या विषयांत तन्मय होऊं शकतो, त्याला भाषेकडे लक्ष द्यावें लागत नाहीं, तो तज्ज्ञ व रसिक असल्यास विषय शिकवितांना त्याला आनंद होऊं शकतो, व हा आनंद मुलांमध्येंहि संक्रांत होतो म्हणून मला मराठींतून शिक्षण हवें, वेळ थोडा लागतो म्हणून नव्हे."

"मराठींतून शिकवल्यामुळें सापेक्षतः इंग्रजी कच्चें राहील हें मीं कबूल केलें, पण याचा अर्थ तें कच्चें राहीलच असा नाहीं. इंग्रजी जर चांगलें पाहिजे असलें तर इंग्रजी शिकवणारे अधिक चांगले मास्तर नेमावे व शिकवण्याच्या पद्धतींत सुधारणा करावी. इंग्रजी चांगलें व्हावें म्हणून सर्व विषय इंग्रजींतून शिकवण्याचा आग्रह

धरणें म्हणजे त्या त्या विषयाकरितां तो तो विषय शिकवायचा असें नाहीं तर इंग्रजीकरितां शिकवायचा असा थोडासा अर्थ होतो. पण ही गोष्ट केव्हांहि इष्ट नाहीं. ”

शेवटीं मला स्पष्टपणें असें म्हणावयाचें आहे कीं, इंग्रजी थोडेंसें कच्चें राहिलें म्हणून घाबरून जाण्याचें कारण काय ? इंग्रजींत चांगलीं पुस्तकें आहेत, व सध्यांच्या काळीं इंग्रजी आवश्यक आहे हें कबूल. पण इंग्रजीचें स्तोम माजविण्यांत अर्थ काय ? इंग्रजीची येवढी कांहीं योग्यता नाहीं कीं इतर विषय शिकतांना ( किंवा शिकवितांना ) मुलांना किंवा ( शिक्षकांना ) आनंद झाला नाहीं तरी चालेल, ते त्यांत रममाण झाले नाहींत तरी चालेल, त्यांना त्यांचा नाद नाहीं लागला तरी चालेल, पण इंग्रजी चांगलें व्हावें म्हणून ते त्यांनीं इंग्रजींतून शिकले पाहिजेत ! इंग्रजी आम्हांस पाहिजे आहे, पण तें आमच्या कामापुरतें असलें म्हणजे बस् झालें. अधिक चांगलें असलें तर नको आहे, असें नाहीं, पण अधिक चांगलें व्हावें म्हणून दुसऱ्या इष्ट गोष्टींचा होम तिच्याप्रीत्यर्थ करण्यास आम्ही तयार नाहीं. ”

“ फार काय ! ‘ मराठी ’ करितांहि असला होम कोणींहि करूं नये. मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी म्हणून इतर विषय मराठींतून शिकवायचे हें म्हणणें खोटें आहे. इतर विषय जे शिकवायचे ते त्यांच्या त्यांच्या उपयुक्ततेकरितां–मराठी भाषा सुधारावी म्हणून नव्हे.

—*वि. वृ. खास अंक १९२९*

**महिला विद्यापीठाचा अभ्यासक्रमः**—महिला विद्यापीठाचा पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम एकंदर तीन वर्षांचा तर मुंबई विद्यापीठाचा चार वर्षांचा. तथापि समाप्तविद्य झालेल्या विद्यार्थिनी पदवीधर या नात्यानें समान योग्यतेच्याच गणल्या जात. निदान महिला विद्यापीठाच्या पदवीधरांची तरी मुंबई पदवीधरांशीं बरोबरी करण्याची इच्छा खरी. स्वतःच्या पदवीधरांना सरकारनें मुंबई विद्यापीठाच्या पदवी-धरांबरोबरीनें लेखावें ही महिला विद्यापीठाची खटपटहि पुढें सरकारमान्य झालीच. परंतु लोकांत मात्र थोडीशी असमानतेची मळमळ असेच. एकादे वेळीं बोलणें निघालें म्हणजे स्वतः वामनरावहि आपलें खरें मत उघड बोलून दाखवित. तसें पाहिलें तर वामनराव महिला विद्यापीठाचे कार्यकर्ते व पोटांतून आपल्या विद्यार्थिनींचे चहाते. परंतु त्यांचा सत्यान्वेषी व तर्कवादी स्वभाव त्यांना उघड पक्षपात करूं देत नसे. ते म्हणत “ गुणांची बरोबरी हें ठीक आहे, पण अभ्यासक्रम सारखाच कसा

होऊं शकेल ? आमचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा, त्यांचा चार वर्षांचा; त्याची बरोबरी कशी होणार ? *Three can never be equal to four* " शेवटल्या इंग्रजी वाक्यानें व तीन म्हणजे चार नव्हे या गणिती कोटिक्रमानें आपण आपली बाजू बिनतोड मांडिली असेंच त्यांना वाटत असल्याचें त्यांच्या चेहऱ्यावरून त्यावेळीं दिसून येई.

—*स. वि. देशपांडे*

**सहशिक्षणः—** सहशिक्षणासंबंधींहि वामनरावांचें मत असेंच चमत्कारिक वाटण्यासारखें होतें. स्त्रियांच्या स्वतंत्र अभ्यासक्रमाकरितां निर्माण झालेल्या स्त्रीप्रधान संस्थेंत वामनराव जरी जातीनें काम करीत तरी त्यांच्या मनाचा ओढा स्त्रीपुरुषांच्या संमिश्र व्यवहाराकडेच असे. मुलें आणि मुली ह्यांच्या एकत्रित सहवासानें मुलांइतकाच मुलींच्याहि मनाचा विकास होऊं शकतो, त्यांचें विचारक्षेत्र वाढतें, बौद्धिक संकुचितपणा दूर होतो, असें त्यांना वाटे. आणि म्हणूनच स्त्रियांच्या स्वतंत्र शिक्षणसंस्थेपेक्षां एकत्रित शिक्षणाच्या संस्था त्यांना रुचत. मानसशास्त्राचा मूलग्राही अभ्यास व स्त्रियांच्या स्वभावाचा निकट परिचयाचा अनुभव ह्यामुळेंहि कदाचित् वामनरावांचें असें मत बनलें असेल. परंतु स्वभाव व स्वत्व ह्याला पारखें करणारें सहशिक्षण येरवीं तात्त्विकपणें कितीहि विकासकारक असलें तरी त्याच्या अपूर्णतेनें सध्यांतरी तें अनुपयोगी आहे असें समजून वामनराव कृतीनें आपलें विभक्त शिक्षणाचें कार्य अविरत चालूं ठेवीत.

—*स. वि. देशपांडे*

**पाठ्य पुस्तकें:—**मराठी अभ्यासक्रमांत पाठ्य पुस्तकें लावण्यासंबंधीं प्रश्न निघाला कीं निरनिराळ्या परीक्षांकरितां वामनराव अनेक ग्रंथ अभ्यासाकरितां लावीत; त्या सर्व ग्रंथांची यादी अर्थातच मोठी लांबट होई. अथांग सागरांत डुंबूं शकणाराला गांवच्या तळ्यांत पोहणें जसें कांहींच वाटत नाहीं तसें विद्वान व व्यासंगी वामनरावांना दोनचार ग्रंथ कमी अधिक म्हणजे कांहींच वाटत नसे, हें ठीकच आहे. परंतु परीक्षा देणारा उमेदवार म्हणजे पाण्यांत पायहि न टाकलेल्या घाबरट जीवाप्रमाणें—तो नुसत्या कल्पनेनेंहि दबून जाई. वामनरावांच्या निदर्शनास ही गोष्ट आणली तरी ते म्हणत, " ह्या गोष्टीची जाणीव मलाहि आहेच. दरवर्षी थोडीं थोडीं पुस्तकें आम्ही कमी करीत आहोंच. परंतु पुस्तकेंच लावलेलीं असलीं

म्हणजे तेवढीं तरी डोळ्याखालून जातील. " पाठ्य पुस्तकांव्यतिरिक्त इतर ग्रंथांना न दुखविणाऱ्या विद्यार्थिनींच्या दृष्टीनें वामनरावांचें करणें योग्यच ठरेल.

—स. वि. देशपांडे

**स्त्रिया आणि सामाजिक कार्यः**—उच्चतम विचारसरणी किंवा भूमिका न स्वीकारतां नववधूंच्या अगदीं आकुंचित स्वार्थाच्या आणि सुखाच्या दृष्टीनेंच त्यांना एक गोष्ट सांगावीशी वाटते. इंग्रजी भाषेंतल्या एका विनोदी नियतकालिकांत एका आजोबानें एका नववधूला आशीर्वाद देतांना उपदेश केला कीं, '*Feed the brute.*' नवरा हा पशू आहे, त्याला खायला प्यायला चांगलं घाल. हा आजोबांचा उपदेश दिसण्यांत अगदीं खालच्या भूमिकेवरचा वाटेल. पण त्यांत पुष्कळ अर्थ आहे. सुशिक्षित नव तरुणींना त्यांतील मर्म कळावयाचें नाहीं. पण आजोबांचा हा उपदेश अनुभवावर आधारलेला आहे हें त्यांनीं ध्यानांत धरावें. नवरे पशू नाहींत हें खरें. त्यांना ध्येयें असतात, त्यांना उच्च प्रेम समजतें, त्यांच्यामध्यें सात्त्विक वृत्ति असते, बायका स्वैंपाकिणी अशी त्यांची वृत्ति मुळींच नसते हें सगळें खरें. पण हीहि गोष्ट खरी कीं, खायला–प्यायला चांगलं मिळालं नाहीं, घरांत अस्वच्छता असली, घरीं आल्यावर शारीरिक अस्वास्थ्य उत्पन्न होईल अशी परिस्थिति असली, तर सात्त्विक वृत्तीचे आणि थोर मनाचे पुरुषहि उगीचच्या उगीच पुष्कळ वेळा चिडखोरपणा करतात, आणि स्वतः संयमन करून त्यांनीं चिडखोरपणा बाहेर दाखविला नाहीं तरी किंबहुना मनांतील अस्वस्थता दाबावी लागल्यामुळेंच त्यांच्या बोलण्याचालण्यांतला मोकळेपणा कमी होतो, आणि त्यांतलें घरगुती काव्य कमी होऊं लागतें. घरांतल्या घरांत संकोच आणि एक प्रकारचा दूरपणा उत्पन्न होतो आणि त्याचा शेवट पुष्कळ वेळां घोर प्रकारांत होतो. पतिराजांना खूष ठेवण्याची ही गोष्ट क्षुल्लक वाटेल, पण ती तशी नाहीं हें अनुभवानें सांगतों. या क्षुल्लक भासणाऱ्या गोष्टीकडे कांहीं नववधूंचें दुर्लक्ष होतें असें दिसून येतें म्हणून हें सांगण्याची पाळी आमच्यासारख्यावर येते."

"आतां जरा उच्च भूमिकेवरून विवाहित स्त्रियांच्या सामाजिक कार्याविषयींचीं माझीं मतें सांगतों. अगदीं खरं बोलायचं म्हणजे विवाहित स्त्रियांनीं आधीं घर आणि मग समाज ही वृत्ति सामान्यतः स्वीकारावी, असं माझं मत आहे. पण आर्थिक परिस्थिति अनुकूल असली, आणि पतीची अनुकूलता असली तर स्त्रियांनीं

सामाजिक कार्यें करण्यास हरकत नाहीं. पतीची अनुकूलता असली तर, ही अट मात्र पुन्हां उच्चारून तिला महत्त्व द्यावेंसें वाटतें. पति प्रतिकूल असला तर सामाजिक कार्याच्या फंदांत सामान्यतः विवाहित स्त्रियांनीं पडूं नये असं मी म्हणेन. कारण, कांहीं जरी म्हटलं तरी, पतिप्रेमाशिवाय आणि गृहसौख्याशिवाय विवाहित स्त्रियांचें जीवन सामान्यतः रसशून्य होतें यांत मला तरी शंका नाहीं. पतीच्या इच्छेविरुद्ध सामाजिक कार्यें करूं पाहणाऱ्या एका सुशिक्षित स्त्रीचें जीवन कसें शोकान्तक झालें हें नागपूरच्या माडखोलकरांनीं 'भंगलेलें देऊळ' या सुंदर कादंबरींत दाखविलें आहे तें वाचण्यासारखें आहे."

"आर्थिक अनुकूलता असेल आणि घरचा विरोध नसेल अशा सुशिक्षित स्त्रियांनीं स्त्रीशिक्षण, गुन्हेगार स्त्रियांचा उद्धार, मजूर स्त्रियांची स्थिति सुधारणें, कायद्याच्या दृष्टीनें स्त्रियांची स्थिति सुधारणें वगैरेसारखीं सार्वजनिक कार्यें अवश्य केलीं पाहिजेत. पण अशा प्रकारच्या सामाजिक कार्यांपेक्षां दुसऱ्या प्रकारचें एक सामाजिक कार्य आहे तें अधिक महत्त्वाचें आहे, आणि तें सर्व सुशिक्षित स्त्रियांना, श्रीमंतांना, आणि गरिबांनाहि साधण्यासारखें आहे. तें करण्याकरितां घराबाहेर जायला नको, पतिराजांच्या परवानगीची वाट पहायला नको. तें म्हणजे उत्तम नवी पिढी निर्माण करणें. मुलें निरोगी, सुदृढ, सात्त्विक वृत्तीचीं, सद्गुणाचीं चहातीं, धाडसी, पराक्रमी झालीं पाहिजेत. त्यांच्यामध्यें धमक उत्पन्न झाली पाहिजे. देश म्हणून कांहीं पदार्थ आहे, याची त्यांना जाणीव उत्पन्न झाली पाहिजे. 'देश' असा शब्द मीं वापरला खरा, पण 'देशाभिमानाला' मी अलीकडे फारसें महत्त्व देत नाहीं. किंबहुना क्षुद्र देशाभिमानामुळें मनुष्य जातीची हानि होत चालली आहे, असें माझें मत होत चाललें आहे. देशांदेशांतील संशयी वृत्तीमुळें, भांडणामुळें, आणि चढाओढीमुळें मनुष्यजातीची हानि झाली आहे ती आतां पुरे झाली. आतां नवीन पिढी जी उत्पन्न व्हायची तिच्यामध्यें क्षुद्र जात्यभिमान, धर्माभिमान, किंवा देशाभिमानहि नको आहे. मनुष्य परक्या जातींतला, धर्मांतला किंवा देशांतला म्हणून तो परकी ही वृत्ति नष्ट होऊन जो नीतिदृष्ट्या वाईट तो परका, आणि जो नीतिदृष्ट्या चांगला तो आपला अशी वृत्ति बळावत चालली पाहिजे. अशा प्रकारची वृत्ति लहानपणापासून शिक्षण दिल्यानेंच उत्पन्न होऊं शकेल; आणि हें कार्य विवाहित स्त्रियांना जसें साधेल तसें इतरांना साधणार नाहीं."

"ज्या विवाहित स्त्रियांना प्रत्यक्ष समाजकार्य करावयाचें असेल त्यांनीं आप-

त्याला घरीं डांबून घ्यावें असें मला सुचवायचें नाहीं. ज्यांच्यामध्यें तेवढी बुद्धिमत्ता आणि तितकी आवड असेल त्यांनीं (पति आणि आर्थिक परिस्थिति अनुकूल असल्यास) गृहकृत्याकडे थोडेंसें दुर्लक्ष करूनहि प्रत्यक्ष समाजकार्य करावें; त्यांत कांहीं एक गैर नाहीं. पतीची अनुकूलता नसतांहि त्यांनीं प्रत्यक्ष समाजकार्य करण्यासहि माझी हरकत नाहीं. पण केव्हां—तर तेवढी प्रबळ अंतःप्रेरणा असली तर. ‘ तेवढी प्रबळ अंतःप्रेरणा ’ म्हणजे काय—तर पतीची मर्जी खप्पा झाली, गृहसौख्य नष्ट झालें, मुलाबाळांची हेळसांड आणि ताटातूट झाली तरी देखील प्रत्यक्ष समाज-कार्य केलेंच पाहिजे, असें जिला वाटत असेल, आणि ही एवढी किंमत देण्याची जिची तयारी असेल, आणि पुन्हां ही किंमत देण्यामध्यें आपण कांहीं चुकत आहोंत असें मनःशल्य जिला बोचत नसेल, तिला प्रत्यक्ष समाजकार्य करण्याची तेवढी अंतःप्रेरणा आहे असें मी मानीन. एवढी मोठी किंमत देण्याची ज्यांची तयारी नसेल, त्यांनीं मात्र गृहकृत्यें सांभाळून जेवढें समाजकार्य करतां येईल तेवढें कार्य करण्यांत समाधान मानावें असें मला म्हणावयाचें आहे. ज्यांना गृहप्रेमापेक्षां, पतिप्रेमापेक्षां, अपत्यप्रेमापेक्षांहि समाजकार्यप्रेम अधिक महत्त्वाचें वाटत असेल, ज्यांना तें आपलें अवतारकार्य आहे असें वाटत असेल त्यांनीं अवश्य आपल्या अंतःप्रेरणेप्रमाणें वागावें. इतरांनीं मात्र त्या फंदांत पडूं नये, एवढें मला सुचवा-वयाचें आहे, अधिक कांहीं नाहीं. ”

—*विचारलहरी*

**भावी राजकारणः**—“ हिंदुस्थानांतील राजकारणासंबंधीं बोलावयाचें म्हणजे मला आपलें असें वाटतें कीं गांधीयुगाच्या उपयुक्ततेचा काल संपत आला आहे. पुढील निवडणुकीचा लढा ते जिंकतील, आणि जनहिताचीं कामें कॉंग्रेसकडून केलीं जातील. पण ढोंगबाजी आणि असहिष्णुता हीं वाढतील आणि गांधीवादाला पुष्कळशी कलाटणी मिळाली नाहीं तर तो १०–२० वर्षांत अधोगतीला जाईल, असें वाटतें. हिंदु-मुसलमान प्रश्न लवकरच सुटेल असें नाहीं. पण मुसलमानांचा चढेलपणा उतरून २०–२५ वर्षांत कांहीं तरी उभयपक्षांना संमत असा मार्ग निघेल अशी मला आशा आहे. हिंदुस्थानांतल्या राजकारणावर साम्यवादाचा पगडा अधिकाधिक बसेल हें उघड दिसतें आणि तें हितकरहि आहे. पण रशियामध्यें स्टॅलिनचा कारभार पाहून सद्यःकालीन स्टॅलिन-छाप रशियन् साम्यवाद कितपत हितकर होईल, याबद्दल शंका आणि भीति वाटते. तत्त्वें पुष्कळ चांगलीं असतात,

पण मनुष्यस्वभाव बदलणें कठीण असतें, आणि उच्च तत्त्वांची अंमलबजावणी करतांना नीचवृत्तींना देखील वाव मिळतो, हें मला विसरतां येत नाहीं. पण लगेच माझा आशावाद मला सांगतो कीं, मनुष्यस्वभावांतील लोभादि सहजविशेष यांत देखील परिस्थितीनें बदल होऊं शकेल, आणि पुष्कळ कालानंतर साम्यवादी लोकांचें स्वप्न सत्यसृष्टींत उतरूं शकेल—पूर्णतेनें नाहीं तरी बरेचसें उतरूं शकेल, अशी मला आशा आहे. ''

—*विचारलहरी*

**समाजकारणः**—समाजकारणासंबंधीं बोलतांना प्रथम मागासलेल्या आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांची स्थिति लवकरच सुधारेल असें मला दिसतें. ऐतखाऊ मध्यम वर्ग खालावेल, पण त्यांत वाईट काय आहे ? कांहीं नाहीं. पण आहे, थोडेंसें वाईट आहे. उच्च अर्थाची जी संस्कृति तिचें रक्षण आणि वर्धन करण्यास फुरसत असलेला एक वर्ग लागतो. हा वर्ग साम्यवादी समाजांत उत्पन्न होणें अशक्य नाहीं, पण त्याची सोय होऊं शकली नाहीं, आणि स्टॅलिनछाप साम्यवाद प्रबल झाला तर उच्च संस्कृतीला आपण कदाचित् मुकूं अशी भीति वाटते.

स्त्रियांच्या सुखांत आणि दुःखांतहि पुढें भर पडणार नाहीं. विवाह होणें कांहीं काळपर्यन्त तरी कठीण होत जाणार, पण त्यांतूनहि मार्ग निघूं शकेल. शिक्षणाबरोबर, ज्ञानाबरोबर आणि समान हक्कांच्या प्राप्तीबरोबर, त्यांच्या जबाबदाऱ्याहि वाढतील. आणि दुःखेंहि वाढतील. पण सुख होईल तें उच्च दर्जाचें होईल, आणि दुःखेंहि उच्च दर्जाचीं होतील.

—*विचारलहरी*

**नीति-अनीतिः**—" लौकिक धर्मभेदच नव्हे, तर नीतिविषयक कल्पनांतील व आचारांतील भेदांनाहि मी विशेष महत्त्व देत नाहीं. स्त्री-पुरुष आपापल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें नीतीनें वागत आहेत कीं नाहीं या प्रश्नालाच मी महत्त्व देतों. उदाहरण घेऊन बोलावयाचें म्हणजे मांस खाणें निषिद्ध व अविहित असें वाटत असून जो मांस खाईल तो पापी. मांस भक्षणामध्यें पापपुण्याचा कांहीं संबंध नाहीं, असें ज्याला प्रामाणिकपणें वाटत असेल त्यानें मांस खाल्लें असतां त्याला मुळींच पाप लागत नाहीं असें मी मानतों. अशनपानादि क्षुल्लक गोष्टीबद्दलच नव्हे तर संतति-नियमन, घटस्फोट, पुनर्विवाह, इत्यादींसंबंधीं माझ्या विचाराचें असेंच

धोरण आहे. एतद्विषयक कल्पना व आचार यांमध्यें देशभेद, कालभेद, परिस्थितिभेद, ज्ञानभेद इत्यादिकांमुळें फरक होत असतो हें धादांत स्पष्ट आहे. यांतील नीतिमत्त्व व अनीतिमत्त्व कालस्थलपरिस्थितिसापेक्ष आहे; व अमुक एक कल्पना किंवा आचार नित्यत्वानें व कालस्थलपरिस्थिति–निरपेक्षतेनें सत् किंवा असत् ठरविणें चुकीचें आहे हें नीतिशास्त्रज्ञांना व समाजशास्त्रज्ञांना माहीत आहे. ”

*—विचारलहरी*

**जीवनाकडे पाहण्याची दृष्टिः**—“ माझेवर जरी अनेक दुःसह प्रसंग आले असले तरी माझा एकंदर जगाचा अनुभव कटु नाहीं. जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ति ओढवतात, व तंटेबखेडे उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच, दुष्टपणा पण आहे. परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे, व मला अशी आशा आहे कीं पांच हजार, दहा हजार वर्षांनीं म्हणा किंवा लाख वर्षांनीं म्हणा असा एक दिवस येईल कीं जेव्हां सर्वांना खाण्यापिण्यास पोटभर मिळेल. प्रत्येकाला राहण्यास घर मिळेल. क्षुल्लक तंटेबखेडे पुष्कळ कमी होतील. समाजांतील कृत्रिम भेद व त्यांमुळें उत्पन्न होणारीं वैरें व युद्धें बंद होतील. ज्ञान व ज्ञानाची आवड तसेंच कला व कलेची आवड हीं वृद्धिंगत होतील आणि खऱ्या नीतीचीं आणि धर्माचीं तत्त्वें सहाजिकपणेंच लोकांना इतकीं प्रिय व आदरणीय होतील कीं त्यांचे अंमलबजावणीकरितां कृत्रिम निर्बंधांची, निषेधांची, कायद्यांची, व तुरुंगाची आवश्यकता फारशी राहणार नाहीं. ”

*—विचारलहरी*

## जीवनाचा उपसंहार व संदेश

## १२

१९४३ च्या जानेवारींत वामनरावांच्या वयाला साठ वर्षें पुरीं होऊन त्यांना ६१ वें वर्ष लागलें. त्यांच्या चहात्यांचा वर्ग मोठा असल्यामुळें त्यांचा ६१ वा वाढदिवस मुंबई, पुणें, कोल्हापूर, सांगली, नगर, वगैरे अनेक ठिकाणीं मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं आपल्या अतृप्त इच्छा प्रकट करतांना ते म्हणाले कीं, संशोधनात्मक वाङ्मय निर्माण करण्याची माझी इच्छा अद्याप अतृप्त आहे. यापुढें वेळ मिळाल्यास त्या दिशेनें मी प्रयत्न करणार आहें; पण असल्या सर्व आकांक्षांना पूर्ण होण्यास वावच मिळाला नाहीं; कारण या समारंभानंतर वामनरावांचें इहलोकींचें वास्तव्य पुरें वर्षभर देखील टिकलें नाहीं.

बाहेरच्या जगांत वामनरावांची कीर्ति दुमदुमत असली तरी कॉलेजांतील त्यांच्या कांहीं सहकाऱ्यांकडून मात्र दुर्दैवानें योग्य तें सहकार्य त्यांना मिळूं शकलें नाहीं. शेवटच्या वर्षीं कॉलेजच्या मुख्याध्यापकाचें मानाचें पद वामनरावांना देण्यांत आलें. पण तें मानाचें ठरण्याऐवजीं काटेरी जोखमीचेंच ठरलें. या काटेरीपणाची जाणीव त्यांच्या एका सहकाऱ्यानें वामनराव प्रिन्सिपलच्या जागेवर आरूढ होऊन महिनाहि झाला नसेल तोंच करून दिली. प्रिन्सिपल या नात्यानें वामनरावांनीं सुचविलेल्या योजना आपण ओळखत नाहीं, अशा आशयाचें एक पत्र त्यानें वामनरावांकडे

घाडलें. सामान्यतः सर्वांना गम्य करणारे वामनरावहि या प्रकारानें चिडले व सहकाऱ्यानें आपल्या कृत्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केल्याशिवाय आपण प्रिन्सिपलचें काम करूं शकत नाहीं, असें त्यांनीं विद्यापीठाकडे कळविलें. विद्यापीठानेंहि या गोष्टीचा योग्य तो विचार करून त्या गृहस्थांना दिलगिरी प्रदर्शित करण्यास भाग पाडलें व हें प्रकरण तेवढ्यापुरतें मिटलें.

पण याच सुमारास आणखीहि कांहीं अनिष्ट व विषादकारक प्रसंग घडले आणि त्यांचे योगानें वामनराव फारच व्यथित झाले. अशा या व्यथित मनःस्थितींत १९४३ च्या जुलैमध्यें आरंभींच ते विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभाकरितां व सिंडिकेटच्या सभेकरितां म्हणून मुंबईस जाण्यास निघाले ते वाटेंत गाडींतच बेशुद्ध होऊन पडले. ८।१५ दिवसांत दुखणें विकोपास गेलें. डॉक्टर वाड, भालेराव वगैरे त्यांच्या डॉक्टरमित्रांनीं उपायांची पराकाष्ठा केली; पण त्यांना यश न येतां ता. २० जुलै १९४३ मंगळवार रोजीं दुपारीं १॥ च्या सुमारास वामनरावांचें देहावसान झालें. शेवटच्या क्षणापर्यंत ते पूर्ण शुद्धींत होते. त्यापूर्वी पांचच मिनिटें त्यांनीं भोंवतालीं उभें असलेल्या मंडळीकडे पाहून शेवटचे उद्गार काढले कीं "एकंदरींत सर्व ठीक आहे." ते उद्गार खऱ्या समाधानाचे होते कीं मानीव समाधानाचे होते, हें कोण, कसें सांगूं शकणार! त्यांच्या मृत्यूची वार्ता टेलिफोननें मुंबईत व रेडिओद्वारां सबंध महाराष्ट्रभर हां हां म्हणतां पसरली. शाळा कॉलेजें ताबडतोब बंद झालीं व त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं विद्यार्थ्यांची व प्रौढांची रीघ लागून राहिली. दुसरे दिवशीं सकाळीं प्रेतयात्रा निघाली. तींत मुंबईतील सर्व साहित्यसेवक, वामनरावांचे सर्व आप्तइष्ट, त्यांचे स्नेही व चाहते वगैरे हजर होते. सर रघुनाथराव परांजपे, आचार्य अत्रे, वगैरेंनीं त्यांच्या गुणगौरवपर भाषणें केलीं. सर्व वर्तमानपत्रांनीं एकमुखानें लिहिलें कीं महाराष्ट्र सारस्वतांतील आणि सार्वजनिक जीवनांतील एक थोर व्यक्ति हरपली!

निमोनिया हें एक शेवटचें निमित्त झालें एवढेंच! खरें सांगावयाचें म्हणजे वामनरावांची प्रकृति फार दिवसांपासून खंगत चालली असून मनहि दिवसें दिवस विटत चाललें होतें. तें जरी पूर्वीसारखें निकोप आणि खंबीर राहिलें असतें, तरीसुद्धां वामनरावांनीं आपल्या खंगत चाललेल्या शरीराला इच्छाशक्तीचे जोरावर तसेंच दामटत नेलें असतें. वामनराव स्वभावानें कर्मयोग्यापेक्षां राजयोगीच अधिक होते. मदिरा अन् मदिराक्षि जवळ असल्या तरच काव्याला भरती यावयाची, अशी

उमर खय्यामाप्रमाणेंच जरी त्यांची वृत्ति नसली, तरी जेव्हां जेव्हां वामनराव सुखांत, आनंदांत व मनाच्या प्रसन्नावस्थेंत असत, तेव्हां तेव्हां, त्यांच्या लिहिण्यांत विशेष आनंद व प्रसाद उत्पन्न होत असत, असें दिसून येई. प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यासाठीं त्यांनीं कितीहि तात्त्विक विचार केला व विनोदाचा उपयोग करून तिच्यांतील कडवटपणा गोड तोंडानें चाखला, तरी शेवटीं परिस्थितीपुढें वामनरावांना हात टेकावे लागले, असेंच मोठ्या कष्टानें व दुःखानें कबूल करणें भाग आहे; उलट इतके दिवस तरी ते न डगमगतां तसेच तग धरून राहिले, हेंही कांहीं कमी अभिमानास्पद नाहीं. परिस्थितीच्या कचाट्यांतच बारीक सारीक धर्गीची व झळींची भर पडून एकंदर दुःख वाढतच चाललें. शरिरांत कायमचें ठाण मांडून बसलेल्या आव, मूळव्याध, अॅनिमिया, मलेरिया इत्यादि रोगांशीं झगडण्यांत वामनरावांच्या शक्तीचा व पैशाचा किती ऱ्हास होत होता व मनाचा पंगूपणा किती वाढत चालला होता, याची त्याची त्यांनाही कल्पना नसेल! शक्य ती काळजी घेऊनहि हे रोग बरे होत नाहींत असें पाहून वामनराव निराश आणि निष्काळजी बनत आणि त्या आवेगांत ते वाटेल तें कुपथ्य करावयाला तयार होत. कुपथ्य झालें, म्हणजे रोग चढाई करीत—अशी ही चक्रापत्ति निर्माण होई.

शारीरिक कळांप्रमाणेंच वामनरावांना कांहीं मानसिक टोचण्याहि हल्लीं हल्लीं विशेष त्रास देत. त्यांच्या साधेपणाला बावळटपणाचें रूप दिलें जाई. दीर्घ विचारीपणा हा मंत्रचळेपणा व कार्य–अक्षमता मानला जाई; मीमांसक वृत्तीला संशयात्म्याचें नांव मिळे; दुहेरी दृष्टी दुटप्पीपणाची गणली जाई; स्वभावाचा गोडवेपणा मनोदुर्बलता मानली जाई; सहानुभूति ही कमकुवतपणा समजली जाई; सौजन्याचा भीतीशीं संबंध जोडला जाई! अर्थात् असा गैरसमज करून घेणारे लोक संख्येनें थोडे असले तरी तेवढ्यांचाही त्रास वामनरावांना होई आणि अशा नरजंतूंची एका काळीं उपेक्षा व कींव करणारे वामनरावच आतां दुःखीकष्टी बनत! उत्तम व्यवस्थापक अशा पूर्वीच्या लौकिकाला थोडी थोडी ओहोटी लागूं लागली. (कारणें कांहीं का होवोत, व दोष कोणाचा का असो) आणि जिवाभावानें वाढविलेला वृक्ष पुढें पुढें जोमानें वाढण्याऐवजीं तो हळू हळू खुरटतच जातो कीं काय, अशीही भीति त्यांना भेडसावूं लागली. अर्थात् पराजितत्वाची ही वृत्ति वृथा असून ती फार काळ टिकली असती असेंहि नाहीं; पण ती वामनरावांचे मनांत उत्पन्न झाली व तिचा परिणाम घातुक झाला हें निश्चित.

लहानपणीं सत्यनारायणाची पोथी ऐकतांना ‘ या देवाला कोणी सत्य म्हणतात, कोणी काल म्हणतात, कोणी ईश म्हणतात ’ असें एक वाक्य नेहमीं कानावरून जाई. निरनिराळ्या भक्तांना एकाच देवाचीं जीं निरनिराळीं रूपें प्रतीत झालीं तीं व्यक्त करण्याकरितां म्हणून त्यांनीं हीं सर्व विशेषदर्शक नामें उपयोगांत आणलीं आहेत. वामनरावांच्या चहात्यांनीं व चरित्रकारांनींहि त्यांच्या जीवनाचें विहंगमावलोकन करून सार म्हणून त्यांचें निरनिराळ्या विशेषणांनीं वर्णन केलें आहे. तात्यासाहेब कोल्हटकरांनीं वामनरावांचें वर्णन ‘ खरा ज्ञानी पुरुष ’ या शब्दांनीं केलें असें माडखोलकर म्हणतात. तात्यासाहेबांनीं ‘ खरा ज्ञानी पुरुष ’ आणि ‘ खोटा ज्ञानी पुरुष ’ यांतील भेद मोठ्या मार्मिकतेनें सूचित केला असून वामनराव हे पहिल्या प्रकारचे ज्ञानी होत असें दर्शविलें आहे. ज्ञानाच्या ओझ्याखालीं वांकून गेलेले पुरुष पुष्कळ असतात, पण संपादिलेलें ज्ञान पटवून व पचवून घेऊन वृत्तींत व कृतींत उतरविणें हें जें खऱ्या ज्ञानी पुरुषालाच साधतें तें वामनरावांना साध्य झालें होतें आणि म्हणून वामनराव खरे ज्ञानी पुरुष असें तात्यासाहेबांना म्हणावयाचें असेल. वामनरावांना ज्ञानाची इतकी आवड आणि सत्याची इतकी तळमळ वाटत असे कीं—दुसऱ्या एका तत्त्वज्ञान्याच्या शब्दांत सांगायचें म्हणजे—सत्यासाठीं नरक पत्करावा लागला असता तरी सुद्धां त्यांनीं तो पत्करला असता.

बौद्धिक सत्याइतकीच नैतिक सत्यासंबंधींहि त्यांना तितकीच चाड असे. आपल्या ‘ स्मृति-लहरी ’च्या पहिल्या प्रकरणांत त्यांनीं धोंडोपंतांकडून पुढीलप्रमाणें वदविलें आहे:—“ मी एवढंच तंत्र सांभाळणार कीं आठवेल तसं सांगायचं, आणि लिहिण्याच्या पूर्वीं मंत्र एवढाच जपणार कीं, माझा मान सांगतांना विनयाचें वर वर सोंग घेण्याची जशी मला इच्छा होऊं नये, तशीच माझी फजिती सांगतांना लज्जेनें लपवालपवीहि मीं करूं नये. माझं वर्तन बरं असो किंवा वुरं असो, माझें हें लेखन खरें असावें ही माझी इच्छा आहे. हीच माझी कला, हेंच माझें सामर्थ्य आणि हीच माझी ( ईश्वर असला तर त्याचेजवळ ) विनंति. ” आपलं लिहिणं, बोलणं, वागणं—सर्व कांहीं—सत्याला धरून असावं असें धोंडोपंतांप्रमाणें वामनरावांनाहि वाटे. संयम, तितिक्षा, त्याग वगैरे खऱ्या ज्ञानी पुरुषाचीं दुसरींहि लक्षणें वामनरावांना पूर्णपणें लागू पडत. पण यासंबंधीं आणखी विस्तार नको.

स्वतः माडखोलकर वामनरावांना ‘ घरचे तत्त्वज्ञानी ’ ( *Family Philosopher* ) असें म्हणतात; आणि आपण दिलेली ही पदवी किती सार्थ व समर्पक

आहे हें पटवून देण्याकरितां म्हणून विचारतात "नैतिक किंवा शास्त्रीय प्रमेयांची चर्चा जो आपल्या सुबोध वाणीनें ललित लिखाणांत ग्रथित करून सामान्य वाचकांच्या आटोक्यांत आणून सोडतो त्याला जर मीं 'घरचा तत्त्वज्ञानी' म्हटलें तर तें समर्पक होणार नाहीं काय?"

ज्ञानेश्वरांनीं संस्कृतांतील 'गीता' आपल्या मायबोलींत उतरवून व आपल्या गोड उपमा–दृष्टान्तादिकांनीं तिच्यांतील कठीणपणा काढून टाकून सामान्य जनतेला उपलब्ध करून दिली. तत्त्वज्ञानाचे बाबतींत वामनरावांनींहि थोडें–फार तसेंच केलें म्हटलें तरी चालेल. संस्कृतांतील पौर्वात्य तत्त्वज्ञान व इंग्रजींतील पाश्चात्य तत्त्व-ज्ञान हीं दोन्हीं मराठींत आणून, त्यांत काव्यशास्त्र–विनोद यांची सुंदर भर घालून व वर कलेचें लेणें चढवून वामनरावांनीं तों तत्त्वज्ञानें सर्व प्रकारच्या व सर्व दर्जाच्या वाचकांच्या आटोक्यांत आणून दिलीं. महाराष्ट्रांतील बहुतेक सुशिक्षित कुटुंबांत वामनरावांची 'नीतिशास्त्रप्रवेश,' 'विचार–विलास,' 'रागिणी' वगैरे पुस्तकें अगत्यपूर्वक वाचलीं जात, आणि या अर्थानें त्यांना खरोखरच 'घरचे तत्त्वज्ञानी' म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

रा. नवरे मास्तर वामनरावांना 'पुण्याचे प्लेटो' असें म्हणतात. वामनरावांना 'प्लेटो' म्हणण्यांत रा. नवरे यांनीं त्यांचा मोठाच गौरव केला आहे. पण 'पुण्याचे' असें एक विशेषण घालून त्यांनीं त्या 'प्लेटोला' उगीचच स्थानबद्ध केलें आहे. वामनराव हे पुणें, मुंबई, नागपूर, बडोदें, ग्वालेर, गोवें वगैरेंपैकीं कोणत्याहि एकाच प्रांताचे नसून ते सार्वप्रांतीय व बृहन्महाराष्ट्रीय होते. वामन-रावांपेक्षां जास्त विद्वान् व जास्त कलावंत असे दुसरे लेखक आहेत; पण जास्तींत जास्त लोकांना आवडणारे व आदरणीय वाटणारे असे कोणी लेखक असतील तर पहिले वामनराव आणि दुसरेहि...पण वामनरावच! प्लेटोच्या तत्त्वज्ञानानें व तें तत्त्वज्ञान त्यानें ज्या संवादशैलीनें मांडलें आहे त्या शैलीनें वामनरावांच्या मनाची अशी कांहीं पकड घेतलेली दिसते कीं त्यांचें बहुतेक लिखाण तत्त्वज्ञानात्मक व संवादस्वरूप झालें आहे. असो.

आतां शेवटीं वामनरावांच्या जीवनसंदेशासंबंधीं थोडेसें सांगून आटोपतें घ्यावयाचें.

वामनरावजींचा जीवनसंदेश–पण या 'संदेश' शब्दावरूनच वामनरावजींसंबंधीं एक गोष्ट मला आठवते. कांहीं कॉलेज–विद्यार्थिनी एकदां वामनरावांकडे त्यांचा

संदेश घेण्याकरितां आल्या व त्यांनीं आपल्या त्या छोट्या वह्या त्यांच्यापुढें धरल्या. त्यांतली एक घेऊन व जरा चाळून वामनरावांनीं आपल्या नेहमींच्या प्रेमळ मिष्कीलपणानें विचारलें, "आजपर्यंतच्या संदेशांचें काय केलेंत ?" जिची ती वही होती ती बिचारी बोलून गेली, "ते सगळे जुन्या वहींत आहेत." वामनराव हंसले व जरा गंभीरपणें म्हणाले, "संदेश वहींत नसतात ठेवायचे, मनांत बाळगायचे असतात नि शक्य तों आचरणांत आणावयाचे असतात. बरं, पण मीं हल्लीं निव्वळ संदेशाकरितां संदेश द्यावयाचे नाहींत असं ठरवलं आहे. ज्यांना ते हवे असतील त्यांना ते माझ्या वाङ्मयांतून मिळवितां येतील." असें सांगूनहि शेवटीं वामनरावांनीं त्या विद्यार्थिनींना संदेश दिले असले (आणि त्यांच्या स्वभावाचें हें एक वैशिष्ट्यच होतें) तरी सर्वसामान्य संदेशांसंबंधीं वामनरावांनीं जो हा विशेष संदेश दिला आहे तो विचार करण्यासारखा आहे यांत शंका नाहीं.

वामनरावांनीं त्या विद्यार्थिनीला जें सांगितलें तें आपणांसहि लागू पडत असल्यामुळें त्यांच्या संदेशांसाठीं आपल्याला त्यांचें जीवन व वाङ्मय पाहिलें पाहिजे. पण इतकेंहि करण्याचें कारण नाहीं. त्या दोहोंपैकीं कोणतेंहि एक पाहिलें तरीहि भागण्यासारखें आहे. कारण त्यांच्या जीवनांत व वाङ्मयांत फारसा फरक नव्हता नि विरोध तर नव्हताच नव्हता. वामनराव सबाह्यान्तर एक होते. त्यांना जें मनांतून वाटे तेंच ते बोलत किंवा लिहीत, नि ते जें बोलत किंवा लिहीत, तेंच ते आचरीत. वाङ्मयांत एक नि जीवनांत भलतेंच असें वामनरावांचे बाबतीत दिसायचें नाहीं. त्यांचें वाङ्मय त्यांच्या जीवनांतून उत्स्फूर्त झालें होतें; त्यांचें जीवन त्यांच्या वाङ्मयांतून आविष्कृत झालें होतें. तेव्हां, त्यांच्या जीवनाचें अवलोकन केलें म्हणजे आपणाला हवे असलेले संदेश आपोआप मिळतील.

वामनरावांचे जीवनाकाशांत ढगांचे गडगडाट व विजांचे चमचमाट—किंवा नाट्याचे भाषेंत बोलायचें म्हणजे त्यांच्या भूमिकेंत भीमदेवी भाषणें व तरवारीचे खणखणाट—फारसे नसल्यामुळें त्यांचेकडे वरवर पाहणाराचें मन तितकेंसें आकर्षित होत नाहीं. त्यांच्या आयुष्यांत फारशा मोठ्या घडामोडी झालेल्या दिसत नसल्यामुळें ते चारचौघांच्या आयुष्याप्रमाणें मंद, सपक व स्थित्यात्मक दिसतें. पण वास्तविक तें तसें नाहीं हें जरा बारकाईनें पाहाणाराला तेव्हांच आढळून येईल. त्यांना जीवनांत खेळाव्या लागणाऱ्या झटापटी व लढाव्या लागणाऱ्या लढाया, त्यांच्या कादंबऱ्यांतील नायकनायिकांना कराव्या लागणाऱ्या झगड्यांप्रमाणेंच केवळ बाह्य व शारीरिक

स्वरूपाच्या नसून त्या आंतरिक म्हणजे बौद्धिक व नैतिक स्वरूपाच्या होत्या. सरकारी नोकरीचें सुस्थिर, सुखाचें व शांत जीवन भोगायचें कां राजकारणाचें अस्थिर, धकाधकीचें व भगभगीचें जिणें कंठायचें ? मूक वृत्ति धारण करून सरकारी व संस्थानी रोषापासून स्वतःची कातडी वचावयाची का गुरुजनांना वांचविण्याकरितां स्वतःची मान द्यावयाची ? वरिष्ठांच्या चुकीच्या सांगण्यालाहि मान तुकवून अपमानाचें पण सुस्थिर जीवन जगावयाचें का त्याचा प्रतिकार करून मानाचें पण अस्थिर आयुष्य घालवायचें ? राजकीय क्षेत्रांत राहूनच थोडीफार चळवळ करून पुढारी म्हणून लोकांचे पुढें मिरवायचें का स्त्रीशिक्षणासारख्या उपेक्षित कार्याला वाहून घेऊन गाजावाजा न करतां मागचे मागें राहायचें ? स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीला पटेल त्याचाच पुरस्कार करीत राहून सहकाऱ्यांचा विरोध पत्करायचा का शिस्तीच्या व एकीच्या नांवाखालीं नमतें घेऊन स्वतःच्या बुद्धीशीं द्रोह करायचा ? सत्यासत्याची सूक्तासूक्ताची फारशी कदर न करतां येन केन प्रकारेण पैसा, पदवी व प्रसिद्धि मिळवायाची का नीतीनें, मानानें व सौजन्यानें वागून 'ठेविलें अनंतें तैसेंचि' राहायचें ? निव्वळ रंजविणारे व रिझविणारें ललितलुलित लिखाण लिहून सवंग लोकप्रियता मिळवायची का ध्येयदर्शी सात्त्विक व सोज्ज्वल वाङ्मय निर्माण करून मिळेल त्या मानावर व धनावर समाधान मानायचें ? अशा नाना प्रकारच्या बौद्धिक खटक्यांनीं, मानसिक झगडयांनीं व नैतिक द्वंद्वांनीं वामनरावांचें आयुष्य व्याप्त झालें होतें.

सदरहूसारखीं द्वंद्वें लढून जिंकणें क्लेशदायक तर खरेंच, पण हीं द्वंद्वें सत्य–असत्य, न्याय्य–अन्याय्य, उच्च–नीच अशा विजातीय व परस्परविरुद्ध घटकांचीं असल्यामुळें तीं लढणें इतकेसें कठीण व दुःखाचें नसतें. पण जेव्हां का सत्य आणि सत्य, न्याय्य आणि न्याय्य, उच्च आणि उच्च अशा सजातीय व सदृश घटकांमधेंच खटके उडतात आणि त्यांतील तर–तम ठरवायचे प्रसंग येतात, तेव्हां बुद्धीला पडणारा ताण व मनाला होणारे क्लेश अत्यंत तीव्र असतात. वामनरावांचे आयुष्यांत हे दुसऱ्या प्रकारचे नाजूक खटकेच फार उद्‌भवत. ते इतके नाजूक असत कीं, ते दुसऱ्या कोणाला सहसा कळत नसत नि कळले तरी शब्दांनीं सांगतां येत नसत. अशा खटक्यांच्या सामान्य स्वरूपाचें दिग्दर्शन आपल्या कादंबऱ्यांतील नायक–नायिकांचीं जीवनचित्रें रंगवितांना स्वतः वामनरावांनांच करून ठेवलें आहे. उत्तरा–रागिणी, गभस्तिगति–धौम्य, सुनंदा–बाळू, नारायणराव–विनायकराव,

इंदू–सरला वगैरेसारख्या जोड्या निर्मून, त्यांतील दोन्ही तुल्यबल आणि तितक्याच आकर्षक पात्रांमधील विरोधाचीं सुंदर सुंदर वर्णनें करतांना वामनरावांनीं स्वतःच्या जीवनांतील द्वंद्वांचे व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या मानसिक क्लेशांचेच कांहीं नमुने दाखविले आहेत असें मानण्यास हरकत नाहीं.

वामनरावांना सत्य हें सर्वत्र दिसत असल्याकारणानें त्यांना सर्वच व्यक्ती व सर्वच पक्षोपपक्ष आपआपल्यापरी बरोबर वाटत. सत्याप्रमाणेंच–किंबहुना थोडें जास्तच–सौन्दर्य व सौजन्य यांकडेहि त्यांचें मन ओढ घेई. मनुष्य हा मूलतः वाईट नाहीं, वाईट असलाच तर तो परिस्थितीमुळें तसा बनलेला असतो असें मानण्याकडे त्यांच्या मनाचा कल असे. माणसाचीं मतें हीं परिस्थितिसापेक्ष व म्हणून अनित्य अशीं असल्यामुळें, वामनराव त्याच्या मतांपेक्षां त्याच्या मनाला व त्यांतील त्याच्या माणुसकीला मान देत. जगांतील बहुतेक भांडणें माणसाचें अज्ञान, त्याचे गैरसमज, त्याच्या मनांतील अढ्या व तेढी वगैरेंत उगम पावत असल्यामुळें, हे उगमच शक्यतों लवकर व शक्य त्या मार्गानें नाहींसे करणें अत्यंत अगत्याचें आहे असें वामनरावांना वाटे. कोणत्याहि प्रश्नाचा विचार करतांना वामनराव त्याच्या अंगोपांगांकडे व मुळांकडे जात. त्यांना वादविवाद करतांना जरी कधीं कधीं कठोर व्हावें लागलें तरी एरवीं वागतांना ते मृदु व प्रेमळपणें वागत. वामनरावांचे ठिकाणीं उत्कृष्ट खेळाडूचा दिलदारपणा असल्यामुळें प्रतिपक्षांतील गुण घेण्यासहि ते सदैव तयार असत. त्यांची बुद्धि जात्या तत्त्वगामी असल्यामुळें त्यांचें लक्ष बाह्य गोष्टींकडे जात नसे. बुद्धिप्रामाण्यावर भिस्त असली तरी मनांतून ते भावनेला मान देत. विद्वान् प्राध्यापक व प्रेमळ आचार्य म्हणून विद्यार्थिनींना ते अति प्रिय वाटत. आपल्या न्याय्य व स्निग्ध स्वभावामुळें ते सर्वांना एकत्र व गुण्यागोविंदानें वागायला लावीत. नव्या–जुन्या, सनातनीसुधारक इत्यादि प्रकारच्या सर्वच व्यक्तींना ते सारखेच प्रिय व आदरणीय वाटत. अशा कितीतरी गोष्टी वामनरावांच्या स्वभावाच्या निदर्शक म्हणून सांगतां येतील. वामनरावांचें जीवन हें असें उदात्त पवित्र व विविध रूपाचें आहे तसेंच अर्थात त्यांचें वाङ्मयहि आहे.

वामनरावजोंचा जीवनसंदेश सांगायचें ठरविलें खरें, पण तें जीवन इतकें विशाल आहे व आपल्याला हवे असलेले संदेश त्यांत इतके मुबलक व जागजागीं विखुरलेले आहेत कीं, त्यांपैकीं कोणते घ्यावयाचे व कोणते वगळायचे हें सांगणें कठीण आहे. ज्याला त्याला आपल्या बुध्यनुसार व वृत्त्यनुसार त्यांची निवड करितां येईल.

तथापि, संदेश स्वरूपाचें असें त्यांचें कांहीं सांगावयाचें झाल्यास, त्यांनीं स्वतःच प्रो. विजापूरकरांच्या मृत्यूनंतर त्यांचेसंबंधीं जें म्हटलें आहे, तेंच सांगतां येईल. ते लिहितात—

"अण्णांच्यासारख्यांचे गुण हे कित्येक वेळां दोषस्वरूप होत हें म्हणणें व्यर्थ आहे. जगांत ज्यानें त्यानें आपलें ध्येय निश्चित करून तन्निष्ठ रहावें व यथामति तत्सिध्यर्थ कार्य करीत रहावें हाच धर्मशास्त्राचा अंतिम सिद्धान्त. अण्णासारख्यांचें स्मरण आपणांस पुनीत करतें, त्यांचीं चरित्रें आपणांस " दुःखांना भितां काय! दुःखें येतील आणि जातील; प्राण देखील जावयाचे आहेत; मग सुखदुःखांचें काय? जगांत कोठें चिरंतनत्व असेल तर तें सद्बुद्धींत व सत्कार्यांत आहे." असें सांगतात व आपलें अंगीकृत कार्य उत्साहानें, नेटानें, चिकाटीनें, संकटांना धैर्यानें तोंड देऊन, नैराश्याला कधीं बळी न पडतां, शांतपणें, धिमेपणानें, निरभिमानपूर्वक, चंद्रसूर्याप्रमाणें, *Without haste without rest* करीत रहावें असें बजावतात; तेव्हां हा उपदेश वंद्य समजून स्वीकृत उचित कार्यास लागावें हें बरें."

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, वामनरावांत अतिमानुष अगर दैवी असें कांहींच नव्हतें; जें होतें तें मानवस्वरूपाचेंच, पण जास्त विशुद्ध, जास्त उदात्त, जास्त मंगल व जास्त पवित्र असें होतें. त्यांचीं सुखदुःखें, त्यांच्या आशा–आकांक्षा, सर्व कांहीं मानवी होतें. अशा या मानवी वामनरावांना शेवटीं नमस्कार करून मी हें प्रकरण व त्यांचें हें चरित्रहि पुरें करितों.

## जीवन-पट

| | | |
|---|---|---|
| १८८२ | जानेवारी २१ | जन्म. |
| १८८८ | | वडिलांचा मृत्यु. |
| १८९२ ते १८९७ | | न्यू प्रिपेरेटरी क्लासेस. |
| १८९८ ते १९०० | | नगर सोसायटी हायस्कूल मॅट्रिक्युलेशन |
| १९०१ | | प्रीव्हिअस. |
| १९०२ | | इंटर, विवाह. |
| १९०३ १९०४ | | बी. ए. |
| १९०५ | | पहिला लेख. |
| १९०६ | | एम्. ए., कलकत्ता-कॉंग्रेस; विजापूरकरांची गांठ; समर्थ-विद्यालयाची स्थापना; विश्ववृत्त. |
| १९०७ | जून | समर्थ विद्यालयाला मिळतात. |
| ,, | आगस्ट | समर्थ विद्यालयाचें मिरजेस स्थलान्तर. |
| ,, | नोव्हेंबर | समर्थ विद्यालयाचें तळेगांवास स्थलान्तर |
| १९०८ | आगस्ट | विश्ववृत्त खटला. |
| १९०९ जानेवारी ते १९११ आक्टोबर | | शिक्षा, तुरुंगवास. |
| १९१२ (अखेर) | | आर्यभूषण-कोषाचें काम. |
| १९१३ ते १९१५ अखेर | | केसरी-मराठा. |
| १९१६ जून ते १९१७ अखेर | | मेसेज. |
| १९१८ | जून | हिंगणें येथें आगमन–प्रोफेसर महिलापाठशाळा. |

| | | |
|---|---|---|
| १९१९ | जानेवारी | पत्नीचा मृत्यु. |
| १९२० | | आजन्म सेवकाची दीक्षा. |
| १९२७ | | सुपरिंटेंडेंट महिलाश्रम. |
| १९२८ | एप्रिल १६ | म. म. जोशी यांचा मृत्यु. |
| १९३० | | गोव्याच्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष. |
| १९४१ | | प्रिन्सिपल–महिला पाठशाळा. |
| १९४३ | जानेवारी २१ | एकसष्टी–समारंभ. |
| १९४३ | जुलै २० | मृत्यु. |

RLFBK 0019256

# आगामी प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )
१४ पहिली लाट
१५ कल्पलता
१६ हिरवा चाफा ( दु. आ. )
१७ दोन ध्रुव „
१८ सुवर्णकण

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ती उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

## ना. धों. ताम्हनकर

१ निवांडे भा. २ रा
२ गुजाताई
३ शेजारी

## प्र. के. अत्रे

१ ' मी ' कसा झालो
२ शब्दचित्रें

## कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटश्रेष्ठ

## दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब

## कुसुमावतीबाई देशपांडे

१ मोळी

## शकुंतला परांजपे

१ चांदणी

## ना. ह. आपटे

१ साजणी

१ ? आचार्य भागवत
१ ? क्षमाबाई राव

## साने गुरुजी

१ गोड निबंध भा. १-२-३